**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

पृ. शी. : शासनाने राज्यातील काही भागात विशेष आर्थिक क्षेत्र राबविण्याचा घेतलेला निर्णय.

मु. शी. : शासनाने राज्यातील काही भागात विशेष आर्थिक क्षेत्र राबविण्याचा घेतलेला निर्णय या विषयावर डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री मधुकर चव्हाण, जयंत पाटील, डॉ. दीपक सावंत, श्रीमती मंदा म्हात्रे, श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री संजय केळकर, पाशा पटेल, कपिल पाटील, रणजितसिंह मोहिते-पाटील, संजय दत्त, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**उपसभापती** : काल माननीय सभापतींच्या आदेशानुसार या विषयाच्या संदर्भातील अर्धा-तास चर्चेचे रुपांतर अल्पकालीन चर्चेमध्ये केलेले आहे. या अल्पकालीन चर्चेसाठी मी दोन तास वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सदस्य श्री. जयंत पाटील आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो.

"शासनाने राज्यातील काही भागात व विशेषतः नवी मुंबई, पनवेल आदि भागात विशेष आर्थिक क्षेत्र (एसईझेड) राबविण्याचा घेतलेला निर्णय, विशेष आर्थिक क्षेत्रासाठी सुमारे 40 हजार हेक्टर जमिनीची आवश्यकता असून नवी मुंबईला विशेष आर्थिक क्षेत्रात रिलायन्स उद्योग समुहासाठी सुमारे 2200 हेक्टर जमीन लागणार असून नवी मुंबई पनवेल आदि भागातील शेतकऱ्यांच्या सुपिक जमिनी अत्यल्पदराने संपादन करण्याबाबत शासनाने सुरु केलेली कारवाई, रिलायन्सच्या व इतर उद्योगांसाठी लागणाऱ्या जमिनीपेक्षा कितीतरी अधिक जमीन संपादित करण्यात येऊन ती अतिरिक्त जमीन रिलायन्स आदि कंपन्यांना विकण्याची शासनाने दिलेली मुभा, नवी मुंबई येथील सध्या सिडको व रिलायन्सच्या मालकीच्या जमिनीचा भाव प्रति हेक्टरी एक कोटी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

श्री. जयंत प्र. पाटील ......

रुपये असणे, परंतु तेथील स्थानिक शेतकऱ्यांची जमीन फक्त हेक्टरी अडीच लाख रुपये या दराने घेण्यात येणे, अशा प्रकारे शेतकऱ्यांची शासनाच्या मध्यस्थीने करण्यात येणारी लूट व याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, विशेष आर्थिक क्षेत्राबद्दल शासनाचे जे धोरण आहे त्याबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, हे केंद्र सरकारचे धोरण आहे. परंतु आपल्या राज्यामध्ये या विशेष आर्थिक क्षेत्रातील कामगारांसाठी वेगळा कायदा आपण पास केलेला आहे. या विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये आपण कामगारांना संरक्षण ठेवलेले नाही. सभापती महोदय, विशेषकरुन या राज्यातील ज्या जिल्ह्यांमध्ये हे विशेष आर्थिक क्षेत्र होणार आहे त्यामध्ये आमचा रायगड जिल्हा आहे. त्या ठिकाणी 45 गावामध्ये हे विशेष आर्थिक क्षेत्र होत आहे. या 45 गावांपैकी 20 गावांमधील संपूर्ण जमीन ओलिताखाली येणारी आहे. विशेष आर्थिक क्षेत्रासंबंधीचे जे नॉर्म्स दिलेले आहेत त्यामध्ये जी पिकाऊ जमीन आहे, जी सुपीक जमीन आहे, ती घेऊ नये अशा गाईड लाईन्स केंद्र शासनाच्या धोरणामध्ये दिलेल्या आहेत. त्या गाईड लाईन्स राज्य शासन विसरले आहे काय ? या 45 गावातील शेतकऱ्यांनी विरोध केला. या 45 गावातील शेतकऱ्यांचा एक विराट मोर्चा आम्ही कोकण भवनावर काढला होता. डाव्या आघाडीचे नेते श्री. सिताराम येचुरी यांनी त्या मोर्चाचे नेतृत्व केले होते. जवळजवळ 1 लाख शेतकरी त्या ठिकाणी रस्त्यावर आले आहे. याचे कारण असे की, राज्य शासनाने सिडकोच्या निमित्ताने ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या त्या शेतकऱ्यांचे पुनर्वसन अजूनही 35 वर्षामध्ये झालेले नाही. शेतकऱ्यांच्या वतीने अनेकवेळा आंदोलने झाली. 1984 सालच्या शेतकऱ्यांच्या आंदोलनामध्ये 5 शेतकरी धारातीर्थी पडले. अजूनही त्यांचे पुनर्वसन झालेले नाही. त्यांच्या साडेबारा टक्के जमिनीच्या बाबतीत तसेच त्यांचा रोजगार, त्यांचा प्रपंच याबाबतीत कोणताही प्रश्न सोडविण्यात आला नाही. या 45 गावातील शेतकरी भयभीत झालेले आहे. या विशेष आर्थिक क्षेत्राबाबत माननीय मंत्रिमहोदयांनी भरपूर अभ्यास केला आहे. ती जमीन आपण 2 लाख रुपये ते 3 लाख रुपये हेक्टर या भावाने घेणार. त्या जमिनीचा विकास करण्यासाठी 25-30 लाख रुपये, 40 लाख रुपये खर्च करणार आणि विशेष आर्थिक क्षेत्रातील मालक उद्योगांना ती जमीन 4 कोटी रुपये एकर या भावाने भाडे तत्वावर देणार.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 10:35

(श्री. जयंत प्र. पाटील...)

म्हणजे नफ्याचे प्रमाण हे 200 टक्क्या पेक्षा जास्त आहे. यावर राज्य शासन काही बंधन घालणार आहे की नाही ? आमच्या रायगड जिल्ह्यातील समुद्र आम्हाला वरदान आहे की शाप आहे असा प्रश्न आम्हाला पडलेला आहे. आमच्या रायगड जिल्ह्यातील सर्व जमिनी घेण्याचा शासन प्रयत्न करीत आहे. अलिबाग तालुक्यातील 40 गावे म्हणजे अर्धा तालुका हा विशेष आर्थिक क्षेत्रासाठी घेतलाला आहे. विमानतळ, बंदर, आर.सी.एफ.साठी जमिनी घेतल्या. कृषी मंत्री महोदय श्री. बाबासाहेब थोरात यांना मी सांगू इच्छितो की, त्याठिकाणी जमिनीच शिल्लक राहिल्या नाहीत तर आम्हाला तुमच्या अहमदनगर जिल्ह्यात यावे लागेल अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. परंतु अहमदनगर जिल्ह्यामध्ये समुद्र नसल्यामुळे आणि आम्ही मासेमारी करणारे लोक असल्यामुळे आम्हाला तेथे समुद्रही न्यावा लागेल. शासन शेतक-यांच्या जमिनी संपादित करते आणि त्या जमिनी तशाच ठेवते. विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये समुद्र किनारा पाहिजे, बंदर पाहिजे, विमानतळ पाहिजे येथ पर्यंन्त ह्या गोष्टी आम्हाला मान्य आहेत. परंतु जमिनी संपादित करुन त्या तशाच ठेवणे हे योग्य नाही. रायगड जिल्हयात पंचतारांकित एमआयडीसीसाठी जमिनी ताब्यात घेतल्या. महाडमधील शेतक-यांची 3 हजार एकर जमीन मातीमोल किंमतीने शासनाने संपादित केली. माणगाव तीलुक्यातील 3 हजार एकर जमीन संपादित केली. त्या जमिनी तशाच पडून आहेत. अलिबाग तालुक्यात भेल आणि एसपीअे हे दोन प्रकल्प आणले. त्यासाठी साडेतीन हजार एकर जमीन संपादित केली. आता जमिनीच्या व्यवहारावर बंदी आणून शासन नव्याने जमिनी ताब्यात घेत आहे. पण मी या निमित्ताने शासनाला सांगू इच्छितो की, रायगड जिल्ह्यातील एक तसूभर देखील जमीन आम्ही राज्य शासनाला घेऊ देणार नाही. लोक रस्त्यावर येतील, आंदोलने छेडतील, पण शासनाला जमीन काही संपादित करु देणार नाही अशा प्रकारचा निर्धार तेथील शेतक-यांनी केलेला आहे. याबाबतीत शासनाचे नक्की धोरण काय आहे ? शासनाच्या उद्योग आणि महसूल या दोन विभागामध्येच समन्वय नाही. महसूल मंत्री श्री. नारायण राणे यांनी सांगितले की, 20694 एकर जमीन संपादित केली जाईल तर उद्योग मंत्री श्री. अशोक चव्हाण यांनी आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये सांगितले आहे की, 29250 एकर जमीन संपादित केली जाईल. शासनाचेच एक खाते

..2..

(श्री. जयंत प्र. पाटील...)

एक सांगते तर दुसरे खाते वेगळे सांगते. अलिबाग तालुक्यामध्ये हे विशेष आर्थिक क्षेत्र होत आहे. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर आंब्याच्या बागा आहेत. देवगडच्या आंब्याच्या आधी अलिबाग तालुक्यातील हाशिव-याचा आंबा बाजारात येतो. डिसेंबर महिन्यामध्ये हा आंबा बाजारात येतो आणि 5 हजार रु. डझन या भावाने तो विकला जातो. मारुतीमास्तर नावाच्या शेतक-याने 200 एकरामध्ये आंब्याची लागवड केलेली असून ते डिसेंबर महिन्यामध्ये आंबा बाजारात आणतात. अलिबाग तालुक्यामध्ये जसे बागायती क्षेत्र आहे त्याप्रमाणे तेथे मत्स्योत्पादन देखील मोठ्या प्रमाणावर होते. तेथील शेती दुपिकी आहे. असे क्षेत्र हे शासन ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत आहे. हे राज्य शासन कोण चालवित आहे ? हे राज्य शासन रिलायन्स कंपनी चालवित आहे, अशा प्रकारची शंका आमच्या मनात निर्माण झालेली आहे. पेण तालुक्यातील जमिनी मुकेश अंबानी आणि अलिबाग तालुक्यातील जमिनी अनिल अंबानी खरेदी करीत आहेत.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MHM/ 10:40

श्री.जयंत प्र.पाटील.........

सभापती महोदय, काल मंत्रीमहोदयांनी सांगितले की, शेतकऱ्यांनी डायरेक्ट जमिनी दिल्या तर शासन काय करणार? मंत्रीमहोदयांना मी सांगू इच्छितो की, तसे होत नाही. औद्योगिक वापरासाठी जमिनी कोणत्या संपादित करायच्या, शेतजमिनी कुळांना कशा विकत द्यायच्या हे धोरण उद्योग विभागाकडून राबविले जाते. त्यामुळे मंत्रीमहोदयांना अशा प्रकारे स्टेटमेंट करण्याचा अधिकार नाही. जमिनी विकल्या तर आम्ही काय करणार? आज जे गरीब आहेत, ज्यांच्याकडे दारिद्र्य आहे त्यांच्या गरीबीचा आणि दारिद्र्याचा फायदा घेऊन भांडवलदार जमिनी विकत घेत आहेत. म्हणूनच आमचा विरोध आहे. जमीन जयंत पाटील विकत नाही. गरीब माणूस आहे तो गरीबीमुळे जमीन विकतो आहे. त्याला संरक्षण द्यायची जबाबदारी शासनाची आहे. या एसईझेडमुळे मोठा संघर्ष निर्माण होणार आहे.

सभापती महोदय, रायगड जिल्हयातील तसूभरही जमीन कोणत्याही परिस्थितीत आम्ही संपादित करु देणार नाही. ज्यावेळी आम्ही मोर्चा काढला होता त्याकरीता आमचे नेते श्री.सीताराम येचूरी मुंबईमध्ये मोर्चासाठी आले होते. त्यांच्याबरोबर मी दिल्लीला गेलो. दुसऱ्या दिवशी श्रीमती सोनिया गांधी यांची भेट घेतली. माझे मित्र श्री.वायलर रवी आमच्यासोबत होते. आम्ही आमची भूमिका स्पष्ट केली. दुसऱ्या दिवशी कॉंग्रेस पक्षातर्फे स्टेटमेंट करण्यात आले. खुद्द श्रीमती सोनिया गांधी यांनी स्टेटमेंट केले. सुपीक आणि दुपिकी जमीन घेतली जाणार नाही. मग कोणाच्या आदेशाने सरकार चालविणार आहात? श्रीमती सोनिया गांधी यांच्या आदेशाने की रिलायन्स कंपनीच्या सल्ल्याने चालविणार आहात? सभापती महोदय, मी निश्चितपणे सांगतो की, एसईझेड प्रकल्प करावयाचा असेल तर सन्माननीय मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांच्या जिल्हयात उभारला जावा. अहमदनगरमध्ये त्यांच्या मोठ्या प्रमाणात पडिक, दुष्काळी व ओसाड जमीन आहे. मी सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांना सांगू इच्छितो की, डाव्या आघाडीचा एसईझेडला विरोध नाही. प्रत्येक वेळी सांगण्यात येते की, आम्ही विकासाला विरोध करतो. माझे आवाहन आहे, विकास करावयाचा असेल तर नापिकी जमिनी ताब्यात घ्या. पश्चिम बंगालमध्ये एसईझेड सरकारी जमिनींवर उभारले जात आहेत. मध्यंतरी उद्योगमंत्री चीनमध्ये गेल्याचे वृत्तपत्रात मी वाचले. मी स्वत: चीनमध्ये गेलो होतो, शांघायला गेलो होतो. चीनमधील ग्रामीण भागामध्ये फिरलो. चीनमध्ये नवीन शहर तयार करावयाचे असेल, एसईझेड करावयाचे असेल तर त्या क्षेत्रापासून पुढील 70

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील........

कि.मी.पर्यंतच्या भागातील सर्व खेडी उठविली जातात. त्या खेडयांमध्ये राहणाऱ्या नागरिकांचे प्रथम पुनर्वसन केले जाते. सगळया सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात आणि नंतरच नवीन शहर किंवा एसईझेड उभारले जाते. त्यामुळे आज जगामध्ये चीन या देशाने प्रगती साधली आहे. याचा अभ्यास मंत्रीमहोदयांनी केला आहे की नाही? राज्य शासनाने केला आहे की नाही? परदेश दौरे काढले जातात त्या दौऱ्यामध्ये त्या त्या देशातील सामाजिक, औद्योगिक भरभराट आणि त्यात जनतेचा असलेला सहभाग, जनतेबद्दलची सहानुभूती याचा कोणताही अभ्यास शासनाचे प्रतिनिधी म्हणून केलेला नाही. मंत्रीमहोदयांनी सांगितले की, फक्त मालाची आयात निर्यात होणार आहे. सभापती महोदय, तसे नाही. तेथे उत्पादित होणारा माल निर्यात होणार नसेल तर आणि तो या देशात विकावयाचा असेल तर त्यावर ड्युटी भरावी लागणार आहे. तेथे उत्पादित होणारा माल या देशामध्ये सुध्दा विकता येईल. म्हणूनच आमचे म्हणणे आहे की, यासंदर्भात उद्योग विभागाने पूर्ण अभ्यास केलेला दिसत नाही.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. अरविंद सावंत )**

श्री. जयंत पाटील ....

त्या दृष्टीकोनातून माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे विशेष आर्थिक क्षेत्र यावे याला आमचा विरोध नाही. परंतु, केंद्र शासनाच्या विशेष आर्थिक क्षेत्राच्या संदर्भात ज्या गाईडलाइन्स आहेत त्या प्रमाणे काम केले जाणार आहे का ? यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तराच्या भाषणात उल्लेख करावा अशी माझी विनंती आहे.

या विशेष आर्थिक क्षेत्रात जे कामगार काम करणार आहेत त्यांना कोणत्याही प्रकारच्या मागण्या करण्याचा अधिकार राहणार नाही. यासंदर्भात शासनाने एक विधेयक अगोदर आणले होते त्यावेळी सुध्दा आम्ही या विधेयकाला विरोध केलेला आहे आणि आताही आम्ही यासंदर्भात विरोध करणार आहोत. या विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये वीज, डीझेल, पेट्रोल लागणार आहे त्यावर शासनाला कोणत्याही प्रकारचा टॅक्स लावता येणार नाही. या ठिकाणी जर आपल्याला टॅक्स मिळणार नसेल तर राज्य शासनाचे उत्पन्न कसे काय वाढेल ? यासाठी राज्य शासनाने विशेष आर्थिक क्षेत्राच्या धोरणाचा पुर्नविचार करणे आवश्यक आहे. ज्या भागाचा विकास झाला नाही, ज्या ठिकाणी मोकळया जमिनी आहेत, ज्या ठिकाणी उद्योग गेलेले नाहीत अशा ठिकाणी विशेष आर्थिक क्षेत्राची निर्मिती करणे आवश्यक आहे. सभापती महोदय, विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील नगर, सोलापूर या ठिकाणी जर विशेष आर्थिक क्षेत्र तयार केले तर त्याचा चांगल्या प्रकारे उपयोग होऊ शकेल. या ठिकाणी जर बंदरामध्ये माल त्वरित जाऊ शकेल अशा प्रकारची दळणवळणाची सुविधा उपलब्ध करुन दिली तर त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल. त्यामुळे याबाबतीत आपण काय नियोजन केलेले आहे याची माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी या ठिकाणी देण्याची आवश्यकता आहे. विशेष आर्थिक क्षेत्र अलिबाग तालुक्यात जाहीर करतांना तेथील लोकप्रतिनिधींना आपण कोणत्याही प्रकारे विश्वासात घेतले नाही, तेथील ग्रामपंचायतींना विश्वासात न घेता नोटीफिकेशन काढण्यात आलेले आहे. विशेष आर्थिक क्षेत्राच्या संदर्भातील नोटीफिकेशन 27 ऑक्टोबरला काढण्यात आलेले आहे. या संदर्भातील नोटीफिकेशन कालच माझ्या हातात मिळालेले आहे. या ठिकाणच्या शेतक-यांना विश्वासात न घेतल्यामुळे या विशेष आर्थिक क्षेत्राच्या संदर्भात 10 हजार शेतक-यांनी आपला विरोध प्रदर्शित केलेला आहे. या ठिकाणच्या विशेष आर्थिक क्षेत्राच्या संदर्भात शासनाने कोणत्याही प्रकारचे नियोजन केलेले नाही, या ठिकाणच्या लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले गेले नाही त्यामुळे हे सरकार कोणाच्या तालावर

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...........

नाचते हा आमच्यासमोर प्रश्न पडलेला आहे. त्यामुळे या विशेष आर्थिक क्षेत्राच्या संदर्भातील संपूर्ण योजनेचा पुनर्विचार राज्य शासनाने करावा, यासंदर्भात ठिकठिकाणच्या लोकप्रतिनिधींशी चर्चा करावी व त्यानुसार धोरण ठरवावे अशी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------------

..3...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** ( श्री. अरविंद सावंत ) : अजून या चर्चेवर 11 सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत. साधारणत: 12.15 वाजता माननीय मंत्रीमहोदय या चर्चेला उत्तर देणार आहेत त्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, वेळेच भान ठेवून त्यांनी आपले विचार व्यक्त करावेत.

डॉ. नीलम गो-हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) :सभापती महोदय, काल विशेष आर्थिक क्षेत्राच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तर दिल्यानंतर माझ्या मनात काही प्रश्न निर्माण झालेले आहेत. काल विशेष आर्थिक क्षेत्राच्या संदर्भात अर्धातास चर्चा उपस्थित करण्यात आली होती परंतु माननीय सभापती महोदयांनी या चर्चेला अल्पकालीन चर्चेचे स्वरुप दिलेले आहे. या अल्पकालीन चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील,मधुकर चव्हाण, दीपक सावंत, डॉ. अरविंद सावंत तसेच श्रीमती मंदा म्हात्रे, ऊषा दराडे यानी या चर्चेला पाठिंबा दर्शविलेला आहे. तसेच या चर्चेला माननीय मांत्रीमहोदयांनी वेळ दिल्यामुळे मी त्यांचेही आभार मानते.

काल माननीय मंत्रीमहोदयांनी सभागृहात असे आश्वासन दिलेले आहे की, ज्या ठिकाणी नापिकी जमीन असेल त्याच ठिकाणी एसईझेड उभारण्याची शासनाची भुमिका आहे. तसेच या दृष्टीने शेतक-यांच्या हिताचे संरक्षण केले जाईल . त्यामुळे यासंदर्भात मला असे विचारावयाचे आहे की, सर्वसाधारण धोरणांची सांगड आणि त्यासंदर्भात आश्वासन माननीय मंत्रीमहोदयांनी दिले तर सर्वसामान्य जनतेला दिलासा मिळू शकेल. पुणे जिल्हयातील खेड, राजगुरुनगर या ठिकाणच्या जमिनी सुपीक आहेत तसेच तसेच नवी मुंबईतील भागात मोठया प्रमाणात भातशेती केली जाते . त्यामुळे ज्या ठिकाणी जमिनी नापिकी आहेत अशा ठिकाणी जर एसईझेडचा प्रकल्प घेतला तर तेथील जनतेला दिलासा मिळू शकेल.  एसईझेड नाकारण्याचा अधिकार राज्याकडे आहे आणि तो अधिकार राज्याकडे नसेल तर त्याबाबतीत केंद्र शासनाकडे मागणी केली पाहिजे असा माझा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल साहेबांनी नॅशनल सेंटर फॉर ॲडव्होकसीने उपलब्ध करुन दिलेली माहिती नेटवरुन घेतलेली आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.....

ज्या शेतकऱ्यांना हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी कशाप्रकारे हरकत घ्यावयाची याचा देखील नमुना दिलेला आहे. मला या निमित्ताने सांगावयाचे आहे, जर काही शेतकऱ्यांनी हरकत घेतली तर त्या हरकतीवर शासन कोणता निर्णय घेणार आहे ? शासनाची कोणती भूमिका राहणार आहे ? त्यांच्या हरकतींना कशाप्रकारे न्याय देणार आहात याबाबतीतची भूमिका शासनाने स्पष्ट करावी.

सभापती महोदय, ज्यांच्या जमिनी एसईझेडखाली येणार आहेत त्यांचे आपण पुनर्वसन करणार आहोत असे सांगण्यात आले. मंत्रिमहोदयांनी उत्तर देताना सांगितले होते की, पुनर्वसन हा विषय डॉ.पंतगराव कदम यांचेकडे आहे. परंतु मला सांगावयाचे आहे की, शासनाची ही सामुदायिक जबाबदारी आहे. तेव्हा मला शासनाला सूचित करावयाचे आहे की, पुनर्वसनाबाबत शासनाने कालबध्द कार्यक्रम आखला पाहिजे. या कार्यक्रमाच्या अनुषंगाने मी काही सूचना करणार आहे त्याचा शासनाने जरुर विचार करावा. पहिली सूचना म्हणजे, ज्यावेळी अमूक अमूक भाग एसईझ ेडखाली जाणार आहे, त्याबाबतची माहिती प्रथम सदनासमोर मांडली पाहिजे. जर ही माहिती मांडली नसेल तर का मांडली नाही याचे उत्तर मंत्रिमहोदयांकडून अपेक्षित आहे. तसेच एसईझ ेडखाली कोणकोणते भाग येणार आहेत यासंबंधीची माहिती देखील आजच्या आज सभागृहासमोर मांडली पाहिजे. यातील दुसरा भाग असा की, अमूक अमूक जमीन या -या उद्योगपतींनी एसईझ ेडखाली मागितली आहे, त्या संदर्भात अंतिम निर्णय घेण्या अगोदर त्याची माहिती तेथील स्थानिक लोकप्रतिनिधींना मिळावी अशी विनंती आहे. सभापती महोदय, पश्चिम बंगालमध्ये काय होते, काय होणार आहे या चर्चेत मला जायचे नाही. भूकबळी, दारिद्र्य यामुळे पश्चिम बंगालमधील मुली मुंबई-पुणे याठिकाणी नोकरीसाठी येत आहेत. सभापती महोदय, एसईझेड संदर्भात पुनर्वसनाबाबत महाराष्ट्र शासनाने एक आदर्श घालून द्यावा, पुनर्वसनाचा एक उत्कृष्ट नमुना घालून द्यावा. श्री.सीताराम येचुरी यांची कोणती भूमिका आहे ? या वादात मला जायचे नाही. एकीकडे एसईझ ेडला विरोध करायचा आाणि दुसरीकडे दलालांच्या संगनमताने आपला उद्देश साध्य करुन घ्यायचा ही आमची भूमिका नाही.

..2..

डॉ.नीलम गोऱ्हे.....

सभापती महोदय, जर खेड येथे एसईझेड करावयाचे असेल तर सर्वांना विश्वासात घेऊन निर्णय घ्यावा. जर त्या ठिकाणी नापिकी जमीन असेल तर त्या संदर्भात विचार होऊ शकतो. मला मंत्रिमहोदयांना सांगावयाचे आहे की, ज्या स्टेजला एसईझेडचा प्रस्ताव विचाराधीन असतो किंवा केंद्र सरकारकडून राज्य सरकारला एसईझेडबाबत विचारणा होते त्यावेळेला तेथील स्थानिक लोकांना, ग्रामपंचायतींना, स्थानिक लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले पाहिजे. ज्याप्रमाणे नियोजन मंडळाची अधिकृत बैठक होते त्याप्रमाणे बैठक घेऊन निर्णय घेण्यात यावा. त्यांना विश्वासात घेऊन सांगण्यात यावे की, तुमची जमीन एसईझेडखाली घेण्याचा विचार चालू आहे.

सभापती महोदय,ज्याप्रमाणे खाजगी विद्यापीठांचा प्रस्ताव ठेवण्यात आला त्यावेळेला एक प्रेझेन्टेशन ठेवण्यात येऊन त्यासंबंधीची सविस्तर माहिती देण्यात आली होती. त्याप्रमाणे एसईझेड संदर्भातील माहिती देण्यासाठी सर्वसामान्यासाठी एक प्रेझेन्टेशन ठेवण्यात यावे. या एसईझेडमुळे कोणकोणते फायदे होणार आहेत यासंबंधीची सविस्तर माहिती देण्यात यावी. एसईझेडमुळे कोणते विपरित परिणाम होणार आहेत याची देखील माहिती देण्यात यावी. सभापती महोदय, आजच्या वर्तमानपत्रात श्री.चंद्राबाबू नायडू यांचे एक स्टेटमेंट आलेले आहे. श्री.नायडू यांना उदारीकरणाचे प्रवर्तक मानले जाते. त्यांनी असे म्हटले आहे की, एसईझेडखाली ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी जाणार आहेत ते बेकार होणार असून अन्नधान्यावर देखील त्याचा विपरित परिणार होणार आहे." त्याचप्रमाणे ज्या शेतकऱ्यांना एसईझेडखाली त्यांच्या जमिनी द्यावयाच्या नसतील तर आपण त्यांचे संरक्षण कसे करणार आहात ? समजा पाच हजार शेतक-यांपैकी दोन हजार शेतकऱ्यांनी एसई झेडखाली जमीन द्यावयाचे नाकारले तर अशा शेतक-यांसाठी एक असोसिएशन, फेडरेशन किंवा कृषिसंघ स्थापन करुन जे एसईझेडचे मालक आहेत त्यांच्याबरोबर त्यांना थेट निगोशिएशन करण्याची सुविधा शासनाने निर्माण केली पाहिजे. कारण एकिकडे नंदनवन निर्माण करावयाचे व शेतक-यांना दंडकारण्यामध्ये ढकलावयाचे, अशी परिस्थिती निर्माण होणार नाही, याची काळजी शासनाने घेतली पाहिजे. ज्या शेतक-यांना जमिनी देण्याची इच्छा नाही त्यांना संरक्षणाची हमी मिळाली पाहिजे अन्यथा हिंसाचार होतो.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे ......

ज्यावेळी माणसे मृत्यूमुखी पडतात, काही कुटुंबे उद्‌ध्वस्त होतात, त्यावेळी लाख-दोन लाख रुपये मिळतात. परंतु मूळ प्रश्न तसाच कायम राहतो. म्हणून ज्या शेतकऱ्यांना जमिनी द्यावयाच्या नाहीत, त्यांना सरकारने संरक्षण दिले पाहिजे. सभापती महोदय, माझा चौथा मुद्दा असा आहे की, ज्याठिकाणी एसईझेड होणार आहे, त्याबाबतीत महाराष्ट्र शासनाने स्वत:ची शिफारस केंद्र शासनाकडे केली पाहिजे. त्याठिकाणचे स्थानिक स्वराज्य संस्थेचे अस्तित्व अबाधित राहिले पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थेमधील कार्यक्षेत्रामध्ये एसईझेड नियम लागणार आहेत. कुठल्या अधिकाराने आपण स्थानिक मतदारांच्या जमिनी ओरबाडून घेणार आहात ? त्यांच्या बाकीच्या सगळया प्रश्नांची जबाबदारीही एसईझेड घेणार आहे का ? आपण संपूर्ण स्थानिक स्वराज्य संस्थांमधील जमिनी एसईझेडसाठी घेणार आहात का ? त्याठिकाणच्या लोकांना आपण नोकऱ्या देणार आहात का ? त्याठिकाणच्या लोकांचे अस्तित्व अबाधित ठेऊन आपण एसईझेड करावे, असे मला वाटते. संभाजीनगरमध्ये एसईझेडचा प्रयत्न झालेला आहे. परंतु पूर्वी ज्या लोकांनी त्याठिकाणी उद्योग उभारले त्यांचे काय होणार ? तेथील कामगारांचे काय होणार ? याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे. म्हणून या चर्चेच्या निमित्ताने पक्षीय वादाच्या पलिकडे जाऊन सामान्य शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने पुनर्वसनाचे धोरण आणि कालबध्द कार्यक्रमाची हमी द्यावी, ही विनंती. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करते. धन्यवाद !

जय हिंद, जय महाराष्ट्र !

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत)** : सर्व सन्माननीय सदस्यांना मी पुन्हा सांगू इच्छितो की, माननीय सभापती महोदयांना शब्द दिल्याप्रमाणे वेळेचे भान ठेऊन सर्वांनी बोलावे. अजूनही बऱ्याच वक्त्यांची नांवे येत आहेत. कृपया मला सहकार्य करावे. आता सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे बोलतील.

श्रीमती मंदा म्हात्रे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, विशेष आर्थिक क्षेत्राबद्दल काल चर्चा झाली, आजही या चर्चेमध्ये भाग घेण्याच्या दृष्टीने मला संधी दिली त्याबद्दल मी आभारी आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती नीलमताई गोऱ्हे यांनी शेतकऱ्यांच्या पुनर्वसनासंबंधी सांगितले. मी याठिकाणी आपल्या व सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, ज्यावेळी मुंबईची जुळी बहीण म्हणून नवीन मुंबई निर्माण करण्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी सिडको आणि एमआयडीसीने संपादित केल्या. त्यावेळी जमिनी संपादित करत असताना शेतकऱ्यांना अनेक प्रोत्साहने देण्यात आली. आम्ही आपल्याला नोकऱ्या देऊ, दवाखाने उपलब्ध करुन देऊ अशाप्रकारची अनेक प्रोत्साहने देण्यात आली. त्यावेळी सिडकोने आणि एमआयडीसीने तेथील लोकांच्या जमिनी कवडीमोल भावाने खरेदी घेतल्या. परंतु आज तेथील 30 ते 35 हजार लोकांचे पुनर्वसन 35 वर्षे होऊनही झालेले नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्याठिकाणचा साडे बारा टक्क्यांचा प्रश्न तसाच आहे. ज्यावेळी जमिनी संपादित केल्या त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री माननीय श्री.शरदचंद्रजी पवार सोहब होते. ज्यावेळी त्यांच्या लक्षात आले की, जमिनी संपादित केल्यामुळे तेथील शेतकरी भूमिहीन झाले आहेत, त्यांची मिठागरे गेलेली आहेत. त्यामुळे त्यांना उत्पन्नाचे साधन शिल्लक नाही. अशावेळी शेतकरी वैफल्यग्रस्त होऊन आत्महत्या करु नयेत यासाठी त्यावेळी माननीय पवार साहेबांनी साडेबारा टक्क्यांचे नियोजन केले होते. परंतु आजपर्यंतही त्या जमिनींचे वाटप झालेले नाही. आपण रिलायन्स समुहाला 2200 हेक्टर जमीन देणार आहात, ती कुठून देणार आहात ? आजपर्यंत तेथील 30-35 हजार भूमिहीन लोकांना साडेबारा टक्क्यांची जमीन दिली गेली नाही. आज सिडको सांगत आहे की, आपल्याला देण्यासाठी आमच्याकडे जमिनी शिल्लक नाहीत. आज त्याठिकाणच्या गावांमध्ये सिडकोने कोणती सुविधा दिली आहे ? आज त्या ठिकाणच्या गावांमध्ये खेळासाठी मैदाने नाहीत, आरोग्याच्या सुविधा नाहीत,

..2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे....

गावांमध्ये साधी ॲम्ब्यूलंसही जात नाही, अशी परिस्थिती आहे. त्याठिकाणची 29 गावे दत्तक घेण्याच्या दृष्टीने त्यावेळी सिडकोने नियमावली दिली होती, त्याचे काय झाले ? तेथील प्रकल्पग्रस्तांना प्रशिक्षण देऊ, असे आश्वासन दिले होते, त्याचे काय झाले ? आजपर्यंत किती प्रकल्पग्रस्तांच्या मुलांना प्रशिक्षण देण्यात आले ? किती शेतकऱ्यांना नोकऱ्या दिल्या ? एमआयडीसीनेही कवडीमोल भावाने जमिनी संपादित केल्या होत्या. त्यावेळी त्यांनीही आश्वासन दिले होते की, याठिकाणी मोठमोठे प्रकल्प येतील, ते आपल्यानंतर आपल्या लोकांचा विकास होईल, परंतु प्रत्यक्षात काहीही झालेले नाही. त्यावेळी तेथील शेतकऱ्यांच्या जमिनी एमआयडीसीने आणि सिडकोने कवडीमोल भावाने खरेदी केल्या. आज त्याठिकाणी मोठमोठे उद्योग उभे राहिले परंतु त्याचा फायदा लोकांना झालेला नाही. आणि आज याठिकाणी पुनश्च एकदा रिलायन्सला उद्योगाच्या नावाखाली आपण त्याठिकाणच्या जमिनी देणार आहात. त्याठिकाणचे उद्योग बंद पडून आज तेथील शेतकरी बरोजगार होऊन घरी बसले आहेत. ज्या जमिनी आपण त्यावेळी कवडीमोल भावाने खरेदी केल्या, त्या आज करोडो रुपयांनी विकल्या जात आहेत. परंतु आज परत आपण रिलायन्सला जमिनी देणार आहात. परंतु आजपर्यंत किती शेतकऱ्यांना त्यांनी कामावर ठेवलेले आहे ? या जमिनी घेतल्यानंतर लोकांना कोणता न्याय मिळणार आहे ? याची शाश्वती आपण काय देणार आहात ?

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे........

आतापर्यंत नवी मुंबईमध्ये किती लोकांना रोजगार दिला गेला आहे ? याचा विचार करण्याची गरज आहे. रिलायन्सने नवी मुंबईमध्ये शेतक-यांची करोडो रुपये किमतीची जमीन घेतली, पण त्या बदल्यात शेतक-यांना काय मिळाले ? आता तर त्यांच्या नोक-याही गेलेल्या आहेत. नवी मुंबईमधील नोसीलसारखी मोठी कंपनी बंद पाडली गेली. स्टँडर्ड अल्कलीसारखी कंपनी बंद पाडली गेली. या सर्व कंपन्यांच्या जमिनी तेथील स्थानिक शेतक-यांच्या होत्या. म्हणजे कंपनी देखील बंद आहे व शेतक-यांच्या जमिनी देखील गेलेल्या आहेत. उद्या अशा पध्दतीने रिलायन्स आर्थिक विकास क्षेत्र उभे करेल, काही वर्षानंतर कंपनी बंद पाडेल किंवा दुस-या एखाद्या कंपनीला जागा विकेल, मग याचा शेतक-यांना कोणता फायदा होणार आहे ? यादृष्टीकोनातून शासनाने आज विचार करण्याची गरज आहे. एवढीच बाब मी सभागृहाच्या निदर्शनास आणते आणि शेतक-यांना न्याय दिला गेला पाहिजे, असे प्रतिपादन करुन थांबते. धन्यवाद.

---------------

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, आजच्या चर्चेमध्ये आम्ही जे मुद्दे या ठिकाणी उपस्थित करणार आहोत त्याबाबतची ठोस उत्तरे माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात द्यावी, अशी विनंती करुन मी माझे भाषण सुरु करतो.

कदाचित शासनातर्फे असे सांगितले जाईल की, हे सर्व आमच्या हातात नाही, केंद्र शासनाच्या हातात आहे, परंतु, जमिनी या राज्य शासनाच्या आहेत. जगामध्ये एस.ई.झेड.चे किंवा तत्सम धोरण स्वीकारले जाते ते भारतात स्वीकारलेच पाहिजे, असे नाही. मोर नाचतो म्हणून लांडोर नाचू लागला तर मोराच्या पिसा-याचे सौदर्य मोहक दिसते परंतु लांडोर नाचू लागला तर विचित्र दृष्य बघायला लागते. या ठिकाणी राष्ट्रीय पातळीवर तसेच राज्य पातळीवर एस.ई.झेड.निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासंदर्भात काही मुद्दे मी सभागृहासमोर आणू इच्छितो. पहिली गोष्ट म्हणजे, इंदिरा काँग्रेसच्या अध्यक्षा, सन्माननीय श्रीमती सोनिया गांधी यांनी नैनीताल येथे झालेल्या काँग्रेसच्या मुख्यमंत्र्यांच्या परिषदेमध्ये आपल्या भाषणात असे सांगितले होते की, जे.के.पिल्ले हे वरिष्ठ अधिकारी आहेत त्यांनी असे सांगितले आहे की, "थांबा आणि पहा" चीन सारख्या देशामध्ये मनुष्यबळाचा उपयोग करुन एस.ई.झेड.निर्माण झाले. भारतामध्ये देखील 100 कोटीच्या वर लोकसंख्या आहे. सन्माननीय सदस्य, श्री.जयंत पाटील हे खाजगी बोलतांना असे म्हणाले होते की, दारिद्रय रेषेखालील जो शेतकरी आहे, दैनंदिन जीवनात पिचला आहे, तो पैशाच्या अमिषापोटी विकला जाईल. पैशाच्या अमिषापोटी शेतकरी आपल्या आयुष्याची शिदोरी विकू लागला तर त्याची काळजी शासनाने घेतली पाहिजे. आजच्या तोंडी प्रश्नोत्तरामध्ये माझा तिस-या क्रमांकाचा याच विषयावरील प्रश्न आहे. या प्रश्नाला शासनाने चांगले उत्तर दिलेले आहे. मला या ठिकाणी शासनाला असे विचारावयाचे आहे की, या 28 एस.ई.झेड प्रकल्पामध्ये कोणत्या उद्योगांना, कोणत्या विभागात, किती जमिनी देण्यात येणार आहेत ? किती देण्यात आलेल्या आहेत ? लोणावळा, कार्ला, पुणे या ठिकाणी किती जमिनी देण्यात येणार आहेत ? त्याचप्रमाणे एस.ई.झेड.निर्माण करणारे उद्योग कोणते आहेत ? या उद्योगांच्या संचालक मंडळावर कोण लोक आहेत ? कुठल्या राजकारणी, सरकारमधील उच्चपदस्थ अधिका-यांचे कुटुंबिय या उद्योगांच्या संचालक मंडळावर आहेत ? ही सर्व माहिती सभागृहासमोर आली पाहिजे. एस.ई.झेड.चा फायदा उपटण्यासाठी कशी घाई झाली आहे, याची माहिती आपल्याला यामधून मिळू

..3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण..............

शकेल. शासनाने एक समिती नेमलेली आहे. त्या समितीने एस.ई.झेड.चा सर्वंकष विचार करणे अपेक्षित आहे. या समितीचा अहवाल येण्याअगोदरच शासनाने 1050 एकर जमीन उद्योगांच्या ताब्यात देण्याची घाई का केली ? याची माहिती देखील शासनाने दिली पाहिजे. या प्रकल्पामधील उद्योगांना 10 वर्षे करांमध्ये सवलत देण्यात येणार आहे. सवलतींचा नुसरा पाऊस पाडण्यात येत आहे. कंपन्या सुरु करणा-या व्यक्तिंना प्राप्तीकरामध्ये सवलत देण्यात येणार आहे. वीज निर्मिती केली तर कस्टम डयुटीमध्ये सवलत देणार आहोत. शासनाने जर वीज निर्मिती केली तर त्यांना अशा प्रकारची सवलत दिली गेली पाहिजे. ज्या करांमधून करोडो रुपयांचा महसूल शासनाला मिळणार होता तो यामधून बुडणार आहे. कल्याणकारी राज्यामध्ये ज्यांच्याकडे मुबलक पैसा आहे त्यांच्याकडून कर गोळा करुन शासनाच्या तिजोरीत टाकावयाचा आणि 'नाही रे' वर्गाला अन्न, वस्त्र, निवारा, उद्योग यासारख्या जीवनावश्यक बाबी उपलब्ध करुन द्यावयाच्या असतात. या क्षेत्रात येणा-या बँकांना आर.बी.आय.ची बंधने असणार नाहीत. या बँका त्या ठिकाणी जागतिक दराने कर्ज उपलब्ध करुन देऊ शकतील.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण ..........

कामगार कायद्याच्या सवलती राहणार नाहीत. कंत्राटी कामगारांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. कामगार चळवळी चालविणारे अनेक लोक आहेत. कामगार चळवळी चालविणारे केवळ विरोधी पक्षामध्येच नाहीत. काँग्रेसच्या लोकांनी मुंबईमध्ये राष्ट्रीय मील मजदूर संघाच्या माध्यमातून चांगली कामगार चळवळ चालविली. काँग्रेसमध्ये सुध्दा कामगारांच्या भाकरीचा विचार करणारी मंडळी होती. त्यावेळी गरीब, कामगार, कष्टकरी, यांच्या विरोधात जे कायदे झाले त्यावेळी ते सर्व नेते स्वर्गीय मोरारजी देसाई, स्वर्गीय यशवंतराव चव्हाण, स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या विरोधामध्ये उभे राहिले. राज्यातील सर्व जमिनी राज्याच्या आहेत. राज्य सरकाने केंद्र सरकारला विचारले पाहिजे की, यामुळे आम्ही विजेवर सवलत देऊ शकणार नाही, कामगार कायदा त्या ठिकाणी असणार नाही. म्हणून मला असे वाटते की, या ठिकाणी धोकादायक स्थिती आहे. सभापती महोदय, जे उद्योग बाहेर आहेत, ज्या उद्योगांच्या माध्यमातून त्यांना शासनाला कर द्यावा लागतो ते सर्व कारखाने उद्योगपती विशेष आर्थिक क्षेत्राच्या कार्यक्षेत्रामध्ये आणतील. त्यावर तुन्ही अट घालणार आहात काय ? कोणताही जुना कारखाना विशेष आर्थिक क्षेत्राच्या कार्यकक्षेमध्ये आणता येणार नाही अशी अट तुम्ही घालणार आहात काय ? तुम्ही तशी अट घालणार नाही. येथे सवलती मिळतात म्हणून सर्व कारखाने येथे येतील, याबाबत तुम्ही कोणती काळजी घेतलेली आहे हे या ठिकाणी सांगणे आवश्यक आहे. विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये आयातीचा आणि निर्यातीचा दर्जा देण्यात येणार आहे. समजा पनवेलच्या विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये उद्योग सुरु झाले तर महाराष्ट्र शासन एक प्रकारे परदेशी राष्ट्र आहे असे समजून रिलायन्स असे म्हणते की, "सारी दुनिया मेरी मुट्ठी मे." अंबानी तर सर्व आपल्या खिशातलेच आहे असे समजत आहेत. उद्योगांना सवलती देऊ नये असे नाही. कम्युनिष्टांचा टेंभा मिरविणारे आम्ही नाही. कम्युनिझम हा जगामध्ये संपला. कम्युनिझम वास्तवावर आधारीत नव्हता. परंतु याचा अर्थ असा नाही की, गरीबांना अधिक दरिद्री करावयाचे आणि श्रीमंतांनी गरीबांच्या घरादारावर नांगर फिरवून स्वत:च्या घरावर सोन्याची कौले टाकण्याचे कायदे मंजूर होत असतील तर आपण कोणतीच काळजी घ्यावयाची नाही.

दुसरा मुद्दा असा आहे की, या ठिकाणी उद्योग कोणते सुरु होणार आहेत ? रायगडमध्ये अभियांत्रिकी प्रकल्प, केमिकल प्रकल्प, आय.टी. प्रकल्प, पेट्रोकेमिकल प्रकल्प सुरु होणार आहेत.

...2/-

श्री.मधुकर चव्हाण ..........

परंतु कृषी उत्पादनावर प्रक्रिया करणारा एकही प्रकल्प तेथे नाही. जे 7-8 प्रकल्प आहेत त्यातून फक्त 14 ते 15 हजार लोकांना नोक-या मिळणार आहेत. सभापती महोदय, रायगडमध्ये किती बेकारी आहे. एस.एस.सी. झालेले 25008, एच.एस.सी. झालेले 27399, पदवीधर 8810, इंजिनिअर्स 1774, आय.टी.आय.3592 आणि एन.सी.टी.व्ही.टी. 547 अशी एकूण 65,000 लोकांची नोंदणी झालेली आहे. नोंदणी झालेल्यांमध्ये थोडया फार प्रमाणामध्ये शिक्षित, अर्धकुशल, अशिक्षित, बेरोजगार, भूमिहीन यांची नोंद नाही. आम्ही उद्योगांना सवलती देणार, 25 लाख लोकांना नोक-या देणार असे गाजर शासनाने दाखवू नये. महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारला सांगितले पाहिजे की, या धोरणाचा स्वीकार केल्यामुळे एवढा कर बुडेल, जेवढे उद्योग येतील ते पेट्रोकेमिकलचे येतील. रायगडमध्ये येणा-या उद्योगांमुळे तेथील पर्यावरणावर विपरित परिणाम होणार आहे यासंदर्भात काय व्यवस्था करण्यात आली आहे ? सभापती महोदय, मी येथे स्पष्ट बोलतो. सिडकोमध्ये एक अधिकारी असा पाठविण्यात आलेला आहे की, त्याने म्हाडाची वाट लावली आणि आता तो सिडकोची वाट लावावयास जाणार आहे. आता श्री.अजित वर्टी यांची तेथे बदली झालेली आहे. राज्य शासनाचे हित कशामध्ये आहे ? ज्याने 30 वर्षे नोकरी केली तो राज्य शासनाला सांगतो की, या सवलती मला द्या. तुमचे नुकसान झाले तरी चालेल. पण श्री.अंबानींचा फायदा झाला पाहिजे. मला असे वाटते की, याचा आपण गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. पwर्वीसारखे करु नये की, आम्ही काय करणार, केंद्र शासनाने सांगितलेले आहे. मी फक्त एक वाक्य सांगतो आणि माझे बोलणे संपवितो. पूर्वी लोक सांगत होते की, राणीने सांगितले. व्हॉईस रॉयने ऐकले, म्हणून आम्ही भारतीय जनतेवर कायदा लादत होतो.

यानंतर श्री.सुंबरे ........

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. मधू चव्हाण ....

म्हणून मला असे वोटते की, आता राणीचे राज्य नाही तसेच व्हॉईसरॉयचे देखील राज्य नाही. हे जनतेचे राज्य आहे आणि या जनतेच्या राज्यामध्ये जनतेच्या हिताला आणि त्यातल्या त्यात जे गरीब आहेत, भूमिहीन आहेत... नाही तरी आपण रोज फुले-आंबेडकरांच्या नावाने राज्य करीत आहात, त्या महापुरूषाने याच लोकांसाठी काम केले आहे, ते लोक या आपल्या धोरणामुळे आज-उद्या देशाधडीला लागणार आहेत. तेव्हा शासनाने या धोरणाचा विचार करताना झट मंगनी और पट् ब्याह अशा प्रकारे करू नका. मुलीच्या लग्नाच्या वेळी आपण जसे ती सुखामध्ये रहावी म्हणून विचार करून स्थळ निश्चित करतो, त्याप्रमाणे आपली जनता सुखी रहावी यासाठी आई-वडिलांच्या भूमिकेतून जनतेचा विचार आपण करावा अशी आग्रहाची विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

**तालिका सभापती** (श्री. अरविंद सावंत) : यानंतर समाननीय सदस्य श्री.कपिल पाटील हे भाषण करतील. मी पुन्हा आपणा सर्वांना विनंती करतो की, या चर्चेसाठी वेळ थोडा असल्याने आपण सर्वांनीच थोडक्यात बोलावे जेणे करून सर्वांना या चर्चेत भाग घेता येऊ शकेल.

****

........ आय 2 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई शिक्षक) : सभापती महोदय, आपण मला या चर्चेमध्ये सहभागी होण्यासाठी थोडा वेळ उपलब्ध करून दिला आहे त्याबद्दल मी आपला आभारी आहे. वेळ कमी असल्याने, वेळेची मर्यादा लक्षात घेऊन मी थोडक्यात माझे विचार येथे मांडणार आहे. सभापती महोदय, मध्यंतरी दिल्लीतील एका गरीब वस्तीतील दाव्यासंबंधात निकाल देताना सुप्रीम कोर्टाने स्पष्ट शब्दात सांगितले आहे की, गरीबी ही जमीन बळकाविण्यासाठी सबब असू शकत नाही. परंतु या देशामध्ये श्रीमंती ही सगळे काही बळकाविण्याचे एक सबब असू शकते. एसइझेड हे त्यातीलच एक उदाहरण आहे. आताच सन्माननीय सदस्य श्री.मधु चव्हाण यांनी सांगितले की, हे राणीचे राज्य नाही, व्हॉईसरॉयचेही राज्य राहिलेले नाही परंतु आता राणीची जागा रिलायन्सने घेतलेली आहे. नवे कंपनी सरकार येते आहे. आतापर्यंत आपण म्हणत होतो, वर्णन करतो की, हा भारत गांधी-आंबेडकरांचा आहे पण यापुढे हा भारत रिलायन्सचा, अंबानींचा भारत राहणार आहे. धीरूभाई अंबानीनी आपल्या दोन मुलांमध्ये वाटणी करून दिली आणि ते निघून गेले. त्यात अर्धा वाटा मुकेशच्या नावावर आणि अर्धा अनिलच्या नावावर त्यांनी करून दिला. 'दुनिया मेरी मुट्ठी में' असे म्हणणाऱ्या अंबानींच्या मुलांसाठी सर्व काही उपलब्ध करून देण्याची या देशामध्ये केंद्रा पासून राज्य सरकारा पर्यंतच्या सत्ताधाऱ्यांमध्ये स्पर्धा लागली आहे. खरे तर त्यांनी यापूर्वीच सर्व देश आपल्या मुठ्ठीमध्ये घेतलेला आहे, किंवा त्याची सुरूवात झालेली आहे. हा सगळा देश धीरूभाईंची खाजगी मालमत्ता असल्याप्रमाणे अर्धा भारत मुकेशला आणि अर्धा अनिल अंबानीला असे वाटप झाले आहे. आज आपण त्याची फळे भोगतो आहोत. सभापती महोदय, या एसइझेडच्या धोरणाचा मूळ गाभा काय होता ? 30 वर्षापूर्वी चीनमध्ये हा प्रयोग सुरू झाला आणि आता नव्या जागतिक अर्थव्यवस्थेमध्ये तर एसइझेड अटळ आहे, ते नाकारता येणार नाही. परंतु आज आपण त्यांच्या नावाने बिल्डरांचे उखळ पांढरे करून देत आहोत. जमिनी खुल्या करून देऊन, सगळ्या सवलतींची खिरापत देऊन बिल्डर्स आणि धनदांडग्यांचे उखळ पांढरे केलेले आहे आणि दुर्दैवाने या लुटमारीला सत्तेतील पुढाऱ्यांचा आणि राजकारण्यांचा हातभार लागतो आहे. मग ते पुणे आणि इतरत्र कोठेही असेल. यामध्ये जे विस्थापित होतील त्यांचा वाटा काय आहे ? आता येथे सन्माननीय सदस्य श्रीमती मंदाताईंनी नवी मुंबईतील विस्थापितांना साडेबारा टक्के जमीन देण्याचा मुद्दा सांगितला. तेथे सिडको ही आपल्या राज्य सरकारची व्यवस्था आहे. पण तेथे या बाबतीत काय

...... आय 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

वाट लागली आहे ते आपण पाहतोच आहोत. तेव्हा येणारे कंपनी सरकार विस्थापितांना यामध्ये वाटा देईल या अपेक्षेने पाहिले तर ती मोठी चूक ठरेल. एसइझेड मधून सगळ्या सवलती, अगदी प्राप्तीकरापासून भरपूर पाणी, वीज वगैरेंच्या बाबतीतील सवलती दिल्या जाणार आहेत आणि त्यामुळे तेथे नव्याने वस्त्या उभ्या राहतील व जुन्या वस्त्या कुंपणामध्ये राहतील. म्हणजे एकट्या रायगडमध्ये 25 लाख नव्या वस्त्या येणार आहेत आणि मग जुन्या आणि नव्यामध्ये पुन्हा वर्गवारी होणार आहे. त्यात या नव्या व जुन्या वस्त्यांना कोणताही नागरी अधिकार असणार नाही. आपण सगळ्यांनी चीनचे उदाहरण या ठिकाणी दिले आहे. पण तेथे एक देश आणि दोन व्यवस्था अशी घोषणा जागतिक अर्थव्यवस्था, मार्केट सोशॅलिझम स्वीकारताना केली गेली. तेथे नियंत्रित राज्यव्यवस्था असल्याने तेथील सरकार ते सर्व करण्यास समर्थ आहे. आपल्याकडे लोकशाही प्रदान राज्य व्यवस्था असल्याने एसइझेडच्या नावाखाली जी बेटे बांधली जाणार आहे, तेथे जी नवीन व्यवस्था येणार आहे त्यामध्ये कोणते अधिकार राहणार आहेत ? ....

( यानंतर श्री. सरफरे ......जे 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

लोकसभा आणि विधानसभेचे मतदानाचे फक्त अधिकार नागरिकांना राहतील, परंतु पंचायत राज संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांचे अधिकार काय राहतील? त्याबाबतचे भाष्य केंद्र व राज्य सरकारने केलेले नाही. हा यामधील सर्वांत नुकसानकारक भाग आहे. माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी पश्चिम बंगालचा उल्लेख वारंवार केला.त्या डाव्या चळवळीतून पुढे आल्या असून आज बाजूला गेल्यामुळे पश्चिम बंगालमध्ये काय चालले आहे हे त्यांना माहीत नाही. पश्चिम बंगालमध्ये एक प्रयोग करण्यात आला आहे त्याचे उदाहरण आपणापुढे ठेवतो. पश्चिम बंगालमध्ये एस.ई.झेड. साठी कलकत्ता इंटरनॅशनल नावाची एक कंपनी निर्माण केली आहे त्या कंपनीबरोबर औद्योगिक विकास महामंडळाची 50/50 टक्के भागीदारी असून ते संयुक्तपणे एस.ई.झेड. चा विकास करणार आहेत. त्यामधील महत्वाचा भाग असा की, तेथील प्रत्येक विस्थापिताला 10 चौरस मीटरचे दुकान बांधून देणार आहेत. पश्चिम बंगालच्या दक्षिण परगण्यामध्ये हा प्रयोग होत आहे. त्याठिकाणी 100 एकर जमीन विस्थापितांच्या औद्योगिक पुनर्वसनासाठी घेतली जाणार आहे. त्यांना नोकरी दिली जाणार नाही, कारण आज नोकरी दिली तर दुसऱ्या दिवशी त्यांना नोकरीवरुन काढून टाकले जाते. त्यामुळे त्यांना नोकरी देऊन हा प्रश्न सुटणार नाही. त्यामुळे जे शेती करीत होते, त्यांचे 100 एकर जमिनीवर पुनर्वसन केले जाणार आहे. त्याठिकाणी 20 हजार स्टॉल्स बांधून दिले जाणार आहेत. विस्थापितांमध्ये जे तरुण आहेत, त्यांना त्याचा लाभ मिळेल. त्याचप्रमाणे चौथा मुद्दा असा आहे की, जे मनुष्य बळ लागणार आहे त्यासाठी प्रशिक्षण केंद्रे उभी करण्याचे काम वेगाने सुरु आहे, व ते पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. त्याचप्रमाणे पर्यायी जागेवर चांगल्या प्रतीची घरबांधणी केली जाणार आहे. त्याठिकाणी इस्पितळ उभारले जाणार आहे, त्या इस्पितळामध्ये विस्थापितांकरीता, गोरगरीबांकरीता 5 टक्के आरक्षण ठेवले जाणार आहे. तसेच, त्यांना पूर्णपणे मोफत सर्व सुविधा उपलब्ध होणार आहेत. त्याचप्रमाणे त्याठिकाणी शिक्षण संस्था निर्माण केल्या जाणार असून त्यामध्ये विस्थापितांच्या मुलांकरीता 5 टक्के आरक्षण ठेवले जाणार आहे. अशाप्रकारची व्यवस्था हे राज्य शासन करणार आहे की नाही? रायगड, पुणे व अहमदनगर येथील विस्थापितांचे पुनर्वसन करतांना आपण हा विचार करणार आहोत की नाही याचे उत्तर मंत्रिमहोदयांच्या भाषणामध्ये अपेक्षित आहे.

सभापती महोदय, सर्वात महत्वाचा मुद्दा असा आहे की, या एस.ई.झेड. मधून प्रचंड विकास अपेक्षित आहे. त्या विकासाच्या प्रक्रियेमध्ये तेथील सामान्य माणसाला आपण भागीदार करणार



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

आहात की नाही? त्यासाठी आपण काय करणार आहात? त्यासाठी लागणारे मनुष्य बळ तयार करण्यासाठी पश्चिम बंगालमध्ये प्रशिक्षण केंद्रे उभी करण्यात आली आहेत. तशाप्रकारची प्रशिक्षण केंद्रे आपण निर्माण करणार आहात की नाही? यासंबंधी राज्य शासनाने विचार केला पाहिजे. 5-10 वर्षानंतर जेव्हा विकास होईल त्यावेळी खूप उशीर झालेला असेल. ही व्यवस्था आपण निर्माण केली नाहीतर तेथील विस्थापितांना शिपाई, टर्नर, फिटर, सफाई कामगार या पलिकडे दुसरी नोकरी मिळणार नाही. त्याकरीता जे विकसित मनुष्य बळ आवश्यक आहे ते विकसित करण्यासाठी राज्य सरकारने पुढाकार घेतला पाहिजे. या दोन-तीन गोष्टी आपण करु शकलोतर त्यामधून महाराष्ट्रातील सामान्य माणसाला आपण न्याय देऊ असे मला वाटते. शेवटचा मुद्दा आपण 73 वी घटना दुरुस्ती केली, 74 वी घटना दुरुस्ती केली. त्यातून स्थानिक स्वराज्य संस्थांचे पंचायतीचे जे अधिकार मिळाले आहेत, ते आपण अबाधित ठेवणार आहोत की नाही? राज्य सरकारची याबद्दल काय भूमिका आहे? हा माझा शेवटचा प्रश्न उपस्थित करुन माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MAP/

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सभागृहापुढे मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर चर्चा होत असतांना मला माझी भूमिका सुरुवातीला स्पष्ट करावयाची आहे. या सभागृहामध्ये कुणीही तत्वज्ञानाविषयी चुकीचे बोलले जाऊ नये , त्या तत्वज्ञानाचे पालन केले पाहिजे. मला फक्त एकाच वाक्यामध्ये सांगावयाचे आहे की, मार्क्सवाद अजून संपलेला नाही. तो जगातील सर्व विद्यापीठांनी मान्य केला आहे. फक्त प्रश्न एवढाच आहे की, त्या विचाराने चालणारे सरकार असले पाहिजे. उदा. आज भाजप सत्तेमध्ये नाही तरीही त्यांचे तत्वज्ञान संपलेले नाही. काही अंशी माणसे सत्तेमध्ये राहतात, त्याबाबत मला भाष्य करावयाचे नाही. मला त्यांना सांगावयाचे आहे ते असे की,

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे (पुढे सुरू...

मला एक मुद्दा मांडावयाचा आहे की, पश्चिम बंगालचे वारंवार नाव घेतले जाते. राज्य सरकार रिलायन्स, केंद्र सरकार आणि जग यामध्ये प्रत्यक्षात आपण कोठे आहोत ? आपल्या हातामध्ये किती आहे ? आपण काय करू शकतो ? या दृष्टीने गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. जेवढे आपल्या हातामध्ये आहे त्याबाबतीत आपण किती प्रामाणिकपणे प्रयत्न करून शेतकऱ्यांना जगविण्याचा कसा प्रयत्न करतो ? याचाही गंभीरपणाने विचार केला पाहिजे. 1972 मध्ये बीड जिल्ह्यामधील वंजारवाडी लघुसिंचन तलावाचे काम करण्याचा निर्णय झाला तेव्हा शेतकऱ्यांना विशेष भूसंपादन कायद्याखाली नोटिसा दिल्या. शेतकऱ्यांनी चळवळ केली. 700 एकर जमीन संपादन झ ालेली आहे. त्याबाबत प्रोस्टेंट नोदविले गेले. 700 एकर जमीन संपादित केली. त्यावेळेस कोर्टामध्ये जाण्याच्या संबंधाने लोकांमध्ये लिगल अवेअरनेस नव्हता. आपल्या शेतकऱ्यांचे हित जपले गेले नाही. एकीकडे जमीन द्यावयाची नसेल तर लोकशाही मार्गाने शेतकरी आंदोलन करतात. लोकप्रतिनिधींमार्फत कायद्याने शेतकऱ्यांचे हित कसे जपले जाईल, हे पहाणे काळाची गरज आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी बोटावर मोजण्याइतके कायदे आहेत. त्यामध्ये विशेष भूसंपादन कायद्याचा क्रमांक वरचा लागतो. 1991 मध्ये सुप्रीम कोर्टाचे एक सायटेशन आहे, त्यामध्ये भूसंपादनाच्या संबंधात बेसिक गाईडलाईन्स दिलेल्या आहेत. शेतकऱ्यांच्या इच्छेप्रमाणे जमीन संपादित होणार आहे की नाही ? होणार नसेल तर शासनाने भूसंपादन कोणत्या रेटने ठरविले, याबाबत सुप्रीम कोर्टाच्या निदेशाप्रमाणे लक्ष घातले पाहिजे. जमीन संपादित होते, प्रकल्प पूर्ण होतात. प्रकल्पाला विरोध करत नाही. नोटिफिकेशन 9 ची इन्क्वायरी व्यवस्थित केली जात नाही. जे बऱ्यापैकी शेतकरी आहेत ज्यांना थोडे कायद्याचे ज्ञान आहे, ते जागरूक रहातात,त्यांच्याबाबतीत प्रत्यक्षात पंचनामे रेकॉर्डवर घेतात परंतु बाकीच्यांचे सगळे पंचनामे हे कोठेतरी बसून केले जातात. ज्यांना कायद्याचे ज्ञान नाही, ते न्यायालयामध्ये जात नाहीत. त्यांना त्याचा फायदा होत नाही. माझी विनंती आहे की, एकूण 11696 हेक्टर जमीन लागणार आहे. यामुळे लाखो शेतकरी बेकार होणार आहेत. या संबंधाने नियंत्रण करण्यासाठी वेगळी समिती करावी. पश्चिम बंगालचा उल्लेख करून त्या ठिकाणी विशेष आर्थिक क्षेत्र निर्माण केलेले असल्याचे सांगण्यात येते. परंतु त्यांनी नेमके या संदर्भाने काय केलेले आहे ते त्याची माहिती येत नाही. यामध्ये ज्यांची इच्छा असेल त्या सन्माननीय सदस्यांना आणि काही अधिकाऱ्यांना त्या ठिकाणचा सर्व्हे करण्यास पाठवावे.

2....

SKK/ KGS/ MAP/

श्रीमती उषाताई दराडे.....

समोरच्या बाजूच्या सन्माननीय सदस्यांचे आभार मानते की, माननीय श्री.शरदराव पवार साहेबांचा त्यांनी उल्लेख केला. खरेच आहे की, शेतकऱ्यांच्या हिताशी कॉम्प्रमाईज करता येणार नाही, हा समाजवाद आहे. बीड जिल्ह्यातील पाटेगाव येथील मोठा मध्यम सिंचन तलावासाठी जमीन संपादित केलेल्या 100 शेतकऱ्यांना पैसे मिळालेले नाहीत. अशी परिस्थिती निर्माण होणार नाही यासाठी काही गोष्टी कराव्या लागतील. अजूनही मला एक बाब स्पष्ट करावयाची आहे की, विशेष भूसंपादन कायद्याच्या माध्यमातून जमिनी संपादित करतो त्याचे योग्य पैसे दिले जात नसतील तर असे वाटते की हा कायदा शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी आहे की आणखी कोणासाठी आहे ?

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे ....

कलम 11 चा अवॉर्ड जाहीर होतो तो आपण विनामूल्य शेतकऱ्यांना दिला पाहिजे. त्यासाठी पुरावे घेतलेले असतात. खरेदीखत आणले काय ? अमूक आणले काय ? असे विचारले जाते. महाराष्ट्रात आणि विशेषत: मराठवाड्यामध्ये एकाही विशेष भूसंपादन अधिकाऱ्याने एकदाही खरेदी खताच्या साक्षीदारांचे जबाब नोंदविल्याचे माझ्या लक्षात नाही. त्यांचे जबाब घेतले जात नाहीत. रजिस्ट्रेशन ऑफीसला नोटीस दिली जाते. भूसंपादन अधिकाऱ्याला पत्र दिले जाते. भूसंपादन अधिकाऱ्यांकडून दुसऱ्या अधिकाऱ्यांना पत्र दिले जाते. खरेदी खताचा चार्ट आणला जातो. ते कायद्याने ॲडमिसिबल नसते. ते वाचता सुध्दा येत नाही. त्या चार्टमध्ये किंमती ठरविलेल्या आहेत. यामध्ये शेतकऱ्यांना स्वत:चे म्हणणे मांडण्याची संधी आहे हे पहिल्यांदा सांगणे आवश्यक आहे. त्या गावामध्ये, त्या परिसरामध्ये जमिनीच्या किंमती काय आहेत हे पाहणे आवश्यक आहे. यामध्ये केवळ त्यांची प्रॉपर्टीच जात नाही किंवा तो केवळ घरापासूनच विस्थापित होत नाही तर हजारो वर्षापासून त्या माणसाच्या ज्या भावना गुंतलेल्या आहेत त्याचा त्यांना मोबदला दिला पाहिजे. हा विशेष भूसंपादन कायदा जशाचातसा 100 टक्के राबविला तरी त्या ठिकाणी शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविले जातील. मला सभागृहाला अशी विनंती करावयाची आहे की, केंद्र सरकारचे, रिलायन्सचे आणि आमचे काही करार झाले असतील तर ते स्पष्टपणे समोर यावयास पाहिजे. ते करार आणि अटी समोर यावयास पाहिजे. आपण संपादनाची घाई करु नये. ते वेळेतच झाले पाहिजे असे नाही. जसा आपण चर्चेला वेळ वाढवून देतो त्या पध्दतीने संपादनाला थोडासा विलंब झाला तरी चालेल. जागतिकीकरणामध्ये आज आपण कोठे आहोत ? आपण कोणत्या आर्थिक अवस्थेमध्ये आहोत ? हे पाहिले पाहिजे. विकसनशील देश विकसित होणार आहेत आणि त्यामध्ये आपला क्रमांक कोठे असणार आहे याचा विचार झाला पाहिजे. एका कवीने असे म्हटले आहे की, " दुनिये तू जिंकलीस कोठे, मी केला माझ्याच पराभव ". दुनिये तू जिंकलीस काय, की मी माझा पराभव केला, की मी दुनियेवर मात करुन जिकले ? याचे उत्तर शोधावे लागेल. विशेष भूसंपादनाच्या बाबतीत विशेष भूसंपादन अधिकारीच नाही तर त्यावर लोकप्रतिनिधींचा सुध्दा अंकुश असला पाहिजे अशी मी सभागृहाला विनंती करते व माझे दोन शब्द संपविते.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ( मुबई पदवीधर ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांच्या अर्धा-तास चर्चेचे रुपांतर अडीच तासाच्या चर्चेमध्ये करण्याचे माननीय सभापतींनी मान्य केले त्याबद्दल सर्वप्रथम मी त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, एस.ई.झेड. हे शाप की वरदान ? हा प्रश्न सभागृहामध्ये चर्चिला जात आहे. विज्ञान हा अभिशाप आहे असे काही काळानंतर म्हटले गेले त्याप्रमाणे एस.ई.झेड. हा अभिशाप तर ठरणार नाही ना ? अशी भीती सन्माननीय सदस्यांना वाटते. या एस.ई.झेड.मध्ये आपण हातचे तर काही गमावत नाही ना ? अशी चिंता सभागृहामध्ये व्यक्त करण्यात आली. केंद्र शासनाकडून 140 ठिकाणी एस.ई.झेड. सुरु करण्याच्या सूचना झाल्या असल्या तरी महाराष्ट्र यामध्ये आघाडीवर आहे. कारण भारताचे आणि सर्व जगाचे लक्ष महाराष्ट्राकडे असते. कारण महाराष्ट्र नेहमीच सगळ्या बाबतीत आघाडीवर असतो. हे प्रोजेक्ट्स लावण्यासाठी 33 हजार कोटीची गुंतवणूक होणार आहे असे काल माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले. यामध्ये सर्वात जास्त जमीन रिलायन्स उद्योग समुहाने घेतलेली आहे. म्हणून रिलायन्स आणि अंबानी ग्रुपवर एवढी मोठी चर्चा चालू आहे. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी सांगितले की, या दोन भावांना सर्व महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण हिंदुस्थानवर राज्य करावयाचे आहे. कारण त्यांच्या वडिलांचे स्वप्न त्यांना पूर्ण करावयाचे आहे. "मेरे बाप का सपना" त्यांना पूर्ण करावयाचा आहे. ते करीत असताना आपले राज्यकर्ते आणि आपण सर्वजण त्यांना झुकते माप देत आहोत की काय अशी भीती सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष अशा सगळ्यांच्या मनामध्ये आहे. अंबानी समूह काय करतात ? त्यांनी विजेच्या बिलामध्ये मुंबईतील लोकांना चिरडून टाकले. त्यांचा पूर्वेतिहास पहिला तर त्यांना जे जे दिले त्या त्या ठिकाणी ते आपल्याला राबवत गेलेले आहेत. त्यांचा पूर्वेतिहास तपासावयास पाहिजे. मुंबईमध्ये पश्चिम उपनगरातील लोक विजेच्या बिलामुळे भरडून निघाले. आज त्यांना वीज कंपनी घ्यावयाची आहे. त्यांना शॉपींग मॉल्स काढावयाचे आहेत.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत....)

त्यांना वीज विकायची आहे आणि त्याच बरोबर किराणाधान्याची दुकानेही चालवायची आहेत. उद्या ते पानपट्टयांचे ठेलेही चालवतील. ते थिएटर्स् काढतील, मॉल्स काढतील सर्व काही करतील. पण कुणाला कोणती परवानगी द्यायची याचा शासन कधी विचार करणार आहे की नाही ? कारण यांच्या मनोवृत्तीचे दर्शन आपल्याला सदैव दिसत आहे. सर्वांच्याच मनामध्ये त्यांच्या विषयी शंका निर्माण झालेली असल्यामुळे सर्वांनी त्यांच्या नावाचा या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. एसईझेड संबंधातील कायद्याला केन्द्राने मे 2005मध्ये मंजुरी दिली. या कायद्याची अंमलबजावणी लगेच फेब्रुवारी 2006मध्ये आपल्याकडे सुरु झाली. माझे म्हणणे असे आहे की, या कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी आपण इतकी घाई का करीत आहोत ? आपण या एसईझेड संबंधी अभ्यास केलेला आहे काय ? त्यासाठी अभ्यास गट नेमलेला आहे काय ? हे केलेले नसेल तर मग शासन ही घाई कशासाठी करीत आहे ? जागतिकीकरणामध्ये आपण अन्य राज्याशी स्पर्धा करायला पाहिजे ही गोष्ट खरी आहे. परंतु हे करीत असताना आपला शेती हा जो मूळ व्यवसाय आहे त्याला तिलांजली देऊन चालणार नाही. या राज्यातील शेती हा जो प्रधान व्यवसाय आहे तो नष्ट होईल आणि महाराष्ट्रातील शेतकरी उद्ध्वस्त होईल अशी मला भीती वाटते्. आज मराठवाडा आणि विदर्भातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. उद्या अलिबाग मधील शेतक-यांवर आत्महत्या करण्याची पाळी येईल. माझ्या माहिती नुसार शेतक-यांच्या ह्या ज्या जमिनी कवडीमोल किंमतीने घेतल्या जाणार आहेत त्या जमिनींवर मोठ मोठे शॉपिंग कॉम्प्लेक्स आणि मॉल्स उभे राहाणार आहेत. माझी माहिती चुकीची असेल तर त्यामध्ये माननीय मंत्री महोदयांनी सुधारणा करावी. आता पर्यन्त उद्योगधंद्यासाठी, एमआयडीसीसाठी घेतलेल्या जमिनीवर उद्योग सुरु नाहीत. तेथील उद्योग बंद पडलेले आहेत. केमिकल्स फॅक्टरीमुळे पर्यावरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. रसायनमिश्रित पाणी नद्यांमध्ये सोडल्यामुळे नदीतील मासे मरत आहेत. मासेमारीवर त्याचा विपरित परिणाम होत आहे. तालिका सभापती महोदय, आज तुम्ही अँबी व्हॅलीमध्ये जाऊ शकता काय ? सर्व सामान्य माणूस या अँबी व्हॅलीचे बाहेरुन देखील दर्शन घेऊ शकत नाही. तेथील जमीन सहारा कंपनीला दिली. त्या कंपनीने काय केले ? सामान्य माणसाने तेथे जायचे म्हटले तर त्यासाठी एण्ट्री फी हजारामध्ये आहे. मग तेथे एक दिवस राहाण्याचा विचार तर सोडाच. आता अलिबाग येथील ज्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत...)

जमिनी घेतल्या जाणार आहेत त्या ठिकाणी गोल्फची मैदाने, शॉपिंग कॉम्प्लेक्स, मॉल्स अशा गोष्टी होणार आहेत. त्या ठिकाणी सर्व सामान्य माणूस राहू शकणार नाही. तो विस्थापित होणार आहे. त्या ठिकाणी शाळा, रुग्णालये काढली जाणार आहेत असे सांगितले जाते. परंतु तेथील माणसे विस्थापित झाल्यानंतर जी काही 4-5 टक्के माणसे तेथे राहातील त्यांची मुले तेथील शाळेत जाऊ शकतील काय ? अलिबाग येथील जमीन एसईझेडसाठी घेतल्या नंतर तेथील शेतक-याला ओळखपत्र बाळगावे लागणार आहे. त्याला गुरे चरविता येणार नाहीत किंवा दुधाचा धंदा करता येणार नाही. ज्या भूमीमध्ये त्याचा जन्म झाला त्याच भूमीमध्ये त्याला परक्यासारखे राहावे लागणार आहे. तेथील जमिनी संपादित केल्यानंतर तेथील 90 टक्के लोक विस्थापित होतील आणि जे काही लोक राहातील त्यांच्यावर ही परिस्थिती ओढवणार आहे. या सभागृहामध्ये पेण आणि अलिबाग तालुक्याचा वारंवार उल्लेख करण्यात आला. कारण या दोन तालुक्यातील जमीन जास्त प्रमाणात संपादित होणार आहे. सभापती महोदय, रिलायन्स उद्योग समूहाला रेड कार्पेट दिलेला आहे. वॅट आणि सेवाकरामध्ये सवलती दिलेल्या आहेत. मग हा राज्याचा बुडणारा महसूल आपण कोठून भरु काढणार आहात ? आज शासनाकडे आत्महत्या करणा-या शेतक-यांच्या कुटुंबीयांना देण्यासाठी 1 लाख रु. नाहीत. प्राथमिक अरोग्य केन्द्रे, शाळा सुधारण्यासाठी पैसे नाहीत. ग्रामीण भागातील लोकांना मूलभूत सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी आज शासनाकडे पैसा नाही. मग ही कर सवलतीच्या माध्यमातून कराडो रुपयांची सूट शासन का देत आहे ? एसईझेडमुळे रोजगार उपलब्ध होईल असे सांगितले जाते. आज पर्यन्त ज्या ज्या प्रकल्पांसाठी जमिनी घेतल्या त्या प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळालेला नाही. प्रकल्पग्रस्तांना शासनाकडून वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या. रायगड जिल्ह्यातील 30 हजार पेक्षा अधिक एक जमीन एसईझेडसाठी घेतली जाणार आहे. शेतक-याने आपली जमीन विकल्यानंतर तो मिळालेला पैसा मुलीच्या लग्नासाठी, सायकल, स्कूटर खरेदी करण्यासाठी खर्च करील आणि मग काही दिवसांनी तो कंगाल होईल. परंतु त्याच्या शेतातील उत्पादनातून त्याला जे वार्षिक किंवा मासिक उत्पन्न मिळत होते ते बंद होईल.

...नंतर श्री. भोगले...

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत..........

तो पैसा त्याला वर्षाला मिळणार नाही, महिन्याला मिळणार नाही. पुन्हा तो भुकेकंगाल राहणार आहे. राज्यातील लोकांच्या या मानसिकतेचा विचार करणे गरजेचे आहे. या प्रकल्पग्रस्तांसाठी ठोस आणि पारदर्शक धोरण या सभागृहात जाहीर करावे. अमूक ठिकाणच्या प्रकल्पग्रस्तांसाठी अ,ब,क व ड अशा प्रकारचे फायदे दिले जातील व अमूक लागवडीखालील जमीन अमूक किंमतीला खरेदी केली जाईल असे धोरण सभागृहात जाहीर केले पाहिजे. अनेक सन्माननीय सदस्यांनी जे सांगितले तेच मी सांगण्याचा प्रयत्न करतो. राज्यामध्ये यासाठी एक मध्यवर्ती समिती असावी. ज्या भागातील जमिनी संपादित केल्या जाणार आहेत त्या भागासाठी एक उपसमिती असावी. त्या उपसमितीमध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश असणे अत्यंत गरजेचे आहे. कारण यावर अंकूश ठेवणे गरजेचे आहे. या संदर्भातील अहवाल हा सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या विधानसभा आणि विधानपरिषद सभागृहास सादर झाला पाहिजे. पारदर्शीपणाने एसईझेड प्रकल्प राबविणार असतील तरच या राज्यातील जमिनी संपादित करण्याची मूभा द्यावी. या ठिकाणी सन्माननीय सदस्य ज्या सूचना मांडतात त्यांची अंमलबजावणी होते की नाही याची माहिती घेण्याचा आम्हाला हक्क आहे एवढे बोलून माझे दोन शब्द पूर्ण करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र !

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत (नामनियुक्त) : सभापती महोदय, अत्यंत महत्वाच्या विषयावर ही चर्चा घडवून आणली याबद्दल महाराष्ट्राची जनता आपली आभारी राहील. मी दोन धोरणात्मक मुद्यांवर बोलणार आहे. एसईझेडचे धोरण चीन या देशासमोर आले तेव्हाचे उदाहरण देता येते. 1981 साली डेंग झियाओ यांनी 7 एसईझेड स्थापन करण्याची घोषणा केली त्यावेळचे त्यांचे धोरण आणि आपल्या देशाचे धोरण यामध्ये मुलभूत फरक आहे. किनारपट्टीवरील बंदराचा विचार करुन 7 एसईझेड निर्माण करण्याची त्यांनी घोषणा केली होती. चीनमध्ये एसईझेडची निर्मिती ही कोणत्या खाजगी बिल्डरमार्फत होणार नव्हती तर ती स्वत: सरकारकडून केली जाणार होती. स्थानिक नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी मुलभूत नियमावली तयार करण्यात आली होती. या देशामध्ये एसईझेड प्रकल्पाची सुरुवात झाली ती मुळातच चुकीची आहे. नवी मुंबई येथे गांधी नावाच्या बिल्डरला जमीन देऊन 14-15 एकर जमिनीमध्ये प्रकल्प तयार करण्याची परवानगी देण्यात आली. तो एक प्रयोग असावा. परंतु राज्य सरकारने हे धोरण केंद्र सरकारचे आहे असे सांगून चालणार नाही. कारण घटनेप्रमाणे जमीन राज्याची मालकी आहे आणि तेथे राहणारे नागरिक हे या राज्यात राहतात. त्यामुळे त्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी राज्य सरकारने आपले स्वत:चे धोरण जाहीर केले पाहिजे. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्यांचे प्रतिबिंब त्या धोरणामध्ये असले पाहिजे. या सूचनेचा मंत्रीमहोदयांनी विचार करावा.

आज राज्यामध्ये अनेक भागात एमआयडीसी अस्तित्वात आहेत. त्याठिकाणी एमआयडीसीमार्फत एकही एसईझेड प्रकल्प का स्थापन केला गेला नाही? उदाहरण म्हणून मी सांगू इच्छितो. रत्नागिरी येथे पंचतारांकित एमआयडीसी उभारण्याची योजना आहे. त्याठिकाणी उत्कृष्ट एसईझेड प्रकल्प होऊ शकतो. तेथे सुपीक जमीन नसून खडकाळ प्रदेश आहे. विजयदूर्ग हे जगातील सर्वात मोठे बंदर होऊ शकेल. कारण विजयदूर्ग येथे 20 फॅदम खोली आहे. भारतात इतकी उपलब्धता कोणत्याही किनारपट्टीवर नाही. तो पूर्ण खडकाळ प्रदेश आहे. तेथे कोळशावर आधारित वीज प्रकल्प आणण्यापेक्षा एसईझेड प्रकल्प होण्याच्या दृष्टीने लक्ष दिले जावे. केंद्राच्या अखत्यारितील विषय असला तरी राज्य सरकारने शिफारस केल्याशिवाय एसईझेड प्रकल्प होऊ शकत नाही. त्यामुळे राज्य सरकारने अभ्यासपूर्वक विचार करुन शिफारस करावी. एसईझेड पॅटर्न ऑफ डेव्हलपमेंट दोन प्रकारचे आहेत.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत ....

सभापती महोदय, दोन प्रकारचे एसईझेड आहेत. आयटी सेक्टरसाठी जे एसईझेड वापरले जाते त्यासाठी 100 एकराची जमीन उपलब्ध करुन दिली जाते पूर्वी आयटीच्या सेक्टरसाठी 25 एकर जमीन उपलब्ध करुन दिली जात होती. तसेच ऑल परपज एसईझेडसाठी 1200 एकर जमीन उपलब्ध करुन दिली होती. सभापती महोदय, आयटीसाठी एसईझेड होत असेल तर काही प्रश्न येत नाही कारण त्या ठिकाणी काही मालाची देवाणघेवाण होत नाही परंतु ऑल परपजसाठी एसईझेड होणार असेल तर त्यासाठी 1200 एकर जमीन लागते व त्यामध्ये घरे येतात, मॉल येतात, मनोरंजनगृहे येत असते. या एसईझेड मध्ये खाजगी बिल्डर आला की, तो प्रथम घरांची कामे सुरु करतो आणि ही घरे मोठया किमतीत विकतो. त्यामुळे यासंदर्भातील पॅटर्न निर्धारीत झाला पाहिजे. ज्यावेळेला परवानगी दिली जाते त्यावेळेला यासंदर्भातील निकष स्पष्ट करण्याची आवश्यकता असते. दुसरा मुद्दा असा आहे की, आज चीन मधून मोठया प्रमाणात माल येतो आणि आपल्याकडे तो विकला जातो. एवढया मोठया प्रमाणात चीन मधून माल येत असतांना आपण त्यासाठी काहीच करु शकत नाही. एसझेडमध्ये जो माल तयार होईल तो स्वस्त असणार आहे. त्यामुळे जे उद्योग एसईझेडमध्ये नसतील त्यांना माल तयार करण्यासाठी जादा खर्च येणार आहे.त्यामुळे एसईझेडच्या बाहेर जे जे उद्योग आहेत ते बंद पडतील व पर्यायाने प्रचंड बरोजगारी वाढेल. त्यामुळे या गोष्टीचा शासनाने विचार केलेला आहे का ? असे मला विचारावयाचे आहे. प्रादेशिक असमतोलाच्या संदर्भात ब-याच लढाया झालेल्या आहेत व त्यासाठी डेव्हलपमेंट बोर्ड तयार झालेले आहे. त्यामुळे यासंदर्भातही विचार होण्याची आवश्यकता आहे. तसेच कोणत्याही प्रकारचे उद्योग एसईझेडमध्ये येणार असतील तर त्यासंदर्भात निकष ठरविण्याची आवश्यकता आहे. जर या ठिकाणच्या एसईझेडमध्ये खेळणी तयार झाली तर सावंतवाडी मध्ये सध्या जी लाकडी खेळणी तयार केली जाते तो उद्योग या कंपनीमुळे बंद पडेल याचा विचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, एसईझेडच्या संदर्भात माझ्या एकूण 7 मागण्या आहेत. पहिली मागणी अशी आहे की, एसईझेडच्या संदर्भात शासनाने प्रथम धोरण ठरवण्याची आवश्यकता आहे. चीनमध्ये एका पूर्ण जिल्हयात एसईझेड निर्माण करण्यात आलेला आहे. या ठिकाणी एसईझेड झालेले असतांना देखील त्या ठिकाणच्या लोकांना त्यांनी दुसरीकडे हलविले नाही. एसईझेड तयार

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत ....

करतांना बेसिक इन्फ्रास्ट्रक्चर त्यांनी तयार केलेले आहे. त्यामुळे त्या ठिकाणी एसईझेड राहिलेले नाही तर एसईझेड प्लॉट राहिलेले आहेत. त्यामुळे त्याला स्पेशल इकॉनॉमी प्लॉट म्हटले गेले आहे. रायगड, सिंधुदुर्ग रत्नागिरी या ठिकाणी एसईआर म्हणून डिक्लेअर करण्यात आलेला आहे. खरे म्हणजे एसईझेडच्या इन्फ्रास्ट्रक्चरचे काम खाजगी बिल्डरला देण्यापेक्षा शासनानेच हे इन्फ्रास्ट्रक्चर उभारावे व उद्योग निर्माण करावे. असे जर झाले तर महाराष्ट्र संपूर्ण जगात क्रांती घडवू शकेल त्यामुळे या बाबीचाही शासनाने विचार करावा अशी माझी माननीय मंत्रीमहोदयांना विनंती आहे. एमआयडीसी सोबत यांसदर्भात चर्चा करण्याची आवश्यकता आहे. तिसरी गोष्ट अशी आहे की, कन्सेन्ट डिक्लेअर ॲक्वीझीशन शासनाने करावे. तसेच चौथा मुद्दा असा आहे की, या एसईझेड मध्ये प्रादेशिक विषमतेचा विचार करण्यात यावा. पाचवा मुद्दा असा आहे की, ज्या ठिकाणी एसईझेड तयार केले जाणार आहे त्या ठिकाणच्या लोकांचे अगोदर पुनर्वसन झाले पाहिजे अशा प्रकारचे धोरण ठरविण्याची आवश्यकता आहे. सहावा मुद्दा असा आहे की, ज्या ठिकाणी सुपिक जमिनी आहेत. तसेच सातवा मुद्दा असा आहे की, कोरडवाहू आणि सुपिक जमिनीच्या संदर्भात निर्णय होण्याची आवश्यकता आहे. तसेच या ठिकाणी जर एसईझेड आणला जाणार असेल तर तेथील लोकप्रतिनिधींशी चर्चा करुन त्यांना विश्वासात घेण्याची आवश्यकता आहे. तसेच एसईझेडमध्ये पॅटर्न ऑफ डेव्हलपमेंट यांचाही विचार होण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कर्नल सुधीर सावंत......

त्याठिकाणी कोणते उद्योग येणार आहेत याची माहिती दिली पाहिजे. मला या निमित्ताने सांगावयाचे आहे की, आर्थिक निर्णय घेताना त्याचे परिणाम लगेच दिसून येत नाहीत. त्यासाठी किमान पाच-सहा वर्षांचा कालावधी जावा लागतो. तसेच एसईझेड बाबत बाहेरील राज्यात काय परिणाम झाला त्याचा अभ्यास करुन आपले धोरण ठरवावे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

---------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर संघ ) : सभापती महोदय, एसईझेडबाबत माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. मी जास्त काही बोलणार नाही. मी फक्त माझे विचार मांडणार आहेत.

सभापती महोदय, केंद्र सरकारने 165 प्रकल्पांना एसईझेडखाली परवानगी दिलेली आहे. परंतु हे एसईझेड मृगजळच आहे की काय ? अशाप्रकारची परिस्थिती निर्माण झालेली आहे. याचे कारण असे की, या एसईझेड बाबत योजनापूर्वक जनतेमध्ये संभ्रम निर्माण केला जात आहे. विशेषत: महाराष्ट्रातील कोकण आणि रायगड विभागात अशाप्रकारची परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्यामुळे तेथील भागांतील लोकांना एसईझेड संदर्भातील माहिती नीटपणे दिली गेली पाहिजे. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, ठाणे जिल्ह्यातील मलंगपट्टी येथे शासनाने हजारो एकर जमीन ताब्यात घेऊन ठेवलेली आहे, परंतु त्या जमिनीचा कोणताही वापर केलेला नाही. गेल्या चार महिन्यांपासून एम.आय.डी.सी.ने शेतकऱ्यांकडून नवीन जमीन घेण्यास सुरुवात केलेली आहे. एका बाजुला आहे त्या जमिनीचा वापर करायचा नाही आणि दुसरीकडे नवीन जमिनी ताब्यात घ्यावयाच्या याला धोरण म्हणत नाही, याचा याठिकाणी विचार केला पाहिजे. सभापती महोदय, राज्यात आणि देशात काँग्रेस पक्षाचे सरकार आहे. एकीकडे त्यांची अशी भूमिका आहे की, शेतकऱ्यांनी रस्त्यावर येता कामा नये, एसईझेडखाली त्यांच्या सुपीक जमिनी घेता कामा नये. तर दुसरीकडे रायगड, उरण , पनवेल, पेण याठिकाणची सुपीक जमीन घेण्याचा विचार चालू आहे. एका बाजुला बळीराजाचा बळी देऊन दुसरीकडे त्याच्या जिवावर वैभव उभे करायचे ही प्रवृत्ती बरोबर नाही. माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, एसईझेडसाठी पडीक जमीन घेणार आहोत. परंतु मला त्यांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, आपण शेतकऱ्यांची पडीक जमीन घेत नसून सुपीक जमीन घेत आहात. याबाबत मंत्रिमहोदयांनी खुलासा केला पाहिजे.

सभापती महोदय, या सर्व क्षेत्रावर सरकारचे नियंत्रण राहणार आहे की नाही ?कारण त्याठिकाणी आठ कामगार कायदे लागू होणार नाहीत. एका बाजुला जेथे कामगार कायदा लागू आहे तेथेच कामगारांची अडचण झालेली आहे. जर याठिकाणी कामगार कायदा लागू होणार नसेल तर त्याठिकाणी त्यांची पिळवणूकच होणार आहे. बेलापूर शहरात पूर्वी सोन्याचा धूर निघायचा आता

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर........

तर त्याठिकाणचे बरेच उद्योगधंदे बंद होण्याच्या मार्गावर आहेत. 700-800 कामगारांना त्यांची देणी मिळालेली नाही. 137 कामगार देशोधडीला लागले आहेत. जर आपण त्याठिकाणी कामगार कायदा लागू केला नाही तर आपण त्यांना कामगारांची पिळवणूक करण्याची संधी देत आहोत. तेव्हा याबाबतीत मंत्रिमहोदयांनी खुलासा केला पाहिजे.

सभापती महोदय, पूर्वी रिलायन्स कंपनीला घरे, मॉल्स बांधण्यासाठी 2.3 टक्के सवलत दिली. आता रिलायन्स कंपनीला 15 टक्के सवलत दिली जाणार आहे. या माध्यमातून मॉल्स,घरे बांधली जाणार आहेत काय ? हे स्पष्ट केले पाहिजे. आपण एका बाजुला धनदांडग्यांना कर सवलत देत आहात तर दुसरीकडे कोकणातील साध्या सुपारी व्यापाऱ्याला ज्याचे उत्पन्न साधारणत: आठ ते दहा लाखांच्या घरात आहे त्यांच्यावर उपकर लावला जात आहे. हा उपकर रद्द केला जाईल असे आश्वासन या सभागृहात दिले गेले, परंतु तो उपकर रद्द झाला नाही. जीवनावश्यक वस्तूंवर व्हॅट लावला जाईल, नारळावर व्हॅट लावण्याचा निर्णय झाला नंतर त्यास स्थगिती दिली. एकाबाजूला सर्व वस्तूंवर कर लावला जाणार आणि दुसऱ्या बाजूला धनदांडग्यांना कर सवलत देणार ही विषमता आपण कशी मिटविणार आहात हे स्पष्ट केले पाहिजे.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर....

सभापती महोदय, आज विजेचा मोठा प्रश्न आहे. परवाच माननीय मंत्रिमहोदयांनी अडीच तासाच्या चर्चेच्या निमित्ताने उत्तर देताना सांगितले की, महाराष्ट्राला जी वीज लागणार आहे ती सन 2010 पर्यंत आपण पूर्ण करु शकणार आहोत. मग, आता याठिकाणी एसईझेड निर्माण होणार आहे, त्यासाठी वीज लागणारच. त्यासाठी आपण काय करणार आहात ? त्यासाठी आपण वीज कुठून आणणार आहात ? याचेही उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावे. सभापती महोदय, पुनर्वसनाच्या बाबतीत निरनिराळया प्रकारे उत्तरे दिली जातात. विस्थापित लोकांच्या बाबतीतही आश्वासने दिली जातात. परंतु प्रत्यक्षात त्यांचे पुनर्वसन होत नाही. आज विस्थापितांना कोर्टाचे खेटे घालावे लागत आहेत. याबाबतीत आपल्याला तारापूरचे उदाहरण देता येईल. त्याठिकाणी शासनाने विस्थापितांना न्याय दिला नाही, म्हणून त्यांना हायकोर्टात जावे लागले व हायकोर्टाच्या निर्देशाप्रमाणे आता त्यांच्या पुनर्वसनाचे काम चालू आहे. त्यामुळे पुनर्वसनाच्या आणि विस्थापितांच्या बाबतीत आपण कशा पध्दतीने न्याय देणार आहात, याची माहिती आपण सभागृहाला द्यावी, ही विनंती. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

धन्यवाद !

--------

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद कमरुझ जामा(महाराष्ट्र विधानसभा सदस्यों द्वारा निर्वाचित):सभापति महोदय, विशेष आर्थिक क्षेत्र योजना के संबंध में बहुत से माननीय सदस्यों ने अपनी राय व्यक्त की है. यह बात सही है कि एसईझेड का कानून भारत सरकार ने बनाया है और यह कानून लागू होगा या नहीं, यह आप्शन अब नहीं है. क्योंकि यह कानून 10 फरवरी, 2006 से लागू हो गया है. एसईझ ेड योजना के संबंध में किसी का कोई विरोध नहीं है, ऐसा मुझे लगता है लेकिन सभी सदस्य यह चाहते हैं और सब का यह मत है कि लैंड एक्वीजिशन की प्रोसेस और पुनर्वास योजना पारदर्शक हो, इसमें किसी पर अन्याय न हो. इस योजना के कार्यान्वयन में लोकप्रतिनिधियों का समावेश किया जाना चाहिए, उनको विश्वास में लिया जाना चाहिए और झोन वाईज लोकप्रतिनिधियों की कमेटी बनाई जा सकती हो तो वह बनाई जानी चाहिए.

सभापति महोदय, दूसरी बात यह है कि एक माननीय सदस्य ने कहा कि एसईझेड में लेबर एक्ट लागू नहीं होगा. मैं यह बताना चाहता हूं कि एसईझेड कानून में ऐसा नहीं लिखा कि लेबर एक्ट लागू नहीं होगा. एसईझेड में भी लेबर एक्ट लागू होगा लेकिन उसे कार्यान्वित करने का अधिकार डेवेलपमेंट कमिश्नर को दिया जाएगा. मैं यह बताना चाहता हूं कि श्रम मंत्रालय, ट्रेड युनियन, लेबर युनियन से सम्पर्क करके इस संबंध में कोई स्पष्ट नीति बनायी जानी चाहिए. ग्लोब्लाईजेशन हमें स्वीकार है लेकिन वह करते समय यहां के लोगों पर अन्याय न हो, इसके प्रति सजग रहना चाहिए. इसलिए लेबर एक्ट के संबंध में स्पष्ट नीति होनी चाहिए.

सभापति महोदय,माननीय सोनिया गांधी जी ने भी कहा है कि एसईझेड योजना करते समय किसानों पर, जमीन मालिकों पर अन्याय नहीं होना चाहिए. यह कहा जाता है कि जो कृषि जमीन है, उपजाऊ जमीन है, वह जमीन नहीं ली जाएगी बल्कि केवल बंजर जमीन ली जाएगी. लेकिन मैं यह बताना चाहता हूं कि इस संबंध में स्पष्ट नीति नहीं है. क्योंकि नागपुर के कामठी क्षेत्र में राजस्व विभाग की तरफ से जिस जमीन को एक्वायर करने के लिए नोटिस लगायी गयी है वह उपजाऊ जमीन है. इसलिए मैं यह अनुरोध करना चाहता हूं कि सरकार इस संबंध में स्पष्ट नीति घोषित करें. हमारे पास बहुत सारी बंजर जमीन पड़ी है इसलिए खेती योग्य जमीन, उपजाऊ जमीन नहीं ली जानी चाहिए. दूसरी बात यह है कि जमीन मार्केट रेट से खरीदी नहीं जा रही है. इसलिए मेरा अनुरोध है कि मार्केट रेट से जमीन खरीदी जाए. आप जब यह कहते हैं

...3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद कमरुझ जामा....

कि एसईझेड योजना के अन्तर्गत फॉरेन इनवेस्टमेंट आएगी तो किसानों को थोड़े ज्यादा पैसे मिल जाए तो कोई अड़चन नहीं होनी चाहिए. इसलिए मेरा यह अनुरोध है कि किसानों की जमीन मार्केट रेट से खरीदी जाए. दूसरी बात यह है कि एसईझेड योजना के अन्तर्गत जिन लोगों की जमीन ली जाने वाली है और जो लोग प्रभावित होने वाले हैं, उनका अच्छी तरह से पुनर्वास किया जाना चाहिए इसलिए पुनर्वास के संबंध में पॅकेज घोषित करना चाहिए. प्रभावित लोगों को नौकरी मिलनी चाहिए. हमारे राज्य में आय.टी. क्षेत्र की अच्छी जानकारी रखने वाले विद्यार्थी है, इंजीनियर है, ऐसे विद्यार्थियों को नौकरी देने की कंडीशंस रखी जानी चाहिए. महाराष्ट्र सरकार इस प्रकार का कानून बनाए. मेरा दूसरा सुझाव यह है कि बड़े उद्योगपतियों के साथ छोटे उद्योगपतियों को भी एसईझेड योजना में शामिल किया जाना चाहिए. छोट उद्योगों के लिए भी लैंड एक्वीजिशन की प्रोसेस की जानी चाहिए. इस योजना में चाहे तो आप छोटे उद्योगपतियों को बड़े उद्योगपतियों के साथ संलग्न कर सकते हो या अलग से उन्हें जमीन उपलब्ध करके दी जा सकती है. तो इस बारे में भी सरकार विचार करें. माननीय सदस्य मेजर सुधीर सावंत ने जैसे कहा कि एमआईडीसी में एसईझेड होना चाहिए. मैं भी उनके सुझाव से सहमत हूं. एमआईडीसी के पास बहुत सारी जमीन बेकार पड़ी है और बहुत सारे उद्योग बंद है. इसलिए ऐसी जमीनों का भी एसईझेड योजना के अन्तर्गत विचार किया जाना चाहिए. अंत में मैं यह कहूंगा कि एसईझेड योजना पर मॉनिटरिंग के लिए विधानमंडल की समिति बनाई जानी चाहिए. इतना कहते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूं.

......................

यानंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारा) : सभापती महोदय, आजच्या चर्चेमध्ये आपण मला भाग घेण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. विशेष आर्थिक क्षेत्रामधील उद्योजकांवर जो सवलतींचा वर्षाव होतो आहे ते पाहिल्यानंतर हे सर्व उद्योजक भारताचे जावई आहेत की काय ? अशी शंका माझ्यासारख्या कार्यकर्त्याच्या मनात आहे. आंधोळीला गरम पाणी, पुसायला नवीन टॉवेल, न्याहरीला गरम गरम शेवया आणि वरुन साजूक तुप अशा प्रकारे या जावयांची खिदमत सुरु आहे. आणि हे सर्व कुणाच्या जिवावर सुरु आहे तर शेतक-यांच्या जमिनींच्या जिवावर. शेतक-यांच्या जमिनी बाजारभावाने घेणार नाही तर सरकारी भावाने घेणार आहेत. कोणत्या जमिनी घेणार ? तर या जावयांना ज्या आवडतील त्या जमिनी घेणार आहेत. ज्या ठिकाणी पडिक जमिनी आहेत, विकास झालेला नाही त्या जमिनी घेणार नाहीत, तर ज्या जमिनी आवडतील त्या जमिनी घेणार आहेत. सभापती महोदय, जमिनी दोन प्रकारच्या असतात. एक म्हणजे पीक येणारी काळी जमीन आणि दुसरी म्हणजे खरबाडी जमीन. मला या निमित्ताने सर्व सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की, खरबाडी जमिनीमध्ये देखील एक गेम आहे. लातुरला विशेष आर्थिक क्षेत्र निर्माण करण्यात आलेले आहे. लातुरमध्ये माळरान आहे. त्या जमिनींची किंमत 30 ते 40 लाख रुपये एकर झालेली आहे. ज्या शेतक-याने आपल्या मुलीच्या लग्नासाठी पोटाला चिमटा दिला, फोडणीत तेल वापरले नाही, ज्वारीच्या पिठाचीच भाकरी आणि त्याच पिठाचे पिठले खाल्ले, जिवाला मारुन जमिनी ठेवल्या ती जमीन आता 40 ते 30 लाख रुपये किमतीची झाली आहे. आता या सरकारचा डोळा या जमिनींकडे गेलेला आहे. या जमिनी सरकार विशेष आर्थिक क्षेत्रासाठी घेऊ इच्छिते. मग काय पाप केले त्या शेतक-यांनी ? सगळया गावांमधील जमिनी घ्या, भारतातील सर्व जमिनी घ्या पण चालू बाजारभावाने घ्या. एका बाजूला सांगता की, मुक्त आर्थिक व्यवस्था स्वीकारली आहे आणि दुस-या बाजूला आमच्यावर बंधने घालता ? लायसन्स, परमिट आमच्यासाठी आणि हे मात्र मोकळे, अशी परिस्थिती आहे. मला या निमित्ताने सरकारला विनंती करावयाची आहे की, त्यांचे डोळे जे या जमिनीवर आहेत ते थोडे बाजूला घ्या.

दुसरी बाब म्हणजे, या क्षेत्रासाठी पर्यावरणाचे देखील बंधन नाही. मी एकदा पाताळगंगा जेथे रिलायन्सचा उद्योग आहे त्या भागात गेलो होतो. त्या ठिकाणी नदीकाठल्या 36 गावातील लोकांना पिण्यासाठी पाणी मिळत नव्हते. या उद्योगाचे केमिकल नदीमध्ये सोडण्यात

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

..2..........

श्री.पाशा पटेल.............

आले होते त्यामुळे पाण्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. अशा प्रकारचे उदंड जावई जर या ठिकाणी एसईझेडमध्ये आले आणि त्यांनी अशा पध्दतीने काम केले तर त्याची जबाबदारी कोण घेणार आहे ? त्यांना कोणत्याही प्रकारची बंधने नाहीत, निर्बंध नाहीत, कारण ते व्हीव्हीआयपी आहेत, जावई आहेत. अशा पध्दतीचा नंगानाच या ठिकाणी होऊ लागला आहे.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल ...........

तेथील लोकांना थिएटर, पाणपट्टी, हॉटेल, चालविता येणार नाहीत काय ? लोकांना कारखाना चालविता येणार नाही. पण पाणपट्टी मात्र चालविता येईल. आम्हाला मोटर कंपनी काढता येणार नाही, हे आम्ही कबूल करतो. परंतु हॉटेल, थिएटर, पाणपट्टी चालविण्यासाठी देखील परकीय गुंतवणूक आणि ते सुध्दा तुम्हीच चालविणार ? माझी अशी विनंती आहे की, जमिनी घेणारी जी आडनावे आहेत. त्या आडनावांचे येथे कोणीच नाही. परंतु जमिनी देणारांची आडनावे येथे आलेली आहेत. मला असा प्रश्न पडलेला आहे की, सर्वांनी गळाताणून, आतडे आवळून ओरडावयाचे. त्याच बरोबर ज्यांच्या जमिनी आहेत, त्या माणसांसाठी लढाई करणे शक्य नाही काय ? मला असे वाटते की, यासंदर्भात सर्वांनी गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. काल माननीय उद्योग मंत्र्यांनी असे सांगितले की, हा केंद्र सरकारचा कायदा आहे. त्यामुळे राज्य सरकार शिफारशी करु शकते. उद्योग मंत्र्यांना मी अशी विचारणा करणार आहे की, यासंदर्भात राज्य सरकारची भूमिका काय आहे ? सेवाभावी संस्थांनी यासंदर्भात सविस्तर अभ्यास केलेला आहे. त्यांनी असे सांगितलेले आहे की, विशेष आर्थिक क्षेत्राच्या स्थापनेत राज्य सरकारची अत्यंत महत्वाची भूमिका असेल. खाजगी क्षेत्राचा, विशेष आर्थिक क्षेत्राचा निर्णय घेण्यापूर्वी मंत्रिमंडळीय समितीत असलेल्या राज्य सरकारच्या प्रतिनिधींशी विचारविनिमय केला जाईल. केंद्रीय व्यापार उद्योग मंत्रालयाकडे कोणत्याही प्रस्तावाची शिफारस करतांना त्यासाठी पाणी, वीज, विशेष मुलभूत सुविधा पुरवू शकते किंवा नाही याची राज्य सरकारने खात्री करुन घ्यावयाची आहे. म्हणजे पूर्ण दुर्लक्ष केलेले आहे असे नाही. तुमची सुध्दा चालेल. परंतु किती चालवावयाचे ? चालवावयाचे की नाही ? असा प्रश्न आहे. एका बाजूला एवढया सोईसवलतींचा वर्षाव झाला तर, म्हणजे पूर्ण वेळ शेतीसाठी वीज मिळाली तर आम्ही संपूर्ण जगाला द्राक्षे, सरफचंद, शेंगा, वांगे, केळी देऊ शकतो एवढी ताकद शेती करणा-या शेतक-यांची आहे. असें असताना स्पेशल लोकांना या जमिनी द्याव्यात असे तुमच्या मनामध्ये कसे काय येते ? शेतक-यांना का नाही ? विशेष आर्थिक झेत्र म्हणजे स्पेशल लोकांसाठी तयार केलेला झोन. ज्या आडनावांच्या लोकांची जमीन जात आहे व जे लोक जमीन घेणार आहेत, त्यांची नावे सांगा. मी सभागृहाला विनंती करतो की, एका गोष्टीचा विचार करा की, लाकांनी आम्हाला आशेने येथे पाठविलेले आहे त्याककडे दुर्लक्ष होऊ नये, अशी माझ्यासारख्या कार्यकर्त्याची भावना आहे. कोणाला वाईट वाटले असेल तर मला माफ करा. 30 वर्षे लोकांना जे सांगितलेले आहे, ते येथे

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ KTG/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर .......... 12:00

श्री.पाशा पटेल ...........

सांगण्यास तोंडावर बंधन येणार असेल तर त्याचा आपल्याला विचार करावा लागणार आहे. शेतक-यांच्या जमिनी शासनाने बाजार भावानेच घेतल्या पाहिजेत. काही ठिकाणी नापीक जमिनी असल्या तरी त्या जमिनीची किंमत जास्त असू शकते या गोष्टीकडे लक्ष दिले पाहिजे. शेतक-यांची सर्व जमीन कारखान्यांनी न वापरता त्या जमिनीतील काही हिस्सा जीवन निर्वाहासाठी शेतक-यांना दिल्या तर ते जगू शकतील. दुसरी गोष्ट म्हणजे ज्या कंपन्या येणार आहेत, त्या कंपन्यांमध्ये शेतक-यांना शेअर्स मिळाले पाहिजेत. जमिनी गेल्यानंतर दारु पिऊन मोकळे हिंडण्यापेक्षा त्यांना काम देऊन कंपनीचा फायदा होणार असेल आणि लोकांचाही फायदा होणार आहे तेव्हा यासंबंधी सुध्दा विचार करावा, अशी मी विनंती करतो. सेवाभावी संस्थेचे हे पुस्तक मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो या पुस्तकातील शिफारशींचा सरकारला उपयोग झाला तर मी धन्यता मानेन. एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

----------

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, वेळेचे भान मला आहे आणि म्हणूनच मी आपला जास्त वेळ घेणार नाही. सभापती महोदय, या सभागृहातील सर्वच सन्माननीय सदस्यांनी एसइझेडच्या संदर्भात आपल्या ज्या भावना व्यक्त केल्या आहेत त्या या विषयाला पुरेपूर न्याय देणार आहेत आणि त्यामुळे मी आणखी वेगळे काही सांगावे अशातील भाग नाही. परंतु या विशेष आर्थिक क्षेत्राच्या संदर्भात दिल्लीवरून एक इंग्रजी मासिक निघते, 'हार्ट न्यूज' नावाचे ते मासिक आहे. त्यामध्ये शेतकरी करीत असलेल्या आत्महत्या आणि एसइझेड यांचा कसा संबंध आहे याची अत्यंत साधक बाधक माहिती देण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी आता येथे जे म्हटले आहे ते आणि आपण सर्वांनीच येथे जे मुद्दे उपस्थित केले त्याच्याशी मी शंभर टक्के सहमत आहे. यामध्ये प्रश्न असा निर्माण होतो की, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी आपण एसइझेड साठी घेणार आहोत ... या ठिकाणी या प्रस्तावात आपण म्हटले आहे की, शेतकऱ्यांच्या जमिनी अडीच लाख रूपये हेक्टरी या भावाने घेणारी सिडको आणि रिलायन्सच्या जमिनी मात्र 4 कोटी रूपये एकरी विकते हे कसे काय ? सभापती महोदय, या निमित्ताने आमच्या सन्माननीय मंत्री महोदयांना मी नम्रपणे विचारू इच्छितो की, आपल्या देशामध्ये आर्थिक, सामाजिक विषमता कमी करण्याचा आपण सर्वच जण जीवापाड मेहनत करीत आहोत मग आपण पुन्हा ही विषमता निर्माण करून गरीब आणि श्रीमंत यांतील दरी वाढविण्याचे पाप का करीत आहात ? हा प्रश्न आमच्या या पुरोगामी सरकारला आहे. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी एसइझेड साठी घेतल्या जाणार असतील त्यांच्या बाबतीत आपले नेमके धोरण काय राहणार आहे ? सेंटॉर हॉटेल विक्रीच्या बाबतीत काय झाले ? खाजगीकरणातून हे हॉटेल 75 कोटीला विकले गेले आणि ज्या भांडवलदाराने ते विकत घेतले त्याने त्याबाबत काहीन न करता ते हॉटेल पुन्हा दुसऱ्या अडीचशे कोटींना विकून टाकले. हे कसे झाले ? यावरून सर्वत्र अगदी संसदेमध्ये देखील कसा गदारोळ उडाला होता ? अशा प्रकारांच्या बाबतीत आपले सरकार काय करीत आहे ? या एसइझेडच्या बाबतीत देखील असेच होणार नाही याची खात्री काय आहे ? शेवटी तुम्ही-आम्ही, हे सरकार कशासाठी आहे ? जर जो नाहीरे वर्ग आहे मग त्यात दलित असतील, आदिवासी असतील, ओबीसी, अल्पसंख्यांक असतील, शेतकरी असेल, गरीब माणूस असेल, बहुजन समाज असेल त्यांच्या कल्याणावर निखारा ठेवून आपण अशा प्रकारचे निर्णय घेणार असाल तर ते बरोबर नाही. अशा प्रकारचे निर्णय घेतले जात

....... टी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे .....

असतील, केंद्र सरकारचा कायदा या संदर्भात झाला असला तरी आमच्या राज्य सरकारने केंद्र सरकारच्या अशा कायद्याला कठोरपणे विरोध केला पाहिजे. त्यांना आपण सांगितले पाहिजे, आमच्या शेतकऱ्यांचे नुकसान होणार नाही, प्रगतीच्या नावाखाली, आर्थिक विकासाच्या नावाखाली आमच्या राज्यातील शेतकऱ्यांचा विकास थांबणार असेल तर त्याला आपण कठोरतेने विरोध केला पाहिजे आणि केंद्र सरकारपुढे आपली भूमिका समर्थतेने मांडली पाहिजे. या संदर्भात 'हार्ट न्यूज'ने काय सांगितले आहे ? ज्या भागामध्ये सुपिकता आहे, जो भाग सधन आहे, संपन्न आहे अशा भागामध्ये एसइझेचे प्रकल्प राबविले जाणार आहेत. त्यामध्ये यावर उपाय सुचविण्यात आले आहेत, शेतकऱ्यांच्या ज्या आत्महत्या होत आहेत त्या कशा थांबविता येतील हे त्यात त्यांनी सांगितले आहे. त्यांनी म्हटले आहे की, ज्या भागामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत, त्या भागामध्ये अशा प्रकारचे एसइझेडचे प्रकल्प राबविले तर शेतकऱ्यांना आत्महत्या करण्यापासून वाचविता येईल. तेव्हा असे काही धोरण आपण ठरविणार आहात का ? सभापती महोदय, एसइझेडला कोणाचाही विरोध नाही. शेटी राज्याची आर्थिक प्रगती सर्वांनाच पाहिजे आहे. आर्थिक संपन्नता आली पाहिजे याबद्दल कोणाचेच दुमत नाही. त्यातून आपले राज्य पुढे पुढे जाणार आहे. .....

( यानंतर श्री. सरफरे ..... यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे....

परंतु यामध्ये ज्या काही उणीवा आहेत त्यांचा गंभीरपणे विचार करण्याची निश्चितपणे गरज आहे. सभापती महोदय, या एस.ई.झेड. मधील उद्योग हे स्पेशल लोकांसाठी स्पेशल झोन असून ते वरपासून खालपर्यंत स्पेशल लोकांसाठी केले जात आहेत. "नाहीरे" वर्गामधून येणारे लोक सुध्दा स्पेशल लोकांचा विचार करु लागले आहेत. दुर्दैवाने ही स्थिती आपल्या राज्यामध्ये आली आहे. आपण बाहेर गेलो तर लोक आपल्याला कदाचित गरिबांचा कैवारी, प्रगतीशील राज्याचे प्रतिक म्हणून आमच्यावर थुंकतील. या एस.ई.झेड. मधील उद्योगपतींना, भांडवलदाऱ्यांना, पुंजीपतींना सर्व प्रकारच्या सवलती मिळणार आहेत. त्यामध्ये श्री. राहुल बजाजसारखे उद्योगपती आहेत, ज्यांनी मागासवर्गीय, इतर मागासवर्गीय, दलित, आदिवासींच्या सवलतींना विरोध केला.त्यांना आपण सवलती देणार आहात काय हा खरा प्रश्न आहे? ही आर्थिक नाहीतर सामाजिक समस्या आहे. त्यामुळे मी आपणास एकच सूचना करतो की, याठिकाणी रोगापेक्षा इलाज भयानक अशी अवस्था या एस.ई.झोनच्या बाबतीत होता कामा नये. या झोनकरीता आज शेतकऱ्यांच्या जमिनी विकत घेतल्या जातील, त्यांना केवळ नुकसान भरपाई देऊन भागणार नाही तर त्या शेतकऱ्यांना देखील उद्योगामध्ये भागिदारी दिली पाहिजे. या प्रस्तावावर अनेक माननीय सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत त्यांच्या भावनांशी मी सहमत आहे. आपण मला संधी दिल्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. यशवंतराव गडाख (अहमदनगर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी एका महत्वाच्या विषयावर सभागृहामध्ये चर्चा उपस्थित केल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. त्यानिमित्ताने अनेक माननीय सदस्यांचे वेगवेगळे विचार मला ऐकावयास मिळाले आहेत. भारताचे पहिले पंतप्रधान श्री. पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी या देशाचे पहिले आर्थिक धोरण जाहीर केले. त्यावेळी डावीकडे नाही, उजवीकडे नाही अशापध्दतीची या देशाची आर्थिक व्यवस्था व समाज रचना राहिली.

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

आजच्या राज्यकर्त्यांना त्या व्यवस्थेचा विसर पडत चालला आहे असे माझ्यासारख्या एका कार्यकर्त्याला वाटते. भारताला आर्थिक महासत्ता व्हावयाचे आहे. जगामध्ये एक नंबरचे आर्थिक महासत्ता होण्यासाठी आर्थिक विकासाचा वेग वाढला पाहिजे. ते होत असतांना त्यामध्ये अनेकांचा बळी जाणार आहे, याचा मूलभूत विचार राज्यकर्त्यांनी केला नाहीतर आर्थिक प्रगती आणि आर्थिक विकासाचा दर हे स्वप्नरंजन ठरेल. अशाप्रकारचे चित्र दिसते. याठिकाणी अनेक प्रकारची प्रलोभने दाखविली जात आहेत. ज्यांच्या जमिनी जाणार आहेत त्यांचे पुनर्वसन चांगल्या पध्दतीने होणार आहे. मी जाहीरपणे या सभागृहाला सांगू इच्छितो की, आजपर्यंत महाराष्ट्रामध्ये जेवढी धरणे झ ाली, जेवढे उद्योग झाले त्यासाठी कराव्या लागणाऱ्या पुनर्वसनाच्या कामामध्ये हे महाराष्ट्र सरकार सपशेल फेल गेले आहे. त्यामध्ये आपण विस्थापितांचे पुनर्वसन करु न शकल्यामुळे ते देशोधडीला लागले आहेत.

सभापती महोदय, माझ्या तालुक्यातील उदाहरण आपणास सांगतो. जायकवाडी धरणाकरीता शेवगाव आणि नेवासे या दोन तालुक्यामधील 151 गावे गेली. या गावातील ज्वारी पिकाची असलेली काळीभोर जमीन गेली. त्यामध्ये मोठमोठया वाडया गेल्या. सभापती महोदय, मी 1967 साली पंचायत समितीचा सभापती होतो. त्या गावामध्ये जायकवाडीचे पाणी येणार होते. जिल्हाधिकाऱ्यांसोबत मी त्या गावामध्ये गेलो. लोक आपले गाव सोडून जायला तयार नव्हते. जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले की, गावामध्ये पाणी येणार असल्यामुळे आपल्याला येथून उठावे लागेल. त्याठिकाणी एक फाटक्या कपडयातील मुंडासे बांधलेला माणूस आला. तो म्हणाला तुम्ही आम्हाला वाचविणार काय? जन्मठेप झालेला माणूस जेलमध्ये जातांना दहा वेळा मागे वळून आपल्या मुलीकडे पाहतो. आमच्या पिढयान् पिढया या गावामध्ये गेल्या आहेत. या गावात सूना, लेकी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MHM/ SBT/

श्री. यशवंतराव गडाख...

नांदल्या आहेत. हे सांगत असतांना त्याच्या डोळयात पाणी आले, आमच्याही डोळयात पाणी आले. तेव्हा सांगावयाचा मुद्दा  असा की, धरण होत असतांना नुसते गाव बुडत नसते, नुसती घरे बुडत नाहीत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.यशवंतराव गडाख (पुढे सुरु....

त्याचबरोबर गावाची संस्कृतीही बुडते. या आर्थिक क्षेत्रासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करत आहात यामध्ये हजारो लोकांना देशोधडीला लावणार आहात. त्यांच्या पुनर्वसनाच्या संबंधात नेमके धोरण काय आहे, याबाबतचा निश्चितपणे शासनाने विचार केला पाहिजे. नाही तर कोणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे अशी परिस्थिती निर्माण होईल. अशाप्रकारे आर्थिक प्रगती असेल तर ती आर्थिक प्रगती आम्हाला मंजूर नाही. या पापाच्या गुन्हेगारीमध्ये आम्हाला सहभागी करून घेऊ नका. शेवटी ग्रामीण भागामध्ये आम्हाला रहावयाचे आहे, शेतकऱ्यांपुढे आम्हाला जावयाचे आहे. त्यांना अशाप्रकारे स्वप्नरंजन दाखवून हा केंद्राचा कायदा आहे, आपल्याला आर्थिक प्रगती करायची आहे या चक्रव्युहामध्ये आम्हाला अडकविणार असाल तर अशापध्दतीने आमची मंजुरी घेऊन आर्थिक क्षेत्र उभारणार असाल तर ते आम्हाला मान्य नाही. म्हणून सरकारने यासंबंधात स्पष्टपणे धोरण ठरवून ते राबविले पाहिजे एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

---

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण (उद्योग मंत्री) : सन्माननीय सभापती महोदय, मी सर्व सन्माननीय सदस्यांचे मनापासून आभार मानतो की, अडीच तासाच्या चर्चेच्या माध्यमातून विशेष आर्थिक क्षेत्राच्याबाबतीत ज्या काही शंका मनामध्ये होत्या, त्या सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या आहेत. विशेष आर्थिक क्षेत्राचा आपल्याला काय फायदा घेऊ शकतो, यासंबंधातही विचारणा करुन आपल्या भावना व्यक्त केल्या, त्याबद्दल सुरूवातीलाच सन्माननीय सदस्यांचे आभार मानतो. विशेष आर्थिक क्षेत्राच्याबाबतीत शेतकऱ्यांचे भवितव्य काय आहे ? त्यांच्या जमिनीचे काय होणार आहे ? याबाबत शासनाची भूमिका काय आहे ? अशाप्रकारचे अनेक प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित करून आक्षेप घेतला. एकीकडे महाराष्ट्रामध्ये उद्योग वाढले पाहिजेत, महाराष्ट्र हे देशामध्ये क्रमांक एकवरचे राज्य राहिले पाहिजे. मागच्या कालावधीमध्ये राज्य मागे पडत चालले होते, अशाप्रकारची अनेक लोकांनी खंत व्यक्त केली होती. उद्योग बाहेरच्या राज्यात जाणार आहेत, अशाप्रकारच्या अनेक गोष्टी ऐकावयास येत होत्या. उद्योगांना महाराष्ट्रामध्ये आकृष्ट करून घेण्यासाठी काहीतरी वेगळी भूमिका घेतली पाहिजे, तशी भूमिका घेतल्याशिवाय पर्याय नाही, याबाबतची भूमिका स्पष्ट करताना हेही सांगितले पाहिजे की, हे राज्य सरकार भांडवलदारांच्या पाठीशी उभे नाही तर हे शेतकऱ्यांचे हित जपणारे राज्य आहे. म्हणून सामाजिक न्यायाची भूमिका घेतली पाहिजे. यातून कोणा गरिबांवर अन्याय होणार नाही. मानवी चेहरा देऊन विकास झाला पाहिजे,असे सांगण्यात आले. मी याच्याशी सहमत नाही. राज्यामध्ये उद्योग येत असताना, एकाच वेळी क्लिरन्स देणे अडचणीचे होते, म्हणून वन विंडो सेटलमेंटची योजना केलेली आहे. त्यामुळे त्या उद्योजकाला कोणत्याही दुसऱ्या विभागाकडे परवानगीसाठी जावे लागणार नाही. अर्ज केल्यानंतर त्यास मंजुरी देण्यासाठी 80 ते 90 दिवस लागतात. आता महाराष्ट्रामध्ये उद्योगासाठी अर्ज केल्यानंतर त्याच्या मंजुरीसाठी 89 दिवस लागतात, ही चांगली परिस्थिती नाही. उद्योजकाला ऑन लाईन अर्ज करता आला पाहिजे, त्याला कोणत्याही शासकीय कार्यालयात जाण्याची वेळ येऊ नये, त्यावर ताबडतोब निर्णय घेतला पाहिजे. आक्षेप असतील तर ऑन लाईन दूर करता आले पाहिजेत, ताबडतोब त्या आर्जाचा निकाल लागला पाहिजे असा आपण निर्णय घेतलेला आहे. उद्योगाला पोषक वातावरण निर्माण झाले पाहिजे, राज्यामध्ये उद्योग वाढावेत, उद्योगामध्ये अधिक गुंतवणूक व्हावी, महाराष्ट्र हे एक क्रमाकाचे राज्य राहिले पाहिजे, अशी मनापासून इच्छा आहे. या राज्यामध्ये बाहेरचे कोणी उद्योगपती नाहीत तर महाराष्ट्रातील, देशातील ते आहेत. त्यांचे वास्तव्य महाराष्ट्रामध्ये आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.अशोक चव्हाण (पुढे सुरू...

त्यांनी महाराष्ट्राचा नावलौकिक केलेला आहे. महाराष्ट्राला देशामध्ये वरच्या क्रमांकावर नेण्यामध्ये त्यांचा महत्वाचा वाटा आहे हे विसरता येणार नाही.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण ....

मला जरुर सांगावयाचे आहे की, महाराष्ट्रातील अनेक उद्योगपतींनी या महाराष्ट्राचा क्रमांक वरच्या दर्जावर नेण्याचे काम त्यांच्या कामातून केलेले आहे. त्यांनी या ठिकाणी गुंतवणूक केली. त्यांनी उद्योग निर्माण केले. त्यांनी आपल्या देशामधील इतर राज्यांमध्ये तसेच परदेशामध्ये आपल्या शाखा उघडल्या. या त्यांच्या प्रगतीचे कौतुक या ठिकाणी केले पाहिजे. ते महाराष्ट्राची शान आहेत. चुकीच्या पध्दतीने कोणी काही करीत असतील तर शासनाने त्यांना दयामाया दाखविण्याचे कारण नाही. त्याची दखल घेतली जाईल. परंतु ज्यांनी चांगले काम केले, ज्यांनी महाराष्ट्राचा नावलौकिक वाढविला त्यांची प्रशंसा या महाराष्ट्रामध्ये झाली पाहिजे अशी आपली भूमिका राहणार आहे.

या ठिकाणी अनेक गोष्टींचा उल्लेख करण्यात आला. एक तर भूसंपादनाच्या बाबतीत बऱ्याचशा गोष्टींचा उल्लेख झाला. आपण स्पेशल इकॉनॉमिक झोनमध्ये स्पेशल काही करीत आहोत, स्पेशल लोकांसाठी काही गोष्टी करीत आहोत अशी टीका करण्यात आली. ज्यावेळी केंद्र शासनाने देशामध्ये आणि राज्यांमध्ये स्पेशल इकॉनॉमिक झोन निर्माण करण्याची भूमिका घेतली त्यामध्ये केंद्र शासनाची अशी भूमिका आहे की, या स्पेशल इकॉनॉमिक झोनच्या माध्यमातून उत्पादित होणारा जो माल आहे जो जागतिक पातळीवर कॉम्पीटेटीव राहिला पाहिजे. ज्यांना तो माल एक्स्पोर्ट करावयाचा आहे त्यांनी करविरहीत मालाचे उत्पादन केले तर जागतिक पातळीवर त्यांच्या मालाचा दर्जा चागला राहील. जागतिक पातळीवर स्पर्धा करु शकेल असा त्यांच्या मालाचा दर्जा राहील. त्यांनी फक्त देशामध्ये माल विकावा ही भूमिका आपल्या राज्याची किंवा देशाची नसून आपल्याकडे उत्पादित होणारा माल जागतिक पातळीवर स्वीकारला गेला पाहिजे, त्या मालाची जागतिक पातळीवर स्पर्धा करण्याची क्षमता असली पाहिजे, त्यांचा दर्जा इतरांपेक्षा कोठेही कमी राहता कामा नये म्हणून काही कर कमी करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतला. त्यामध्ये केंद्र शासनाचा एक्साईजचा कर असेल, आयकर असेल, राज्य शासनाचा कर असेल किंवा व्हॅट असेल. हे कोणाकरिता लागू आहे तर जे या ठिकाणी उत्पादित करणारा माल एक्स्पोर्ट करतील त्यांना ते लागू आहे. त्यांनी त्या मालाची विक्री देशामध्ये केली तर त्यावर कर लागणार आहेत. इतर उद्योगांचे काय होणार असा प्रश्न विचारण्यात आला. एकीकडे एस.ई.झेड.मधील उद्योग आणि दुसरीकडे या क्षेत्राबाहेरील उद्योग आहेत, त्यांची स्पर्धा कशी होणार असा प्रश्न उपस्थित करण्यात

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण .....

आला. ही तुलना होऊ शकणार नाही. कारण जे देशामध्ये आणि राज्यामध्ये माल विकतील त्यांना संपूर्ण कर भरावे लागतील. त्यामध्ये कस्टम, एक्साईज इत्यादीबाबत डेव्हलपमेंट कमिशनर नियुक्त केला जाणार आहे. यातून काही चुकीचे काम होणार नाही याची दक्षता घेतली जाईल. येथील स्थानिक उद्योजकांचे नुकसान होणार अशी जी शंका आपल्या मनामध्ये आहे ती शंका मनातून दूर केली पाहिजे. जमिनीचे दर काय असतील अशी विचारणा करण्यात आली. अत्यंत कमी भावामध्ये जमिनी घेतो असा उल्लेख करण्यात आला. स्पेशल इकॉनॉमिक झोनमध्ये त्यांना कमी किंमतीमध्ये किंवा मोफत जमीन देत आहोत असाही उल्लेख करण्यात आला. जमीन संपादन करण्यासाठी कायदा आहे. हे काम कोणाच्याही मनमानीप्रमाणे करता येत नाही. कोणी जर सांगितले की, हे दर कमी करा किंवा वाढवा तर तसे करता येत नाही. भूसंपादन कायद्याच्या अंतर्गत जमीन संपादन करण्यासाठी एक पध्दत आहे. महामुंबई क्षेत्रामध्ये पनवेल, पेण, रायगड या भागामध्ये जमीन संपादित करीत आहेत. त्या ठिकाणी नोटीस देण्याची कार्यवाही चालू आहे. सेक्शन 5 (अ) च्या स्तरावर कार्यवाही चालू आहे. त्याबाबतीत जे आक्षेप येतील त्याबाबत सुनावणी देऊन त्या आक्षेपामध्ये तथ्य असेल तर ते निश्चित स्वीकारले जातील आणि तथ्य नसेल तर ते फेटाळले जातील अशी या कायद्यामध्ये तरतूद आहे. तेवढ्यानेही समाधान झाले नाही तर कोर्टात जाऊन दाद मागण्याची सुध्दा तरतूद त्या कायद्यामध्ये आहे. ज्याला आपण एन्हॅन्समेंट ऑफ अवॉर्ड म्हणतो त्यामध्ये आपला अवॉर्ड चुकीचा झालेला आहे, दर कमी मिळालेला आहे असे वाटत असेल तर कोर्टात जाऊन दाद मागता येते. काही केसेसमध्ये भूसंपादनाच्या बाबतीत चुका झाल्या असतील तर कोर्टाने हस्तक्षेप करुन जमिनीला योग्य भाव मिळतील याची दक्षता सगळीकडे घेण्यात आलेली आहे. भूसंपादनाचा कायदा लक्षात घेतला तर वाटाघाटीच्या माध्यमातून जमीन संपादन करणे शक्य आहे काय, वाटाघाटीने भाव वाढविणे शक्य आहे काय, भूसंपदानाचे दर कमी असतील तर ते दर अधिक वाढवून देण्यास तयार आहेत काय हे पाहिले जाते. एम.आय.डी.सी. ॲक्टच्या अंतर्गत कंसेन्टने किती भाव वाढविता येतील याचेही काही निकष आहेत. त्या कायद्याप्रमाणे ते दर किती असतील, किती रिझनेबल दर वाढविता येतील, रेडीरेकनर चे दर काय आहेत, आसपासच्या भागातील जे रजिस्ट्रेशन्स झालेले असतील त्याचा भाव तसेच जो उत्पादक जमीन घेणार आहे तो असे सांगू शकतो की, मी यापेक्षा अधिक काही देण्यास तयार आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 12:25

(श्री. अशोक चव्हाण...)

या पध्दतीने शेतक-यांच्या ज्या जमिनी घेतल्या जाणार आहेत त्याबाबतीत शेतक-यांचे नुकसान होता कामा नये अशी भूमिका शासनाने घेतलेली आहे. काँग्रेस पक्षाच्या आदरणीय अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांचा उल्लेख याठिकाणी करण्यात आला. मी हे स्पष्ट करु इच्छितो की, आदरणीय श्रीमती सोनिया गांधींनी एसईझेडसाठी शेतक-यांच्या बागायती किंवा पिकाखाली असणा-या जमिनी घेऊ नयेत, फक्त पड जमिनी घ्याव्यात असे सांगितलेले आहे आणि त्याप्रमाणे काँग्रेस पक्षाची भूमिका राहाणार आहे. त्या भूमिकेमध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नाही. वन विण्डो क्लिअरन्सचा उल्लेख याठिकाणी करण्यात आला. दिल्लीला वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम समिट झाले. या फोरमचे अध्यक्ष जर्मनीचे आहेत. त्यांनी महाराष्ट्रातील उद्योगधंद्यासंबंधी प्रशंशोद्‌गार काढलेले आहेत. महाराष्ट्रातील औद्योगिक प्रगतीकडे या जागतिक स्तरावरील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या अध्यक्षांनी लक्ष वेधलेले आहे. रिझर्व्ह बँकेने सादर केलेल्या रिपोर्टमध्ये देशात महाराष्ट्र हा पहिल्या क्रमांकावर आहे. असे असताना जबरदस्तीने जमिनी घेऊन उद्योग वाढविण्याच्या प्रक्रियेमध्ये शासन सहभागी होऊन त्याचे पाप शासन स्वत:कडे घेणार नाही. परंतु यामध्ये ज्या ज्या काही अडचणी येत आहेत त्यावर नीट लक्ष ठेवून त्या दूर करण्याची भूमिका शासन घेणार आहे. एकदा धोरण आणि नियम ठरले की त्यामध्ये शासनाने हस्तक्षेप करता कामा नये. जेथे जेथे शासनाने हस्तक्षेप केलेला आहे तेथे तेथे विलंब झालेला आहे. म्हणून वन विण्डो क्लिअरन्स ही कल्पना राज्यातील उद्योगांना गती देण्यासाठी स्वीकारलेली आहे आणि त्यामुळे उद्योगांना निश्चितच चालना मिळालेली आहे. नवीमुंबई येथील एसईझेडचा उल्लेख झाला. रायगड, पेण, पनवेल याठिकाणी एसईझेडच्या कामाला सुरुवात झालेली आहे. एकूण किती जमीन संपादित होईल अशी विचारणा याठिकाणी करण्यात आली. एमआयडीसीच्या जमिनीवर देखील एसईझेड करावे अशा प्रकारच्या सूचना करण्यात आल्या. 18 एमआयडीसीच्या स्वत:च्या जागेवर एसईझेड होऊ घातलेले आहेत. नागपूरमध्ये महाराष्ट्र एरोनॉटिकल डेव्हलपमेंट कार्पोरेशन आपण करीत आहोत. त्यासाठी शासनाच्या मालकीची 9045 हेक्टर जमीन दिलेली आहे. खाजगी जमीन मालकांनी परस्पर वाटाघाटी करुन जमिनी विकलेल्या आहेत. अशी जमीन 10582 हेक्टर इतकी आहे. जॉईण्ट

....2..

(श्री. अशोक चव्हाण ...)

व्हेन्चरच्या माध्यमातून 7063 हेक्टर जमीन संपादित होत आहे. नवीमुंबई येथील एसईझेडसाठी 8 हजार हेक्टर खाजगी जमीन आणि जॉईण्ट व्हेन्चरमध्ये 7 हजार हेक्टर जमीन संपादित होत आहे.

... नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण........

आता रिलायन्सच्या संदर्भात, महामुंबईच्या संदर्भात काय काय नवीन विषय निर्माण झाले, त्यामध्ये पुनर्वसनाचा प्रश्न आहे त्याचे काय करायचे? सभापती महोदय, नवी मुंबई एसईझेड हा संपूर्णपणे सिडकोच्या मालकीचा आहे. सिडकोने रिलायन्सबरोबर भागिदारीने काम सुरु केले. ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी महामुंबई एसईझेडकरीता संपादित होणार आहेत त्यापुरता मर्यादित हा प्रश्न निर्माण झाला आहे. कोणत्या जमिनी, किमान किती जमीन असली पाहिजे याला काही मर्यादा आहेत. जास्त किती जमीन घ्यायची हा प्रत्येक प्रकल्पाच्या आवश्यकतेप्रमाणे निर्णय घेतला जातो. त्यामध्ये बी.टी.एल.ॲक्टनुसार जमिनी घेत असताना किती जमिनीची आवश्यकता आहे हे विकास आयुक्त (उद्योग) निश्चित करतात आणि त्यानंतर जमीन उपलब्ध करण्याचा निर्णय घेतला जातो. आय.टी.आणि बायोटेक्नॉलॉजी यासाठी किमान 10 एकर जमीन आवश्यक आहे. त्यात प्रॉडक्ट ओरिएंटेड, विशिष्ट प्रॉडक्ट एसईझेड करावयाचे असल्यास 100 एकर, मल्टीप्रॉडक्ट एसईझेड करावयाचे असल्यास 1000 एकर जमीन असली पाहिजे असे केंद्र शासनाने निकष घालून दिले आहेत. महामुंबई एसईझेडबाबतचे 45 गावांबाबतचे नोटिफिकेशन साधारणपणे 8257 हेक्टरपुरते मर्यादित आहे. कलम 5(अ) च्या स्तरावर कार्यवाही सुरु आहे. त्यातून ज्या हरकती येतील त्या माध्यमातून निश्चित विचार केला जाईल. नापिकी, वर्षाला एक पीक घेण्यासारखी परिस्थिती असेल अशा प्रकारच्या जमिनी यासाठी घेण्याचा विचार करीत आहोत.

सभापती महोदय, मला याठिकाणी मुद्दाम सांगितले पाहिजे की, Socio Economic Survey झाला त्यामध्ये काय उल्लेख झाला? हे काम शासनाने केलेले नाही. खाजगी संस्थेच्या माध्यमातून सर्व्हे करण्यात आला. नेमका काय इम्पॅक्ट होणार आहे या संदर्भात Socio Economic Survey मधून अशी माहिती पुढे आली की, Agricultural land limited to single crop & lack of irrigation, water, sanitation, population अशा प्रकारची परिस्थिती सध्याच्या जमिनीची आहे. Lack of population, small holding and general poverty migration of local employment to other area अशा प्रकारच्या फाईडिंग खाजगी संस्थेच्या सर्व्हेमध्ये आहेत. काय इम्पॅक्ट त्या भागातील दैनंदिन जीवनामध्ये होणार आहे याचा अभ्यास केलेला असून 45 गावांपैकी कोणत्याही गावाचे गावठाण संपादित होणार नाही याची





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण........

दक्षता घेतली आहे, कोणत्याही गावांना विस्थापित व्हावे लागणार नाही. याठिकाणी चिंता व्यक्त करण्यात आली की, लोकांची गावे उठविली जाणार आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : विस्थापित होणार नाही असे होऊच शकत नाही.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, मला जी अधिकृत माहिती प्राप्त झाली त्यावरुन मी उत्तर देत आहे, त्यामुळे मला माझे उत्तर पूर्ण करु द्यावे अशी माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे. सभापती महोदय, कोणत्याही गावाच्या गावठाणाला हात लावण्याची भूमिका नाही. जमिनींचे नोटिफिकेशन 8275 हेक्टरचे निघालेले आहे. नवी मुंबई एसईझेडची जागा सिडकोकडून घेण्याचा प्रस्ताव आहे. त्यामध्ये नवी मुंबई एसईझेडचे पैसे सिडकोकडे भरले आहेत. सिडकोचा 26 टक्के हिस्सा व 74 टक्के हिस्सा नवी मुंबई एसईझेडचा असा संयुक्त करार झाला आहे. त्या माध्यमातून हे काम करण्यात आले. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, सिडकोच्या जमिनी जास्त भावाने आपण देत आहात. 1 कोटी रुपये इतकी किंमत प्रती एकर सिडकोच्या जमिनीला भाव देत आहात असे सांगितले. मग शेतकऱ्यांच्या जमिनी घेताना भाव कमी दिला जातो असा उल्लेख याठिकाणी झाला. मला सांगितले पाहिजे की, नवी मुंबई एसईझेडची जमीन आहे त्या जमिनीच्या संपादनाची कार्यवाही 1972 मध्ये सुरु झाली. 1972 ते 1986 मध्ये सिडकोने ही सर्व जागा संपादित केली. त्या जमिनीवर सिडकोने रेल्वे, वॉटरसप्लाय, ड्रेनेज, रस्ते, मलनि:सारण, इलेक्ट्रीसिटी इ.अनेक प्रकारच्या डेव्हलपमेंट केल्या. त्याची कॉस्ट लोड केलेली आहे. 52 टक्के जमिनीवर कॉस्ट लोड केली असून बाकीची जमीन तशीच आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण ....

सभापती महोदय, यातून प्रत्यक्षात 50-52 टक्के जमीन विक्रीस राहणार आहे. 100 टक्के जमीन काही विक्रीस उपलब्ध राहणार नाही. जी 50-52 टक्के जमीन विक्रीस राहणार आहे त्यावरच ही कॉस्ट लोड होणार आहे. 1982-86 मध्ये जी जमीन ॲक्वायर झालेली आहे ती आज विक्रीस काढण्यात आलेली असून त्या जमिनीचा भाव साधारणत: 1 कोटी रुपये चालला आहे. आज त्या परिसरात ज्या जमिनी ॲक्वायर होत आहेत त्या जमिनी साधारणत: 30-35 कि.मी. अंतरावरील आहेत. जमिनीच्या किंमती या सर्व्हे नंबर टू सर्व्हे नंबर या प्रमाणे ठरतात. यासाठी रेडी रेकनर तयार होत असतो. दर वर्षी डिसेंबर महिन्यात रेडीरेकनर प्रकाशित होत असतो. त्या रेडीरेकनर मध्ये सर्व्हेनिहाय काय किंमत आहे त्याची माहिती दिलेली असते. आता ज्या जमिनी घेतल्या जात आहेत त्या पडीक जमिनी आहेत. त्या जमिनीवर कोणत्याही प्रकारची डेव्हलपमेंट झालेली नाही. त्यामुळे या जमिनीच्या दोन्ही किंमतीत तफावत राहणार आहे हे मला या ठिकाणी सांगणे आवश्यक वाटते. या परिसरात विमानतळ होत असल्यामुळे या ठिकाणच्या जमिनीचे दर वाढत चालले आहेत. या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी पर्यावरणाच्या संदर्भात शंका उपस्थित केलेली आहे. या ठिकाणी नवीन होणारी जी काही डेव्हलपमेंट आहे त्या डेव्हलपमेंटचा परिणाम पर्यावरणावर होणार आहे व त्याची कोणी चिंता केलेली नाही. मला या ठिकाणी मुद्दाम सांगितले पाहिजे की, कोणताही नवीन उद्योग काढला जात असतांना पर्यावरण विभाग यासंदर्भात दक्षता घेत असतो. उद्योग काढावयाचा असेल तर त्याला महाराष्ट्र प्रदुषण विभागाकडून यासाठी कन्सेंट टू एस्टॅब्लिशमेंट आणि कन्सेंट टू ऑपरेटची परवानगी घ्यावी लागत असते. या दोन्ही परवानग्या घेतल्याशिवाय उद्योग सुरु करता येत नाही. त्यामुळे या ठिकाणी प्रदुषण वाढणार नाही यासंदर्भात आपण जी चिंता व्यक्त केलेली आहे तिची दक्षता निश्चित घेतली जाईल. प्रदुषणामुळे या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची काळजी शासनाकडून निश्चित पणे घेतली जाईल. पुनर्वसनाच्या संदर्भात शासनाची काय भूमिका आहे याचाही उल्लेख काही सन्माननीय सदस्यांनी केलेला आहे. साधारणत: 45 गावामध्ये पुनर्वसनाच्या संदर्भातील निर्णय घेण्यात आलेला आहे. नॉर्मल एखादे गावठाण जेव्हा बाधित होते त्यावेळेस पुनर्वसनाच्या अंतर्गत आपण सवलती जाहीर करीत असतो. परंतु या केसमध्ये गावठाणाला हात न लावता बाहेरच्या परिसरातील ज्या जमिनी

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण ....

ताब्यात घेतल्या जाणार आहेत व त्यामुळे जो परिणाम होणार आहे त्यासाठी पुनर्वसनाच्या कायद्याखाली, पुनर्वसन अधिनियम-1999 चे कलम 1 चे पोट कलम (4) क अन्वये या ठिकाणी पुनर्वसनाचा कायदा लागू करण्यात आलेला आहे. या कायद्याअंतर्गत घरबांधणीसाठी जी स्टँप डयूटी भरावी लागते त्यामध्ये सवलत, त्या ठिकाणचे सामान हलविण्यासाठी अर्थसहाय्य, गोठे बांधण्यासाठी सहाय्य अशा 10 प्रकारच्या सवलती पुनर्वसनाच्या कायद्यात आहेत. त्यामुळे या 45 गावांना जी काही अडचण येणार आहे त्यासाठी पुनर्वसन कायदा लावला जाणार आहे. त्याशिवाय या ठिकाणच्या गावक-यांनी काही मागण्या केलेल्या आहेत, मोर्चेही काढलेले आहेत. त्यांनी मागण्या अशा केलेल्या आहेत की, जमिनीचा दर 12 ते 25 लक्ष रुपये असावा, भूमिहीन शेतक-यास भूखंड देण्यात यावा, येथील सक्षम असलेल्या व्यक्तीस नोकरी देण्यात यावी, बेरोजगार भत्ता देण्यात यावा अशा 20-25 मागण्या या ठिकाणच्या लोकांनी केलेल्या आहेत. या सर्व गावांच्या बाबतीत मंत्री पुनर्वसन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीमंडळाची उपसमिती आहे. या समिती समोर महामुंबई एसईझेड ने प्रस्ताव सादर केलेलं आहेत. शासनाच्या पुनर्वसनाच्या धोरणा व्यतिरिक्त ते काही सवलती देण्यास तयार आहे. समितीच्या समोर शासनाच्या पुनर्वसनाच्या धोरणाचाही उल्लेख आणि त्यांनी दिलेल्या सवलती एकत्रित करुन येथील जनतेचे म्हणणे काय आहे ते ऐकून घेऊन पुनर्वसनाचे पॅकेज काय राहणार आहे यासंदर्भात निर्णय घेतला जाणार आहे. अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही. या ठिकाणच्या जमिनीला किती भाव मिळणार, या ठिकाणच्या लोकांचे पुनर्वसन कसे होणार याबाबतीतील पॅकेजचा मी थोडक्यात उल्लेख करु इच्छितो. जे महामुंबई एसईझेडने पॅकेज दिलेले आहे त्यामध्ये ज्यांच्या जमिनी संपादित करण्याची प्रक्रिया सुरु आहे त्यांच्याकरिता 1 हजार दिवसांकरिता म्हणजेच 3 वर्षे शेतक-यांना साधारणत: 60 रुपये रोज ऊदरनिर्वाहभत्ता देण्याचे ठरले आहे, जे शेतमजूर आहेत त्यांना दोन वर्षाकरिता अलाऊंस देण्याची भूमिका आहे.

नंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण......

त्याचबरोबर जी साडेबारा टक्के जमीन संपादित होणार आहे ती जमीन विनामूल्य देण्याचा निर्णय झ ाालेला आहे. आपण त्यांना फक्त विनामूल्य जमीन देत नसून ती डेव्हलप करुन देत आहोत जेणेकरुन शेतकऱ्यांना किंवा जमीन मालकाला त्यातून कायम स्वरुपी उत्पन्न मिळू शकेल. आयटीआयवर 75 लाख आणि पोलिटेनीकवर 1 कोटी रुपये खर्च करणार आहोत.

सभापती महोदय, याठिक्राणी एसएईझेडखाली कोणते उद्योग येणार आहेत याचा उल्लेख करण्यात आला. मी याठिक्राणी नमूद करु इच्छितो की, कोणत्याही ठिकाणी सर्व्हीस इंडस्ट्री अपेक्षित असते. आयसोलेटेडने कोणताही उद्योग वाढत नाही. एखाद्या उद्योग सुरु करण्यासाठी किती जागा दिली यापेक्षा त्याठिकाणी किती सर्व्हीस इंडस्ट्रीसाठी आहे हे महत्वाचे आहे. त्यामुळे त्याठिकाणी काही प्रमाणात रेसिडेन्शीअलसाठी जागा उपलब्ध करुन द्यावी लागणार आहे. त्याठिकाणी काही सोयीसुविधा उपलब्ध करुन द्याव्या लागणार आहेत. शिक्षण संस्था हॉस्पीटल्स अपेक्षित आहेत. जेणेकरुन त्याठिक्राणी काम करणाऱ्या कामगारांना आणि अधिकाऱ्यांना त्याचा पूर्ण फायदा मिळेल ही अपेक्षा आहे. हे सर्व करीत असताना चुकीचे गैरव्यवहार होणार नाहीत याची शासनाकडून दक्षता घेतली जाईल.

सभापती महोदय, एसईझेडखाली जे उद्योग येणार आहेत त्यांनी स्वत:च पाण्याचा स्त्रोत शोधला पाहिजे. दोन हजार मे.वॅ.वीज निर्माण करावी अशाप्रकारचे त्यामध्ये आहे.

सभापती महोदय, याठिकाणी पुनर्वसनाबाबत उल्लेख करण्यात आला. त्याबाबत सांगू इच्छितो की, पुनर्वसनाचा जो कायदा आहे त्यातील तरतुदी आणि लोकांकडून ज्या सूचना आलेल्या आहेत त्याचा एकत्रितपणे विचार करुन अंतिम निर्णय घेण्यात येईल. सध्या हा विषय पुनर्वसन मंत्र्यांकडे प्रतिक्षाधीन आहे.

सभापती महोदय, याठिकाणी किती लोकांना रोजगार उपलब्ध होईल असा प्रश्न विचारण्यात आला. महामुंबई एसईझेडमध्ये 10 लोकांना प्रत्यक्ष आणि 20 लाख लोकांना अप्रत्यक्ष फायदा होणार आहे. महामुंबई एसईझेडमध्ये दहा हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. 1 लाख युनिटस् स्थापन करण्यात येणार आहेत. यामध्ये जवळपास 1 लक्ष कोटी पर्यंत गुंतवणूक

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण......

जाईल अशी अपेक्षा आहे. नवी मुंबई येथे एसईझेडखाली 5384 कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून 3 लाख लोकांना प्रत्यक्ष रोजगार अपेक्षित आहे. हा सर्व व्यववहार करताना सर्व गोष्टींची दक्षता घेण्यात आलेली आहे. कोणाचीही पिळवणूक होणार नाही याची दक्षता घेण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, देशात जवळपास 72 एसईझेड मंजूर झालेले आहेत. आपल्या राज्याबद्दल सांगावयाचे झाले तर विदर्भामध्ये सहा, मराठवाड्यात आठ, कोकणात तेहतीस आणि पश्चिम महाराष्ट्रात तेवीस एसईझेड अपेक्षित आहेत. तेव्हा राज्याच्या सर्व भागात एसईझेड येणार आहेत. एकंदरीत महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी पोषक वातावरण असल्यामुळे इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात जास्त गुंतवणूक अपेक्षित आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांना उत्तरे देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. माझ्या उत्तरांनी त्यांचे समाधान झाले असेल मला वाटते. एवढे बोलून मी माझे उत्तराचे भाषण पूर्ण करतो.

---------------

यानंतर श्री.पुरी......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, कराचे काय ? रिलायन्स त्याठिकाणी 260 हेक्टर जमिनीवर घरे बांधणार आहे. घरे बांधण्यासाठी आपण त्यांना जमिनी देणार आहात काय ? आज त्याठिकाणी रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण राहणार नाही. त्याचेही याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले नाही. पेट्रोकेमिकलच्या बाबतीत उत्तर आले नाही.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, कुठल्याही उद्योग क्षेत्रामध्ये निश्चितपणे निवासी सोय करावी लागते. यामध्ये आपला एवढाच उद्देश आहे की, याठिकाणी उद्योगांची वाढ झाली पाहिजे. असे करीत असताना आपल्याला त्याठिकाणी सगळया सोयी द्याव्याच लागणार आहेत. उद्योगाच्या माध्यमातून विकास करण्याबरोबरच त्याअनुषंगिक ज्या बाबी आहेत, त्यांचाही विचार करुन त्या देण्याची शासनाची भूमिका आहे. ज्यावेळी कायद्यान्वये एसईझेड झाले त्यामध्ये कुठलीही नगरपालिका, महानगरपालिका किंवा ग्रामपंचायतींना अधिकार राहणार नाहीत, हे मी याठिकाणी सांगू इच्छितो.

**उपसभापती** : याठिकाणी सगळयाच सन्माननीय सदस्यांनी बऱ्याचशा गोष्टींचा उल्लेख केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्या खेड तालुक्याचा उल्लेख केला त्याच्याच अनुषंगाने मी बोलत आहे. एसईझेडमुळे जवळपास राज्यातील ग्रामीण भागातील संपूर्ण अर्थव्यवस्था ही कुठेतरी अधोगतीला लागते की काय अशाप्रकारची प्रकरणे आज घडत आहेत. मी आपल्याला थोडक्यात उदाहरण देईन. एसईझेडच्या खाली जो भाग येतो, त्याठिकाणी अतिशय चढ्या किंमतीने तेथील जमिनी लोक विकत आहेत, ही विकणारी मंडळी कोण आहेत ? जास्त पैसे मिळाल्यामुळे त्या भागातील माणूस जमिनी विकतो. जो विकसित भाग आहे, ज्या जमिनी गोरगरीब शेतक-यांकडे आहेत तेथे लोक जास्त पैसे देऊन तिकडच्या जमिनी विकत घेत आहेत. परगावातील शेतकरी दुस-या गावातील अविकसित जमिनी चढ्या भावाने घेत असल्यामुळे या ठिकाणचा शेतकरी बेकार होत आहे. त्यामुळे अशाप्रकारचे बारीकसारीक परिणाम भविष्य काळात त्यांना भोगावे लागणार आहेत. असे आमच्या भागात सर्रास चालत आहे. मला चांगले स्मरते व मी वृत्तपत्रात सुध्दा वाचलेले आहे की, आपल्या काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी आणि माननीय श्री.शरद पवार साहेबांनी आणि इतरही काही मंडळींनी मागणी केलेली आहे की, एसईझेडचे प्रकल्प राबविताना त्याठिकाणचा स्थानिक शेतकरी किंवा जे स्थानिक लोक आहेत, ते उद्या देशोधडीला



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**...

लागणार आहेत का ? आजचा बालक उद्याचा वेठबिगारी होणार आहे का ? या सगळया गोष्टींचा विचार केला पाहिजे. माननीय श्रीमती सोनिया गांधी व माननीय श्री.शरद पवार साहेबांची स्टेटमेंट आपण वृत्तपत्रामध्ये वाचलेले आहेत की, या उद्योगामध्ये शेतकऱ्यांना केवळ पैसे देऊन भागणार नाही तर आपण त्यांच्या नावे काही शेअर्स ठेवणार आहात काय ? की जेणेकरुन, त्यांच्याकडे काही मालकी राहील. या प्रकल्पांमध्ये हया मुलभूत गोष्टींचा समावेश नसेल तर मला असे वाटते की, उद्याच्या महाराष्ट्रामध्ये कदाचित आहेत त्या सर्व भूमिपुत्रांना आपल्या जमिनी विकून या राज्याच्या बाहेर मोलमजूरी करीत फिरावे लागेल. अशी परिस्थिती त्यांच्यावर आपण कृपया येता कामा नये, हेच मी मुद्याम या ठिकाणी आपल्याला सांगू इच्छितो.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, ज्यावेळी पुनर्वसनाचा निर्णय अंतिम होईल त्यावेळी यासंदर्भात विचार होईल. याठिकाणी आपण जी चिंता व्यक्त केली त्याच मताचे आम्ही आहोत. शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा जो मोबदला मिळेल त्याचा दुरुपयोग न होता किंवा ते देशोधडीला लागू नयेत अशी जी आपण संकल्पना व्यक्त केली त्याबाबतीत मी सांगू इच्छितो की, त्यांना जी जमीन दिली जाणार आहे ती विकसित करुन कायमस्वरुपी त्यातून त्यांना उत्पन्न मिळण्याच्या दृष्टीनेच दिली जाणार आहे. त्यांना जी जमीन दिली जाणार आहे ती विकसित करुन विनामूल्य दिली जाणार आहे व त्यातून त्यांना कायमस्वरुपी उत्पन्न मिळाले पाहिजे, अशी शासनाची भूमिका आहे.

**उपसभापती** : साडेबारा टक्क्यांच्या जमिनीबाबत काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, पुनर्वसनाच्या बाबतीत अंतिम निर्णय झाल्यानंतर या सगळया गोष्टींचा विचार केला जाईल.

नंतर श्री.रोझेकर....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आपण या ठिकाणी जी चिंता व्यक्त केली तीच चिंता आमच्या सर्व सदस्यांची आहे. या ठिकाणी कुणालाही अगदी ग्रामापंचायत, नगरपालिका, महानगरपालिका यांना कोणतेही अधिकार मिळणार नाहीत. त्यामुळे शेतक-यांवर गुलामीशिवाय पर्याय राहणार नाही. श्रीमंत लोकांची वस्ती त्या ठिकाणी येणार आहे आणि सर्व सुत्रे त्यांच्या हातात जाणार आहे. एस.ई.झेड.ची सोय शेतक-यांसाठी नाही, उत्पन्न मिळवून देणा-या धंदेवाईक लोकांसाठी करणार आहोत. शासनाला यामधून किती महसूल मिळणार आहे याची मला माहिती नाही. परंतु, कोणतीही बंधने त्यांच्यावर टाकण्यात आलेली नाहीत. पर्यावरणाचा विषय या ठिकाणी निघाला. आज चिपळूण, खेड या ठिकाणी पर्यावरणाचे जबरदस्त नुकसान झाले आहे, आजही होत आहे आणि भविष्यातही होणार आहे. या सर्व गोष्टींचा साकल्याने आणि प्रामुख्याने विचार होण्याची आवश्यकता आहे. कुठलीही कमिटमेंट, निर्णय अंतिम होण्यापूर्वी एकदा लोकप्रतिनिधींबरोबर बैठक घ्यावी, त्यांच्याशी चर्चा करावी व त्यानंतर निर्णय व्हावा, अशी आमची अपेक्षा आहे. केवळ एखाद्या खात्याशी किंवा मंत्र्यांशी चर्चा करुन चालणार नाही, लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून या सगळया गोष्टी जनतेपर्यन्त पोहोचवावयाच्या आहेत. म्हणून सभापती महोदय, आपण जी चिंता या ठिकाणी व्यक्त केली त्याच्याशी आम्ही सर्व सहमत आहोत. सन्माननीय मंत्रीमहोदयांनी दिलेले उत्तर हे समाधानकारक आहे, असे आमचे मत नाही. म्हणून या सगळया गोष्टींचा निषेध करुन आम्ही सभात्याग करीत आहोत.

(विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी सभागृहातून बर्हिगमन केले.)

**उपसभापती** : अल्पकालीन चर्चा आता संपली आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन दुपारी 01.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक 12 वाजून 52 मिनिटांनी दुपारी 01.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थागितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**<u>नियम 289 बाबत.</u>**

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, मी विधान परिषद नियम 289 अन्वये आज पुन्हा नोटीस दिलेली आहे. कालही मी या विषयासंबंधी नोटीस दिली होती. शेतक-यांच्या अतिशय महत्वाच्या प्रश्नावर मागच्या दोन-तीन वर्षापासून महाराष्ट्राची बदनामी होत आहे. शेतक-यांच्या आत्महत्येच्या प्रश्नावर सभागृहामध्ये चर्चा घडून यावी यासाठी सभागृहापुढील आजचे सर्व कामकाज बाजूला सारुन ताबडतोब शेतक-यांच्या आत्महत्यांसंबंधी चर्चा करावी अशा प्रकारची नोटीस मी काल दिली होती आणि आजही मी तशा प्रकारची नोटीस दिलेली आहे. मी आज पुन्हा आपल्याला विनंती करतो की, आजचे कोणतेही कामकाज न करता शेतक-यांच्या आत्महत्यांसंबंधी ताबडतोब चर्चा सुरु करावी.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, कालचा संपूर्ण दिवस याच विषयासाठी खर्ची पडला. आम्ही विधान परिषद नियम 289 अन्वये नोटीस दिली होती. सभागृहापुढील सर्व कामकाज बाजूला सारुन शेतक-यांच्या आत्महत्येच्या ज्वलंत प्रश्नावर चर्चा करावी, यातून मार्ग काढावा आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये शेतक-यांच्या आत्महत्या कशा थांबतील यावर परिणामकारक उपाय शोधावा अशी आमची मागणी होती. शेतक-यांच्या आत्महत्या थांबविण्याच्या दृष्टीकोनातून कोणत्याही प्रकारचा वादविवाद, नियमांचा अर्थ काढणे उचित होणार नाही. आजच्या वर्तमानपत्राने असे शिर्षक दिलेले आहे की, "नियमांच्या लढाईत शेतकरी बाजूला पडला." ही शेतक-यांच्या भल्यासाठीच लढाई झालेली आहे. ही लढाई अशा पद्धतीच्या मार्गाने नव्हे दुस-या मार्गाने व्हावी. लढाई व्हावी असे सभागृहाचे मत नव्हते. रचनात्मक पद्धतीने लढाई व्हावी आणि त्यातून मार्ग निघावा असे सर्वांना वाटत होते. काल संपूर्ण दिवसाचे कामकाज एका प्रश्नावर खर्ची पडले. नियमामध्ये काय तरतूद आहे, ती तरतूद कशा पद्धतीने अंमलात आणावयाची याची काळजी आपण घ्यावयाची आहे. आम्ही त्यामध्ये येण्याची आवश्यकता नाही. आम्हाला असे वाटले की, नियमातील एका तरतुदीचा गैरफायदा घेतला जातो त्यावेळी आम्ही उभे राहतो. ती संपूर्ण जबाबदारी पीठासीन

...2/-



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ KTG/ प्रथम श्री.रोझेकर .......... 13:00

श्री.मधुकर सरपोतदार ...........

अधिका-यांची आहे. आपण ती जबाबदारी पार पाडाल असा आम्हाला विश्वास आहे. या प्रश्नावर जास्त चर्चा न होता ही चर्चा कशी घडून येईल यासंदर्भात आपण निर्णय घ्यावा आणि नोटीस स्वीकृत करावी अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख : माननीय सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांनी नियम 289 खाली जो प्रस्ताव येथे मांडला आहे आणि आपणास चर्चा देण्याची विनंती केली आहे त्या संदर्भात काल देखील मी येथे सांगितले आहे की, शेतकऱ्यांच्या होत असलेल्या आत्महत्यांच्या संदर्भात या ठिकाणी चर्चा होणे आवश्यक आहे. कारण शेवटी चर्चा करण्याचे हे सभागृह ठिकाण आहे. किंबहुना या सभागृहामध्ये दुसरे काहीच होत नाही. चर्चा करणे हेच येथील मुख्य काम आहे आणि त्यातून लोकहिताचे निर्णय होत असतात. लोकांच्या अडचणी येथे दोन्ही बाजूंचे सदस्य मांडतात आणि त्या बाबतीत शासनाची बाजू किती भक्कम आहे, किती पोकळ आहे, शासनाची त्याबाबतील भूमिका किती निश्चित आहे वगैरे गोष्टी या सभागृहातील सदस्यांच्या आणि त्यांच्या मार्फत जनतेच्या लक्षात येतात. आता शेतकऱ्यांचा आत्महत्या हा सध्याचा महत्त्वाचा विषय आहे, प्रश्न आहे. त्यात नागपूरमध्ये विधीमंडळाचे हे अधिवेशन होत आहे आणि या आत्महत्या होताहेत त्या मुख्यत्वे करून विदर्भामध्ये होत आहेत त्यामुळे असे असतानाही नागपूरमध्ये होणाऱ्या या अधिवेशनामध्ये या सभागृहात त्याविषयी चर्चादेखील होत नाही हे योग्य नाही. या ठिकाणी अनेकदा यापूर्वी निर्णय दिलेले आहेत की, नियम 97 अन्वये चर्चा व्हावी. प्रश्न महत्त्वाचा असेल तर प्रसंगी प्रश्नोत्तराचा तास तहकूब करूनही चर्चा या सभागृहामध्ये मान्य करून दिल्या आहेत. तर कित्येकदा प्रश्नोत्तराचा तास तहकूब न करताही अन्य मार्गांनी चर्चा दिलेल्या आहेत. तेव्हा आजचे सभागृहाचे कामकाज तहकूब करून आपणास ही चर्चा देता येत असेल तर त्याप्रमाणे अथवा कामकाज तहकूब न करता देखील आपण ही चर्चा मान्य करावी अशी मी आपणास विनंती करतो.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेता श्री.पांडुरंगजी फुंडकर यांनी नियम 289 खाली आजचे सभागृहाचे पूर्ण कामकाज बाजूला ठेवून सभागृहामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्यासंबंधातील गंभीर विषयावर चर्चा करावी असे सांगितले आहे. आमच्या बाजूने देखील नियम 97 अन्वये आम्ही या गंभीर विषयावर चर्चा करण्यासाठी प्रस्ताव दिलेला आहे. तेव्हा नियम 289 अन्वये कामकाज बाजूला ठेवून माननीय विरोधी पक्षनेत्यांनी विनंती केल्याप्रमाणे आपण चर्चा घ्यावी अशी विनंती मी करतो.

...... इइ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** : मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, काल सभागृहाचे कामकाज स्थगित झाल्यानंतर माननीय उपसभापतींच्या दालनामध्ये दोन्ही बाजूंचे नेते आणि सन्माननीय सदस्यांची बैठक झाली आणि त्यानंतर माझ्या दालनामध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री.फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री.मधुकर सरपोतदार, प्रा. बी.टी.देशमुख, श्री. गुरूनाथ कुलकर्णी, अरूण गुजराथी तसेच दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य यांची आणि माझी सुद्धा या संबंधात चर्चा झाली. त्यांच्या आणि माझ्या विचारांमध्ये तसा काही फरक असण्याचे कारण नाही. कारण संपूर्ण महाराष्ट्राशी संबंधित असलेला हा विषय आहे, विशेषत: विदर्भातील जनतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आणि गंभीर अशा प्रकारचा प्रश्न या सदनाच्या माध्यमातून शासनासमोर व जनतेसमोर यावा अशीच सर्वांची भावना आहे. या बाबतीत माझ्याकडे नियम 289 अन्वये आज देखील माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी आणि इतर यांचा एक प्रस्ताव सकाळी 8.30 वाजता दाखल झालेला आहे. त्यानंतर दुसरा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.रावते यांचा देखील नियम 289 खालील दाखल झालेला आहे. त्यानंतर विरोधी पक्षनेते माननीय श्री.फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी यांनी देखील ही चर्चा कोणत्या नियमाखाली व्हावी या अनुषंगाने एक प्रस्ताव नियम 97 खाली दिलेला आहे. तसेच सन्माननीय सदस्य सर्वश्री गुरूनाथ कुलकर्णी, गोविंदराव आदिक यांनीही नियम 97 खाली प्रस्ताव दिलेला आहे. तद्वतच सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख आणि इतर यांनी देखील नियम 97 खाली प्रस्ताव दिलेला आहे. नियम 289 ची जी काही व्याप्ती आहे त्या संबंधात जे काही बोलावयाचे होते ते मी काल येथे बोललो आहे. तेव्हा मी या संदर्भात आता एकच निर्णय घेतो आहे आणि तोही अपवाद म्हणून घेतो आहे. म्हणजे नियम 289 च्या अनुषंगाने पाहिले तर कामकाज पत्रिकेवर एखादा विषय असेल तर मग त्याबाबतीत अशा पद्धतीने सभागृहाचे ते कामकाज तहकूब आपण करतो. परंतु मी आज एक अपवाद करण्याचे ठरविले आहे. त्यानुसार आजच्या सभागृहाच्या कामकाज पत्रिकेवरील सर्व कामकाज तहकूब करून या ठिकाणी नियम 97 अन्वये या चर्चेला मी तातडीने येथे मान्यता देतो. तरी आता माननीय विरोधी पक्षनेत्यांनी या चर्चेला सुरूवात करावी.

...... इइ 3 ...



KBS/KGS/KTG. श्री. बोरले नंतर --- 13:05

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या चर्चेला उत्तर केवळ महसूल विभागाचेच मंत्री देणार का ? कारण यामध्ये सहकार विभागाचा देखील संबंध आहे. तेव्हा केवळ एका विभागाच्या मंत्र्यांनी उत्तर देऊन समाधान होणार नाही.

**सभापती** : माननीय मंत्री श्री.गणेश नाईक साहेब, या विषयाशी संबंधित असलेल्या सर्व विभागाच्या , मग ते सहकार खाते असो वा कृषी किंवा अन्य कोणतेही खाते असो, त्या सर्व विभागाचे मंत्री येथे येतील हे आपण पहावे.

( यानंतर श्री. सरफरे ..... एफएफ 1 ..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या

**मु.शी.**: राज्यात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या या विषयावर सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री. मधुकर चव्हाण, प्रकाश शेंडगे, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री. पाशा पटेल, गोपीकिशन बाजोरिया, अरविंद सावंत, अनिल परब,सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री. पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र विधान परिषद नियम 97 अन्वये पुढील सूचना याठिकाणी मांडतो.

"मा.पंतप्रधान यांनी विदर्भातील आत्महत्याग्रस्त सहा जिल्हयांसाठी जाहीर केलेले पॅकेज,सदर पॅकेजमध्ये शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची कुठलीही तरतूद नसल्याचे राज्य शासनाने जाहीर करणे, सदर पॅकेज कर्जाच्या पुनर्रचनेसाठी आहे याचा असा अर्थ ती कर्जमाफीसाठी आहे असा होत नसल्याचा शासनाने केलेला खुलासा, शासनाने शेतकऱ्यांच्या कर्जावरील व्याज आधीच माफ केले असल्याने पॅकेजमधील रक्कम कर्जमाफीसाठी नसल्याने त्याचा नेमका उपयोग कोणत्या कामासाठी करण्यात येणार आहे याबाबत कर्जबाजारी शेतकऱ्यांना शासनाचे मार्गदर्शन नसणे, पॅकेजमधील रक्कम कर्जमाफीसाठी नाही तर मग सदर रकमेचा उपयोग कोणत्या कर्जासाठी अथवा शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी करण्यात येणार आहे याबाबत शासनाने पाळलेली गुप्तता, सदर पॅकेजचा उपयोग कसा करण्यात आला आहे याबाबत कर्जबाजारी शेतकरी अनभिज्ञ असल्याने केंद्र व राज्य शासनाने मोठा गाजावाजा करुन पंतप्रधान पॅकेजची केलेली जाहिरातबाजी शेतकऱ्याच्या शेतमालाला मिळत असलेल्या अत्यल्प दर त्यामुळे आलेली उदासीनता सदर केंद्र व राज्य शासनाच्या पॅकेजनंतर आजही शेतकऱ्यांच्या आत्महत्तेत खंड न पडता त्यात झालेली चिंतनीय वाढ, धानाला प्रति क्विंटल रु.1000 चा भाव देण्यात न येणे, परिणामी राज्यातील शेतकऱ्यांत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता याप्रकरणी शासनाने तातडीने उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया".

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, अत्यंत व्यथित अंत:करणाने या सभागृहामध्ये आज ही चर्चा उपस्थित करावी लागत आहे. याचे कारण या देशाला स्वातंत्र्य मिळून पुढील वर्षी जवळपास 60वर्षे पूर्ण होतील. भारतासारख्या कृषीप्रधान देशामध्ये स्वातंत्र्याच्या 60 वर्षानंतरही या देशातील अन्नदात्या शेतकऱ्यावर आत्महत्त्या करण्याची पाळी यावी यापेक्षा दुसरे दुर्दैव असू शकत नाही. सभापती महोदय, या कृषी प्रधान देशामध्ये स्वातंत्र्याचा 50/55 वर्षाच्या कालावधी लोटल्यानंतर शेतकऱ्याची अशी स्थिती होत असेल तर ते या सरकारचे अपयश म्हणावे की धोरणाचे अपयश म्हणावे? हा ठराव आणण्यामागील मुख्य उद्देश असा की, गेली चार-पाच वर्षे या राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्त्यांचा आलेख वाढत गेला आहे. या संदर्भातील आकडेवारी मी आपणाला नंतर देणार आहे. यावर्षी आत्महत्त्यांच्या त्या आकडयांनी उच्चांक गाठला आहे. गेल्या वर्षी हिवाळी अधिवेशनामध्ये आत्महत्तेच्या संदर्भात चर्चा उपस्थित करण्यात आली होती. त्यावेळी या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी जणू काही चमत्कार घडावा अशा पध्दतीने ताबडतोब त्याची शासनाने दखल घेतली आहे अशाप्रकारचा मेसेज शेतकऱ्यांपर्यंत जावा या पध्दतीने आधी 1 हजार 75 कोटी रुपये व नंतर 500 कोटी रुपये असे एकूण 1575 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले.हे पॅकेज जाहीर केल्यानंतर देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या थांबत नाहीत असे पाहून माननीय पंतप्रधान श्री. मनमोहनसिंग यांनी स्वत: विदर्भाचा दौरा केला. ते दोन दिवस विदर्भामध्ये थांबले.आत्महत्त्या केलेल्या शेतकऱ्यांच्या घरी गेले व त्यांनी त्यांची जातीने चौकशी केली. आणि तिथून गेल्यानंतर त्यांनी 3750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. माननीय मुख्यमंत्र्यांनी पहिल्यांदा जाहीर केलेल्या पॅकेज नंतर माननीय पंतप्रधानांनी तिपटीने पॅकेज जाहीर केले. तरीसुध्दा दुप्पटीने शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या वाढया. खरे म्हणजे माननीय मुख्यमंत्री आणि माननीय पंतप्रधानांनी जाहीर केलेल्या पॅकेजचे स्वागत जणू काही शे-पाचशे शेतकऱ्यांच्या आत्महत्तेने करण्यात आले. दिवाळीमध्ये या बळीराजाची संख्या हजारावर गेली. आत्महत्त्या कमी झाल्या, जास्त वाढल्या अशाप्रकारची चर्चा वर्तमानपत्रामधून व्हावयास लागली.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढे सुरु....

सभापती महोदय, काही जिल्हाधिकाऱ्यांकडून आत्महत्येच्या संबंधातील माहिती मागविली. त्यावरून हे स्पष्ट झाले की, 1 जानेंवारी 2006 ते 31 ऑक्टोबर 2006 पर्यन्त 1471 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. त्यानंतर नोव्हेंबर महिन्यामध्ये 100-125 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. म्हणजेच आत्महत्येच्या प्रमाणामध्ये वाढ झालेली आहे. 1471 शेतकऱ्यांच्या आत्महत्येपैकी शासनाने फक्त 582 आत्महत्या पात्र ठरविल्या, 89 आत्महत्यांची चौकशी सुरू आहे बाकीच्या आत्महत्या अपात्र ठरविल्या. म्हणजे जवळपास 7 टक्के आत्महत्या या अपात्र ठरविल्या. म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार आहे. या संदर्भामध्ये लोकसभेमध्ये चर्चा झाली. त्यावेळेला देशाच्या कृषी मंत्र्यांनी उत्तर दिले की, महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या आता घटत आहेत. आत्महत्या घटत असल्या तरी ती महाराष्ट्राला शोभा देणारी गोष्ट नाही. कृषी मंत्र्यांच्या शब्दाची री ओढत राज्याच्या मुख्यमंत्र्यांनीही आत्महत्येमध्ये घट होत चालली आहे असे सांगितले. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना अपात्र ठरविण्याच्या कारणांमध्ये व्यसनाधिनता, आजारपण, कर्जबाजारीपणा अशी कारणे दिलेली आहेत. शासनाने आपल्या कर्तव्यापासून पळून जाण्याचा प्रयत्न केलेला आहे. माझ्या बुलढाणा जिल्ह्यामध्ये 31 ऑक्टोबर 2006 पर्यन्त जवळपास 266 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. त्यामधील फक्त 168 शेतकऱ्यांच्या आत्महत्या शासनाने पात्र ठरविल्या. 6 शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रकरणामध्ये चौकशी सुरू आहे. शासनाने आत्महत्या अपात्र ठरविण्याचे निकष लावले त्यामध्ये पैसे संपल्यामुळे अपात्र ठरविले, कलेक्टर, पटवारी, एसडीओ, तहसिलदार यांनी चुकीचा रिपोर्ट दिला म्हणून आत्महत्या अपात्र ठरविल्या, की अन्य काही कारणे आहेत ? याचा खुलासा व्हावा. नमुना दाखल मी वर्धा जिल्ह्यातील उदाहरण देतो. कु.उज्वला शंकर वानखेडे या मुलीने पत्र लिहिलेले आहे. तिच्या वडिलांनी 2003 मध्ये आत्महत्या केली. शंकरराव वानखेडे याची जमीन अप्पर वर्धा प्रकल्पामध्ये गेलेली होती. त्याची जमीन गेल्यानंतर त्या शेतकऱ्याला दुसरी जमीन मिळायला पाहिजे होती, परंतु ती जमीन मिळाली नाही, त्यामुळे तो शेतकरी उदास झाला. त्याला कोणतेही जगण्याचे साधन राहिले नाही, म्हणून त्या शेतकऱ्यांने आत्महत्या केली. त्याला जमिनीच्या मोबदल्यात जमीन मिळाली असती तर आत्महत्या करावी लागली नसती. खालच्या सभागृहामध्ये या संदर्भाने 2003 मध्ये त्यावेळचे सन्माननीय सदस्य सर्वश्री वामनराव कासावार, गणपतराव देशमुख इ.नी प्रश्न उपस्थित केला होता. त्या प्रश्नावरील चर्चेला उत्तर देताना त्यावेळचे पुनर्वसन मंत्री श्री.विलासकाका पाटील यांनी

07-12-2006 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) GG-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (पुढें सुरु...

आश्वासन दिले की, अप्पर वर्धा प्रकल्पात ज्यांची जमीन गेली असेल, अशा प्रकल्पग्रस्ताना जमीन देणे हे शासनाचे कर्तव्य आहे. परंतु त्यांना जमीन देऊ शकलेलो नाही. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्याला 2 लाख रुपये मोबदला दिला जाईल. परंतु अजूनही त्या शेतकऱ्याच्या कुटुंबियांना पैसे मिळालेले नाहीत. आत्महत्या अपात्र म्हणून का घोषित केल्या जातात, हे समजत नाही.

यानंतर श्री.बरवड......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

सभापती महोदय, आत्महत्यांचा आलेख कसा वाढत गेला हे मी सांगणार आहे. सन 2001 साली महाराष्ट्राच्या सर्व जिल्ह्यामध्ये फक्त 42 आत्महत्या झाल्या होत्या. सन 2002 मध्ये 31 जिल्ह्यांमध्ये 72 आत्महत्या झाल्या. सन 2003 मध्ये 134 आत्महत्या झाल्या. सन 2004 मध्ये 400 आत्महत्या झाल्या. सन 2005 मध्ये आत्महत्येचे प्रमाण थोडे कमी होऊन 312 आत्महत्या झाल्या. सन 2005 च्या डिसेंबर महिन्यामध्ये ज्यावेळी पॅकेज जहीर झाले त्यानंतर 1 जानेवारी पासून आता नोव्हेंबरपर्यंत 1100 आत्महत्या झाल्या. त्याची कारणे काय आहेत ? शासनाने पॅकेज जाहीर केल्यानंतर शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली. शासनाने 1075 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. मध्यंतरी मी अशी मागणी केली होती की, हे पॅकेज किती प्रमाणात शेतकऱ्यांच्या घरापर्यंत पोहोचले याची श्वेतपत्रिका शासनाने काढली पाहिजे. माननीय पंतप्रधानांनी जाहीर केलेले पॅकेज तसेच माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेले पॅकेज याचा लाभ प्रत्यक्षपणे आणि अप्रत्यक्षपणे किती शेतकऱ्यांना दिला, खात्यामार्फत ते पैसे किती प्रमाणात शेतकऱ्यांच्या घरापर्यंत पोहोचले याची श्वेतपत्रिका शासनाने जाहीर करावी अशी पुन्हा मी या सभागृहामध्ये मागणी करतो. या पॅकेजची मला थोडी चिरफाड करावयाची आहे. माननीय मुख्यमंत्र्यांचे पॅकेज 1075 कोटी रुपयांचे होते. त्यामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी काय दिले ? त्या पॅकेजमधील एक बाब म्हणजे भांडवली ठेव निधीच्या बाबतीत 3 वर्षासाठी 370 कोटी रुपयांची तरतूद केली. सन 2005-06 मध्ये प्राप्त निधी 184 कोटी रुपये होता. सन 2006-07 ची तरतूद 220 कोटी रुपये आहे. एकूण तरतूद 405 कोटीची होती. प्राप्त तरतूद 405 कोटी होती त्यापैकी शेतकऱ्यांना 396 कोटी रुपये मिळाले. भांडवल ठेव निधी शासनाने पॅकेजमध्ये घातला. ते शासनाचे पैसे नाहीत. ते शासनाचे पैसे असते तर समजू शकलो असतो. एकाधिकार कापूस खरेदी योजनेमध्ये शेतकऱ्यांकडून ठेव म्हणून घेतलेले हे पैसे होते. ते पैसे तुम्ही शेतकऱ्यांना दिले आणि आमच्यावर खूप उपकार केले. हे पैसे तुम्ही दिलेले नाहीत. या पॅकेजचा शासनाने खूप धिंडोरा पिटला की, आम्ही 1000 कोटी रुपयांचे पॅकेज दिले. या 1000 कोटी रुपयांमधील भांडवल ठेव निधीचे पैसे हे आमच्या शेतकऱ्यांचे पैसे आहेत. 1972 पासून कापूस एकाधिकार योजना या राज्यामध्ये सुरु झाली आणि त्या योजनेच्या

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

श्री. पांडुरंग फुंडकर ....

माध्यमातून शेतकऱ्यांच्या विक्रीच्या रकमेतून 3 टक्के रक्कम भांडवल ठेव निधी म्हणून कापण्यात आला. सन्माननीय सदस्य श्री. हिराणी साहेब या ठिकाणी बसलेले आहेत. ते पणन महासंघाचे अध्यक्ष आहेत. मीही पणन महासंघाचा अध्यक्ष होतो. ही रक्कम 1972 पासून कापण्यास सुरुवात केली. 1995 पर्यंत ही रक्कम कापली गेली. 1995 मध्ये युतीचे सरकार आल्यानंतर मी पणन महासंघाचा अध्यक्ष झालो. मी असे ठरविले की, कशासाठी शेतकऱ्यांच्या कापसाच्या पैशातून पैसे कापावयाचे ? मी धाडसाने निर्णय घेतला. अधिकारीवर्गाचा विरोध होता तरीही मी धाडसाने निर्णय घेतला आणि 3 टक्के कपात बंद केली. या 3 टक्के कपातीच्या पैशाचा हिशेब नव्हता. तो हिशेब पूर्ण करण्याचा आम्ही प्रयत्न केला. या शेतकऱ्यांच्या 3 टक्के रकमीतील पैसे महाराष्ट्र शासनाने बिनव्याजी वापरले. शेतकरी आत्महत्या करावयास लागल्यानंतर उपकार म्हणून शेतकऱ्यांचेच पैसे शेतकऱ्यांना दिले.

सभापती महोदय, या पॅकेजमधील दुसरी बाब म्हणजे कापूस दिलासा रक्कम. त्यासाठी 134 कोटी रुपयांची तरतूद केली. त्यामध्ये सन 2005-06 मध्ये 118 कोटी रुपये आणि सन 2006-07 मध्ये 13 कोटी असा एकूण 131 कोटी रुपये निधी प्राप्त झाला. प्रत्यक्षात वाटप 119 कोटी रुपयांचे झाले. हे पैसे कशासाठी दिले ? लाल्या नावा रोग आला. काल राज्याच्या माननीय कृषी राज्यमंत्र्यांनी सांगितले की, नैसर्गिक आपत्तीमुळे लाल्या रोग होत नाही. तो रोग कशामुळे होतो ? नैसर्गिक आपत्तीमुळे हा रोग होत नसेल तर बियाण्यामध्ये काही तरी खोट आहे. बियाणामध्ये खोट असल्यामुळे, जर्मिनेशन पॉवर कमी झाल्यामुळे लाल्या रोग आला.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, अतिवृष्टीमुळे हा रोग होत नाही असे मी म्हटलेले नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : काल आपण नव्हे तर माननीय कृषी राज्यमंत्र्यांनी हे सांगितले.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर....)

कापसावर लाल्या नावाचा रोग पडला. बियाण्यामध्ये दोष असल्यामुळे हा रोग पडलेला आहे. तर मग शेतक-याने ज्या कंपन्यांचे बियाणे घेतले त्या कंपन्यांकडून शेतक-यांना नुकसान भरपाई मिळवून द्यायला पाहिजे होती. पुनर्गठित कर्जावरील व्याजासाठी 2005-06मध्ये 225 कोटी रु. तरतूद केली होती त्यापैकी 61 कोटी रु. प्राप्त झाले. 2006-07मध्ये 179 कोटीची तरतूद होती. पुनर्गठित कर्जावरील व्याजासाठी एकूण 240 कोटीची तरतूद होती आणि प्रत्यक्षात 240 कोटीचे वाटप झाले.सभापती महोदय, आपण सहकार क्षेत्रामध्ये काम करता. या सहकार क्षेत्रासंबंधी अनेक वेळा आपली आणि माझी व्यक्तिगत चर्चा झालेली आहे. कर्जावरील व्याज हे मुद्दलापेक्षा जास्त होता कामा नये असा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. या निर्णयानुसार शासनाने शेतक-याच्या कर्जाची बँकांकडून माहिति घेतली असती तर बरे झाले असते. बँकांनी शेतक-यांकडून दामदुपटीने कर्ज वसूल केलेले आहे. शासनाने जेव्हा बँकाकडून शेतक-यांच्या कर्जाची माहिती घेतली त्यावेळी बँकांनी शेतक-यांनी घेतलेल्या कर्जावर चार-पाच पटीने व्याजाची आकारणी करुन राज्य शासनाला माहिती दिली. दामदुपटीपेक्षा जास्त व्याज शेतक-याकडून वसूल न करण्यासंबंधीचा निर्णय बँकांना घ्यावयास लावला असता तर त्याचा लाभ शेतक-यांना झाला असता. शेतक-याला 25 हजार रुपये या प्रमाणे आर्थिक मदत करण्यासाठी 2005-06मध्ये 150 कोटीची तरतूद करण्यात आली होती. शेतक-यांना प्रत्यक्षात 20 लाख रु. देण्यात आले. 2005-07मध्ये 50.20 कोटीची तरतूद करण्यात आलेली असताना शेतक-यांना फक्त 16.41 कोटीचे वाटप करण्यात आले. ही माझी आकडेवारी नाही. काल सन्माननीय महसूल मंत्र्यांनी विधानसभेमध्ये ही आकडेवारी सांगितलेली होती. सामूहिक विवाहासाठी 8 कोटीची तरतूद केलेली होती. त्यापैकी 7.46 कोटीचे वाटप करण्यात आले. शेतीला पूरक व्यवसायासाठी 2005-06मध्ये 1 कोटी आणि 2006-07मध्ये 30 कोटी अशी एकूण 31 कोटीची तरतूद केलेली होती. त्यापैकी 6.25 कोटीचे वाटप करण्यात आले. सेंद्रीय शेतीसाठी 2005-06मध्ये पॅकेजमध्ये 30 कोटी रुपये ठेवले होते. त्यापैकी फक्त 30 लाख रुपये प्राप्त झाले. 2006-07मध्ये 10 कोटीची तरतूद होती त्यापैकी फक्त 3 कोटीचे वाटप झाले. पीक विम्याच्या बाबतीत 30 कोटी पैकी फक्त 19 रु. प्राप्त झाले आणि त्यापैकी केवळ 9 कोटीचे वाटप केले. विदर्भ पाणलोट मिशनसाठी पॅकेजमध्ये 100





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. पांडुरंग फुंडकर...)

कोटीची तरतूद होती. पाणलोट मिशनसाठी 2005-06मध्ये 2 कोटीची आणि 2006-07मध्ये 50 कोटीची तरतूद करण्यात आली. एकूण 52 कोटी पैकी शेतक-यांना फक्त 17 कोटी रु. देण्यात आले. शेतक-याच्या पदरात या पॅकेजमधले काय पडले ? 1050 कोटी पैकी शेतक-याला फक्त 54 कोटीचा लाभ झाला, म्हणजे प्रत्यक्षात काहीच लाभ झाला नाही.

... नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ SBT/ KTG/ MHM/ 13:30

श्री.पांडुरंग फुंडकर..........

शेतक-यांना मदत मिळाली नाही म्हणून दुप्पटीने आत्महत्या वाढल्या. देशाचे पंतप्रधान माननीय श्री.मनमोहन सिंह महाराष्ट्रात आले. त्यांनी पाहिले, शेतकऱ्यांच्या आत्महत्या मुख्यमंत्र्यांच्या पॅकेजने थांबत नाहीत, त्यामुळे आपण गेले पाहिजे. 1जुलैला पंतप्रधानांचा दौरा झाला. दोन दिवस पंतप्रधान विदर्भाच्या भूमीत, उपराजधानीत राहिले. यवतमाळ जिल्हयात गेले. शेतकऱ्यांच्या घरापर्यंत गेले. तेथून आल्यानंतर पंतप्रधानांनी चिंता व्यक्त केली. त्यांचे हृदय हळहळले. त्यांनी सांगितले की, मी 3750 कोटी रुपयांचे पॅकेज आज जाहीर करीत आहे. याही पॅकेजची मोठी गंमत आहे. त्यांनी पॅकेज जाहीर केले. व्याज माफीचा मुद्दा त्यामध्ये अंतर्भूत केला गेला. जी व्याज माफी राज्य सरकारने जाहीर केली होती तोच मुद्दा या पॅकेजमध्ये अंतर्भूत करण्यात आला. मुख्यमंत्र्यांनी कसे गोलगोल फिरविले समजत नाही. पंतप्रधानांच्या पॅकेजचे तेच, मुख्यमंत्र्यांच्या पॅकेजचेही तेच झाले.

सभापती महोदय, आश्वासित सिंचन योजनेमध्ये 2177 कोटी रुपयांची तरतूद होती. या 2177 कोटी रुपयांपैकी पंतप्रधान महोदयांच्या कार्यालयाची आकडेवारी निरंक आहे. राज्य शासनाचा वाटा यामध्ये 240 कोटी रुपये होता व फक्त 240 कोटी रुपयांचे वाटप आश्वासित सिंचन योजनेमध्ये झाले आहे. पंतप्रधान कार्यालयाचा पैसा आलेला नाही. महाराष्ट्र सरकारने फक्त आपला 240 कोटी रुपयांचा हिस्सा दिला.

सभापती महोदय, सूक्ष्म सिंचन योजनेमध्ये प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या घरात पैसा गेला नाही. 78 कोटी रुपयांची तरतूद केली गेली. प्राप्त निधी 15.23 कोटी रुपये आणि प्रत्यक्ष वाटप 5.23 कोटी रुपये झाले. 78 कोटी रुपयांपैकी फक्त 5.23 कोटी रुपये सूक्ष्म सिंचन योजनेसाठी वाटप केले गेले.

सभापती महोदय, जेट डॅम योजनेसाठी 240 कोटी रुपयांची तरतूद असताना प्रत्यक्ष प्राप्त निधी रु.7.20 कोटी व प्रत्यक्ष वाटप 22 लाख रुपयांचे झाले. विस्तारित सेवा कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा या योजनेला आत्मा म्हटले गेले. 3 कोटी रुपयांची तरतूद असताना 2.54 कोटी रुपये प्राप्त झाले व फक्त 22 लाख रुपयांचे वाटप केले गेले. बियाणे वाटप योजनेकरीता 180 कोटी रुपयांची तरतूद पंतप्रधानांच्या पॅकेजमध्ये केली होती. त्यापैकी 17 कोटी रुपये निधी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..........

प्राप्त झाला आणि 17.50 कोटी रुपये पंतप्रधान पॅकेजमधून राज्याला मिळाले. त्यापैकी फक्त 12.59 कोटी रुपयांचे वाटप झाले. म्हणजे 180 कोटी रुपयांपैकी फक्त 12.59 कोटी रुपये पंतप्रधान पॅकेजच्या माध्यमातून वाटले गेले.

सभापती महोदय, राष्ट्रीय फलोत्पादन मिशन कार्यक्रमाकरीता 225 कोटी रुपये जाहीर केले गेले. 14.48 कोटी रुपये प्रत्यक्ष दिले गेले. त्यातून फक्त 82 लाख रुपयांचे वाटप झाले. शेवटचा मुद्दा शेती पूरक व्यवसायाचा आहे. काय पुरविले गेले याची मला कल्पना नाही? 135 कोटी रुपयांची तरतूद केली गेली. कशासाठी ही आकडेवारी जाहीर करण्यात आली? फक्त 6 कोटी रुपये निधी दिला गेला. त्यापैकी एक छदाम, एक नवा पैसा देखील पंतप्रधान पॅकेजच्या माध्यमातून वाटला गेला नाही. या दोन्ही पॅकेजची अशी अवस्था आहे. मुख्यमंत्र्यांचे पॅकेज आले, पंतप्रधानांचे पॅकेज आले असा दिंडोरा पिटला गेला. गावागावात जिल्हाधिकारी, तहसिलदार, एसडीओ यांनी भेटी दिल्या. दवंडी दिली गेली. प्रत्यक्षात एक वर्ष पूर्ण होऊनही एक छदाम देखील शेतकऱ्यांच्या हाती पडला नाही.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत गेले. या दोन्ही पॅकेजसंबंधी आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्यांसंबंधी मी आपल्याशी बोललो. आत्महत्या का होतात याच्या मुळात जाण्याची गरज आहे. केवळ वरवरची मलमपट्टी करुन हा विषय संपणार नाही. कधीतरी सरकार याचा गांभीर्याने विचार करणार आहे की नाही? शेतीच्या प्रश्नासंबंधी सरकार कधी खोलात गेले आहे का? या हिंदुस्थानच्या अर्थशास्त्राचा मूळ गाभा हा शेती आहे. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शेतीला प्रमुख उद्योगाचे स्थान द्यायला हवे होते, ते दिले गेले नाही. शेतीला प्रमुख उद्योगाचे स्थान न दिल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी मिळाले नाही. सिंचनाच्या बॅकलॉगसंबंधी सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुखसारखे अनुभवी, ज्येष्ठ नेते प्रत्येक अधिवेशनात झगडत आहेत.

(नंतर श्री.जुन्नरे........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ......

शेतक-यांच्या सिंचनाच्या संदर्भात कोणतीही व्यवस्था करण्यात आलेली नाही. महाराष्ट्रामध्ये सिंचनाची टक्केवारी केवळ 6 ते 7 टक्के एवढीच आहे. आज शेतक-यांच्या शेतीला पाणी नाही, वीज नाही. शेतक-याला वीज दिली तर ती पुरेशा प्रमाणात आणि पुरेशा दाबात दिली जात नाही. आपण सत्तेवर येतांना शेतक-यांना मोफत वीज दिली जाईल अशी घोषणा करुन निवडणूक जिंकलेली आहे. ख-या अर्थाने महाराष्ट्रातील शेतक-याचे दुःख महाराष्ट्राच्या विधानसभेवर आणि विधानपरिषदेवर टांगले गेले पाहिजे होते, नियमांचा आधार बाजूला सारुन कालच आपण शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात नियम 289 अनुसार चर्चा केली पाहिजे होती. शेतक-यांना मोफत वीज देऊ असे आश्वासन देऊन आपण सत्तेवर आलेला आहात परंतु शेतक-यांना मोफत वीज तर सोडूनच द्या परंतु आज महाराष्ट्रातील ग्रामीण भागात आज 17-17 तास लोडशेडींग केले जात आहे. जवळपास 3 लाखाच्यावर शेतक-यांच कृषी पंपाचे अर्ज पेंडींग पडलेले आहे. कनेक्शनसाठी शेतकरी पैसे देण्यास तयार आहे परंतु तुम्ही शेतक-यांना कनेक्शन देत नाही. या वर्षी चांगल्या प्रमाणात पाऊस झाल्यामुळे नद्या-नाले, धरणे, विहीरी तुडुंब भरलेले आहेत. विहिरीत पाणी असतांना वीज नसल्यामुळे शेतकरी आपल्या शेतीला पाणी देऊ शकत नाही. वीज नसल्यामुळे शेतक-याचे ऊभे पीक जळतांना त्याला आपल्या डोळयांने पहावे लागत आहे. शेतक-याची काळी आई पाण्यासाठी आसुसलेली आहे परंतु वीज नसल्यामुळे तो आपल्या शेतीला पाणी देऊ शकत नाही. अगोदरच शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे आत्महत्या करीत आहे आता त्यामध्ये वीज नसल्यामुळे शेतीला पाणी देऊ शकत नसल्यामुळे, पिकविलेल्या मालाला भावन न मिळाल्यामुळे त्याच्यावर आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे. आपणशेतक-यांना मोफत वीज देऊ, शेतक-याच्या कापसाला 2700 रुपये भाव देऊ असे आश्वासन देऊन आपण सत्तेवर आलेला आहात. शेतक-याच्या कापसाला कमी भाव मिळत असल्यामुळे मी माननीय गृहमंत्र्यांना विचारले होते की, तुम्ही तर कापसाला 2700 रुपये भाव देऊ असे सांगितले असता कमी भाव का देत आहात ? त्यावर मंत्रीमहोदय यांनी सांगितले की, आम्ही कापसाला 2700 रुपये भाव देण्याचे आश्वासन दिलेले आहे परंतु याच वर्षी 2700 रुपये भाव द्यावयाचा असे बोललो नव्हतो, पाच वर्षात आम्ही कधीही 2700 रुपये भाव देऊ. जर शेतक-यांची अशा रितीने थट्टा केली जाणार असेल तर ती आम्ही कदापिही खपवून घेणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ......

सभापती महोदय, आता केंद्रशासनाच्या हमी भावानुसार कापसाची खरेदी केली जात आहे. परंतु या कपाशिच्या हमी भावाची काय परिस्थिती आहे हे आपल्याला माहिती आहे का? या शासनाने केवळ बन्नी जातीच्या कापसाला 2020 रुपये भाव दिलेला आहे व ब्रम्हा जातीच्या कापसाला 2010 रुपये प्रती क्विंटल भाव दिलेला आहे. परंतु गंमत अशी आहे की, बन्नी आणि ब्रम्हा हया जातीचा कापूस आपल्याकडे एक टक्का सुध्दा लावला जात नाही. मी विदर्भातील कास्तकाराचा मुलगा आहे. जो कापूस पिकविला जात नाही त्या कापसाला आपण 2020 रुपये भाव दिलेला आहे आणि जो कापूस या ठिकाणी मुबलक प्रमाणात पिकविला जातो त्या कापसाला मात्र आपण 1600-1700 रुपये भाव दिलेला आहे. सीएच-2 या कपाशिच्या जातीला 2000 रुपये, एच-4 या कापसाला 1990रुपये , एमइसीएस या जातीला 1895 रुपये , डीएचवाय-1845 रुपये, अंकुर-1845, एमसीएफ-1845, एलआरएल-1835 रुपये, एएच-4 1805 रुपये, एनएचएफ-1710 रुपये, एनएचएफ-44 1685 रुपये असा कापसाला शासन दर देत आहे. कापसाला केंद्रशासनाच्या हमी भावानुसार 2000 रुपये प्रती क्विंटलच्यावर भाव दिला जात नाही परंतु आपण कापसाला 2700 रुपये भाव देऊ अशी घोषणा करुन सत्तेवर आलेला आहात. परंतु आपण 2000 रुपयाच्या वर कापसाला भाव दिलेला नाही. आपण शेतक-यांचा विश्वासघात केलेला आहे. आपण शेतक-यांचा विश्वासघात करुन सत्तेवर आलेला आहात. शेतक-याच्या कापसाला 2700 रुपये भाव देऊ असे सांगून आपण शेतक-याच्या कापसाला केवळ 1600 ते 1800 रुपये प्रती क्विंटल भाव दिलेला आहे याचा अर्थ आपण शेतक-यांच्या कापसाला प्रती क्विंटल 700 ते 900 रुपये प्रती क्विंटल कमी भाव देत आहात. कापसाला कमी भाव मिळत असल्यामुळे उत्पन्न आणि खर्च याचा मेळ बसत नाही.

यानंतर श्री. अजित.......

श्री.पांडुरंग फुंडकर........

त्यामुळे त्याचे कर्ज फिटत नाही. कर्ज फिटत नाही म्हणून तो मुलीचें लग्न करु शकत नाही. कर्जबाजारीपणामुळे तो आत्महत्येस प्रवृत्त झाला. माझी याठिकाणी मागणी आहे की, आपण शेतकऱ्यांच्या पिकाला 2700 भाव दिला पाहिजे. डॉ.पतंगराव कदम आपण श्री.नारायण राणे यांचे नंतर अभिनंदन करा. तुम्ही सांगितले की, शेतकऱ्यांना सहा टक्के दराने कर्ज देऊ, परंतु आजही शेतकऱ्यांकडून अकरा टक्के दराने वसुली सुरु आहे........

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय,शेतकऱ्यांकडून सहा टक्के दराने व्याज आकारण्यात येणार आहे. त्याबाबतचे कॅलक्युलेशन सुरु आहे, हे कॅलक्युलेशन झाल्यानंतर त्यामध्ये बदल होणार नाही. या संदर्भातील निर्णय घेण्यासाठी दिनांक 13 डिसेंबर रोजी माननीय मुख्यमंत्र्यांकडे जिल्हा बँकाची बैठक बोलाविलेली आहे. तेव्हा विरोधी पक्ष नेत्यांनी कोणतीही शंका घेण्याचे कारण नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी आदेश काढले, परंतु बँका त्यांच्या आदेशाची अंमलबजावणी करीत नाहीत, तेव्हा मंत्रिमहोदय त्यांचेवर कोणती कारवाई करणार आहेत ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, ज्या बँका आदेश पाळणार नाहीत त्या बरखास्त केल्या जातील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शेतकऱ्यांना जास्त हमीभाव दिला जाईल अशी सरकारने घोषणा केली. परंतु प्रत्यक्षात कमी हमी भावाने खरेदी केली. सरकार जर शेतकऱ्यांना 2700 रुपये हमीभाव देत नसेल तर किमान एक एकराला दोन हजार रुपये अनुदान देणार आहे का ? वाटल्यास आपण त्यांच्या सात-बारा उताऱ्यावरील पेरा पहावा. तेव्हा शेंतकऱ्यांना एकरी दोन हजार रुपये अनुदान देणार आहे काय ? याचे उत्तर मंत्रिमहोदयांनी द्यावे. शेतकऱ्यांच्या कर्जाचा प्रश्न आहे. डॉ.पंतगराव कदम याठिकाणी उपस्थित आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, कापूस उत्पादक शेतक-यांना जिल्हा बँका कर्ज देते, त्या कर्जातून दहा टक्के रक्कम शेअर कपात म्हणून केली जाते. राज्यात अशाप्रकारची कपात 1943 पासून 1960 पर्यंत सुरु होती. जवळपास 24 जिल्हयांतून या शेअर रकमेपाठी 200 कोटी रुपये जमा झालेले आहेत. असे असताना देखील बँका दरवर्षी शेतकऱ्यांना मिळणाऱ्या कर्जातून दरवर्षी शेअर कपात करीत असते. मला याठिकाणी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर........

विचारावयाचे आहे की, दरवर्षी शेअर कपात कशासाठी करता ? सन 1960 नंतर ही शेअर कपात वाढत गेली आणि आजपर्यंत 20 हजार कोटी रुपये बँकाकडे जमा झालेले आहेत. माझ्या माहितीप्रमाणे अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे जवळपास 7500 कोटी रुपये कर्ज आहे. बँकाकडे शेतकऱ्यांचे 20हजार कोटी रुपये जमा आहेत. याचा अर्थ धनको कोण आहे आणि ऋणको कोण आहे हे दिसून येते. सभापती महोदय,शेतकऱ्यांवर कर्ज असल्यामुळे तो स्वत:ची घर लिलावात काढतो, त्याच्यावर आत्महत्या करण्याची पाळी येते. शेतकऱ्यांच्या शेअरपोटी कापलेल्या रकमेवर त्यांना कोणत्याही प्रकारचे व्याज, लांभांश वा बोनस देण्यात येत नाही.

यानंतर श्री.पुरी...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पंतगराव कदम : सभापती महोदय, या विषयावर खालच्या सभागृहामध्येही चर्चा चालू असून मला तिकडेही उत्तर द्यावे लागणार आहे.

**सभापती** : आपल्याला येथेही उत्तर द्यावे लागेल. या विषयासंबंधी तीन मंत्र्यांना उत्तर द्यावे लागणार आहे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो उल्लेख केला त्यासंबंधी मी सांगू इच्छितो. आम्ही 20 हजारांचा आदेश काढलेला आहे. वैद्यनाथ समितीच्या एमओयूवर साईन झालेली आहे. त्यामध्ये मराठवाडा आणि विदर्भातील सगळया जिल्हा बँका येणार आहेत. यामध्ये वैद्यनाथ समितीमध्ये 78 टक्के केंद्र सरकार, 22 टक्के राज्य सरकार पैसे देणार आहे. यामधून सर्व सोसायटया आणि बँकांचा तोटा भरुन निघणार आहे. त्याच्यासाठी एमओयू साईन केलेली असून 20 हजारांपेक्षा जादा शेअर्स घेऊ नयेत असे आदेश काढलेले आहे व त्याचा आढावा आम्ही घेणार आहोत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझ्याकडे श्री.चंद्रा, कमिशनर यांचे पत्र आहे. गेल्या 6 महिन्यांमध्ये आपण काहीच केलेले नाही.

डॉ.पतंगराव कदम : मराठवाडा आणि विदर्भातील बँकांची अशीच अवस्था आहे. तेथे रिॲम्बर्स झाल्यानंतर देण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, प्रथम माननीय विरोधी पक्षनेत्यांना आपले मुद्दे मांडू द्यावेत, त्यानंतर माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे, असे मला वाटते.

**सभापती** : आता मीही तेच सांगणार होतो. याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेते आणि अन्य इतर सन्माननीय सदस्य जे मुद्दे उपस्थित करतील, त्यासंबंधी माननीय मंत्रिमहोदयांनी नंतर उत्तर द्यावे. आता माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपले म्हणणे पुढे सुरु ठेवावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दिनांक 21 मार्च, 2006 रोजी यासंबंधीची लक्षवेधी सूचना खालच्या सभागृहामध्ये चर्चेला आली होती, त्यावेळी माननीय सहकार मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले आहे की, 20 हजारापर्यंत शेतकऱ्यांचे शेअर्स कापले जातील त्याच्यापुढील कापले जाणार नाहीत. जर कोणी ते कापले तर त्यावर साडेसात टक्क्यांचे व्याज दिले जाईल, असे त्यावेळी त्यांनी सांगितले. परंतु प्रत्यक्षात अशी कृती झालेली नाही. श्री.अपूर्व चंद्रा, सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांनी आदेश काढल्यानंतरही त्यांच्या आदेशाचे पालन

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

कोणत्याच बँकेने केलेले नाही. शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्यासाठी पॅकेज जाहीर झाले. त्याचा हिशोब केला तर 3,750 कोटी रुपये अधिक 175 कोटी रुपये असे पैसे आलेले आहेत. हा हिशोब मी फक्त 6 जिल्हयांचा सांगत नाही. आज महाराष्ट्रातील अल्पभूधारक शेतक-यांसाठी साडेसात हजार कोटी रुपयांची गरज आहे. त्यापैकी फारच अल्प पॅकेज याठिकाणी जाहीर झालेले आहे. आज आपण राज्यातील शेतकऱ्यांना जर कर्जमुक्त केले तरच या आत्महत्यांच्या प्रमाणात घट होणार आहे. त्यामुळे आज खऱ्याअर्थाने शेतकऱ्यांना कर्जमुक्त करणे गरजेचे आहे. स्वातंत्र्यानंतर हिंतुस्थानातील शेतकऱ्यांचा लगेच विचार झाला असता व त्यांना चांगल्याप्रमाणात पाणी, वीज उपलब्ध करुन, त्यांच्या शेतीमालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी तालुक्या तालुक्यात उभी करुन खऱ्याअर्थाने शेतकऱ्याला त्या कारखान्याचे मालक केले असते व त्यांच्या शेतीमालाला चांगल्या प्रकारचा बाजारभाव मिळवून दिला असता तर कदाचित ही पाळी त्यांच्यावर आज आली नसती. परंतु दुर्दैवाने विदर्भ आणि मराठवाडयातील मोठयाप्रमाणात कापूस पिकवणाऱ्या जिल्हयांमध्ये सूत गिरण्या नाहीत. परंतु ज्या कोल्हापूरसारख्या, इचलकरंजीसारख्या भागात साधा 100 क्विंटलही कापूस पिकत नाही, त्या भागामध्ये मोठयाप्रमाणात सुत गिरण्या उभ्या आहेत. सातारा जिल्हयातील फलटण सोडले तर कुठेही कापसाचे साधे एक बोंडही पिकत नाही, त्याठिकाणी आज सुत गिरण्या उभ्या आहेत. आज त्या सुत गिरण्या मराठवाडा, खानदेश व विदर्भामध्ये उभ्या केल्या असत्या, त्यापध्दतीने कारखादारीस प्रोत्साहन दिले असते व सुत गिरण्याच्या माध्यमातून कच्चा मालावर प्रक्रिया करणारी कारखानदारी त्याठिकाणी उभी राहिली असती तर खऱ्याअर्थाने शेतकरी आज सक्षमपणे उभे राहिले असते.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...........

कापसाला भाव नाही. आज असलेल्या सुतगिरण्या कुणाच्या आहेत ? सुतगिरण्या सहकारी तत्वावरील आहेत पण या सर्व गिरण्या व्यापा-यांना चालविण्यासाठी दिलेल्या आहेत. व्यापारी मजा मारीत आहेत, त्याचा शेतक-यांना कोणताही लाभ मिळत नाही. साखरेला पॅकेज दिले गेले, ऊसाला पॅकेज दिले गेले त्या पध्दतीने कापसाला, सोयाबीनला, धानाला पॅकेज द्या आणि ज्या आजारी पडलेल्या सुतगिरण्या आहेत त्यांना ताकद देऊन पुन्हा एकदा त्या सुरु करा आणि शेतक-यांना या गिरण्याचे मालक होऊ द्या. प्रक्रिया करणारी कारखानदारी उभी राहिलेली नाही. कापुस आम्ही पिकवितो पण भाव मात्र कृषिमुल्य आयोग ठरविते. शेतक-यांना आपल्या मालाचा भाव सांगण्याचा अधिकार मिळालेला नसल्यामुळे त्यांची ही अवस्था झालेली आहे. मी या चर्चेच्या निमित्ताने काही मागणी करणार आहे. ख-या अर्थाने सरकारला शेतक-यांच्या आत्महत्या थांबवावयाच्या असतील तर मग या मागण्यांवर गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्य देखील माझ्या मागण्यांना सहमती दर्शवतील, अशी मला आशा आहे. समग्र विकास गट म्हणून शेतक-यांच्या प्रश्नावर विचार करणारी बुध्दिवंत मंडळी आहेत. त्यांनी शेतक-यांच्या आत्महत्येबाबत विचार केलेला आहे. देशोन्नतीचे, श्री.प्रकाश कोरे यांच्याशी झालेल्या चर्चेत त्यांनी असे सांगितले की, ख-या अर्थाने शेतक-यांना स्वाभीमानाने उभे करावयाचे असेल, आत्महत्यांपासून परावृत्त करावयाचे असेल तर जिल्हा मध्यवर्ती सहकारी भूविकास बँका यांनी शेतक-यांना कर्ज देतांना त्यांच्याकडून कपात केलेल्या शेअर्सची रक्कम व्याजासह परत करावी. यासंदर्भात काढलेल्या शासन निर्णयाची अंमलबजावणी उद्यापासून सुरु करावी. दुसरी मागणी अशी आहे की, बँका शेती कर्जाच्या माध्यमातून दुपटीपेक्षा वसूल केलेली रक्कम शेतक-यांना परत करीत नाहीत. आजही 1 लाख रुपयांपर्यन्त वसूली सुरु आहे. ही जास्त वसूल केलेली रक्कम शेतक-यांना परत करावयास हवी. निवडणुक जाहिरनाम्यामध्ये 2700 भाव देणार असे सांगण्यात आले. परंतु हा भाव देण्यात येत नाही. हा भाव देणार नसाल तर 2000 रुपये शेतक-यांना अनुदान देण्यात यावे. कापुस एकाधिकार योजनेमधील 3 टक्के कपात व बोनस कपातीचा हिशेब 30 वर्षापासून पेंडिंग आहे. 750 कोटी रुपयांचा हा हिशेब आहे असे ठोकून दिले आहे. हा सर्व हिशेब सादर केला गेला पाहिजे. कापसाच्या आयातीवर बंदी आणि निर्यातीला परवानगी दिली

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...............

पाहिजे. मी पणन महासंघाचा अध्यक्ष असतांना त्यावेळी सन्माननीय अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान होते. आम्ही त्यांच्याकडे मागणी केली की, परदेशातील कापूस आयातीवर इम्पोर्ट डयुटी वाढवा. त्यावेळी त्यांनी असे विचारले की, इम्पोर्ट डयुटी बढानेसे क्या होगा, तब मैने उनको बताया कि हमारे देश के किसानों को अच्छा भाव मिलेगा. त्यामुळे त्यांनी ही इम्पोर्ट डयुटी 60 टक्के केली. मला आनंदाने सांगावेसे वाटते की, तिस-या वर्षी कापूस उत्पादक शेतक-यांना 3000 रुपये भाव मिळाला. माझी अशी मागणी आहे की, पाकिस्तान, चीन, हँागकाँग येथून येणा-या कापसावर बंदी घालावी व कापूस उत्पादक शेतक-यांना आपला माल निर्यात करण्यास परवानगी द्यावी. स्वामीनाथन् समितीने 27 जुलै 2006 रोजी केलेल्या शिफारशी आहेत. उत्पादन वाढविणा-या विदर्भातील किमान 6 जिल्हयात सेंद्रिय शेती झोन जाहीर करावा, अशी एक शिफारस त्यामध्ये केली आहे. ही शिफारस मान्य करावी, अशी माझी मागणी आहे.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ SBT/ MHM/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर .......... 13:55

श्री.पांडुरंग फुंडकर .........

विदर्भातील सिंचनाचा बॅकलॉग पूर्ण करुन सिंचनाच्या सोई देण्याकरिता 15 डिसेंबर, 2001 रोजी माजी राज्यपाल श्री.पी.सी. अलेक्झांडर यांनी जे निर्देश दिले होते त्याची त्वरित अंमलबजावणी करण्यात यावी. मागच्या 40 वर्षापासून विदर्भामध्ये लाखोली डाळीचे उत्पादन होते. परंतु त्यावर बंदी घातली गेली. त्यावर बंदी का घातली ते समजत नाही. लाखोली डाळीपासून भयानक रोग होतो म्हणून त्या डाळीवर बंदी घालण्यात आली. त्याचा परिणाम असा झाला की, लाखोली डाळ पिकविणा-या शेतकऱ्याला बाजारामध्ये डाळ विकता येत नाही. व्यापारी शेतक-यांकडून 500 रुपये दराने डाळ खरेदी करतो आणि दुसरीकडे ती 3000 रुपये दराने विकतो. त्यावरील बंदी त्वरित उठविली पाहिजे.

वाईनरीचे स्तोम महाराष्ट्रामध्ये सुरु आहे. मी दारुचे समर्थन करणार नाही. वाईनरीला राजमान्यता आहे. गोव्यामध्ये फेणीला राजमान्यता आहे. खरे म्हणजे काजूच्या फुलापासून दारु बनविणा-याला प्रोत्साहन, द्राक्ष्यापासून दारु बनविणा-यांना प्रोत्साहन, परंतु वाईनला दारु म्हटले नाही. विदर्भाच्या भूमिमध्ये मोहाफुलाचे उत्पादन होते. त्याचा विचार शासन करणार आहे काय ? मोहाफुलापासून जे अल्कोहोल तयार होते त्याला शासन गोव्याच्या फेणी प्रमाणे, वाईनप्रमाणे प्रोत्साहन देणार आहे काय ? त्याला प्रोत्साहन द्यावे अशी मी मागणी करतो.

विदर्भातील वीज ग्राहकांना वाहतुकीचा खर्च न लावता वीज द्यावी. मुंबईमध्ये पेट्रोल, डीझल वरील वाहतुकीच्या खर्चामध्ये सवलत दिलेली आहे, त्याच प्रमाणे शेतक-याला वीज द्यावी, अशी मी मागणी करतो. एकदा शेतक-याला कर्ज मुक्त करा आणि विदर्भ, मराठवाडयातील आत्महत्या करणा-या शेतक-यांच्या शेती मालावर प्रक्रिया करणारे कारखाने उभे केले तर निश्चितपणे आत्महत्येचे प्रमाण कमी होईल. मलमपट्टी करणारे पॅकेज आम्हाला नको आहे. माननीय पंतप्रधानांनी, माननीय मुख्यमंत्र्यांनी पॅकेज जाहीर केले. परंतु शेतक-यांच्या पदरामध्ये काहीच पडले नाही. पॅकेजमधून शेतक-यांना काय मिळाले ते एकदा जनतेसमोर येऊ द्या, अशी मी मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो.

----------

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, एका गंभीर विषयावर चर्चा करण्यासाठी मी उभा आहे. शेतक-यांच्या आत्महत्या हा केवळ एका राज्याचा, एका पक्षाचा, एका सरकारचा विषय नाही. ही चिंतेची बाब नाही, असे मी म्हणत नाही. संपूर्ण देशातील शंभर कोटी जनतेच्या दृष्टीने ही चिंतेची बाब आहे, खेदाची बाब आहे. देशामध्ये आणि राज्यामध्ये शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत. माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेब बोलले, त्यांचे मुद्दे खोडण्यासाठी मी उभा नाही. एकूणच राज्याची कृषी अर्थव्यवस्था आणि देशाची कृषी अर्थव्यवस्था कशी असावी, यासंदर्भात चर्चा करण्यासाठी आपण या वेळेचा सदुपयोग केला पाहिजे. शेतक-यांच्या आत्महत्येची कारणे काय ? आत्महत्येची कारणे निश्चितपणे आर्थिक असली तरी इतर देखील काही कारणे आहेत. परंतु ही कारणे शोधून त्यासंदर्भात प्रयत्न झाला पाहिजे. सभापती महोदय, वर्धा येथे आम्ही अभ्यास शिबीर घेतले होते. त्या अभ्यास शिबीराला मी स्वत: उपस्थित होतो.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MHM/ MAP/ SBT/ श्री. बोरले नंतर --- 14:00

श्री. गुजराथी ....

शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागे आर्थिक कारण आहे काय ? या प्रश्नापुढे आम्ही 'होय' असे म्हटले. तसेच त्यामागे सामाजिक, कौटुंबिक, मानसिक करणेही आहेत काय ? याचाही आम्ही विचार केला. नागपूरमधील प्रसिद्ध मानसोपचार करणारे डॉक्टर्स होते, त्यांचे भाषण त्यात झाले. तसेच पत्रकार, अर्थशास्त्रज्ञ देखील होते. शेवटी हा प्रश्न एकट्या सरकारचा, राज्याचा वा एखाद्या पक्षाचा आहे असे आपण मानले तर मग त्याची राजकीय उत्तरे दिली जातात. नापिकी कारण आहे. कर्ज वेळेवर आणि मुबलक मिळत नाही. तसेच पावसाच्या दयेवर अवलंबून असणे, निसर्गाची लहर अशीही कारणे आहेत. अशी किती तरी कारणे याबाबतीतील देता येतील. शेतकऱ्याला भांडवलाची भूक आहे, पाण्याची तहान आहे आणि विजेची गरज आहे. या संबंधी बेसिक गरजेनुसार उपलब्धता करून देणाऱ्या बाबी आहेत. त्या दृष्टीकोनातून जास्त लक्ष आपण दिले पाहिजे. केंद्र सरकारचा कृषी विभागाचा अर्थसंकल्प दीड टक्के आहे. 35-40 वर्षे सार्वजनिक जीवनात राहूनही मला हे माहीत नव्हते. माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार यांच्या भाषणातून माझ्या ते लक्षात आले. शेतीसाठी पाटबंधाऱ्याची जी काही तरतूद अर्थसंकल्पामध्ये आहे ती अर्ध्या टक्क्यापेक्षासुद्धा जास्त नाही, ती आहे अवघी .035 टक्के. ज्या देशामध्ये 75 टक्के जनता शेतकरी आहे, त्याच्यासाठी देशाच्या केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पामध्ये 2 टक्के रक्कम आहे. आता या ठिकाणी राज्याचे कृषी मंत्री उपस्थित आहेत. राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये आपल्या खात्यासाठी किती तरतूद आहे हे त्यांनी आपल्या भाषणामध्ये सभागृहाला सांगावे. 65 टक्के शेतकरी या महाराष्ट्रात असताना, साडेसहा कोटी जनता शेतीवर अवलंबून असताना राज्याच्या अर्थसंकल्पामध्ये माझ्या माहितीप्रमाणे 100 कोटी पेक्षा जास्त निधी उपलब्ध नाही. सन्माननीय श्री.बाळासाहेब थोरात हे अत्यंत अभ्यासू मंत्री आहेत. अत्यंत गांभीर्याने ते हे खरे सांभाळीत आहेत. आदिवासींसाठी वेगळा अर्थसंकल्प आपण करतो. एस.टी.साठी वेगळा करतो, केंद्रामध्ये रेल्वेसाठी वेगळा अर्थसंकल्प केला जातो. म्हणूनच माझी या निमित्ताने मंत्री महोदयांना विनंती आहे की, महाराष्ट्र राज्यामध्ये यापुढे शेतकऱ्यांचा वेगळा अर्थसंकल्प असला पाहिजे. त्यातून 8, 10 टक्के जो काही निधी अुपलब्ध असेल तो आपण द्यावा. या वर्षी 5 टक्के, पुढील वर्षी 7, त्यानंतरच्या वर्षी 8 असे करीत किमान 10 टक्के पर्यंत तरी तरतूद आपण करायला पाहिजे. 65 टक्के लोकांसाठी केवळ 10 टक्के आपल्याला राखून हे ठेवावेच लागबतील. या दृष्टीने आपण पुढे गेलो तर दोन तीन वर्षामध्ये नव्हे याच वर्षी निश्चितपणे

....... पीपी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MHM/ MAP/ SBT/ श्री. बोरले नंतर --- 14:00

श्री. गुजराथी ....

आत्महत्या आपण थांबवू शकू. पूर्ण पॅकेज देऊनही आत्महत्या थांबत नाहीत. या मागील कारणे शोधावी लागतील. जूनमध्ये पेरणी करीत असताना बँकांचे कोठलेही अधिकारी वसुली करण्यास येत नाहीत त्यावेळी देखील आत्महत्या का होतात ? ज्याला आपण सक्तीची वसुली म्हणतो ती सक्तीची वसुली होत नसताही आत्महत्या होत आहेत. सक्तीची वसुली थांबविली पाहिजे यात दुमत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी सावकारांच्याबाबतीत घेतलेला निर्णय उत्तम आहे. सावकारांकडे शेतकरी का जातो याचा कोठे तरी विचार आपण कृषी मंत्र्यांनी केला पाहिजे. याचा अर्थ असा होतो की, शेतकऱ्याला वेळेवर आणि पाहिजे तेवढे कर्ज मिळत नाही म्हणून मग शेतकरी सावकाराकडे जातो. सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात विदर्भातील कापसाच्या बाबतीत माननीय विरोधीपक्षनेत्यांनी चांगला विचार मांडला आहे. महाराष्ट्रात बीटी कापसाचे उत्पादन सरासरी एका एकराला 350 किलो आहे. देशाचे सरासरी उत्पादन 500 किलो आहे तर पाकिस्तानचे 900 किलो आहे आणि चीनचे 1800 किलो आहे. जगाच्या पाठीवर 3200 किलो प्रमाणे कापसाचे उत्पादन घेणारे देशही आहेत. मग आपल्या महाराष्ट्रात 1800 ते 2200 किलो पर्यंत कापसाचे उत्पादन का होत नाही ? कापसाला 2700 रूपये भाव द्यायचे आपण म्हणतो, ती जबाबदारी शासनाची आहे, ती टाळता येत नाही. अर्थात एवढा दर देता येत नसेल तर त्यामागील कारणेही शासनाने दिली पाहिजेत की या या मुळे आम्ही इतका दर देऊ शकत नाही. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... क्यूक्यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ MAP/ 14:05

श्री. अरुण गुजराथी...

उत्पादन वाढीच्या संदर्भात मी माननीय कृषीमंत्र्यांना सांगितले की, आपण तेथील बियाणे राज्यामध्ये आणा. जे बियाणे एका एकराला 1800 किलो कापूस देते. आपल्या बी.टी. कॉटनपेक्षा जास्त उत्पन्न देते. मी एकदा सीड कॉर्पोरेशनच्या अधिवेशनाला गेलो होतो. त्यावेळी तेथील तज्ज्ञांना विनंती केली, तुम्ही अशाप्रकारचे बियाणे तयार करा, ज्याला पावसाची आवश्यकता लागणार नाही. अशाप्रकारचे पावसाची आवश्यकता नसलेले रेनलेस सीड आपण तयार करा. त्याबरोबर ते हसायला लागले. ते म्हणाले हे कसे शक्य आहे? त्यानंतर त्यांनी असे आश्वासन दिले की, ड्राऊट रेजिस्टन्स सीड, पेरणी केल्यानंतर महिना दीड महिन्याच्या कालावधीत पाऊस आला नाहीतर दुबार पेरणी करण्याची आवश्यकता राहणार नाही अशाप्रकारचे बियाणे तयार करावे. हा चेंडू थोडासा कृषी विद्यापीठाकडे टाकूया. आपल्याकडे राहुरी कृषी विद्यापीठ, पंजाबराव कृषी विद्यापीठ आहे या विद्यापिठांमध्ये बियाण्यांच्या संदर्भात विचार होणार आहे की नाही? बियाण्यांची भेसळ हा वेगळा विषय आहे. त्यासंबंधीचा कायदा अजून केंद्र सरकारमध्ये झालेला नाही, तो होऊ घातला आहे. बियाण्यांच्या भेसळीच्या माध्यमातून जर एखाद्या शेतकऱ्यांने आत्महत्त्या केली तर बियाणे उत्पादन करणाऱ्यांवर 302 कलम लावण्याबाबत विचार करावा लागेल. तेव्हा अशाप्रकारचे चायना आणि ऑस्ट्रेलिया येथून बियाणे आणा. आज आपण 2100 चा भाव देत आहात, आमची 2700 ची मागणी आहे. यामध्ये 500 ते 600 रुपयांचा फरक आहे.शेतकऱ्यांकडील पिकलेला 3 क्विंटल कापूस धरला व भावाची सरासरी काढली तर शेतकऱ्याला 3 हजार रुपये जास्त मिळतील. आज सत्ताधारी पक्षाकडून देखील आमची मागणी आहे की, शेतकऱ्यांना आपण पैसे वाढवून दिले पाहिजेत. मागील वर्षी आपण हेक्टरी एक हजार रुपये दिले. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एकरी पैसे वाढवून मागितले.आपली मागणी बरोबर आहे.आपण मागत असतांना कमी मागावयाचे.परंतु काही वेळेस पैसे वाढवून दिले पाहिजेत. या माध्यमातून काही अंशी आपण शेतकऱ्याला दिलेला शब्द पाळला पाहिजे आणि हा विचार आपण शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविला पाहिजे. . अशाप्रकारचे कापसाचे बियाणे काढा, ज्यामध्ये सीड नसेल. सीडलेस बियाणे काढा. आज या कापसामध्ये दोन तृतियांश वजन सरकीचे असते तर एक तृतियांश वजन रुईचे असते. त्यामध्ये सरकी दहाने आणि रुई 80 ने विकली जाते. गेल्या 50 वर्षाच्या कालावधीत सीडच्या बाबतीत हा विचार कां करण्यात आला नाही? आपण सीडलेस कॉटन केले तर शेतकऱ्यांना भाव वाढवून देण्याची गरज नाही. आज जो

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

भाव मिळत आहे त्याच भावामध्ये अडीच पट उत्पादन वाढणार आहे. आज 500 किलोचे उत्पादन असेल तर त्याच्या अडीच पटीने उत्पादन वाढणार आहे. त्याचबरोबर विद्यापीठांना विनंती केली पाहिजे की, आपण रंगीत कापसाचे बियाणे काढा. सीडलेस कापूस तयार केलातर जिनिंग आणि प्रेसिंगचा खर्च वाचेल, त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होईल. रंगीत कापूस काढलातर डाईंगचा खर्च वाचेल. त्याचे पैसे अल्टिमेटली शेतकऱ्यांच्या पदरात जातील.हा एक संशोधनाचा विषय असून या राज्याने आणि माननीय मंत्रिमहोदयांनी त्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आणि एका बियाण्यापासून त्याची सुरुवात झाली पाहिजे. त्यानंतर पाण्याचा प्रश्न येतो. Electricity and the water is important for the development of Agriculture. जर आपण शेतकऱ्याला वीज आणि पाणी पुरवू शकलो नाही तर त्या शेतकऱ्याच्या डोळयात निश्चितपणे पाणी येईल ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. विदर्भातील सिंचन क्षमता,महाराष्ट्रातील सिंचन क्षमता 18, 19, 20 टक्क्याच्या आसपास आहे. आपण एक पंचवार्षिक योजना फक्त शेती आणि पाटबंधारेसाठी केली पाहिजे.आणि संपूर्ण निधीची उपलब्धता फक्त कृषीसाठी असली पाहिजे.

सभापती महोदय, जमिनीमध्ये खते वापरुन जमीन खराब झाली आहे. त्याठिकाणी आज उत्पादन येत नाही. सारखे - सारखे पेस्टीसाईड फवारले जात आहेत. कापसावर रोग पडल्यानंतर लोक हातपंपाने पेस्टीसाईड फवारत आहेत. हातपंप वापरुन हात दुखायला लागल्यानंतर लोकांनी मोटर बसवून फवारणी सुरु केली आहे. तेही कठीण झाल्यानंतर ट्रॅक्टरवर बसून फवारणी व्हावयास लागली आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुणलाल गुजराथी (पुढे सुरु......

एकाच जागी लांबून पिकांवर औषधांची फवारणी मारत आहेत. त्याही पुढे जाऊन हेलिकॅप्टर गावामध्ये आणून वरून पिकांवर फवारणी मारण्याचे कामही झालेले आहे. सतत पाच-सात वर्षे पेस्टीसाईड आणि फर्टिलायझरच्या औषधांची फवारणी केली तर जमीन नापीक होते. शेजारच्या राज्याची माहिती घेतली असता, त्या ठिकाणी औषध फवारणीचा मोठ्याप्रमाणावर उपयोग केल्यामुळे जमीन नापीक झाल्याचे आढून आलेले आहे. म्हणून या संदर्भात शेतकऱ्यांमध्ये जागृती करणे महत्वाचे आहे. ही बाब लक्षात घेतली पाहिजे. सभापती महोदय, पॅकेज दिल्यानंतर काही प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी झालेल्या आहेत. जरूर यापुढे देखील त्या कमी होतील. त्या भागातील प्राध्यापक, पत्रकार, डॉक्टर यांनी या आत्महत्या का थांबत नाहीत, याचा अभ्यास करावा. कारणे शोधतांना शेतकऱ्यांच्या वयाचा, पिकांचा, बँकेचे कर्ज असेल तर त्याचा अभ्यास केला पाहिजे, त्याचबरोबर त्याची मानसिकता देखील विचारात घेतली पाहिजे. आपण पिकासाठी सपोर्ट प्राइज किती देतो आणि प्रत्यक्षात त्याला उत्पादन खर्च किती येतो, याचा आपल्याला गांभीर्याने विचार करावा लागणार आहे. कोरडवाहू शेतीची उत्पादकता संपलेली आहे. कारण आज पाण्याची उपलब्धता नाही. त्याचबरोबर जमिनीचे क्षेत्रही कमी आहे. आजोबाच्या वेळेस 12 एकर जमीन होती. त्यांच्या दोन मुलांना नंतर सहा, सहा एकर जमीन वाट्याला आली. त्यानंतर त्यांच्या प्रत्येकी दोन मुलांच्या तीन, तीन एकर जमीन वाट्याला आली, त्यांच्या पुढच्या मुलांच्या वाट्याला दीड,दीड एकर जमीन आली. कमीतकमी जमिनीचे क्षेत्र किती असले पाहिजे, याचा विचार केला पाहिजे. आपण आता कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगला परवानगी दिलेली आहे. काही लोकांची कार्पोरेट फार्मिंग व्हावे अशी मागणी होती. कार्पोरेट फार्मिंगला सर्वांचाच विरोध राहील. परंतु कॉन्ट्रॅक्ट फार्मिंगमध्ये कोणाची 2 एकर जमीन असेल, त्याला लागून कोणाची पाच एकर जमीन असेल असा मिळून 50-100 एकराचा गट केला तर त्या ठिकाणी अत्याधुनिक पध्दतीने शेती होऊ शकेल. याकरिता तंत्रज्ञानाची गरज आहे. एका सेमिनारसाठी पॅसिसमध्ये मी गेलो असताना, शेजारीच शेतकरी बसला होतो. तो तेथून आपल्या पिकाला पाणी देत होता 500 कि.मी.अंतरावरुन पॅरिसच्या हॉटेलमध्ये बसून तो शेतकरी पाणी देत होता.इतके तंत्रज्ञान पुढे गेलेले आहे. त्यामध्ये पाणी वाया जाणार नाही अशापध्दतीने तो पाणी सोडत होता.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ SBT/

श्री.अरुणलाल गुजराथी (पुढे सुरू....

मला श्री.महानोर यांच्या कवितेची आठवण होते. ते म्हणतात की,

"पाणी,पाणी,पाणी रे पाणी,

पाण्यासाठी चाललो अनवाणी,

कबीराचे दोहे ऐकून डोळ्यातही येईना पाणी."

पुढच्या काळामध्ये आपल्याला पाणी मोजून द्यावे लागणार आहे यासाठीचे तंत्रज्ञान महाराष्ट्रामध्ये उपलब्ध करून देण्याच्या संदर्भात मंत्री महोदयांनी लक्ष घालावे अशी मी विनंती करेन.

सभापती महोदय शेतकऱ्यांच्या पिकाच्या उत्पन्नामध्ये किती वाढ झाली, याबाबत गेल्या पाच वर्षाची आकडेवारी द्यावी. विदर्भातील कापूस सोडून सोडून एकूण महाराष्ट्रामधील शेतीच्या उत्पन्नात प्रतीवर्षी किती वाढ झाली याची माहिती मिळाली तर प्रत्यक्षात दरडोई उत्पन्न किती आहे याची हे कळू शकेल.

यानंतर श्री.गागरे...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGS/ MAP/ SBT/ 14:20

प्रा.बी.टी.देशमुख.....

एक नाही तर दोन वेळा विदर्भाचा उल्लेख केला आहे. मी दुसऱ्या दिवशी मुद्दाम त्यांच्या सचिवालयाकडे पत्र लिहून त्या भाषणाची प्रत मागितली. मी लिहून घेण्याचा प्रयन केला पण गडबडीत मला ते काही जमले नाही. त्या भाषणाची मूळ प्रत माझ्याजवळ आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "मुझे अहसास है कि देश के कई हिस्सों में किसानभाई संकट में है और मेहनत मशक्कत करने के बाद भी उन्हें उनकी जमीन से सही कमाई नहीं हो रही है. जब मैं विदर्भ गया तो किसानों के हालात ने मुझ पर गहरा असर डाला. इसी वजह से किसान खुदकुशी करने के लिए मजबूर हो रहे हैं." आणि मग या आत्महत्येचे कारण काय आहे हे सुध्दा त्यांनी त्याच भाषणात सांगितले आहे ते म्हणाले की, "विदर्भ के किसान कर्ज के बोझ से दब कर आत्महत्या कर रहे हैं. यह देखते हुए सरकार ने किसानों के बकाया कर्ज के ब्याज को माफ कर दिया है, इसके बावजूद मैं मानता हूं कि किसानों की हालत सुधारने के लिए बहुत कुछ किया जा सकता है. खास तौर से उन इलाकों में जहां सिंचाई की सुविधा नहीं है और खेती बारिश पर निर्भर है." या देशाचे पंतप्रधान लाल किल्ल्यावरुन भाषण करताना विदर्भाच्या 6 जिल्ह्याचा उल्लेख करतात. आत्महत्येचे कारण स्पष्टपणे सांगतात. अध्यक्ष महाराज मी नमूद करु इच्छितो की, लाल किल्ल्यावरुन ते जे बोलले ते वाक्य मी सांगितले. विदर्भामध्ये आल्यानंतर त्यांनी पत्रकार परिषद घेतली.त्या पत्रकार परिषदेची ऑफीशिअली प्रेस रिलीज मी मुद्दाम आणली आहे. वर्तमानपत्रात एखाद्या वेळेला एखाद दुसरे वाक्य कमी होऊ शकते. ऑफीशिअली प्रेस रिलीज मध्ये ते काय म्हणाले या विषयीचा उल्लेख मी या ठिकाणी करु इच्छितो. "The causes of the crisis seem to be many. The primary ones seems to be the poor irrigation. कारणे अनेक असतील पण सिंचन सुविधांची दारिद्री व्यवस्था, भिकार सिंचन व्यवस्था असे त्याचे वर्णन मी मराठीत करतो. मुद्दाम घोटाळा होऊ नये म्हणून मी इंग्रजी शब्द वाचून दाखविला आणि ते नुसते असे बोलून थांबले नाही. त्याच प्रेस कॉन्फरन्स मध्ये त्यांनी असे जाहिर केले की, 2177 रुपयांचा निधी हा केंद्र सरकारतर्फे दिला जाईल. त्यांच्या प्रेस रिलीजच्या पॅरा 5 मध्ये ती गोष्ट आहे. देशाचे पंतप्रधान आणि देशाचे कृषी मंत्री यांनी एक अभ्यास गट नेमला आणि या अभ्यास गटाने या आत्महत्याच्या कारणांविषयी जो खल केला त्यातून असे निष्पन्न झाले की, देशातील निरनिराळया चार राज्यात आत्महत्या होत आहे आणि याचे मुख्य कारण सिंचनाच्या सुविधाचा अभाव.

TT-2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख.....

आंधप्रदेशातील असे 16 जिल्हे त्यांनी आयडेंटीफाय केले महाराष्ट्रातील दुर्देवी 6 जिल्हे आणि केरळ आणि कर्नाटक मधील चार आणि तीन असे 31 जिल्हे आयडेंटीफाय केले. माझी सभागृहाला विनंती आहे की, सिंचनाच्या उत्तम सुविधा असलेल्या ठिकाणी अपवाद सोडला तर या आत्महत्या नाहीत. काही सरप्लस असलेल्या जिल्हयात अजिबातच आत्महत्या नाही. बारमाही पाटाचे पाणी हे शेताच्या कडेने वाहत असल्यावर कोण मनुष्य आत्महत्येचा विचार करेल. हेही सत्य आहे की अनेक समस्या शेतकऱ्यांच्या असतात. देशाच्या कृषी मंत्र्यांनी 31 जुलै, 2000 रोजी लोकसभेमध्ये सांगितले की, शेतीसाठी पाण्याचा खात्रीलायक उपलब्धतेचा अभाव हेच विदर्भातील शेतकऱ्याच्या आत्महत्याचे मुख्य कारण आहे. श्री. प्रियरंजनदास मुन्शी हे ज्यावेळी नागपूरला आले त्यावेळेला टी.व्ही. वर ते जे बोलले, त्यांच्या कॅसेटच्या टेप्स काही मिळालेल्या नाही. पण कॅसेटमधील काही शब्द मी आपल्याला वाचून दाखवितो. शेतकऱ्याच्या आत्महत्यामुळे उद्‌भवलेल्या भीषण स्थितीतून विदर्भाला बाहेर काढण्यासाठी राज्यकर्ते, विरोधी पक्षनेते यांनी सिंचनाच्या सोईकडे प्राधान्याने लक्ष दिल्यास हा भाग कॅलिफोर्निआ म्हणून विकसित होऊ शकतो. राज्यकर्त्यांनी गंभीरपणे सिंचनाच्या समस्या दूर केल्या असत्या तर आज शेतकऱ्यांवर ही वेळ आली नसती.

यानंती श्री. बरवड.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख ....

राज्यामध्ये सुध्दा आपल्या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी ही गोष्ट सभागृहामध्ये सांगितली की, "विदर्भात शेतकऱ्यांचे आत्महत्या करण्याचे प्रमाण जास्त आहे ही वस्तुस्थिती आहे. मराठवाडा, खानदेश किंवा अन्य प्रगत जिल्ह्यांमध्ये सुध्दा शेतकरी आत्महत्या करीत आहेत परंतु विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. या भागात सिंचनाची सुविधा अतिशय अपुरी आहे. नाही म्हटले तरी चालेल. त्यामुळे विदर्भात सिंगल क्रॉप घेतले जाते. सिंगल क्रॉपवरुन डबल क्रॉपवर जाण्यासाठी सिंचनाची आवश्यकता आहे." हे महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन 3 जुलै, 2006 पृष्ठ क्रमांक 3 क्यू 1 व 2 वर दिलेले आहे.

सभापती महोदय, माननीय पंतप्रधानांनी जे निवेदन केले त्यांचे वाक्य मी जसेच्यातसे वाचून दाखवितो. त्यांनी असे म्हटले आहे की, " There is a crying demand all around for improving irrigation. We are allocating Rs.2177 crores from the Central Government for completion of major, medium and minor irrigation projects in these districts over the next three years." पुढच्या तीन वर्षामध्ये आम्ही 2177 कोटी रुपये देत आहोत असे त्यांनी म्हटले आहे. तसेच राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये असे सांगितले की, "हा निधी तीन वर्षामध्ये उपलब्ध होईल व त्यानुसार तो खर्च केला जाईल. तसेच शासनाकडून इतर वेळी बॅकलॉगसाठी जो निधी दिला जातो तो या निधी व्यतिरिक्त असेल. वेगाने प्रकल्प होण्यासाठी दोन्ही निधी एकत्र केल्यास प्रकल्प पूर्ण होऊ शकतील. अशा पध्दतीने निर्णय घेण्यात आलेला आहे." महाराष्ट्र विधानसभा कार्यवाही अधिकृत प्रतिवेदन 3 जुलै 2006, पृष्ठ 3 टी 2 वर हे भाषण आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या पध्दतीने जाहीर केले. मला अत्यंत आदराने माननीय पंतप्रधानांच्या निवेदनामध्ये काय म्हटले आहे ते सांगावयाचे आहे. गव्हर्नमेंट ऑफ इंडियाच्या प्रेस रिलीजची अधिकृत प्रत माझ्यासमोर आहे. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "I do realize that the success of this approach depends on the implementation. In addition to state and local implementation and monitoring mechanisms......"

प्रा. बी. टी. देशमुख ....

राज्याच्या स्तरावर आपण जे इम्प्लीमेंट करीत आहोत त्यापेक्षा हे ॲडिशनल असेल. सभापती महोदय, मी अहवालांची अवतरणे काढून आणलेली आहेत परंतु वेळेअभावी मी ती वाचून दाखवत नाही. 1977-78 मध्ये राज्यातील 11 नगरपालिकांना महानगरपालिका करण्यासाठी त्यावेळी माजी मुख्य सचिव श्री. जी. डी. साठे यांचे वन मॅन कमिशन नेमले होते. त्या कमिशनने जो रिपोर्ट दिला त्यामध्ये अमरावतीला कॉर्पोरेशन करावी की करु नये या विषयी त्यांनी असा उल्लेख केला आहे की, "हे लोक दरिद्री का आहेत तर सिंचनाचा अभाव आहे आणि उद्योगांचा अभाव आहे. त्यामुळे या ठिकाणी उत्पन्न कमी आहे. त्यामुळे कॉर्पोरेशन करु नये". असा अहवाल त्यांनी दिला होता. पुढे वेगवेगळ्या कारणाने अमरावतीची महापालिका झाली. त्यांनी अहवालामध्ये "दरिद्री" असा शब्द वापरलेला आहे. दारिद्रय असले तरी आपल्याला "दरिद्री" असा शब्द वापरणे आवडत नाही. हा शब्द त्यांनी अहवालात वापरलेला आहे. आता माननीय पंतप्रधानांच्या निदेशानुसार नियोजन आयोगाची एक समिती येऊन गेली. त्या समितीने एक रिपोर्ट दिलेला आहे. त्या रिपोर्टमध्ये असे शब्द वापरलेले आहेत की, अत्यंत घमेंडखोर वृत्तीने यांना निधी नाकरला जात आहे. मी जसेच्यातसे वाचून दाखवतो. त्या अहवालामध्ये असे म्हटले आहे की, "The Team felt that there was inadequate explanation for this lackadaisical attitude in implementation of projects for Vidarbha and that there was ample reason to suspect collusion and connivance in not sanctioning the funds for the region and later to move for supplementary budgets, mostly for irrigation in Western Maharashtra." आमचे दु:ख काय आहे हे त्यांनी मांडलेले आहे. अत्यंत घमेंडखोर वृत्तीने हा निधी वर्षानुवर्षे पळवला जात आहे.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. बी.टी.देशमुख...

रिपोर्टमध्ये पुढे जोरदार वाक्य आहे. त्यानी असे म्हटलेले आहे की, बच्छावत आयोगाने दिलेल्या निवाड्याचा उल्लेख सुध्दा हे करीत नाहीत....

(सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते सभागृहामध्ये आसनस्थ होतात.)

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे सभागृहामध्ये जे कपडे परिधान करुन आलेले आहेत, तशा प्रकारचे कपडे परिधान करुन सभागृहामध्ये येता येते काय ?

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या सदनामध्ये उपस्थित राहताना कोणते कपडे परिधान करावे यासंबंधी काही मार्गदर्शन किंवा नियम आहेत काय ? तसे ते असतील तर सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी उपस्थित केलेला मुद्दा योग्य आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार हे अशा त-हेचे कपडे घालून सभागृहामध्ये येतील काय ?

श्री. भास्करराव जाधव : विदर्भातील दोन्ही जागा पडल्यामुळे त्यांना व्यथा झालेल्या आहेत.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, वेळे अभावी अनेक समित्यांचे रिपोर्ट मी वाचून दाखवत नाही. शासनाने आदर्श मिश्रा यांच्या अध्यक्षेखाली समिती नेमली. त्या समितीने असे म्हटलेले आहे की, "निधी अपुरा देता हे तर आहेच पण त्याच बरोबर त्याचा अनुशेष दूर करण्याचे नियोजन सुध्दा नाही." 5 मे 2006 रोजी या कमिटीने मंत्रालयामध्ये आम्हाला वेळ दिली. हेल्प लाईनचे सरचिटणीस प्रभाकर वैद्य, श्री. मधुकरराव किंमतकर, नानासाहेब गवई आणि खासदार राठोड असे आम्ही त्या समितीमध्ये बोलत होतो. त्यावेळी चेअरपर्सनने आम्हाला सांगितले की, "तुमचे निधीचे रडगाणे बाजूला ठेवा, मी तुम्हाला असे विचारते की, तुमचा अनुशेष दूर करण्यासंबंधीचा मास्टर प्लॅन तयार आहे काय ?" या प्रश्नाचे आम्हाला काहीच उत्तर देता आले नाही. त्या समितीच्या रिपोर्टमध्ये असे आलेले आहे की,

" The crying need of the area is for water, while it is true that the area is awaiting a favorable allocation under the Governor's directives, the real ailment is also appropriate planning of projects which would benefit the

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. बी.टी.देशमुख...)

most people...The list of projects to be taken up for Vidarbha should be reviewed urgently and a time bound programme for the implementation of the full backlog should be designed and put into implementation mode within the next six months, that is right after the monsoons."

सभापती महोदय, मी आपल्या तयारीच्या वर्णनाला सुरुवात करतो. दिल्लीत बसून जे कळते ते आपल्याला वर्षानुवर्षे कळत नाही. आपल्या तयारीचे जेवढे कौतुक करावे तेवढे ते थोडेच आहे. राज्यकर्त्यांनी स्वेच्छेने निर्णय घेऊन निधी देणे वेगळे पण घटनेच्या कलम 371(2) प्रमाणे राज्यपालांनी निधीच्या वाटपासंबंधी राज्य सरकारला जे निदेश दिलेले आहेत त्या निदेशांचे गेली 5-6 वर्षे सतत व्हायलेशन होत आहे. राज्यपालांनी दिलेल्या निदेशांचे पालन न करण्यासाठी आपण कटिबध्द आहोत अशा प्रकारची भूमिका या सरकारने घेतलेली आहे.

... नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...........

पाच वर्षात विदर्भाला द्यावयाच्या निधीपैकी 6111 कोटी रुपये शासनाने कमी दिले. मराठवाडयाला 2774 कोटी रुपये शासनाने कमी दिले. कॉन्स्टिटयूशनल डायरेक्शन्स असून सुध्दा शासनाने हे काम केले. माझे असे म्हणणे आहे की, याला कोणी जबाबदार असतो की नाही? It is arrogance to the high Constitutional Authority, असे मी वर्णन करतो. Hon. Governor is high Constitutional Authority, especially when he is bestowed with special powers under Article 371(2). अशा प्रकारचे उध्दटपणाचे वर्तन होणे ही गोष्ट अशोभनीय अशा प्रकारची होती.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी त्या निदेशामध्येच असे म्हटले आहे, त्या अगोदर एकदा म्हटले होते, चार वर्षात हा अनुशेष अशा पध्दतीने दूर झाला पाहिजे. तीन ठिकाणी अशी मुदत आहे. शासनाने यातील काहीच पाळले नाही. त्यांनी म्हटले, चार वर्षात काम करा. 5 ते 6 वर्षे लागली असती तर समजू शकले असते. परंतु अनुशेष दूर करण्याची सुरुवात सुध्दा झाली नाही. म्हणजे 134 हजार हेक्टरचा नंबर 1 च्या जिल्हयाचा अनुशेष होता. तो सर्वात जास्त असलेल्या जिल्हयाचा अनुशेष 219 हजार हेक्टरचा झाला आहे. अनुशेष 134 ऐवजी 133 हजार हेक्टर झाला असता तरी कमीत कमी सुरुवात झाली असे म्हटले असते. परंतु तसे झाले नाही आणि मग दुसऱ्या निदेशाची पूर्ण पायमल्ली केली. कालबध्द कार्यक्रम दिला होता. मी सिंचन प्रकल्पाबाबत एक गोष्ट सांगतो. दोन वर्षात पूर्ण होईल असे म्हटले तरी दोन वर्षात पूर्ण होईलच असे होत नाही. अडीच किंवा तीन वर्षे सुध्दा लागतात. परंतु त्याची सुरुवात झाली आहे की नाही हा मुद्दा महत्वाचा असतो. त्यांच्या आदेशाची अंमलबजावणी झाली नाही आणि निगेटिव्ह अंमलबजावणी झाली. This is second incidence of arrogance to the high Constitutional Authority.

सभापती महोदय, तिसरी गोष्ट मी आपल्याला सांगू इच्छितो, ती अशी आहे की, माननीय राज्यपालांनी वारंवार निदेश दिले की, प्रशासकीय मान्यतेच्या अधिकाराचे विकेंद्रीकरण करावे. कृष्णा खोरे आणि तापी खोरे पाटबंधारे विकास महामंडळांना प्रशासकीय मान्यतेचे अधिकार हे रिजनल लेव्हलवर दिले होते. जेव्हा विदर्भातून मागणी आली त्यावेळी राज्य सरकारने एक ऑर्डिनन्स तयार केला. आम्हाला असे अधिकार द्या असे म्हटले त्यावेळेला एक ऑर्डिनन्स तयार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख...........

केला. तो ऑर्डिनन्स काय होता? कृष्णा खोरेतील सर्व प्रकल्पांची मान्यता झाली. विदर्भ आणि मराठवाडयातून मागणी आली त्यावेळी सरकारने एक ऑर्डिनन्स तयार केला. त्या ऑर्डिनन्सनुसार शासनाने असे ठरविले की, सारे मंत्रालयात करायचे. माननीय राज्यपालांनी ती फाईल परत पाठविली आणि असे सांगितले की, मी तुम्हाला आधी आदेश दिले. ही त्यावेळची गोष्ट आहे. 10 जानेवारी, 2002 रोजी माननीय राज्यपालांचे सचिव श्री.जयरथ यांनी पाठविलेले पत्र असे आहे की, महाराष्ट्र राज्याच्या पाटबंधारे विभागातील पाचही महामंडळांमध्ये समानता आणि सुसूत्रता आणण्यासाठी नियमात करावयाच्या सुधारणांचा अध्यादेश प्रख्यापित करण्याचा प्रस्ताव माननीय राज्यपालांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आला. या संदर्भात मला आपणास असे कळविण्याचा आदेश आहे की, माननीय राज्यपालांच्या असे निदर्शनास आले आहे की, फक्त विदर्भ आणि मराठवाडा विभागात प्रशासकीय मान्यता आणि सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी नवीन कामे सुरु करण्यास विलंब होत आहे. यापूर्वी कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळ आणि तापी खोरे पाटबंधारे विकास महामंडळ यांना प्रशासकीय मान्यता आणि सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. उक्त महामंडळाच्या अखत्यारितील नवीन कामे विनाविलंब आणि वेगाने सुरु व्हावीत यासाठी प्रशासकीय मान्यता आणि सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार वरील सर्व..................

((नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख...

प्रादेशिक महामंडळास देण्याच्या संबंधी आदेश निर्गमित करावयाचे आहेत असे म्हणून ही फाईल परत पाठवली गेली. ही फाईल परत पाठविल्यानंतर त्यावर काहीही कृती करण्यात आली नाही. यासंदर्भात खात्याने एक जीआर काढलेला असून हा जी.आर. काढून खात्याने यामध्ये अजून विष कालविण्याचेच काम केलेले आहे. पाटबंधारे विभाला जे अधिकार होते ते अधिकार रिजनल लेव्हलवर द्या असे आमचे म्हणणे होते. परंतु ते अधिकार रिजनल लेव्हलवर देण्यात आले नाही. आता ऐन गर्दीत 29 नोव्हेंबर, 2005 रोजी जी.आर.काढण्यात आलेला असून या जी.आर. ची मुळ प्रत माझ्याकडे आहे. त्यात असे म्हटले आहे की, "पाटबंधारे विभागाने कोणताही जी.आर. वित्त विभागाच्या संमती शिवाय काढू नये." महाराष्ट्राच्या जाणकार नेत्यांनी पाटबंधारे विभागात लक्ष घालून 1974 मध्ये अशी व्यवस्था अस्तित्वात आणली की, पाटबंधारे विभागाला वित्त विभागाने मान्यता देऊ नये. यासाठी तांत्रिक सल्लागार पद निर्माण केले गेले. या पूर्वी कधीही म्हणजे 1974 ते 2005 पर्यंत पाटबंधारे प्रकल्पाची मान्यता वित्त विभागाकडे जात नव्हती. यासंदर्भात 2005 मध्ये शासन निर्णय काढण्यात आला व त्यामध्ये तरतूद करण्यात आली की, "यापुढे 5 कोटी रुपयाच्यावर पाटबंधारे विभागाचा प्रकल्प असेल तर वित्त विभागाची मान्यता घेतल्याशिवाय त्याबाबत जी.आर. काढू नये.." त्यामध्ये कारण टाकण्यात आले की, " शासनाच्या असे लक्षात आले आहे की, पाटबंधारे विभागाला परवानगी दिल्यामुळे त्यांनी प्रकल्पाला भराभर मान्यता देऊन टाकल्या." सभापती महोदय, आम्हाला हे समजत नाही की, पाटबंधारे विभागाने जर प्रकल्पाला भराभर मान्यता दिल्या आहेत तर काम कोठेच झालेले दिसत नाही. ही गोष्ट जर लोकांना सांगितली तर लोक पोट धरुन धरुन हसत असतात. असा या शासनाचा कारभार चालला आहे. एका बाजूला प्रशासकीय मान्यतेसाठी विकेंद्रीकरण न करणे It is arrogance against high Constitutional Authority. राज्यपाल महोदयांनी विक्रेद्रीकरणासाठी अधिकार दिलेले आहेत. परंतु या अधिकाराचा यांनी काय उपयोग केलेला आहे? तर आला तो प्रकल्प दाबून टाकण्याचाच उपयोग केलेला या शासनाने केलेला आहे. 219 हजार हेक्टरचा अनुशेष असलेल्या जिल्हयावर 3 लहान लहान प्रकल्प आहेत. करंजगाव,शिंदी आणि बोरडी असे हे तीन लहान लहान प्रकल्प आहेत. या सभागृहात या विषयाच्या एका वाक्यासाठी 50 मिनिटे वेळ वाया गेलेला आहे. या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख...

संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी जे उत्तर दिलेले आहे ते वाचले तर हसू येते. मी त्यावेळेस विचारले होते की, जर 219 हजार हेक्टरचा अनुशेष आहे त्यासंदर्भात तुम्ही काय करणार आहात ? सभापती महोदय, हा प्रश्न मी पाच वेळेस विचारला होता. तर माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले होते की, आपल्या भागाचा बॅकलॉग दूर करणे हे शासनाला कटीबध्द आहे. सभापती महोदय, यामध्ये सदनाचा 50 मिनिटे वेळ वाया गेलेला आहे. मराठवाडा आणि विदर्भाच्या संदर्भात शासनाने जो निर्णय घेतलेला आहे तो आपण मागे घ्याल का परंतु हा निर्णय मागे घेण्याची त्यांची हिंमत झाली नाही.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख......

कारण जे लेखी निवेदन दिले होते त्यामध्ये विष होते. लक्षवेधी सूचनेच्या मार्गाने मी हा प्रश्न उपस्थित केला त्यावेळी जवळपास 50 मिनिटे चर्चा चालू होती. परंतु त्या संदर्भात मंत्रिमहोदयांकडून ठोस उत्तर मिळाले नव्हते. सभापती महोदय, मी पाटबंधारे मंत्र्यांना धन्यवाद देतो कारण एका प्रकल्पाच्या संदर्भाने माननीय पाटब्ंधारे मंत्री आणि पाटबंधारे राज्य मंत्री यांनी माननीय मुख्यमंत्र्यांच्या नजरेस ही बाब आणून दिली. सभापती महोदय, आजपर्यंत महाराष्ट्राच्या इतिहासात असा निर्णय झालेला नाही. वित्त विभागाने असा जी.आर.काढला की " ....... हा आदेश माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री यांच्या आदेशानुसार निर्गमित करण्यात आलेला आहे " सभापती महोदय, दिनांक 29 नोव्हेंबरचा जी.आर.आहे, त्यामध्ये असे म्हटले आहे की," It is breach of collective reponsibility." तसेच घटनेच्या कलम 163 मध्ये म्हटलेले आहे की, " The council of Ministers shall be collectively responsible." तेव्हा collective reponsibility भंग करुन हा निर्यण घेण्यात आलेला आहे.त्याचा पुरावा मी सभागृहाला सादर करु इच्छितो. विदर्भातील नऊ मंत्र्यांनी माननीय राज्यपालांना पत्र लिहिलेले आहे की, "या निर्णयाची आम्हाला माहिती नाही. मंत्रिमंडळात हा निर्णय झालेला नाही." आमचा गळा घोटणारा निर्णय आहे. "गळा घोटणारा" हा माझ ाा शब्दप्रयोग आहे. अशाप्रकारचे पत्र पाठविणाऱ्या मंत्र्यांचे मी स्वागत करतो, त्यातील काही सदस्य या सभागृहात उपस्थित आहेत त्यांना मी धन्यवाद देतो. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे कलेक्टीव्ह रिस्पॉन्सिबिलीटीचा भंग झालेला आहे तसेच कॅबिनेटचा निर्णय लाथेखाली तुडविण्याचा गुन्हा देखील झालेला आहे. मंत्रिमंडळाने अनुशेष आणि निर्देशांक समितीचा अहवाल मान्य केला, काही निर्णय घेतले. हा निर्णय शासन निर्णयामध्ये प्रसिध्द झालेला आहे. आजही तो अस्तित्वात आहे. कॅबिनेटने घेतलेला निर्णय वित्त विभागाने हिम्मत करुन बदलून टाकला आहे. लहानपणी आईवडील मुलांची नावे ठेवतात. वडिलांनी सुबोधकुमार नाव ठेवले म्हणून तो पुढे तसाच वागेल असे नाही. 1974 साली मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय वित्त विभागाने बदलला ही गोष्ट पाटबंधारे मंत्र्यांनी मला सांगितली. कारण मी पाटबंधारे विषयावर एक लक्षवेधी सूचना दिली होती. त्यांनी मला सांगितले की, एक घटनात्मक मुद्दा निर्माण झालेला आहे. अमूक अमूक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख......

जी.आर.वित्त विभागाने काढलेला असल्यामुळे त्याचे उत्तर त्या विभागाने द्यावे. त्यासंबंधीचे पत्र मी माननीय सभापतींना दिलेले आहे. परंतु तुमची लक्षवेधी सूचना असल्यामुळे तुम्हाला कल्पना असावी म्हणून मी हे सांगत आहे. सभापती महोदय, त्या जी.आर.मुळे collective reponsibilityin Parliamentary form of Government चा भंग झालेला आहे. सभापती महोदय, दिनांक 5 सप्टेंबर 2001 चा शासन निर्णय आहे.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख....

या शासन निर्णयामध्ये स्पष्टपणे असे म्हटले आहे की, "शिल्लक राहणारा अनुशेष 5 वर्षाच्या कालावधीत दूर करावा असे माननीय राज्यपालांनी निदेश दिले आहेत. तसेच वार्षिक योजनेअंतर्गत अनुशेष नियतव्ययाचे विकास मंडळ व विकासक्षेत्रनिहाय वाटप शिल्लक अनुशेषाच्या प्रमाणात करण्यात यावे असे माननीय राज्यपालांचे आदेश आहेत." पुढे शासन निर्णयामध्ये असेही म्हटले आहे की, "निर्देशांक व अनुशेष समितीने काढलेला अनुशेष दूर करण्यासाठी संबंधित विभागांनी कालबध्द कार्यक्रम आखून त्याप्रमाणे कार्यवाही करावी. अनुशेष दूर करण्याचा प्रयत्न करीत असताना नवीन अनुशेष निर्माण होणार नाही, याची काळजी घेणे आवश्यक आहे." मंत्रिमंडळाने हा निर्णय पायदळी तुडवला. 29 नोव्हेंबरच्या निर्णयामुळे सभागृहात चर्चा झाल्यानंतर त्यामध्ये बदल केला. हा बदल फारच हास्यास्पद असून साऱ्या महाराष्ट्राला लज्जा वाटेल असा आहे. या सभागृहामध्ये नागवं व्हाव लागलं असतानाही बदल करण्याचा सपाटाच त्यांनी लावलेला आहे. 29 नोव्हेंबरच्या शासन निर्णयाचा उल्लेख झाल्यानंतर व त्यामध्ये बदल झाल्यानंतर एकामागोमाग तीन शासन निर्णय काढण्यात आले. ते तीनही शासन निर्णय महंमद तुघलकाची आठवण करुन देणारे आहेत. मी मुद्दाम महंमद तुघलकाचा उल्लेख केला, त्याच्यासारखे उदाहरण महाराष्ट्राच्या इतिहासात दिसणार नाही. 29 नोव्हेंबरचा शासन निर्णय काढला व त्यामध्ये पहिली करेक्शन दिनांक 28 जुलै, 2006 ला केली. त्यामध्ये अशी करेक्शन केली की, "प्रशासकीय मान्यतेचे पाटबंधारे विभागाचे जे अधिकार आम्ही आमच्याकडे घेतले होते ते आता शिथिल करुन या 6 जिल्हयामध्ये पाटबंधारे विभागाला परत देण्यात येत आहेत आणि ते फक्त प्रशासकीय मान्यता दिलेल्या प्रकल्पांनाच लागू पडतील." प्रशासकीय मान्यता दिलेल्या प्रकल्पांनाच म्हणजे काय ? असे पाहून माझ्यातर असे मनात आले होते की, याबाबत विभागाला पत्र पाठवून कळवावे की, या शासन निर्णयामध्ये खाली आणखी एक क्लॉज टाकावा की, हा शासन निर्णय नशा-पाणी न घेता काढला आहे. कारण जून्या खरेदीखतामध्ये असे असते की, हा खरेदीखत नशा-पाणी न घेता केलेला आहे. त्यामुळे माझ्याही मनात अशाप्रकारची कल्पना आली होती. मी हे सर्व अगदी सोप्या भाषेत सांगितले. शासन निर्णय मी जशाच्या तसाच वाचून दाखवला तर तो आणखीन हासण्यासारखा आहे. यामध्ये पुढे असेही म्हटले आहे की, "दिनांक 17 जुलै 1974 च्या शासन निर्णयातील यापूर्वीचे प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार खालील अटींची पूर्तता होण्याच्या अधिन राहून पूर्ववत ठेवण्यात येत आहेत. :-"

(..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण लवकर संपवावे, आणखी ब-याच सन्माननीय सदस्यांना बोलायचे आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या विषयावर ज्या सन्माननीय सदस्यांना जेवढा वेळ बोलायचे असेल तेवढा वेळ त्यांना बोलू द्यावे. काल सर्वानुमते असेच ठरले आहे. कारण हा महत्वाचा प्रश्न असून या शेतकऱ्यांच्या प्रश्नांना पूर्ण न्याय मिळणे आवश्यक आहे.

**उपसभापती** : मी आपल्या म्हणण्याशी सहमत आहे. परंतु मला खाली बसलेले सन्माननीय सदस्य मधून मधून हात करुन किती वेळ चालणार असे विचारत आहेत, म्हणून मी माझे म्हणणे क्लिअर केले. आता सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु ठेवावे.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी सभागृहाला महम्मद तुघलकाची गोष्ट सांगितली. 29 नोव्हेंबरच्या शासन निर्णयाव्दारे या विभागाने पाटबंधारे विभागाचे जे काढून घेतले होते त्यातून किलोभर परत दिले. उदार अंत:करणाने परत दिले. आणि हे सर्व करीत आहे ते एकटे वित्त खाते. दुर्बोधकुमार नावाचा उत्तम अधिकारी हा त्या खात्याच्या मदतीला आहे. मी या ठिकाणी हा शासन निर्णय आपल्याला जसाच्या तसा वाचून दाखवितो. "दिनांक 17 जुलै 1974 च्या शासन निर्णयातील यापूर्वीचे प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार खालील अटींची पूर्तता होण्याच्या आधीन राहून पूर्ववत ठेवण्यात येत आहेत." पहिली अट अशी होती की, "या शासन निर्णयातील अधिकारांची शिथिलता विदर्भातील 6 जिल्हयातील उपरोक्त पॅकेजअंतर्गत येणा-या पाटबंधारे योजनांसाठी अनुज्ञेय राहिल." या पॅकेजमध्ये पाटबंधारे विभागाचे एकूण 82 प्रकल्प आहेत, त्या सर्वांना लागू पडेल असा शासन निर्णयाचा अर्थ आहे. आता परिस्थिती अशी आहे की, या सर्व प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे, त्या प्रकल्पांचे काम सुरु झाले आहे. मग ज्यांची कामे सुरु झालेली नाहीत त्यांना हे मदत देतील काय ? म्हणजे याचा अर्थ काय होतो ? या 6 जिल्हयातील प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार परत घेण्यात येत आहेत. त्यानंतर हा शासन निर्णय लोकांनी वाचला, त्याचप्रमाणे त्याच विभागातील अधिका-यांनी वाचला. तेंव्हा त्यांनी सांगितले की, आपण मॅडपणा केलेला आहे, हा शासन निर्णय उद्या लोकांनी वाचला तर ते आपल्याला मॅड ठरवतील. अगोदरच प्रशासकीय मान्यता असलेल्या प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार आपण देतो आहोत. ही चूक लक्षात आल्यानंतर त्यांनी पुन्हा एक नवीन जी.आर.18 सप्टेंबर 2006 रोजी काढला. म्हणजे वित्त विभाग किती गांभीर्याने आत्महत्यांच्या प्रश्नाकडे बघतो आहे हे आपल्या लक्षात येईल. नवीन जी.आर.मधील मला जे समजले ते मी या ठिकाणी तुम्हाला सांगतो, काही वेळा त्याचे अर्थच लक्षात येत नाहीत. हे सर्व प्रकल्प ऐआयबीपीमध्ये असले पाहिजेत. केंद्र सरकारकडून येईल तो निधी खर्च झाला पाहिजे, राज्य शासनावर भार पडता कामा नये. ऐआयबीपीमध्ये काय असते ? ऐआयबीपी ही वर्धितवेग अशी योजना आहे. तुम्ही म्हणजे राज्य शासनाने उजेड पाडला तर केंद्र शासन तुम्हाला बॅटरी देईल. त्यामध्ये पहिली अट अशी आहे की, 30 टक्के खर्च राज्य शासनाने केला पाहिजे, 50 टक्के खर्च

..2...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख................

केला असेल तर प्रकल्पाला प्रायॉरिटी मिळेल. "पंतप्रधानांच्या पॅकेजमध्ये प्रस्तावित केलेल्या पण ऐआयबीपीमध्ये समाविष्ट असलेल्या" असे म्हणणे म्हणजे जादुटोणा आहे. ही चूक देखील यथावकाश विभागाच्या लक्षात आली आणि त्यांनी पुन्हा दुरुस्ती केली. पुन्हा काय अट टाकली ? यापूर्वीचे प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार पूढील अटींची पूर्तता होण्याच्या आधीन राहून पूर्ववत ठेवण्यात येत आहेत.

यानंतर श्री.बोरले..............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख ..........

हे सर्व प्रकल्प केंद्र शासनाच्या ए.आय.बी.पी. योजनेखाली माननीय पंतप्रधानांच्या पॅकेज अंतर्गत असावेत. ए.आय.बी.पी. कार्यक्रमातील निधीच्या प्रमाणानुसार हे प्रकल्प प्रस्तावित असावेत व राबविण्यात यावेत. ए.आय.बी.पी. कार्यक्रमाच्या निधी व्यतिरिक्त राज्य शासनावर कोणताही अतिरिक्त बोजा पडू नये. ए.आय.बी.पी. कार्यक्रमांतर्गत प्रस्तावास केंद्र शासनाने मान्यता दिल्यानंतर निविदा मागविण्याची विहित कार्यपद्धती अनुसरुन त्यानंतरच प्रकल्पावर प्रत्यक्ष खर्च करण्यात यावा. राज्य शासनाचा 30 टक्के खर्च झाल्याशिवाय ए.आय.बी.पी.मध्ये प्रकल्प समाविष्ट होत नाही. ए.आय.बी.पी.मध्ये समाविष्ट झाल्यानंतर निविदा काढा असे हे म्हणत आहेत. म्हणजे पाळणा केव्हा हलवायचा ? नाव केव्हा ठेवावयाचे ? शुश्रृषागृहामध्ये केव्हा जावयाचे ? म्हणजे कशाचाच ताळमेळ नाही. शुश्रृषा घरामध्ये जाण्यापूर्वीच पाळणा आणला आणि तो हलविण्यास सुरुवातही केली. म्हणजे पाळणा सुश्रृषागृहामध्ये जाण्यापूर्वी आठ दिवस अगोदर हलविण्यात येईल. पाळणा हलविण्याच्या 10 दिवस अगोदर नाव ठेवण्यात येईल. सभापती महोदय, केवढी ही नशा, केवढा हा उद्धटपणा. सभापती महोदय, मी त्या दिवशी सभागृहामध्ये ही हा शब्द वारंवार वापरत होतो. त्यामुळे अनेक सदस्यांना वाईट वाटले. पण माननीय पंतप्रधानांच्या अधिकृत समितीने असा शब्द वापरलेला आहे ही घमेंडखोर वृत्ती आहे. मी हा शासन निर्णय बाजूला ठेवतो. एका बाजूला मंत्रीमंडळाचे निर्णय पायदळी तुडविणार, कलेक्टिव्हली रिस्पॉन्सिबिलिटी पायदळी तुडविणार आणि आता महाराष्ट्रामध्ये या तुघलकी कारभारामुळे काय स्थिती निर्माण झालेली आहे ? स्थिती अशी निर्माण झालेली आहे की, महाराष्ट्राचे आता तीन भाग झालेले आहेत. काही जिल्हे असे आहेत की, तेथे प्रशासकीय मान्यतेची गरजच नाही. अनुशेष असलेल्या जिल्हयांचे आता दोन भाग झालेले आहेत. एका भागामध्ये वित्त विभागापुढे लोटांगण जर घातले तर मान्यता मिळेल आणि महत्तम मार खाणारे पॅकेजमधील जे सहा जिल्हे आहेत त्या सहा जिल्हयांमध्ये पंतप्रधानांच्या योजनेमध्ये मान्य असलेल्या प्रकल्पाशिवाय नवीन एकही प्रकल्प सुरु होऊ शकणार नाही. ही आपली पैदाईश आहे, हे आपले अपत्य आहे, हे आपले फळ आहे. मी जाहीरपणे सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांचे आभार मानतो की, त्या दिवशी मंत्री महोदय प्रकल्पाला मान्यता देत नव्हते परंतु सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी मला मदत केली. सभापती महोदय मी आपले आभार मानू इच्छितो. त्या दिवशी आपण निर्णय दिला की, ही गोष्ट देशाच्या घटनेच्या विरुध्द आहे

..2..........

प्रा.बी.टी.देशमुख..............

असे येथे मांडले जात आहे. उद्या ॲडव्होकेट जनरलला बोलाविले जाईल आणि 10.30 वाजता विशेष बैठक होईल आणि त्या बैठकीमध्ये याबाबतचा निर्णय घेण्यात येईल. त्याप्रमाणे बैठक झ ाली. या बैठकीमध्ये आम्ही आमचे म्हणणे मांडले. मी एक गोष्ट आपल्याला सांगतो की, या राज्यामध्ये आजही कायदा आहे. सभापती महोदय, आपण मला स्टेट ॲक्टचे नाव आणि नंबर वाचून दाखविण्याची परवानगी द्यावी. कायद्यामध्ये असे म्हटलेले आहे की, विदर्भ आणि मराठवाडयामध्ये प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार महामंडळांना राहतील. त्या दिवशी जी बैठक झाली त्या बैठकीमध्ये माननीय जलसंपदा मंत्र्यांचे जाहीरपणे आभार मानू इच्छितो. त्या बैठकीमध्ये त्यांनी माननीय सभापतींना ठामपणे असे सांगितले की, आजच्या बैठकीमध्ये मला सर्वप्रथम असे सांगावयाचे आहे की, वित्त आणि नियोजन विभागाच्या अधिका-यांचे जे मत आहे ते मला मान्य नाही. कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अंतर्गत कृष्णा खो-यातील अनेक प्रकल्पांची कामे सुरु असून त्या प्रकल्पांसाठी निधी देण्याचे काम झाले आहे. विदर्भातील सिंचन प्रकल्पांची कामे घेण्यासाठी अमरावती विभागासाठी एक हजार कोटी रुपये दिले तर या प्रकल्पाच्या कामावर ते सर्व निधी खर्च करु शकणार नाहीत. कारण हे काम जे कॉन्ट्रॅक्टर करणार आहेत त्यांच्याही काही मर्यादा असतात. वित्त विभाग असे म्हणेल की, तुमच्या वाटयाचा जो पैसा होता तो आम्ही तुम्हाला दिलेला आहे. परंतु तो पैसा पुन्ही खर्च करु शकत नाही. दुसरी गोष्ट अशी की, 5 कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमतीचे हे प्रकल्प आहेत. त्यासंबंधीचे प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यासाठी बंधने घालण्यात आलेली आहेत. त्या बंधनाच्या बाबतीत मला असे म्हणावयाचे आहे की, यासंदर्भातील निर्णय घेण्याचा अधिकार वित्त व नियोजन विभागातील कोणलाही नाही. मंत्रिमंडळ यासंबंधीचा निर्णय घेऊ शकते.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख .....

मात्र वित्त आणि नियोजन विभागाच्या अधिकाऱ्यांना यासंबंधीचा निर्णय घेण्याचा काहीही अधिकार नाही. इतके दिवस मी या विषयावर काहीही न बोलता गप्प बसलो होतो. कृष्णा खोऱ्यातील कामाच्या बाबतीत मात्र अशा प्रकारचे कोणतेही बंधन घालण्यात आलेले नव्हते. त्या ठिकाणी 300-400 कोटी रूपयांच्या प्रकल्पांची कामे सिंचन भवनात बसून मंजूर केली जातात. परंतु ज्या भागात मोठ्या प्रमाणात अनुशेष आहे, ज्या भागाच्या बाबतीत माननीय पंतप्रधानांनी देखील सांगितलेले आहे, त्या संदर्भात दिलेल्या सूचनांचे व्यवस्थितपणे पालन केले जात नाही.

नागपूर विभागात, अमरावती विभागात सिंचन प्रकल्पांची कामे सुरू करण्यासाठी माननीय राज्यपालांची निदेश दिलेले आहेत. विदर्भातील अनुशेषाच्या संदर्भात माननीय राज्यपालांनी निदेश दिलेले असले तरी त्या प्रकल्पांसाठी पैसे खर्च होऊ शकत नाहीत. कारण 5 कोटी रूपयांपेक्षा ज्या प्रकल्पाची किंमत जास्त आहे अशा प्रकल्पांच्या बाबतीत घालण्यात आलेले बंधन आणि म्हणूनच असे कोणतेही बंधन त्याबाबतीत असणे बरोबर नाही. माननीय सभापती महोदय, आपणसुद्धा काही वर्षे पाटबंधारे मंत्री म्हणून काम केलेले आहे. तांत्रिकदृष्ट्या पूर्णपणे तपासून पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी एकदा प्रकल्प सफल आहे असे ठरविल्यावर पुन्हा वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांसमोर 5-5, 6-6 महिने फाईल कशासाठी फिरवायची ? 1974 पासून महाराष्ट्रात अस्तित्वात असलेली व्यवस्था 2005 मध्ये फक्त विदर्भावर अन्याय करण्यासाठी बदलविण्यात आलेली आहे अशी भावना त्या भागामध्ये निर्माण झालेली आहे. ही व्यवस्था वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांनी बदलविली. आम्हाला याची काहीही माहिती नव्हती, आमची त्याला संमती नव्हती. निर्णय घ्यायचा झाला तर मंत्रिमंडळालाच असा निर्णय घेता येईल. वित्त विभागाला या संबंधीचा निर्णय घेण्याचा काहीही अधिकार नाही.

सभापती महोदय, माननीय जलसंपदा मंत्र्यांनी अतिशय ठामपणे हे विचार तेथे मांडले. मी त्यांचे एक वाक्य मुद्दाम आपल्याला येथे वाचून दाखवितो. "...आंध्र प्रदेश राज्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या केल्या आहेत. या आत्महत्या रोखण्यासाठी आंध्र प्रदेश सरकारने सिंचन प्रकल्पाकरिता मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला आहे. अशा प्रकारे सिंचन प्रकल्पांसाठी अधिकचा निधी उपलब्ध करून देऊन सिंचन प्रकल्पांची कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न त्या राज्याने केलेला आहे. त्याप्रमाणे आपल्याकडेसुद्धा सिंचन प्रकल्पांसाठी जास्त निधी देऊन ही कामे लवकर पूर्ण करण्याचा आपण प्रयत्न केला पाहिजे. आपण सिंचन प्रकल्पांची कामे मोठ्या

प्रा.बी.टी.देशमुख.....

प्रमाणावर सुरू केली आणि त्यासाठी निधी कमी पडत असेल तर माननीय पंतप्रधानांना आपण सांगू शकू की, आम्ही अनेक प्रकल्पांची कामे सुरू केलेली आहेत. परंतु त्यासाठी बजेट कमी पडते आहे. तेव्हा आपण देखील आम्हाला निधी द्यावा. परंतु आपण अगोदरच मर्यादित स्वरूपाची कामे सुरू केली तर माननीय पंतप्रधान असे म्हणतील की, तुमच्या बजेटमधूनच ही कामे तुम्ही घ्यावीत."

सभापती महोदय, हे सारे झाल्यानंतर आज आता आपली काय स्थिती आहे ? माझे ठाम म्हणणे आहे की, या सहा जिल्ह्यांच्या बाबतीतील मास्टर प्लॅनप तरी आपण तयार करणार आहात का ? निधी वाटल्यास नंतर द्या. पण आराखडा तर तयार करा. आपल्याकडे त्यादृष्टीनेदेखील तयारी नाही ही दुर्दैवाची गोष्ट आहे. म्हणून ही चर्चा येथे उपस्थित करीत असताना मी एक गोष्ट नमूद करू इच्छितो की, या पॅकेजच्या बाहेर असलेले जिल्हे आहेत त्यांना आपण काय दिले ? घटनेच्या कलम 371(2) अन्वये आपल्याला हे अधिकार मिळाले आहेत ना ? त्या प्रमाणात निधी वाटप करण्याचे हे अधिकार आपल्याकडे आहेत. पॅकेज वेगळे. ज्यांना जास्त मार मिळालेला आहे, जे जास्त मागे आहेत त्यांना आपण पॅकेजने अधिक देतो, हे योग्यच आहे. मग रत्नागिरीचा अनुशेष कमी झालेला नाही तर तो वाढलेलाच आहे. बीडचा देखील अनुशेष कमी झालेला नाही पण तो वाढलेलाही ना. विदर्भातील चंद्रपूरचा देखील अनुशेष कमी झालेला नाही. पण आता ते सारे तुम्ही खुंटीवर टांगून दिले. पॅकेजमधील असेल तर घेणार आणि 5 कोटीचे प्रकल्प असतील तर ते वित्त विभागाकडे मान्यतेसाठी जाणार. पॅकेजमधील असतील तर त्यासाठी दिल्लीला जावे लागेल. त्या व्यतिरिक्त निधी खर्च करणार नाही असे यामध्ये कबूल केले आहे. याचा उगम कोठे आहे तर तो त्या समितीच्या अहवालामध्ये लिहिलेले आहे. त्या समितीच्या अहवालात असे म्हटले आहे की, कृष्णा खोऱ्यामध्ये जो न्याय दिला तेवढी सिंचन क्षमता पदरात पडूनही "The fact that the capacity has already been created to absorb the Bachawat Award is not mentioned by the senior politicians of the State. Their desire is to expand the capactiy in Western Maharashtra. Currently, they are busy with all last mile projects where 75% expenditure has already been made in Western Maharashtra." आणि मग आपल्याला असे दिसते की, त्यात स्पष्टपणे म्हटले आहे की, हे सारे कशासाठी आहे ? आता बच्छावत आयोगाचा निर्णय स्पष्ट आहे. तो निर्णय असा होता की, पाणी

...... सीसीसी 3 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वापरले नाही तरी जाणार नाही. परंतु तरीही आम्हाला असे सांगितले गेले की, सन 2000 पर्यंत आपण हे पाणी वापरले नाही तर ते आपल्याला मिळणार नाही. .....

( यानंतर 3डी 1 .....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख....

पुढे पुढे ते वाक्य मंत्रिमहोदय सभागृहामध्ये सांगू लागले, आणि सभागृहाबाहेर सांगणे बंद झाले. आणि पुन्हा पुन्हा सांगण्यात येते की, तुमचा पाण्याचा हक्क असला तरी तुम्ही जास्तीचे पाणी अडविले तर ते तुम्हाला मिळणार नाही. आणि कमी साठविले म्हणूनही दिले जाणार नाही.

या चर्चेचा शेवट करीत असतांना तीन-चार गोष्टींची मी मागणी करतो. पहिला मुद्दा असा की, जलसिंचन सुविधेचा अभाव ही महत्वाची गोष्ट शासनाला कळली आहे की नाही? आणि जर कळली नसेल तर त्यांनी जास्त मार खाल्ला आहे निदान त्यांच्या प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देऊन यादी तयार करण्याचे काम करीत असतांना त्यांचा गळा दाबण्याचे काम ज्या 29 नोव्हेंबरच्या निर्णयाने केले आहे तो शासन निर्णय आपण रद्द करणार आहात की नाही?. याबाबत कलेक्टिव्ह रिस्पाँसिबिलिटी म्हणून मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय लाथेखाली तुडविण्याचे काम करणारी जी चार लहान लहान पिल्ले बसली आहेत ती करीत आहेत. ही पिल्ले शेवटी शुध्दिपत्रक देत आहेत. माझे असे स्पष्ट म्हणणे आहे की, या अधिकाऱ्यांना आपण हाकलून दिले पाहिजे. मी हे वाक्य लोकांना वाचून दाखविले. लोक म्हणाले की, वित्त विभागाचे सचिव हे क्लास फोरचे अधिकारी असतात कां? प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार त्यांच्याकडे आहे, हे अधिकारी क्लास फोरचे नाहीत तर क्लास वन मधील क्लास फोर अधिकारी आहेत. कारण मनामध्ये रागव्देष ठेवून जी.आर.काढण्याचे काम ही खालची मंडळी करतात. मनात रागव्देष ठेवून सुंदर असा जी.आर. काढतात. व्देषयुक्त भावनेने असलेले जी.आर. काढणाऱ्या या पिल्लांना आपण जमिनीत गाडणार की नाही? आणि प्रशासकीय मान्यतेचे अधिकार आपण नागपूर आणि औरंगाबादच्या स्तरावर देणार की नाही? 2177 कोटी रुपये हे माननीय पंतप्रधानांनी जाहीर केलेल्या रकमेतील आहेत की जास्तीचे आहेत यासंबंधी माननीय मंत्री श्री. बाळासाहेब थोरात आपण आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये स्पष्ट करावे. माननीय पंतप्रधानांनी दिलेल्या मदतीच्या भरंवशावर हा विदर्भ चालला आहे कां? आपण अनुशेष निर्मूलनाचा आराखडा किती दिवसात तयार करणार आहात? ते सांगा. माननीय पंतप्रधानांनी व्याजमाफी केली, कर्जमाफीची बाब आपण विचारात घेतली आहे त्याचे मी स्वागत करतो. सर्वांना सरसकट कर्जमाफी हा वेगळा विषय आहे. ज्यांनी मार खाल्ला आहे त्यांना कर्जमाफी देण्याचा विचार माननीय पंतप्रधान आणि माननीय कृषी मंत्र्यांच्या स्तरावर चालू आहे.त्याकरीता एक कमिटी नेमण्यात आली आहे. 31 जिल्हयांसाठी कर्जमाफी देण्याचा विचार चालू आहे. यासंबंधी आपण काही विचार करणार आहोत की नाही? अनुशेष वाढविण्याचे काम आम्ही करावे आणि तो दुरुस्त



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MHM/

प्रा. बी. टी. देशमुख....

करण्याचे काम केंद्र सरकारने करावे. आमचे मूल रडत आहे तर त्याला त्यांनी दूध पाजावे. तेव्हा कर्जमाफीच्या बाबतीत आपण निर्णय घेणार आहात की नाही? अमरावती येथे 55 आमदारांनी मागणी केली. जलसिंचन असुविधेप्रती सानुग्रह अनुदान देणार आहात की नाही? ज्याठिकाणी असुविधा जास्त प्रमाणात असेल त्याठिकाणी जास्त अनुदान दिले पाहिजे. आणि ज्याठिकाणी कमी असुविधा असेल त्याठिकाणी कमी अनुदान दिले पाहिजे. ज्या दिवशी अनुशेष दूर होईल त्या दिवशी तो बंद केला पाहिजे. माननीय राज्यपालांच्या निदेशानुसार करावयाच्या निधीच्या वाटपाबाबत सांगू इच्छितो की, गेल्या पाच वर्षामध्ये एकदा मुख्यमंत्री बदलले, एकदा पाटबंधारे मंत्री बदलले, अर्थमंत्री तेच राहिले आहेत. निधीचे वाटप माननीय राज्यपालांच्या निदेशाप्रमाणे न करणे, माननीय राज्यपालांसारख्या कॉस्टिटयुशनल ॲथॉरिटीशी उध्दटपणाचे वर्तन करुन सिंचनाचा अनुशेष दूर करण्याचे वेळापत्रक पाळण्यात आले नाही. प्रशासकीय मान्यता देण्याच्या शासन निर्णयाचे पालन करण्यात आले नाही.

यानंतर श्री. किल्लेदार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख (पुढे सुरु....

त्याच्या उलट 29 नोव्हेंबरला जी.आर. काढलेला आहे. कायद्याच्या विरूध्द जाऊन आदेश काढलेला आहे. कायद्यामध्ये स्पष्टपणे तरतूद आहे की "बुधवार,दिनांक 4 मे 2005 रोजी प्रकाशित झालेल्या महाराष्ट्र शासन राजपत्राच्या (असाधारण) भाग चारमध्ये पृष्ठ 293 ते 316 या पृष्ठावर सन 2005 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 18 मधील खंड 11 च्या उपखंड (च) मध्ये दुस-या परंतुकात पुढीलप्रमाणे तरतूद आहे :-

"परंतु आणखी असे की, राज्यपालांचे निदेशानुसार विदर्भ व महराठवाड्यातील अशा प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता किंवा सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार संबंधित पाटबंधारे विकास महामंडळास असतील."

माननीय राज्यपालांशी उध्दटपणा करणाऱ्या वित्त मंत्र्यांना मंत्रिमंडळातून बडतर्फ करण्यात यावे. राज्यपालांनी दिलेल्या आदेशाची अवहेलना केलेली आहे, उद्दट वर्तन केलेले आहे. म्हणून माझ ी विनंती आहे की, मुख्यमंत्र्यांनी वित्तमंत्र्यांना बडतर्फ करण्याबाबत राज्यपालांना विनंती करावी, एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MHM/

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या या विषयावर अधिवेशन सुरू होण्याच्या पहिल्या मिनिटाला या सदनामध्ये चर्चा व्हावी अशी विदर्भातील सर्वच शेतकऱ्यांची भावना होती. परंतु विदर्भामधील खैरलांजीची घटना ही माणुसकीला काळिमा फासणारी घडलेली आहे. त्याची तीव्रता आणि सामाजिक पडसाद याची नोंद सदनाने घेतली नसती तर लोकप्रतिनिधी म्हणून सदनातील सर्वच लोकप्रतिनिधींना अत्यंत अडचणीचे झाले असते. म्हणून त्या प्रकरणामध्ये सुरुवातीलाच आपण वाचा फोडली. महाराष्ट्रामध्ये महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, शाहु महाराज यांची नावे घेऊन राज्य चालविले जाते. म्हणून या प्रकरणाची चर्चा होणे आवश्यक होते, हे विदर्भातील शेतकऱ्यांनी समजून घेतले पाहिजे. विदर्भातील शेतकऱ्यांना कामकाजामध्ये स्वारस्य नाही. शेतकऱ्याला असे म्हणायचे आहे की, सरकार माझ्यासाठी कोणता न्याय देणार आहे, माझ्या विभागातील लोकप्रतिनिधी माझ्यासाठी कोणते काम करणार आहेत ?, माझी कोणती व्यथा ते सभागृहात मांडणार आहेत, माझ्या काय समस्या सांगणार आहेत ? आत्महत्या या कागदावर राहतील. खऱ्या अर्थाने जगण्यासाठी कोणते बळ आम्हाला देणार आहेत ? या अपेक्षेने खासकरुन विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकरी चातकाप्रमाणे वाट पहात आहे. मी या अगोदरची सन्माननीय सदस्यांनी केलेली भाषणे ऐकली नाहीत. परंतु सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख साहेबांना मी धन्यवाद देईन.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

विदर्भातील आणि मराठवाड्यातील अनुशेषाच्या संदर्भामध्ये जे धिंडवडे काढण्यात आले त्याबाबत योग्य मार्गाने सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी आपल्या भाषणातून मार्गदर्शन केले तसेच मंत्रिमंडळातील काही सन्माननीय मंत्र्यांची विदर्भातील आणि मराठवाड्यातील जनतेला न्याय देण्याची इच्छा असली तरी झारीतील शुक्राचार्य ते झिरपू देत नाही हे सप्रमाण त्यांनी मांडले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. कारण हा विषय आम्ही परत मांडणार नाही. सभापती महोदय, गेल्या नागपूरच्या अधिवेशनामध्ये मी गैरहजर होतो. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या तीव्रतेची जाणीव होऊन, या शासनाला आपल्या व्यथांची जाणीव आहे असे सांगत शासनाने पॅकेज जाहीर केले. त्या पॅकेजचे विरोधी पक्षाने सुध्दा स्वागत केले. त्या पॅकेजबाबत तातडीने टीकाटिप्पणी केली नाही. परंतु त्यामागे एकच भावना होती की, काहीही झाले तरी या शेतकऱ्यांना मदत करण्याकरिता सरकारची उणीदुणी काढण्यापेक्षा आपण एकत्र येऊन शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे. त्यामुळे त्यामध्ये उणिवा असताना सुध्द त्या उणिवा तपासण्याचा प्रयत्न आमच्या विरोधी पक्षाने केला नाही. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सुध्दा त्याचे स्वागत केले. त्यानंतर अर्थसंकल्पीय अधिवेशन आले आणि त्या पॅकेजचा प्रभाव काय आहे याची प्रचिती सर्वांना आली. ती प्रचिती विरोधी पक्षाच्या लोकांनाच आली असे नही तर विदर्भातील आमदार, सर्व समाजसेवक, सर्व पक्षाचे लोकप्रतिनिधी म्हणून काम करणाऱ्या इकडच्या प्रतिनिधींना आणि प्रमुखांना आली. विरोधी पक्ष म्हणून आम्ही ओरडण्याचे, विरोध करण्याचे काम करीत होतो. सत्तेमध्ये असलेले या भागातील जे प्रमुख आहेत ते या सरकारला सांगण्याचे काम करीत होते. पॅकेज कसे योग्य आहे हे सांगण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी यवतमाळला 10 दिवसांची यात्रा काढली आणि जनसामान्यांमध्ये जाऊन पॅकेजची योग्यता सांगण्याचा प्रयत्न केला. पण जनता अशी असते की जे स्वीकारवयाचे आहे ते स्वीकारते आणि जे नाकारावयाचे असेल ते तीव्रतेने नाकारते. मी या ठिकाणी एक गोष्ट नमूद करु इच्छितो. त्या 10 दिवसांमध्ये या सरकारमधील किमान 8-9 मंत्र्यांनी त्या भागामध्ये जाऊन पॅकेज कसे योग्य आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यामध्ये माननीय कृषी मंत्री श्री. बाळासाहेब थोरात सुध्दा होते. मी याचा अर्थ असा काढला की, या निमित्ताने पॅकेजचा

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MHM/

श्री. दिवाकर रावते ....

अभ्यास करणे भाग पडले. त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या बाबींचा अभ्यास करणे भाग पडले. जनतेपुढे हे सर्व मांडल्यानंतर त्याचा प्रभाव पडू शकला नाही. माननीय मुख्यमंत्र्यांच्या दहा दिवसांच्या त्या पॅकेजच्या दौऱ्यामध्ये विविध मंत्रिमहोदयांनी जनसामान्याना त्या पॅकेजबाबत सांगितले त्या संपूर्ण काळात किमन 42 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. ज्या भागामध्ये पॅकेजच्या संदर्भातील दौरा होता त्याच भागामध्ये या आत्महत्या झाल्या. हे मी सप्रमाण सभागृहासमोर मांडले. याचा अर्थ असा होतो की, शेतकऱ्यांचा या सरकारच्या विविध योजनांवर विश्वास नाही. मी पॅकेजच्या डिटेल्समध्ये जाणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी पॅकेजच्या संदर्भात एक उत्तम नोट काढून आम्हाला अभ्यास करण्यासाठी दिली. त्यांचे भाषण झाले तर ते प्रभावीपणे त्याबाबत सांगतील. पॅकेजमधील प्रत्येक बाब ते प्रभावीपणे मांडू शकतात. या सगळ्या पॅकेजचा फोलपणा आम्ही अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये मांडला. मी तर माननीय सभापती महोदयांची भेट घेतली आणि त्यांना विनंती केली की, मागच्या अधिवेशनामध्ये पहिले चार दिवस शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा करण्याशिवाय गेलेले आहेत.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 15:25

(श्री. दिवाकर रावते ...

ग्रामीण भागातील शेतक-यांशी असलेली बांधिलकी घेऊन या सदनामध्ये मी शेतक-यांसाठी उभा रहातो आणि मला चर्चा करायला वेळ मिळत नाही. तेव्हा सभागृह सुरु झाल्यानंतर मला कृपा करुन एक मिनिटाचा अवधी द्यावा, सभापती महोदय, आपण शेतक-यांचे कैवारी आहात, स्व. यशवंतराव चव्हाणांपासून ते स्व. वसंतदादा पाटील यांच्या मंत्रिमंडळामध्ये आपण काम केलेले आहे, शेतक-यांना न्याय देण्यासाठी आपण मला संधी द्यावी, अशी मी माननीय सभापतींना विनंती केली आणि त्यांनी माझी विनंती मान्य केली. त्यानंतर मी रोज अधिवेशन सुरु झाल्यानंतर या सदनामध्ये उभा राहून सांगत असे की, आज अमूक अमूक शेतक-याने आत्महत्या केली. त्या शेतक-याचे नाव, गाव आणि त्या दिवसापर्यन्त एकूण किती शेतक-यांनी आत्महत्या केल्या हे मी सभागृहामध्ये सांगत होतो. सभापती महोदय, त्या अधिवेशनाच्या काळात 83 शेतक-यांनी आत्महत्या केल्या होत्या. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी आणि मी, आम्ही दोन-दोन तासांनी सारखे विचारत होता की, 6 टक्के व्याजाचे काय झाले ? मला आठवते की, एकदा जलसंपदा मंत्री श्री. अजित पवार यांनी सांगितले की, हे अधिवेशन संपेपर्यन्त आम्ही यासंबंधीचा निर्णय जाहीर करु. अधिवेशनाच्या शेवटी निर्णय झाला. मी त्यावेळी बोलण्यासाठी उभा राहिलो असताना मला थांबविण्यात आले. मला शेतक-यांच्या आत्महत्येचा उल्लेख करण्यास परवानगी देण्यात आली हेच मी माझे भाग्य समजतो. आपल्या सदनामध्ये आपण स्वर्गवासी झालेल्या आमदारांना श्रध्दांजली वाहतो. उद्या दिवाकर रावते स्वर्गवासी झाला तर त्याला स्वर्गाची दारे उघडी आहेत. पण शेतकरी मेला तर त्याला स्वर्गवासी ही उपाधी लावली जात नाही. शेतकरी फासावर गेला, मेला असेच म्हटले जाते. माननीय सभापतींनी मला जी संधी दिली त्यामुळे मी या सदनामध्ये किमान 83 शेतक-यांना आदरांजली वाहू शकलो. हे विधिमंडळ जोपर्यन्त राहील तोपर्यन्त मी सांगितलेली आत्महत्या केलेल्या शेतक-यांची नावे या विधिमंडळाच्या रेकॉर्डला कायम राहतील. त्याना वेगळ्या प्रकारे आदरांजली वाहण्याची संधी मला प्राप्त झाली. अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी माननीय मुख्यमंत्र्यांनी 10 मिनिटांमध्ये तोंडी निवेदन केले आणि 6 टक्के व्याजाची घोषणा केली. त्यावेळी चर्चेसाठी वेळ नव्हता. मी तातडीने उभा राहीलो आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेल्या घोषणेचे स्वागत केले. शेतक-यांच्या आत्महत्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...)

होऊ नयेत यासाठी सकारात्मकतेने काम करणारा मी कार्यकर्ता आहे. शासनाचे केवळ दोषच काढण्यामध्ये मला स्वारस्य नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी 6 टक्के कर्जाची घोषणा केल्यानंतर मी दोन दिवसातच मुंबईहून विदर्भात आलो आणि कर्ज उपलब्धी आंदोलन सुरु केले. मी आमच्या पक्षाच्या पदाधिका-यांच्या बैठका घेऊन सांगितले की, कर्जासंबंधी माहिती असलेल्या जाणकार व्यक्तीला घेऊन शेतक-याला कर्ज उपलब्ध करुन देण्यासाठी टेबले खुर्च्या मांडून त्यांना सर्वतोपरी मदत करा. मी देखील शेतक-यांना 6 टक्के दराने कर्ज उपलब्ध होण्यासाठी प्रत्येक बँकेतून फिरत होतो. शेतक-यांना कर्ज मिळण्यामध्ये ज्या ज्या काही अडचणी येत होत्या त्या मी निस्तरण्याचा प्रयत्न केला. मोर्शीमध्ये युनियन बँकेच्या मॅनेजरने मला असे सांगितले की, "मी कर्ज देऊ शकत नाही."

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सरकारचे जी.आर.मी घेऊन गेलो होतो. माझ्या सर्व सहकाऱ्यांनी हे कर्जाच्या बाबतीतील सरकारचे जी.आर.घेतले होते. त्याची झेरॉक्स काढून सर्व बँकांच्या अधिकाऱ्यांनी दिली होती. हे सरकारचे आदेश आहेत याची कल्पना दिली होती. अनेक बँकांनी सांगितले की, आमच्याकडे आदेश आले नाहीत. लगेच झेरॉक्स काढून त्यांच्या हाती दिली जायची. हा सरकारचा निर्णय आहे. काही अडचण आली तर विभागाच्या सचिवांशी बोलायचो. सचिवांना त्या बँकेचे नाव सांगायचो. ते तेथील ए.आर., डी.डी.आर.ला गाठायचे. अशा प्रकारे मी बँकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना कर्ज कसे उपलब्ध होईल यासाठी 15 दिवस सकारात्मक आंदोलन उभे केले.

सभापती महोदय, मोर्शीला ज्यावेळी 42 शेतकऱ्यांना सांगण्यात आले की, कर्ज मिळणार नाही. त्यावेळी मी शिवसेनेच्या आणि माझ्या मताप्रमाणे त्या बँकेमध्ये घुसलो नाही, त्यांची कॉलर पकडली नाही. शेतकऱ्यांना ते अपेक्षित होते म्हणून दंगेधोपे केले नाहीत, निदर्शने केली नाहीत. अमरावतीच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे गेलो. त्यांच्याकडे बसलो आणि त्यांना कथा सांगितली. त्यांनी डीडीआर व बँक मॅनेजर आणि संबंधित शेतकऱ्यांना बोलावले. त्यांनी विचारले, यांना कर्ज का देत नाही? परिणाम एवढाच झाला, तुम्हाला कर्ज मिळणार नाही हे सांगणाऱ्या मॅनेजरने संध्याकाळी सर्व शेतकऱ्यांना कर्जाचे वाटप केले. सभापती महोदय, विरोधी पक्षात असताना विधायक आंदोलन उभे करता येते. मुख्यमंत्री जाऊन पॅकेजची घोषणा करतात. यवतमाळला जेव्हा पॅकेजच्या संदर्भात संपर्क साधतात तो फोल ठरतो. कर्ज उपलब्धी आंदोलनातून मला शेकडो पत्रे, शेकडो निवेदने येत होती. याठिकाणी 2-4 निवेदने मुद्दाम वाचून दाखविणार आहे. यामधून शेतकऱ्यांची मानसिकता निश्चितपणे कळू शकेल. एक महत्वाचे निवेदन मी वाचून दाखवितो. श्री.गोपजी इसराजी धुर्वे, रा.गोटखिंड या शेतकऱ्याने निवेदनात लिहिले होते :-

फक्त 5 हजार रुपयांचे कर्ज थकित असून पहिले ते 5 हजार रुपये भर म्हणाले. नंतर कर्ज देतो म्हणाले. जर पैसे भरायची परिस्थिती राहिली असती तर कर्ज घ्यायला कशाला आलो असतो? कर्ज दिले तर बी-बियाणे विकत घेऊ आणि नंतर पेरणी करु. पेरणी केल्यानंतर पीक निघेल. पीक निघाल्यावर कर्ज फेडू. आधी कर्ज द्या आणि नंतर कर्ज फेडू. 5 हजार रुपये थकित आहेत म्हणून नवीन कर्ज देत नाही. आत्महत्या करण्याची पाळी आलेली आहे.

गोपजी इसराजी धुर्वे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी धोरण जाहीर केल्यानंतर बँकेचे अधिकारी अशा पध्दतीने शेतकऱ्यांना अडवितात. माझ्याकडे शेकडो पत्रे आहेत, निवेदने आहेत. सरकारचे धोरण असताना सुध्दा शेतकऱ्यांची अडवणूक झाली. विदर्भातील आत्महत्या का वाढतात त्याच्या मागची ही कारणमिमांसा आहे. शेतकऱ्यांना वेळेवर कर्ज न देणे, निधीचा पुरवठा आला नाही म्हणून कर्ज न देणे, त्यांना ना हरकत प्रमाणपत्र देण्याकरीता अडविणे अशा अनेक गोष्टी होत असताना कर्ज उपलब्धी आंदोलनाच्या माध्यमातून मदत होत होती. कुठे 150 रुपये, कुठे 200 रुपये, कुठे 50 रुपये घेतले जायचे. शासनाचे आदेश होते की, पीक कर्जाकरीता ना हरकत प्रमाणपत्र देत असताना कोणतेही पैसे घेऊ नयेत. परंतु शेतक-यांकडून पैसे घेतले जायचे. शेतकऱ्यांच्या दृष्टीने काही प्रमाणात आम्ही काम करु शकलो. हे सर्व एवढ्यासाठी मांडतो आहे की, आंदोलनात्मक विधायक काम अधिक परिणामकारक होऊ शकते. आंदोलने विध्वंसक असतात. आंदोलने पूरकही असतात, विधायकही असू शकतात. या 6 टक्क्यातून शेतकरी सावरला नाही. आत्महत्या वाढल्या. त्याची आकडेवारी मी देणार आहे. माननीय पंतप्रधानांचे पॅकेज जाहीर झाले. पंतप्रधानांच्या दौऱ्याचा एवढा बोलबाला झाला होता, पंतप्रधान येण्याची प्रचंड प्रमाणावर तयारी करण्यात आली होती.

(नंतर श्री.जुन्नरे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

सभापती महोदय, नागपूर मध्ये दलितांना अडविण्यासाठी गृहविभागाने जेवढा पोलीस बंदोबस्त वापरला होता तेवढा पोलीस बंदोबस्त माननीय पंतप्रधान शेतक-यांना पॅकेज घोषित करण्यासाठी आले होते त्यावेळेस लावण्यात आला होता. हिंदुस्थानचा राजा शेतक-यांना दिलासा देण्यासाठी आलेला असतांना सुध्दा प्रत्येक गावा-गावात, चौका-चौकात नागपूर सारखाच पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता. हिंदुस्थानचा राजा शेतक-यांसाठी आलेला असतांना आपण जनतेला का भेटू दिले नाही? आपल्याला एवढया मोठया प्रमाणात पोलीस बळ का वापरावे लागले? खरे म्हणजे राजकारण्यांना हार आणि प्रहार हे सहन करावेच लागतात. लोकांच्या व्यथा, लोकांचे फटके खाल्ल्याशिवाय व्यथा समजत नाही. शेतक-यांना 6 टक्के दराने व्याज उपलब्ध करुन देण्याचा पॅकेज आला, निर्णय आला परंतु त्यामध्ये काय घोळ झालेला त्यावर मी राजकीय टीकाटिप्पणी करणार नाही. माननीय पंतप्रधानांच्या पॅकेजनंतर सुध्दा 331 आत्महत्या झालेल्या आहेत. याचा अर्थ माननीय पंतप्रधानांचे पॅकेज जनतेला भावले नाही, आवडले नाही असाच अर्थ होतो. मी 15 ऑगस्ट, 2006 रोजी विदर्भाच्या दौ-यावर होतो. सकाळी सहा वाजता उठल्यानंतर पेपर वाचत असतांना त्यामध्ये बातमी आली की, "देशाला स्वातंत्र्य मिळून 59 वर्षे झाले" मला वाटले देशाला स्वातंत्र्य मिळून सुध्द आज शेतक-यांना आत्महत्या का करावी लागत आहे? त्याचवेळी मी निर्णय घेतला की, पाच जिल्हयातील प्रत्येक जिल्हयात आत्महत्या केलेल्या पाच कुटुंबाला भेट द्यावयाची त्यांच्या व्यथा समजून घ्यावयाच्या व त्या कुटुंबाला जी काही मदत करता येईल ती करायची असा निर्णय घेतला. सभापती महोदय, या पाचही कुटुंबाच्या व्यथा वेगवेगळया आहेत. सभापती महोदय, रोजच्या वर्तमानपत्रात आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या संदर्भात व्यथा छापून येत असते. शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात वर्तमानपत्रात विविध कमिटयांचे रिपोर्ट येत असता. शेतकरी आत्महत्या का करतात याचा शोध मला घ्यावायाचा होता त्यामुळे आत्महत्या केलेल्या शेतक-याच्या घरी जाऊन सर्व माहिती घ्यावयाची असे मी ठरवले. यासंदर्भातील विचार मी 24 तास करीत होतो. या विषयाच्या संदर्भातील माझ्या भावना अतिशय प्रामाणिक आहे. यातून मला काहीही मिळवावयाचे नाही. त्यामुळे यासंदर्भातील माझ्या भावना मी माननीय शिवसेना प्रमुखांना सांगितल्या. त्यावेळेस त्यांनी मला विचारले की, "एवढया लोकांच्या प्रत्येकाच्या घरी तू कसा काय



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( तालिका सभापतीस्थानी डॉ. वसंत पवार )

श्री. दिवाकर रावते .....

जाणार? त्यावेळेस मी त्यांना सांगितले की, कपाशीसाठी मी 550 कि.मी. गेलो होतो तशाच प्रकारे यावेळेस सुध्दा मी आत्महत्या केलेल्या कुटुंबाच्या घरी जाईन व त्यांची व्यथा समजून घेईल. त्यामुळे आत्महत्या केलेल्या शेतक-यांची व्यथा जाणून घेण्यासाठी मी दिंडी काढली व तिला सांत्वन दिंडी नाव दिले. सभापती महोदय, पूर्वी गावात शेतक-याने आत्महत्या केली तर संपूर्ण गाव पेटून उठत असे. जसा जवान बॉर्डरवर शहिद झाला तर त्यांच्या अंत्ययात्रेसाठी संपूर्ण गाव जमा होतो त्यावेळेस तो कोणत्या जातीचा आहे, कोणत्या धर्माचा आहे हे पाहिले जात नाही. तशाच पध्दतीने शेतक-यांने आत्महत्या केली तर अंत्ययात्रेसाठी संपूर्ण गाव एकत्र होते, त्यावेळेस सुध्दा जात पात पाहिली जात नाही.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

त्याच्या अंत्ययात्रेला संपूर्ण गाव लोटायचा. सरकारचा निषेध म्हणून त्याचे प्रेत तहसील कार्यालयावर, जिल्हाधिकारी कार्यालयावर नेऊन निदर्शने करायची. लोकांची ही आंदोलने पाहून सरकार बिथरले,सरकारला वाटले अशाप्रकारची आंदोलने व्हावयास लागली तर आपले सरकार कोसळेल, बरखास्त होऊ शकेल. हा विचार करुन मग मंत्री मृत झालेल्या व्यक्तीच्या पत्नीस घरी जाऊन तिला एक लाख रुपयांचा चेक देत होते. सरकारने दिलेल्या मदतीने लोक शांत झाले. सरकारला मान देऊ लागले. त्यानंतर शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रमाणात वाढ झाली. मग मंत्र्यांना वाटले की, रोज रोज प्रत्येक मृत व्यक्तींच्या घरी कसे जाणार ? आम्हाला दुसरी काही कामे नाहीत काय ? सरकारी नोकरीत हुशार अधिकारी असतात. ते मंत्र्यांना बरोबर मार्गी लावतात. त्यांनी ही जबाबदारी पालकमंत्र्यांवर टाकली. ज्या जिल्ह्यात शेतकऱ्यांची आत्महत्या झाली त्यांच्या घरी त्या त्या जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी जायचे असा निर्णय झाला. सुरुवातीला काही महिने पालकमंत्री आत्महत्या केलेल्या कुटुंबाच्या घरी जाऊन त्यांना एक लाख रुपयांचा चेक देऊन आले. नंतर पालकमंत्रीही म्हणू लागले की, आम्हाला सुध्दा इतर कामे असतात, आम्ही हीच कामे करायची काय ? त्यांना जिल्ह्याचे राजकारण, तालुक्याचे राजकारण, पक्षाचे राजकारण करायचे असते यासाठी वेळ कोठून मिळणार ? मग त्यांनी ही जबाबदारी जिल्हाधिकाऱ्यांवर सोपविली. मग जिल्हाधिकारी आत्महत्या केलेल्या कुटुंबियांच्या घरी जाऊ लागले आणि एखादे प्रशस्तीपत्रक देतात त्याप्रमाणे एक लाख रुपयांचा चेक देऊ लागले. ही दुर्दैवाची गोष्ट आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडे 285 कमिट्या आहेत, त्यांचे ते चेअरमन आहेत. चेक देण्याचे काम करीत राहिला तर बाकीची प्रशासकीय कामे कोण करणार हे कारण सांगून त्यांनी ती जबाबदारी तहसिलदारांवर सोपविली. तहसलिदारांकडे सुध्दा मोठ्या प्रमाणावर कामे असतात, त्यांना जागेमध्ये फेरफार करायचे असतात, आर्थिक घोटाळे करायचे असतात, यातून त्यांना वेळ कसा मिळणार ? मग ही जबाबदारी पोलीस पाटील,तलाठी, पटवारी यांच्यावर सोपविण्यात आली. त्यांना पंचनामे करण्याचे सांगण्यात आले. त्या पंचनाम्यामध्ये एक प्रश्नावली तयार करण्यात आली. त्यात एक प्रश्न होता की, " मृत





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

व्यक्ती दारु पीत असे काय ? " ती विधवा सांगायची कधी कधी दारु पीत असे. मग पटवारी नोंद करुन घ्यायचा की, दारु पिण्यामुळे मृत्यू झालेला आहे. मग तो पंचनामा समितीसमोर ठेवायचा आणि मग समिती त्यावर निर्णय घेणार. पूर्वी मंत्री आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या घरी जाऊन प्रत्यक्ष मदत देत होते, त्यावेळी तेथे संपूर्ण गाव गोळा व्हायचा.

यानंतर श्री.रोझेकर.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..........

लाल दिवा दाराशी येत होता, सरकार दाराशी जात होते आणि आता पटवारी त्यांना विचारायला जातो की, शेतक-याला काय झाले होते ? आता शेतक-यांच्या कुटुंबियांना तहसिलदाराचे उंबरठे झिजविण्याची पाळी येते आहे. अशी अवस्था झाल्यानंतर त्यांची व्यथा समजून घेण्यासाठी सांत्वन दिंडी काढावी लागली, त्यांचे अश्रू पुसण्यासाठी जावे लागले. या सांत्वनदिंडीत मला जे दिसले ते मी माननीय शिवसेनाप्रमुखांना सांगितले, तसे ते वर्तमानपत्रात वृत्तांत वाचित होते. त्यांच्याकडे या विधवांच्या व्यथा मी मांडल्या. माननीय शिवसेना प्रमुखांनी सांत्वनदिंडी काढतांना मला कोणत्या प्रकारची काळजी घेतली पाहिजे हे सांगितले होते. दिंडीबरोबर शेकडो माणसे नेऊ नका, ज्या गावात जाणार आहात त्या ठिकाणी जेवण-खाण लोकांना करावे लागते, आपण सांत्वन करण्याकरिता जातो आहोत. या सर्व मर्यादा सांभाळून मी गेलो होतो. माननीय शिवसेना प्रमुखांनी सांत्वनदिंडीच्या निमित्ताने विधवांना देण्यासाठी माझ्याकडे एक पत्र दिले होते. सकाळ या वृत्तपत्राने या पत्राचे चांगले वर्णन केले आहे. हे पत्र मी मुद्दाम या ठिकाणी वाचून दाखविणार आहे. शिवसेनाप्रमुखांसारख्या नेतृत्वाने आत्महत्येची नोंद किती कारुण्याने घेतली, हे आपल्याला यामधून लक्षात येईल. त्यांनी त्यांच्या लेटरहेडवर दिलेले हे पत्र आहे. दिनांक 10 सप्टेंबर 2006 रोजी दिलेले हे पत्र आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या विधवांच्या नांवे आहे. हे पत्र असे आहे. "जय महाराष्ट्र, पावसाळयात डोंगराची एक मोठी दरड कोसळावी आणि तेथिल सारे संसार उध्वस्त व्हावेत तशी आत्महत्येची ही दरड आपल्या शेतकरी कुटुंबावर कोसळून आपले संसार उध्वस्त झाले. आपल्या घरातील कर्ते सवरते पुरुष आपल्या भरल्या संसारातून उठून गेले. काय आपली अवस्था असेल याची कल्पना करवत नाही. आज शिवसेना नेते आमदार श्री,दिवाकर रावते यांच्या नेतृत्वाखाली असंख्य शिवसैनिक आपल्या दारी आपले सांत्वन करण्यासाठी येत आहेत. शिवसेना फार मोठं करीत आहे असे नाही. परंतु आपल्या डोळयातील दु:खाच्या गंगाजमुना वाहत असतील त्यातील दोन-तीन थेंब तरी आम्ही टिपू शकतो म्हणून या सांत्वन दिंडीच्या रुपाने श्री.दिवाकर रावते व असंख्य शिवसैनिक आपल्या सांत्वनासाठी येत आहेत. आपण एकाकी नाहीत त्याचीही जाणीव या सांत्वन दिंडीमुळे होईल, हीच भावना. पुन्हा अशा आयुष्य उद्ध्वस्त करणा-या दरडी कोणावरही कोसळू नयेत ही ईश्वरचरणी व शिवचरणी प्रार्थना. ज्या शेतक-यांनी आत्महत्या

..2...........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..............

केल्या त्या दुर्दैवी जिवांना मी आणि माझे असंख्य शिवसैनिक प्रणाम करीत आहोत. आपले नम्र, बाळ ठाकरे, शिवसेनाप्रमुख" मी हे पत्र या विधवांना सांत्वनपर म्हणून देत होतो. मी जी दिंडी काढली त्यामधील मला आलेल्या अनुभवाचे एक हॅण्डबिल मी काढले आहे ते मी सर्व सन्माननीय सदस्यांना वाटले आहे. हे हॅण्डबिल म्हणजे त्या विधवांची व्यथा आहे. प्रत्येक ठिकाणी मी साडी-चोळी घेऊन जात होतो. शिवसेनाप्रमुखांच्या वतीने 5 हजार रुपये त्यांना देत होतो. त्या पाकिटावर शिवसेनाप्रमुखांनी लिहिले होते, मी आणि माझी शिवसेना तुमच्या पाठीशी आहे, ही शिवसेना प्रमुखांच्या वतीने रक्षाबंधनाची भेट आहे. आता या ठिकाणी सन्माननीय सदस्य, श्री.भास्करराव जाधव उपस्थित नाहीत. मी या ठिकाणी काही विनोद करण्याकरिता आलेलो नाही, मी येथे गंमत करण्याकरिता आलेलो नाही. माझ्या उद्ध्वस्त झालेल्या आया-बहिणींनी माझ्या हातावर बांधलेल्या राख्या घेऊन मी आलो आहे. या व्यथा नजरेआड करुन ज्या पध्दतीने माझे हसून स्वागत झाले त्याचे मला अत्यंत वाईट वाटले. एखादी आई-भगिनी अशी उद्ध्वस्त झालेली असेल, तिने रक्षाबंधनानिमित्त राख्या दिल्या असतील त्यासंबंधी हरकतीचा मुद्दा या ठिकाणी निघाला त्याबद्दल मी व्यथित झालो आहे. ही काही शोभेची वस्तू नाही, गमतीचीही नाही.

यानंतर श्री.बोरले..............

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...........

त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.भास्करराव जाधव उभे राहून बोलले. निवडणूका येतात आणि जातात. राजकारण चालूच राहते. राजकारणाच्या प्रवृत्तीमुळे उद्‌ध्वस्त झालेले आई बहिणीचे संसार उभे राहणार नाहीत. आज गेलेली दर्यापुरची जागा उद्या आम्ही जिंकू शकतो. कदाचित उद्या आम्ही राज्य घेऊ. परंतु कोणताही विचार न करता पटकन उभे राहून बोलणे योग्य नाही. माझ्या शेतक-यांची या उद्‌गारातून अव्हेलना झाली यासाठी मी खेद व्यक्त करतो. निवडणुकीसंदर्भात मी भाष्य करणार नाही. आत्महत्या केलेल्या कुटुंबियांच्या व्यथा मी बघून आलेलो आहे. मी त्यांच्याशी एकरुप होऊन आलेलो आहे. त्यांच्या व्यथा जाणून आलेलो आहे. आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना भेट देण्यासाठी मी सांत्वन दिंडी काढली. त्यातून मला काय सापडले ? त्यातून मला भरपूर काही सापडले आहे. मी एकंदरीत 550 ते 600 घरांपर्यंत घेलो. माझ्या बरोबर अकोल्याचे डॉ.केळकर होतो. त्यांच्या डॉक्टरांच्या टिमसह ते सन्मित्र आत्महत्या प्रतिबंधक समितीच्या माध्यमातून माझ्या बरोबर दोन महिने होते. या दोन महिन्यांमध्ये गावांमध्ये जाऊन उद्धवस्त झ ालेल्या कुटुंबियांना आधार द्यावयाचा, जो शेतकरी विचलित झालेला आहे त्याला आधार द्यावयाचा, त्यांच्यावर मोफत उपचार करण्याचा आम्ही प्रयत्न केला. सभापती महोदय, माझ्याकडे वेगवेगळया 4 फाईल आहेत. त्या फाईलींमध्ये प्राथमिक स्वरुपातील 170 शेतक-यांनी केलेल्या आत्महत्येचे प्रकार कोणते होते याचे विश्लेषण आहे. कोणत्या आत्महत्या नाकारलेल्या आहेत. त्यांना आपल्याला सभागृहामध्ये न्याय द्यावा लागणार आहे. फाशी घेऊन 41, विष घेऊन 113, विहिरीमध्ये उडी मारुन 15, स्वत:ला जाळून घेऊन 2, शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. एकूण 172 शेतक-यांनी केलेल्या आत्महत्यांचे विश्लेषण माझ्याकडे आलेले आहे. आत्महत्येची कारणे काय होती याबाबची रितसर प्रश्नावली तयार करुन फॉर्म भरुन घेण्यात आलेले आहेत. संपूर्ण फाईल चाळण्यासाठी बराच वेळ लागेल. 172 आत्महत्यांपैकी कुटुंबातील भांडणामुळे फक्त 1 आत्महत्या झालेली आहे आणि कर्जबाजारीपणामुळे 171 आत्महत्या झालेल्या आहेत. आत्महत्या केलेल्या शेतक-यांनी घेतलेल्या कर्जाचे स्वरुप काय होते ? 0 ते 1000 रुपये कर्ज असेलेल्या 30, 1000 ते 25000 रुपये कर्ज असलेल्या 53, 25000 ते 50000 कर्ज असलेल्या 46, 50000 ते 75000 रुपये कर्ज असलेल्या 23, 75000 ते 1 लाख रुपये कर्ज असलेल्या 4, 1 लाख ते 2

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...........

लाख रुपये कर्ज असलेल्या 12, 2 लाख ते 3 लाख रुपये कर्ज असलेल्या 2 आणि 3 लाख रुपयांच्यावर कर्ज असलेल्या 2 आत्महत्या झालेल्या आहेत. असे एकूण 172 आत्महत्यांच्या कर्जाचे विश्लेषण आलेले आहे. वयोगटाप्रमाणे यातून सामाजिक प्रश्न निर्माण होणार आहेत. 15 ते 25 वयोगटातील 2 मुलींनी आत्महत्या केलेल्या आहेत आणि हे वर्तमानपत्रामध्ये देखील छापून आलेले आहे. माझी मोठी बहीण लग्नाची असून माझ्या लग्नाचा बोजा माझ्या वडीलांवर असल्यामुळे मी आत्महत्या करीत आहे हे एक कारण आहे. मी स्वत: त्या आत्महत्या केलेल्या मुलीच्या घरी गेलो होतो. एका मुलीने परीक्षेमध्ये बक्षीस मिळविले होते. त्या मुलीने सुध्दा आत्महत्या केलेली आहे आणि हे देखील वर्तमानपत्रामध्ये छापून आलेले आहे. 25 वयोगटापर्यंत 14, 25 ते 35 वयोगटातील 29, 35 ते 45 वयोगटातील 57, 45 ते 55 वयोगटातील 40, 55 ते 65 वयोगटातील 20 आणि 65 वयोगटापेक्षा जास्त वय असलेल्या 12 आत्महत्या झालेल्या आहेत. शेतक-यांनी आत्महत्या केल्यामुळे आमच्या भगिनी विधवा झालेल्या आहेत. त्या वयाने लहान आहेत असा त्यातून निष्कर्ष निघतो.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

सभापती महोदय, उत्पन्नाच्या बाबतीतील आत्महत्यांचे विश्लेषण असे आलेले आहे की, 0 ते 1 हजार रूपयांपर्यंत वर्षाचे उत्पन्न असलेल्या 77 लोकांनी आत्महत्या केलेल्या आहेत. 1 हजार ते 25 हजार पर्यंत उत्पन्न असणाऱ्यांच्या 84, 25 हजार ते 50 हजारपर्यंत उत्पन्नर असलेल्यांच्या 5 आणि 50 ते 75 हजार उत्पन्नर असल्यांच्या 3 आणि 75 ते 1 लाख रूपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्यांच्या 2 आत्महत्या झालेल्या आहेत. अशा प्रकारे अल्पउत्पन्नधारकांच्या आत्महत्या मला तेथे मोठ्या प्रमाणात आढळून आलेल्याआहेत. त्या साऱ्या विश्लेषणामध्ये मानसिक आजार होता अशांची केवळ एकच आणि कोणताही मानसिक आजार नसलेल्या अशा 171 आत्महत्या आहेत. शारीरिक आजार असलेल्यांच्या 7 आणि शारीरिक आजार नसलेल्याच्या 165 आत्महत्या झालेल्या आहेत. तसेच आत्महत्या केल्यानंतर त्यांच्या कुटुंबियांना कोठलीही मदत मिळाली नाही अशी 172 प्रकरणे आहेत आणि आत्महत्येनंतर मदत मिळालेली अशी 75 प्रकरणे आहेत. या आत्महत्यांमध्ये 141 आत्महत्या या शेतमजुरांच्या आहेत तर 121 शेतकऱ्यांच्या आहेत. सभापती महोदय, हे विश्लेषण करीत असताना ज्या आत्महत्याग्रस्त कुटुंबियांना मी भेट दिली त्यांची परिस्थिती अत्यंत विदारक अशीच होती. त्या कुटुंबियांच्या व्यथा सांगण्यासाठी एक दिवस पुरणार नाही, रात्र होईल. तरी त्यातील काही उदाहरणे मी येथे देऊ इच्छितो. धामणगाव येथील श्री.रंगराव नीळकंठ गोपाळ याने आत्महत्या केली आहे आणि त्याची पत्नी श्रीमती पुष्पा रंगराव गोपाळ हिला मी या यात्रेच्या वेळी भेटलो. या सर्वांचेच फोटो माझ्या लॅपटॉपमध्ये आहेत ते पाहिले असता कोणाच्याही डोळ्यात अश्रू येतील. तिने सांगितले की, तिला 8 वर्षे वयाचा मुलगा आहे आणि त्याला मोठा आजार असून गंभीर ऑपरेशन करण्याची आवश्यकता आहे. त्या मुलाचे ऑपरेशन करण्याचे आम्ही तिला आश्वासन दिले आहे. तिच्या घरामध्ये भांडीकुंडी काहीही नव्हते. त्या साऱ्या घराची स्थिती पाहण्यासारखी होती. तिला मी साडीचोळी दिली आणि तिच्याकडून राखी बांधून घेतली व तिला शिवसेना प्रमुखांचे सांत्वनपर पत्र देखील दिले. सभापती महोदय, अठरा विश्वे दारिद्र्य म्हणजे काय आहे ते मी तेथे अनुभवले. तेव्हा तिने भरल्या डोळ्यांनी मला सांगितले की, तिला तिच्या मुलाची काळजी नाही, त्याचे ऑपरेशन तुम्ही करालच. पण मला माझ्या मुलीची काळजी आहे कारण आता ती वयात आली आहे. त्यावेळी तिने तिच्या दारिद्र्याचे वर्णन केले. मी लहान असतानाची एक दारिद्र्यावरील कविता मला आठवते, बहुधा ती कुसुमाग्रजांची असावी. ती कविता

........ 3एम 2 ...

श्री. रावते ....

अशी आहे की,

"भडभडते उंदीर फिरती कण शोधाया ते फिरती, परी अंती निराश होती,
बाळा नीज गडे, नीज गडे ".

असे 18 विश्वे दारिद्र्य तिच्या त्या घरामध्ये होते. मला म्हणाली, जेमतेम भाकरी करून मुलांना देते परंतु केव्हा तरी पक्वान्न म्हणून चटणी करून दिली तर मुलगा त्यात तेल मागतो आणि मग त्यावर तेल म्हणून पाणी टाकून देते. सभापती महोदय, ज्याला हृदय असेल तो माणूस निश्चितच हेलावून जाईल अशीच त्यांची परिस्थिती होती.

सभापती महोदय, धामणगावामधीलच श्री.राजेंद्र बबन भुजबळ यानेही आत्महत्या केली. तो एक चांगला शेतकरी होता, त्याचे घरदार देखील चांगले व्यवस्थित होते. त्याची पत्नी श्रीमती वनिता राजेंद्र भुजबळ हिला मी भेटलो, ती मुलगी शिकलेली होती. तिच्याबरोबर बोलताना तिने अर्धा तास त्यांच्या परिस्थितीचे आणि नवऱ्याने आत्महत्या का केली याचे वर्णनप केले. त्यावेळेस दोनच वेळा तिने हुंदका काढला. परक्यासमोर अश्रू काढायचे नाहीत ही मर्यादा सांभाळण्याचा तिने प्रयत्न केला. तिच्या पतीने, राजेंद्र बबन भुजबळ याने आत्महत्या केली तेव्हा खिशात एक पत्र ठेवले होते की जे पोलिसांनी जप्त केले, त्याची प्रत तिने मला दिली. राजेंद्र बबन भुजबळ याने स्वतःच्या हाताने ते पत्र लिहिलेले होते. त्यात त्याने म्हटले आहे की, मी स्वतःहून आत्महत्या करीत आहे. त्याला जबाबदार घरची कोणीही मंडळी नाही. ....

( यानंतर श्री. सरफरे .... 3एन 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

कारण वडिलांवर वाढता कर्जाचा बोजा, आजच्या सरकारचे शेतकरी विरोधी काम, कापसाला भाव नाही, संत्र्याला माप नाही अशावेळी शेतकऱ्याच्या मुलाने काय करावे? चोरी करावी की आतंकवाद? याला फक्त शासन जबाबदार आहे. अशाप्रकारे पत्र लिहून व त्यावर सही करुन त्या मुलाने आत्महत्त्या केली.शासनाने पॅकेज जाहीर केल्यानंतर ही आत्महत्त्या करण्यात आली. 12-13 एकर शेती असलेला एक शिकलेला माणूस, संत्रा-कापूस पिकविणारा, ज्याच्या डोक्यावर असलेला कर्जाचा बोजा कधी फिटत नाही. असा हा शेतकऱ्याचा मुलगा आपल्या मुलांना पापा आणि बडिलांना शेवटचा सलाम लिहून, शेवटची चिठ्ठी लिहून आत्महत्त्या करुन गेला. असे या सरकारच्या धोरणाचे नागडे-उघडे चित्र या आत्महत्त्येच्या प्रकरणामध्ये दिसून येते.

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्रीमती सुधाताई जोशी)**

सभापती महोदया, रकमाबाई तुळशीराम आकरे यांचे काय म्हणणे आहे? माझ्यासमोर त्या आपले म्हणणे मांडीत असतांना अंगाचा थरकाप होत होता. मी ज्यावेळी त्यांच्याकडे गेलो त्यावेळी ही 40-45 वय असलेली माय रडत बसली होती. मी म्हणालो की, आत्महत्त्या कुणाची झाली? ती मला म्हणाली, माझा लेक गेला. किती वर्षाचा होता? 27 वर्षाचा होता. मी साडी-चोळी घेऊन गेलो होतो. मी म्हणालो, सूनबाई कुठे आहे? ती सावडायला थांबली नाही, दुसऱ्या दिवशी निघून गेली.त्यावेळी तिच्या डोळयामधून अश्रू बाहेर पडत होते. मी म्हणालो, त्याचे वडील कुठे आहेत? तिने सांगितले त्याचे वडील गेली 25 वर्षे घरी आले नाहीत. दोन वर्षाचा मुलगा माझ्या ओटीत ठेवला आणि ते कुष्ठ रोग्यांच्या आनंदवनामध्ये गेले. त्यावेळी माझ्याबरोबर माननीय आमदार श्री. संजय राठोड होते. त्या महिलेची ही करुण कहाणी विचार करण्याच्या पलिकडची आहे. ज्या मुलाला 27 वर्षे वाढविला, त्याने आत्महत्त्या केली, सून आत्महत्त्येच्या दुसऱ्या दिवशी निघून गेली, आणि एकटी म्हातारी घरामध्ये बसली. कसले हे जीवन? जिथे भावना थांबतात अशाप्रकारच्या अत्यंत उद्ध्वस्त यातना मला ऐकावयास मिळाल्या. तिला काय सांगावे आणि काय बोलावे अशाप्रकारचा प्रश्न निर्माण व्हावा. अशाप्रकारची परिस्थिती त्या आत्महत्तेंची आम्हाला जाणवली. त्यानंतर तानाजी क्षीरसागर बाबत मला सांगावेसे वाटते. या शासनाच्या अधिकाऱ्यांबाबत काय बोलावे असे मला वाटते? या तानाजी क्षीरसागरने आत्महत्त्या केली. त्याची पत्नी चंद्रकला, वय 45 वर्षे राहणार वणी. तिने अर्ज लिहिला की, माझ्या पतीच्या नावे फत्तेपूर येथे जमीन आहे. त्या जमिनीवर सेवा सहकारी सोसायटी, फत्तेपूर यांच्याकडून 15 वर्षापूर्वी 25 हजाराचे कर्ज घेतले



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

होते, तसेच लोकांकडून 15 हजार उसने घेतले होते. आमच्या कुटुंबामध्ये दोन मुले, दोन मुली व आम्ही दोघे असे सहा जण आहोत. मुले शेतात राहतात, मुलगी लग्नाची आहे, मला हृदरोग आहे.त्यामुळे मला कर्ज फेडण्याची चिंता आहे. सरकारकडून अजून मदतीचे पैसे दिले गेले नाहीत. ज्यांनी ज्यांनी आत्महत्त्या केल्या त्यांच्या कहाण्या मन व्यथित करणाऱ्या आहेत. त्यांना शासनाच्या मदतीचे पैसे दिले जात नाहीत. आपले अधिकारी कोणत्या पध्दतीने काम करीत आहेत हे समजत नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु.....

सभापती महोदय, संजय बबनराव परुळकर या शेतकऱ्याचे सर्वात मोठे दु:ख आहे, संजय परूळकर यांनी आत्महत्या केल्यानंतर त्याची पत्नी नलिनी संजय परूळकर हिच्यासाठी साडीचोळी घेऊन गेलो. त्या घरामध्ये 42 ते 45 वर्षाची तिची सासू होती. तिने सांगितले की, कर्जबाजारीमुळे माझाही धरवाला गेला, मुलगा गेला. त्यांच्यावर 70 हजाराचे कर्ज होते. सासु आणि सून दोघीही विधवा झाल्या होत्या, आमच्यासमोर आता प्रश्न पडला की, साडी-चोळी कोणाला द्यावी ? ही बातमी बी.बी.सी.पर्यन्त गेली. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या या 30-40 वर्ष वयाच्या शेतकऱ्यांच्या होताना दिसतात. इतके ते शेतामध्ये काबाडकष्ट करत असतात, त्यामुळे त्यांचे वय मोठे वाटते. पुढच्या घरामध्ये गेल्यानंतर आत्महत्या करणारी कोणी मातारी स्त्री, तिच्या दोन्ही मुलांनी आत्महत्या केल्या. 21 वर्षाची त्याची सून आणि दुसरी 28 वर्षाची सून घरी होती. विश्वास बसणार नाही परंतु कर्जबाजारीपणामुळे दोन्ही मुलांनी आत्महत्या केल्या. त्यांना आज चटके सोसावे लागत आहेत. सांगण्यासारखे खूप आहे. सभागृहाला रडवता येईल इतक्या आत्महत्येच्या कहाण्या सांगता येतील. कारण दोन महिने विदर्भामध्ये अनवाणी फिरुन माहिती घेतलेली आहे. तेथील सगळीच प्रकरणे सांगून वेळ घेणार नाही. श्री. धनसिंग पवार या शेतकऱ्याने आत्महत्या केली. सन्माननीय मंत्री श्री.पुरके साहेबांचा यवतमाळ जिल्ह्यामध्ये पंतप्रधान भेट देणार म्हणून आदल्या दिवशी त्याच्या कुटुंबियांकडे 1 लाखाचा चेक दिला. सामाजिक परिस्थितीचे विश्लेषण करणारी ही आत्महत्या आहे. या प्रकरणामध्ये आपल्या मुलीच्या लग्नाला मोठ्या भावाने आहेर केला, म्हणून आपणही त्याच्या मुलीच्या लग्नाला आहेर घेऊन जायला पाहिजे नाहीतर समाज काय म्हणेल ? म्हणून त्याने एका दुकानदाराकडे उसण्या पैशाची मागणी केली, परंतु त्या दुकानदाराने त्याला पैसे दिले नाहीत. भावाच्या मुलीला आहेर करता आला नाही म्हणून त्याने आत्महत्या केली.

यानंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती सुधा जोशी )

श्री. दिवाकर रावते...

बेलखेड, मंगरुळ, जिल्हा वाशिम येथील श्री. प्रल्हाद शिवराम सुरुशे यांनी स्वत:ला झाडाला टांगून घेऊन फाशी घेतली. त्यांनी पत्र लिहून ठेवलेले आहे की, "सावकाराने शेतामध्ये दारु पाजून खरेदीखत करुन घेतले आणि 1600 रुपये दिले. त्यामुळे फासावर जावे लागत आहे" असे पत्र त्यांनी लिहिले. त्यासंदर्भात कोणतीही कारवाई झाली नाही. त्यांना कोणतीही मदत मिळाली नाही. अशा प्रकारच्या या आत्महत्या आहेत.

सभापती महोदया, आत्महत्येनंतर सुध्दा आमचे शेतकरी किती प्रामाणिकपणे काम करतात याचे दिग्दर्शन मला वाशीममध्ये झाले. त्या ठिकाणी सकाळी 8.00 वाजता एका घरात गेलो होतो. आमची दिंडी त्यांच्या दारामध्ये थांबली होती. त्या कुटुंबाला आम्ही भेट दिली. पंपाचे बेकायदेशीर कनेक्शन पकडले म्हणून कारवाई करण्याऐवजी त्याच्याकडून 10 हजार रुपये मला दे असा तगादा बोर्डाच्या अधिकाऱ्याने त्याच्यामागे लावला. तो म्हणाला की, माझ्यावर एवढे कर्ज आहे, बँकेचे एवढे कर्ज आहे, खाजगी कर्ज एवढे घेतलेले आहे, त्यामुळे मी तुम्हाला 10 हजार रुपये देऊ शकत नाही. त्यांनी महिनाभर त्याचा छळ केला. तू पैसे दे नाही तर तुझी वाट लावतो असे ते म्हणत होते. शेवटी कंटाळून त्या शेतकऱ्याने पोलीस स्टेशनमध्ये पोलीस इन्स्पेक्टरच्या समोर तक्रार लिहिली की, माझे बेकायदेशीर कनेक्शन पकडल्यामुळे अधिकारी मला 10 हजार रुपये मागतो. मी कर्जामुळे ते पैसे देऊ शकत नाही त्यामुळे मी तुमच्या समोर आत्महत्या करीत आहे. त्याने पोलीस स्टेशनमध्ये एन्ड्रीन पिऊन आत्महत्या केली. त्या शेतकऱ्याला 1 लाख रुपये मिळाले परंतु ज्या अधिकाऱ्याने त्याच्याकडे 10 हजार रुपये मागितले त्याच्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. त्यांच्या घरातील लोकांना मी विचारले की, तुम्ही बँकेचे कर्ज फेडले काय ? त्यांनी सांगितले की, 70 हजार रुपये फिक्स्ड डिपॉझीटमध्ये आहेत. 30 हजार रुपये गावातील देणे होते ते दिले. 5 हजार रुपये देणे बाकी आहे. आज भाऊबीजेचे 5 हजार रुपये आलेले आहेत. ते देऊन खाजगी कर्जातून मोकळे होतो. शेतकऱ्याच्या घरामध्ये मृत्यूनंतरही प्रामाणिकपणा वावरतो हे दृश्य आम्ही पाहिले. अमरावतीमध्ये गुल्हाने नावाच्या सावकाराकडून एका जोडप्याने आधीच्या वर्षी 20 हजार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2...

श्री. दिवाकर रावते ....

रुपयांचे कर्ज घेतले होते. त्यापैकी 10 हजार रुपये त्यांनी दिले. त्यानंतर राहिलेले 15 हजार रुपये त्यांच्याकडे घेऊन गेले तेव्हा श्री. गुल्हाने यांनी सांगितले की, 20 हजाराचे दीड लाख रुपये झालेले आहेत. त्यामुळे तेथील गाडगेनगर येथील विहिरीमध्ये त्या शेतकऱ्याने आपल्या बायकोच्या समोर जीव दिला. तिने पोलिसांना स्टेटमेंट दिले तरी सुध्दा त्या सावकारावर कोणतीही कारवाई झालेली नाही. शासन आत्महत्येबद्दल किती गंभीर आहे हे यावरुन दिसून येते. शासनाने आत्महत्येच्या संदर्भात सर्व्हे केला. शासनाच्या वेबसाईटवर ते उपलब्ध आहे. हा सर्व्हे गाडीभर कागदपत्रांचा आहे. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी सिंचनाच्या बाबतीत मुद्दा मांडला. त्या सर्व्हेमध्ये असे लिहिले आहे की, अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशीम व वर्धा या 6 जिल्ह्यांमध्ये एकूण 8351 गावांचा सर्व्हे झालेला आहे. एकूण 17,64,338 खातेदारांचा सर्व्हे झालेला आहे. त्यामध्ये नापिकी असलेल्या शेतकऱ्यांची संख्या 12,26,559 आहे.

यानंतर श्री. शिगम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते .ञ.

त्यामध्ये कर्जबाजारी असलेल्या शेतक-यांची संख्या 8,89,656 इतकी आहे. हे कर्ज कशामुळे वाढले ? 2002 सालापासून शेतक-यांच्या आत्महत्या वाढल्या. त्यानंतर 2004-05 आणि 2005-06मध्ये त्या आणखीनच वाढल्या. कापसाला योग्य भाव न दिल्यामुळे, शेतक-यांचा कापूस व्यापा-यांच्या ताब्यात गेल्यामुळे आणि एकंदरीतच कापूस पणनच्या बाबतीत शासनाने घेतलेल्या चुकीच्या धोरणामुळे शेतक-यांच्या आत्महत्या वाढल्या. कापूस पणन महामंडळाचे अध्यक्ष डॉ. एन.पी.हिराणी आज सभागृहामध्ये उपस्थित नाहीत. पणन मंत्र्यांनी असे सांगितले की, 350 लाख क्विंटल कापूस आणि 72 लाख गाठींची खरेदी होईल. कृषी खात्याने 200 लाख क्विंटल कापूस आणि 40 लाख गाठींची खरेदी होईल असे सांगितले. कृषी खात्याने जाहीर केल्यानंतर महाराष्ट्रामध्ये कापूस खरेदीची व्यवस्था तातडीने करण्याची आवश्यकता होती. आता पर्यन्त केवळ 45 हजार क्विंटल कापूस खरेदी केल्याची घोषणा कापूस फेडरेशनने केली. शेतक-यांचा कापूस विकत घेऊन शेतक-यांना दिलासा द्यावा असे शासनाला वाटतच नाही. आता कापूस खरेदी केन्द्रेच नसल्यामुळे साहजिकच शेतकरी आपला कापूस व्यापा-याला विकणार. कारण शेतक-याच्या हाती आलेले पीक त्याला विकलेच पाहिजे. आता एवढ्या आत्महत्या होत असताना हे शासन प्रभावीपणे धोरण राबवित नाही त्याबद्दल काय करायचे ? या शासनाचा धिक्कार करायचा, निषेध करायचा की आणखी काही... असे म्हणतात की, कोडग्या कोडग्या लाज नाही आणि कालचा गोंधळ आज नाही. शेतक-यांच्या आत्महत्या थांबाव्यात म्हणून आम्ही येते घसा फोडतोय, आत्महत्येचा प्रश्न या सभागृहामध्ये कोणत्या आयुधांनी उपस्थित करावा यासाठी भांडातोय. अशा परिस्थितीत शासन निष्क्रियतेने वागत असेल तर त्याबद्दल काय करायचे ? हे शासन शेतक-यांच्या आत्महत्येबाबत गंभीर नाही. कर्जबाजारी शेतक-यांची कृषी खात्याने जाहीर केलेली अधिकृत आकडेवारी 8,89,656 अशी आहे.याबाबतीत सर्वेक्षण झाले. कर्जबाजारीपणामुळे वडील लग्न करु शकत नसल्यामुळे दोन मुलींनी आत्महत्या केल्या. तसेच कर्जबाजारीपणामुळे मुलींची लग्ने करता येत नाहीत म्हणून शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. सभापती महोदय, शासनाने केलेल्या सर्वेक्षणामध्ये लग्नायोग्य मुली असलेल्या शेतक-यांची संख्या 3,06,362 इतकी आहे. काही शेतक-यांना एक मुलगी असेल तर, काही शेतक-यांना दोन किंवा तीन मुली देखील असतील.

==2==

(श्री. दिवाकर रावते....)

पॅकेजमध्ये विवाहासाठी एका जोडप्याला 10 हजाररु.प्रमाणे तरतूद करण्यात आली. त्याप्रमाणे किती आणि कशा प्रकारे मदत केलेली आहे ? या सदनामध्ये मी व्यथित होऊन सांगू इच्छितो की, सरकारचे अनुदान हे लाटण्यासाठीच असते असा काही लोकांचा समज आहे. शासनाने केलेल्या सर्वेक्षणानुसार साडेतीन लाख कर्जबाजारी असलेल्या शेतक-यांच्या मुलींची लग्ने व्हायची आहेत.

...नंतर श्री. भोगले...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ KTG/ 16:20

श्री.दिवाकर रावते.....

यांना अनुदान नाही परंतु लग्नाच्या अनुदानाचे काय? मंत्रीमहोदयांनी उत्तराच्या भाषणामध्ये या संदर्भातील हिशोब द्यावा. प्रत्येक लग्नासाठी दिलेले 10 हजाराचे अनुदान किती वेळेत संपले? चुटकीसरशी कसे संपले? तपासले का? पाहिले का? चौकशी केली तर फार गंभीर प्रकरणे बाहेर येतील. 10 टक्के खरी लग्ने आणि 90 टक्के खोटी लग्ने. केवळ अनुदान लाटण्यासाठी एकमेकांच्या गळयात हार घातले गेले. सभापती महोदय, ही कुटुंबे जगणार नाहीत. लुबाडणूक कशी आहे? फार हपापलेले लोक आहेत. गंभीर आजार असलेल्या कुटुंबांची संख्या 92456. मला अनुभव आलेल्या अनेक प्रकरणांमध्ये केवळ चिकनगुनिया हा आजार झाल्यामुळे कर्जबाजारी झालेली कुटुंबे आढळली आहेत. 92456 कुटुंबे गंभीर आजार असलेली आहेत. त्यासाठी काय तरतूद केली? हा सर्व्हे शासनाचा असून ही आकडेवारी शासनाची असली तरी त्यात आणखी वाढ होऊ शकते. आदिवासींच्या कुपोषणानंतर हा एक गंभीर विषय विदर्भामध्ये निर्माण झालेला आहे. 92456 गंभीर आजार असलेल्या कुटुंबांची संख्या आहे.

सभापती महोदय, आणखी एक चांगली आकडेवारी सरकारने तयार केली. हे सरकार नाही जगणार. एखाद-दोन विजयाने हर्षोल्हास निर्माण होऊ शकतो. परंतु हे सरकार जगणार नाही. शासनाचा एक असा सर्व्हे आहे. सभापती महोदय, मी जे बोलतो आहे ते आपण ज्याठिकाणी बसला आहात तेथे बसून ऐकल्यानंतर आपल्याही मनात त्याच व्यथा निर्माण होतील. अ गटामध्ये अत्यंत अडचणीत असलेली कुटुंबे म्हणजे शेतकरी कुटुंबाचा अडचणीचा स्तर निर्माण केला आहे. अत्यंत अडचणीत असलेल्या कुटुंबाचा "अ" स्तर आहे. जिल्हानिहाय आकडेवारी दिलेली असली तरी मी फक्त 6 जिल्हयांची समरी वाचणार आहे. "अ" स्तरामध्ये 4,34,291 कुटुंबे आहेत. याचा अर्थ त्यांना खायला अन्न नाही. विदर्भातील 4 लाख कुटुंबांना खायला अन्न नाही. कशा अवस्थेत जगत असतील? प्रत्यक्षात ही संख्या जास्त असू शकते. या संदर्भात कोणत्या उपाययोजना केल्या हे मंत्रीमहोदयांनी उत्तराच्या भाषणात सांगावे. शेतकरी जगवायचा असेल, आत्महत्या थांबवायच्या असतील तर त्यासाठी आवश्यक असलेले विश्लेषण मी आपल्यापुढे मांडत आहे. ही सगळी शेतकरी कुटुंबे आहेत. यांना बीपीएल लागू होत नाही. कारण ते मजूर नाहीत. ज्याची शेती आहे तो बीपीएलमध्ये येत नाही. यांची परिस्थिती इतकी बिकट आहे. "ब"

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

स्तर म्हणजे ब-यापैकी परिस्थिती असलेली कुटुंबे. हे कधीही "अ" गटामध्ये ट्रान्सफर होऊ शकतील. कर्ज मिळाले नाही, पीक कमी आले, लाळया रोगाचा प्रादुर्भाव झाला तर ही कुटुंबे अ गटात जातील अशी कुटुंबे 9,14,708 इतकी आहेत. त्यातील 2 लाख कुटुंबे नक्की "अ" गटात जाण्याची शक्यता आहे. यांना मॉडरेट कुटुंब म्हटले आहे. यांच्याकडे तातडीने व्यवसायाच्या, कडधान्याचे पीक घेण्याच्या दृष्टीने पाहिले नाही तर ही कुटुंबे "अ" गटात जातील. अन्न खायला मोताद असे म्हटले जाते. प्रत्यक्ष हे घडत आहे. मी स्वत: हे अनुभवले आहे. हा सरकारी सर्व्हे असून ही आकडेवारी डॉटकॉमवर उपलब्ध आहे. पुढच्या स्तरामध्ये 3,66,950 कुटुंबे आहेत. "अ" गटातील अन्नाला मोताद असलेली कुटुंबे, त्यांना कर्ज मिळत नाही, कोणत्याही बँका फायनान्स करीत नाही, कोणत्याही कर्जाचा लाभ मिळत नाही कारण ही आदिवासी कुटुंबे आहेत.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, महार वतनाच्या ज्या जमिनी आहेत त्या जमिनी त्या कुटुंबाच्या नावावर केल्या जात नाहीत. महारा वतनाच्या जमिनीच्या संदर्भात फार मोठा घोळ आहे. महार वतनाच्या जमिनीवर मोठया प्रमाणात अतिक्रमणे झालेली आहेत. असे असतांनाही शासनाने महार वतनाच्या जमिनीच्या संदर्भात निर्णय घेतलेला नाही. माझ्याकडे भरभणी जिल्हयातील जिंतूर तालुक्यातील एका दलित महिलेचा महार वतनाच्या संदर्भात निवेदन आलेले आहे. या महिलेने लिहिले आहे की, माझा पती मरण पावला आहे, सासरा मरण पावला आहे, मला दोन मुले आहेत तरी महार वतनाची जमीन माझ्या नावावर व्हावी यासाठी मी संबंधित अधिका-याकडे गेले असता त्या अधिका-याने सांगितले आहे की, मला चार बिभा जमीन दे किंवा 50 हजार रुपये दे. सभापती महोदय, मला सांगा लंगोटीवर फिरणा-या लोकांची कोणी दाद घेते का हो?

सभापती महोदय, शासनाच्या डॉट कॉम साईटवर आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या संदर्भातील आकडेवारी आहे. ही जी आकडेवारी आहे ती माननीय मंत्रीमहोदय असत्य आहे असे म्हणू शकणार नाहीत. 2000 नंतर नवीन सरकार सत्तेवर आल्यानंतर 2500 शेतक-यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. तसेच कापसाला भाव वाढवून द्यावा यासंदर्भात बीजेपीने एक मोर्चा काढला होता परंतु या संदर्भात या शासनाने 19 डिसेंबर रोजी जी.आर.काढून कापसाला वाढीव भाव मिळणार नाही हे जाहीर केले. सभापती महोदय, 1.1.2006 ते आजपर्यंत 1431 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. या आत्महत्येच्या संदर्भात शासनाने म्हटले आहे की, 90 टक्के आत्महत्या या दारुच्या व्यसनामुळे झालेल्या आहेत. सभापती महोदय, शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात चुकीची माहिती देणे योग्य नाही. कोणीही उठावे आणि शेतक-यांची टिंगल करावी अशी शेतक-यांची परिस्थिती झालेली आहे. शेतक-यांचा शासनाने अशा प्रकारे अवमान करु नये अशी माझ ी आपल्याला कळकळीची विनंती आहे. शासनाने सांगितलेले आहे की, 90 टक्के शेतक-यांनी दारुच्या व्यसनामुळे आत्महत्या केलेल्या आहेत, त्यासंदर्भात शासनाने पुन्हा एकदा सर्व्हेक्षण करण्याची आवश्यकता आहे. आत्महत्येच्या संदर्भात जी मदत दिली जाते त्यामध्ये मोठया प्रमाणात फ्रॉड झालेला आहे असे मला सांगावयाचे आहे. आत्महत्या केलेल्या काही कुटुंबाला 25 हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात येते परंतु आपण शेतक-यांना अशा प्रकारे आर्थिक मदत केलेली

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

आहे का? आपण आत्महत्या केलेल्या शेतक-यांना कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत केलेली नाही. सन 2006-2007 मध्ये आत्महत्या केलेल्या शेतक-यांना आर्थिक मदत व्हावी यासाठी या शासनाने फक्त 7 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. एवढया छोटया प्रमाणात तरतूद करुन आपण आत्महत्या केलेल्या शेतक-यांचा अपमान केलेला आहे. यासंदर्भात आपण माहिती दिली नाही तर आम्ही आपल्याला सभागृहाच्या बाहेर जाऊ देणार नाही. ऑक्टोबर 2006 पर्यंत आर्थिक मदत दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या 49885 आहे. याचा अर्थ 50 हजार लाभार्थ्यांना 9.17 लक्ष रुपयांच्या तरतूदीमध्ये, अमरावती, वाशिम, अकोला या जिल्हयातील 60 हजार लाभार्थ्यांना निवडावयाचे होते.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

सभापती महोदया, आर्थिक वर्षामध्ये 60 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. प्रत्यक्षात 9 लाख 17 हजार रुपयांचे वाटप झाले. 180 प्रमाणे 50,000 हजार लाभार्थी होतात. मी जी आकडेवारी सांगत आहे ती आपल्याच वेबसाईटवरील आहे. सरकारने जी.आर.काढला की, गाई,पंप इत्यादी खरेदीसाठी 50 टक्के सबसिडी आणि 50 टक्के कर्ज. परंतु आपल्या अधिकाऱ्यांनी जो पंप बाजारात एक रुपयाला मिळतो तो दोन रुपयांनी खरेदी करुन शेतकऱ्यांना दिला. यामध्ये फायदा कोणाचा झाला ? अशाप्रकारांमुळे शेतकरी आत्महत्या करणार नाही तर काय करणार ? सभापती महोदया, शेतकऱ्यांना तीन टक्के दराने कर्ज द्यावे असा ठेका आम्ही मागील अधिवेशनापासून करीत आहोत. गेल्या अधिवेशात या संदर्भातील विषयावर माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी लक्षवेधी सूचना देखील उपस्थित केली होती. सभापती महोदया, मला येथे नमूद करावयाचे आहे की, पणन विभागाकडे मागील 25 वर्षांचा रेकॉर्ड उपलब्ध आहे काय हे त्यांनी सांगावे. त्यांच्याकडे रेकॉर्ड उपलब्ध नाही आणि ही अतिशय गंभीर बाब आहे. एकूण तरतूद 408 कोटी रुपयांची आहे. प्रत्यक्षात किती रुपये खर्च झाले ? हा निधी कोणाला देण्यात आला ? हा निधी मुंबई फेडरेशनकडे वर्ग करण्यात आला, त्यांनी तो उपविभागीय कार्यालयाकडे वर्ग केला. त्यांनी संचालक, अधिकारी यांच्या नातेवाईकांमध्ये वाटला. त्यांनी 10-20 लाख रुपयांचे चेक अधिकाऱ्यांच्या नातेवाईकांना दिलेले आहेत असा माझा आरोप आहे आणि यासाठी मी सीबीआयची मागणी करीत आहे. अशाप्रकारचा भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांना वठणीवर आणले पाहिजे. त्यांच्याकडून कोणत्याही मार्गाने हा निधी वसूल केला पाहिजे. ही कार्यवाही मंत्रिमहोदय करणार आहेत काय ?

सभापती महोदया, सन्माननी सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सिचंनावर अतिशय सुंदर मुद्देसूद मुद्दे मांडले. त्यांचे संपूर्ण भाषण मी ऐकलेले आहे. सर्व निधी पश्चिम महाराष्ट्राकडे वळविला जात आहे. विदर्भाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे. अशा परिस्थितीत विदर्भातील शेतकरी आत्महत्या करणार नाहीत तर काय करणार ? विदर्भात पाटलोट क्षेत्रासाठी मागील दोन-तीन वर्षात एकूण 17 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. परंतु अधिकाऱ्यांनी प्रत्यक्षात 72

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.........

लाख रुपये खर्च केले. मागील वर्षी तसेच यावर्षी विदर्भात मुसळधार पाऊस झाला. पण हे पाणी अडविण्याची कोणतीही तरतूद करण्यात आली नाही. त्यांनी हा निधी खर्च केला नाही. सभापती महोदया, शेतकऱ्यांच्या जीवनमरणाचा प्रश्न निर्माण झाला असताना जर अशाप्रकारची कामे होत असतील तर विदर्भातील शेतकऱ्यांनी कसे जगावे ? त्यांनी आत्महत्या का करु नयेत असा प्रश्न निर्माण झालेला आहे. ही सर्व परिस्थिती पाहिल्यानंतर शेतकऱ्यांना कर्ज माफी देणे आवश्यक आहे आणि त्याप्रमाणे सरकारने धोरणात्मक निर्णय घ्यावा. तसा या सभागृहात एकमताने प्रस्ताव संमत करुन तो केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी पाठवावा. ज्याप्रमाणे आपण पक्षाची मते फुटू नयेत, पक्षाची अब्रू जाऊ नये म्हणून ओपन बॅलेटचा पर्याय स्वीकारला त्याप्रमाणे याही विषयावर एकमताने प्रस्ताव करावा.

यानंतर श्री.रोझेकर......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SRR/ KGS/ MHM/ प्रथम श्री.अजित....... 16:35

श्री.दिवाकर रावते........

शेतक-यांच्या हिताकरिता असा एक प्रस्ताव आणून केंद्राला का पाठवित नाही ? 15 दिवसात कर्ज माफी करावी. आपण मागणी करु त्यामधून केंद्र काही कमी करेल, कॅटेगरी पाडून देईल. परंतु याबाबत एकमुखी प्रस्ताव यावा, अशी अधिकृत मागणी मी या निमित्ताने करीत आहे. कापसाला 2700 रुपये भाव घेतल्याशिवाय आम्ही या सरकारला नागपूरमधून जाऊ देणार नाही आणि आम्हीही जाणार नाही.

सभापती महोदया, कृषि धोरण बदलल्याशिवाय आत्महत्या थांबणार नाहीत. सन्माननीय श्री.शरद पवार यांनी सुध्दा केंद्रामध्ये सुतोवाच केले होते. कृषि धोरणामध्ये बदल आणल्याशिवाय विदर्भातील परिस्थितीत बदल होणार नाही. उपलब्ध पाणीसाठयावर कृषि कशी निर्माण करता येईल, उत्पादनाला कसा भाव देता येईल, सुविधा कशा निर्माण करता येतील याचा विचार करुन कृषि धोरणात बदल करावा लागेल.

सभापती महोदया, बी-बियाणांसंबंधीचा कायदा केंद्राने केला पाहिजे, असे या सभागृहात सांगण्यात आले आहे. बोगस औषधांसंबंधी मी लक्षवेधी सूचना मांडली होती त्यावेळी हा कायदा केंद्राने केला पाहिजे, असे सांगण्यात आले. परंतु, मला असे सांगावयाचे आहे की, माहितीच्या अधिकाराचा कायदा या राज्याने केला. त्यानंतर केंद्राने कायदा केला व मग राज्यातील कायदा निष्प्रभ झाला. त्यामुळे आपल्याला जर आपल्या शेतक-यांना जगवायचे असेल तर आपण यासंदर्भातील कायदे केले पाहिजेत. 120 कोटी रुपयांची औषध खरेदी मराठवाडयात होते, 80 कोटी रुपयांची खरेदी विदर्भात होते आणि यामध्ये 60 टक्के खरेदी ही बोगस असते. पडताळणी झाली आणि बोगस औषधे आढळून आली तर खटला भरण्यासाठी 3 वर्षे लागतात. तिकडे औषध कंपन्या मात्र मौजमजा करतात. बाहेरच्या राज्यातून बनावट औषधे येतात परंतु आपल्या राज्याला या कंपन्यांवर कारवाई करता येत नाही. अशी परिस्थिती असेल तर शेतकरी आत्महत्या करणार नाहीत तर काय करतील ? हा अत्यंत मुलभूत मुद्दा आहे. सन्माननीय कृषिमंत्र्यांनी या सभागृहात मला शब्द दिला होता की केंद्राकडून धोरणात बदल करुन घेऊ. सन्माननीय श्री.शरद पवार यांनी बियाणांचा कायदा लवकरच बदलू असे सांगितले होते. परंतु 2 वर्षे झाली आपण काहीही करु शकलेलो नाही. या कायद्यांमध्ये बदल करणे अत्यंत गरजेचे झाले आहे आणि हा बदल शासनाने लवकरात लवकर करावा, अशी माझी मागणी आहे.

..2..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...........

सभापती महोदया, 6 टक्के दराने नवीन कर्जाची उपलब्धता कशी आणि कधी करणार आहात ? यासंदर्भातील खुलासा मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात केला पाहिजे.

सभापती महोदया, संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत निराधारांना आर्थिक मदत केली जाते. अ आणि ब कॅटेगरीसंदर्भात शासनाने निवेदन केले होते. कारण, परिस्थिती अत्यंत बिकट आहे. मी ज्या ज्या ठिकाणी फिरलो त्या ठिकाणी मला म्हातारे-कोतारे येऊन भेटत होते आणि आमचा पगार कधी देणार हे विचारीत होते. यासाठी आमदारांकडून यादी मागविली जाते, त्यामध्ये फार मोठे राजकारण होते. 3 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार मंत्री करीत असतील, 100, 200 रुपयांसाठी म्हाता-यांना दारोदार हिंडावे लागत असेल तर ते या राज्याला शोभणारे नाही. या म्हाता-यांचे आशिर्वाद घ्या. त्यांचे अश्रू पुसा. लोकशाहीमध्ये 3 सत्ताधा-यांचे 2 विरोधी पक्षाचे अशी नांवे घेऊन हे काम होणार नाही. हे दळभद्री राजकारण यामध्ये आणू नका. आमदारांची समिती रद्द करा आणि सरसकट वय झाले की सर्वांना हा भत्ता लागू करा. अ व ब गटाच्या यादीत असलेले अल्पभूधारक, अल्पउत्पन्नधारक या सर्वांना ही मदत द्या, अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदया, जोडधंद्याच्या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, न खपणा-या गायी आणून विदर्भात देऊ नका. जोडधंदा शेतक-यांना देण्याकरिता योग्य पध्दतीची यंत्रणा तयार करा. विदर्भातील आत्महत्या थांबवण्यासाठी योग्य मदत उभी करा अन्यथा तुमचा नाकर्तेपणा जनता सहन करणार नाही, एवढे सांगतो आणि आपण मला संधी दिल्याबद्दल धन्यवाद देतो. जयहिंद. जय महाराष्ट्र.

------------------

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रमेश निकोसे यांना मिटींगला जायचे असल्यामुळे त्यांना बोलू द्यावे. ते फक्त 2-3 मिनिटे बोलणार आहेत. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी बोलावे.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदया, त्यांचे भाषण झाल्यानंतर मला बोलू द्यावे.

**तालिका सभापती** : आता आपण वेळेचे नियोजन करावयाचे काय ? सन्माननीय सदस्य श्री.रमेश निकोसे यांचे भाषण झाल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी बोलतील.

श्री.रमेश निकोसे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी अत्यंत चांगले भाषण आणि सूचना मांडलेल्या आहेत, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. विदर्भातील यवतमाळ आणि इतर जिल्हयांमधील शेतक-यांच्या घरी जाऊन त्यांनी आत्महत्या केलेल्या शेक-यांच्या कुटुंबियांचे सांत्वन केले. महात्मा गांधी असे म्हणाले होते की, "खेडयामध्ये माझ ा आत्मा आहे." डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी 18 जुलै 1956 नंतर धर्मांतर केले. 18 जुलै रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर असे म्हणाले होते की, "मी गेल्यावर माझ्या खेडयापाडयातील गोरगरीब जनतेचे काय होईल." महात्मा गांधी असे म्हणाले होते की, खेडयापाडयामध्ये लघुउद्योग सुरु झाले पाहिजेत. परंतु अद्याप तशी प्रगती झालेली नाही, असे दु:खाने म्हणावे लागत आहे. माननीय पंतप्रधानांनी आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी जे पॅकेज जाहीर केले त्यामुळे शेतक-यांना थोडाफार दिलासा मिळाला. परंतु सन 2005-06 मध्ये आत्महत्येचे प्रमाण जास्त वाढले, ही दु:खाची बाब आहे. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर युरियाचा उपयोग महाराष्ट्रामध्ये नव्हे तर देशामध्ये झाला. लोकांनी युरिया वापरण्यास सुरुवात केल्यामुळे शेती खराब झाली, निकृष्ठ दर्जाची झाली. त्या शेतीतून पाहिजे तसे उत्पन्न मिळत नाही. माझी अशी सूचना आहे की, त्या युरियावर आणि रासायनिक खतांवर बंदी आणली पाहिजे. कृषी तंत्र विज्ञान विद्यापीठातील प्राध्यापक श्री.देशपांडे हे कोल्हापूर भागातील आहेत. त्यांचे पुस्तक मी वाचलेले आहे. शेतकरी मेळाव्याला माननीय कृषी मंत्री श्री.बाळासाहेब थोरात उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीमध्ये श्री.देशपांडे यांनी जमिनीमध्ये काही प्रात्याक्षिक करुन दाखविले. कोणत्या प्रकारची कमी असल्यामुळे जमीन खराब होते यासंदर्भातील सुंदर भाषण श्री.देशपांडे यांनी शेतकरी मेळाव्यामध्ये केले होते. श्री.देशपांडे

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे ..........

यांची पुस्तके वाचून काही शेतकरी शेती करीत आहेत. माझी कृषी मंत्र्यांना अशी विनंती आहे की, श्री.देशपांडे यांचे पुस्तक शेतक-यांना मोफत देण्यात यावे. शेतक-यांना ते पुस्तक मोफत दिल्यास शेतक-यांना त्याचा फायदा होईल. शेती म्हटले म्हणजे पाणी आले, पाण्याशिवाय शेती करता येत नाही. पाणी म्हटले की, वीज आली. वीज म्हटले की, कृषी पंप आले. प्रत्येक शेतामध्ये विहीर पाहिजे असे आपण म्हणतो आणि ती योजना अनेक वर्षापासून आपण राबविण्याचा प्रयत्न करीत आहोत. ही योजना देखील पूर्ण होऊ शकत नाही, ही दुर्दैवाची बाब आहे. मी माननीय कृषी मंत्र्यांना विनंती करतो की, शेतक-यांचे अश्रू पुसावयाचे असतील तर प्रत्येक शेतामध्ये विहीर झाली पाहिजे.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/ MHM/ KGS/ श्री. बोरले नंतर --- 16:45

श्री. रमेश निकोसे .....

पंप लागलाच पाहिजे आणि त्या पंपाला वीज मिळालीच पाहिजे. जेणे करून विदर्भातील शेतकरी आत्महत्या करणार नाहीत. शेतकऱ्यांना शेती बरोबरच अन्य जोडधंदा करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मदत करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी त्यांना गाई-म्हशी देण्याचे ठरविले. पण त्यासाठी शेतकऱ्याने 15 हजार रूपये प्रथमत: भरायचे म्हणजे त्याला दोन गाई किंवा 2 म्हशी मिळतील. पण ज्याला अगोदरच खायला काही नाही तो 15 हजार रूपये आणणार कोठून ? त्यासाठी कर्ज घेणार कोठून आणि ते त्याला देणार कोण ? 20 हजाराच्या गाई घ्यायच्या असतील तर 10 हजार रूपये तो आणणार कोठून ? म्हणून शेतकऱ्यांना सरकारने 2-2 गाई वा म्हशी मोफत दिल्या तर तो त्यातून निश्चितपणे जोडधंदा करू शकेल आणि त्यामुळेही शेतकरी आत्महत्या करणार नाहीत. सभापती महोदया, दुसरी एक अत्यंत दु:खाची बाब आहे. मी देखील एक शेतकरी आहे. मी रामटेक मध्ये जातो तेव्हा तेथे देवळाच्या पायऱ्यांवर 70-75 वर्षे वयांची म्हातारी माणसे बसलेली दिसून येतात. ते थकलेले असतात, शेतात काही काम करू शकत नाहीत. त्यांच्या स्त्रिया मात्र इंधनाचे आणि बाकीची कामे करण्यास जातात. त्यांना त्यासाठी 15 रूपये रोज मिळतो. जे शेतकरी असतात त्यांची सगळ्यात मोठी दु:खाची गोष्टी ही आहे की, त्यांना जे काही बी-बियाणे बाजारात मिळते ते सारे बोगस असते. मी एका ओळखीच्या व्यापाऱ्याला याबाबत विचारले तेव्हा त्याने मला सांगितले की, हे महाबीजचे बियाणे वगैरे काहीही खरे नाही. प्रत्येक व्यापाऱ्याच्या गोदामामध्ये जाऊन पहा, तेथे गोण्या छापून येतात आणि त्यात बोगस बियाणे भरून तुम्हाला देतात. म्हणूनच या निमित्ताने माझी महाराष्ट्र शासनाला विनंती आहे की, सगळ्यात प्रथमत: आपण एक काम करा आणि ते म्हणजे हे जे सारे व्यापारी आहेत त्यांच्यावर धाडी टाका, त्यांच्या दुकानांवर, गोदामांवर धाडी टाका, त्यांच्या ज्या मोठमोठ्या कंपन्या आहेत त्या बंद करा. त्यांची झडती घ्या. आणखी एक महत्त्वाची गोष्ट अशी की, माझ्या अनुभवास आले आहे की, आपल्या महाराष्ट्रातील खालपासून वरपर्यंतचे अधिकारी भ्रष्ट आहेत. जे मोठ्या दर्जाचे अधिकारी आहेत, ज्यांच्या भ्रष्टाचाराची माहिती होते त्यांच्यावर धाडी टाका, त्यांची नावे सीबीआयला कळवा, प्राप्तीकर खात्याला कळवा. अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांची आपण झडती घेतली तरी आपल्याला कोट्यवधी रूपये मिळतील. मध्यंतरी अशाच एका अधिकाऱ्याकडे कोट्यवधीची रक्कम सापडली आहे. अशाच अधिकाऱ्यांकडून मंत्र्यांना, आमदारांना आणि लोकप्रतिनिधींना बदनाम केले जाते. मात्र या अधिकाऱ्यांच्या घरामध्ये भरपूर पैसा आहे तो आपण उघड्यावर आणा एवढीच विनंती करतो आणि आपला रजा घेतो. ..... 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्रीमती सुधा जोशी) : आता यानंतर सन्माननीय सदस्य श्री.मानकर हे भाषण करतील. ... मी सभागृहाला माहितीसाठी सांगू इच्छिते की, या चर्चेत भाग घेण्यासाठी अजून 27 सदस्यांनी नावे माझ्याकडे दिलेली आहेत. तेव्हा वेळेचे नियोजन कसे करावे हे आपणच मला सांगावे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदया, आपण त्या सदस्यांची नावे वाचून दाखविल्यास आम्हाला आमचा क्रमांक केव्हा येईल हे तरी कळू शकेल.

**तालिका सभापती** : माझ्याकडे जी अधिकृतपणे नावे आलेली आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, सुधाकर गणगणे, जैनुद्दीन जव्हेरी, मुझफ्फर हुसेन, कर्नल सावंत, यशवंतराव गडाख, डॉ. अजीज, गुरूनाथ कुलकर्णी, श्रीमती दराडे, श्रीमती फौजिया खान, सर्वश्री भास्कर जाधव, जगन्नाथ शेवाळे, डॉ. हिराणी, डॉ.वसंत पवार, श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, प्रा.कवाडे, सर्वश्री मधुकर सरपोतदार, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री जेथलिया, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री अरविंद सावंत, उपरकर, मानकर, पाशा, शरद पाटील, कपिल पाटील. ही एवढीच नावे आतापर्यंत माझ्याकडे आलेली आहेत.

श्री. रामनाथ मोते : सकाळी असे सांगण्यात आले होते की, या चर्चेत कोणीही बोलू शकतो त्याप्रमाणे मलाही या चर्चेत भाग घ्यावयाचा आहे.

**तालिका सभापती** : एक गोष्ट सन्माननीय सदस्यांनी लक्षात घेतली पाहिजे की, कोणीही बोलावयाचे याचा अर्थ प्रत्येकाने प्रत्येक वेळी हात वर करून बोलण्याची संधी मिळावी अशी मागणी करावयाची असे नाही. तर त्यासाठी आपण अगोदर नाव दिले पाहिजे. पीठासीन अधिकाऱ्याकडे नाव आल्याशिवाय तो त्या सदस्याला बोलण्याची संधी देऊ शकणार नाही. आता तुमचे नाव यामध्ये समाविष्ट करावयाचे तर एकंदर 28 सदस्य होतात. ही चर्चा महत्त्वाची आहे यात शंका नाही. तेव्हा वेळेचे नियोजन कसे करावयाचे हे आपणच मला सांगावे.

एक सन्माननीय सदस्य : प्रत्येकाला 5-5 मिनिटे द्यावीत.

( यानंतर श्री. सरफरे ....3एक्स 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदया, आजच्या चर्चेमध्ये तीन माननीय सदस्यांनी एक-एक तास भाषण केले आहे. त्यांच्या भाषणामध्ये बहुतेक सर्व मुद्दे आले असल्यामुळे कोणताही मुद्दा शिल्लक राहिलेला नाही असे मला वाटते...

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदया, माझे मुद्दे अजिबात आलेले नाहीत...

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी)** : प्रत्येक माननीय सदस्यांना पाच-पाच मिनिटांचा अवधी देण्याचे ठरले असल्यामुळे चौथ्या मिनिटाला बेल वाजविली जाईल आणि पाचव्या मिनिटानंतर माननीय सदस्यांनी खाली बसावे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदया, माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये पुनरावृत्ती टाळावी याबाबत आपण त्यांना सूचना करावी.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांनी भाषणामध्ये म्हटले की, दोन्ही बाजूकडील माननीय सदस्यांनी एकत्र बसून शेतकऱ्यांविषयी चिंता व्यक्त करावी आणि हा मेसेज संपूर्ण महाराष्ट्रामध्ये जावू द्यावा. त्याकरीता ही चर्चा अखंडीत चालू द्यावी.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदया, प्रत्येक माननीय सदस्यांना कमीत कमी पाच मिनिटांचा अवधी द्यावा. आणि माननीय सदस्यांनी देखील आपले भाषण पाच मिनिटामध्ये संपवावे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, या सभागृहाचा सदस्य झाल्यानंतर आपण मला पहिल्यांदा भाषण करण्याकरीता संधी प्राप्त करुन दिल्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या विषयावर बोलतांना पूर्व विदर्भातील गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली आणि नागपूरचा पूर्वेकडील भाग या भागामध्ये धान उत्पादक शेतकरी मोठया प्रमाणावर आहे. त्या शेतकऱ्याविषयी या सदनामध्ये कुणीही चिंता व्यक्त केलेली नाही या विषयी मला दु:ख वाटते. आपल्या जेवणामध्ये भात असतो, तरीसुध्दा आपण या धान उत्पादक शेतकऱ्याची चिंता केलेली नाही. त्याचप्रमाणे जे पॅकेज जाहीर करण्यात आले त्यामधून धान उत्पादन करणारे जिल्हे वगळण्यात आले ही दुर्दैवाची गोष्ट आहे. गोंदीया, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा या जिल्हयातील धान उत्पादक शेतकऱ्यांनी कोणते पाप केले आहे हे सांगावे? खऱ्या अर्थाने सर्वात गरीब शेतकरी हा धान उत्पादन करणारा शेतकरी आहे. आज आपल्याकडे शेतमजूर काय करतात? चटणीबरोबर भात जेवतात त्यांच्याबद्दल या सदनातील कुणालाही चिंता वाटत नाही ही दुर्दैवाची बाब आहे. पूर्व विदर्भामध्ये आत्महत्या कमी झाल्या म्हणून या भागाला पॅकेज दिले गेले नाही. माझी अशी मागणी आहे की, महाराष्ट्राच्या सर्व जिल्हयातील शेतकऱ्यांच्या कर्जावरील व्याज माफ केले पाहिजे. ही मागणी आपण मान्य करणार आहात की नाही? सर्व शेतकऱ्यांची कर्जमाफी झ ाली पाहिजे, व्याज माफी झाली पाहिजे, कर्जमुक्ती झाली पाहिजे. आणि ही कर्जमुक्ती आपण ताबडतोब केली पाहिजे. आज धानाला चांगला भाव दिला जात नाही. माननीय श्री. अटलजींचे राज्य असतांना धानाला 350 रुपये भाव दिला होता. त्यांचे राज्य गेल्यानंतर धानाचा भाव साडे पाचशे रुपये झाला. राजवट बदलल्यानंतर तीन वर्षात धानाचा भाव किती रुपयांनी वाढला? आज धानाचा हमीभाव 580 रुपये आहे. आपण 40 रुपयांचा बोनस जाहीर केला आहे तो कुणाला मिळाला आहे? याबाबतीत शासनाचा कोणताही निर्णय स्पष्ट नाही.

यानंतर श्री. किल्लेदार...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ MHM/ पूर्वी श्री.सरफरे... 16:55

श्री.केशवराव मानकर (पुढे सुरु...

ज्या शेतकऱ्यांनी धान खरेदी केंद्रावर धान विकले असेल तर त्यांना शासन 40 रुपये बोनस देणार आहे. पण ज्या शेतकऱ्यांनी आपले धान कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये घातले तर त्यांना बोनस मिळणार आहे काय ? त्या बाबातचा मंत्री महोदयांनी खुलासा करावा. एका गोष्टीचे दु:ख होते की, भाताच्या एफअेक्युचा दर आणि नॉन एफअेक्युचा दर वेगळा ठेवलेला आहे. नॉन एफअेक्यु म्हणजे काय हे समजत नाही. नॉन एफअेक्युच्या भाताला 437 रुपये क्विंटल असा भाव दिलेला आहे. नॉन एफ.अे.क्यू.चा भात सरकारच्या समोर भरडला जातो तो देखील स्वच्छ आणि पांढरा शुभ्र असतो तरीही त्याला कमी भाव दिला जातो, हे आदिवासी शेतकऱ्यांवर अन्याय करण्यासारखे आहे. भाताचे चार-पाच प्रकारचे भाव आहेत. 470,480,510,520 आणि 580 रुपये क्विंटल. भाताला भाव कमी असल्यामुळे शेतकऱ्याला उत्पादन खर्चही तेवढा मिळत नाही, मग शेतकरी आत्महत्या करतील नाही तर काय करणार ? माझे असे म्हणणे आहे की, ब्रिटिश सरकारपासून आणेवारीची पध्दती आहे,ती बदलली नाही, म्हणून शेतकरी दारिद्र्यात राहिलेला आहे. एक एकरामध्ये किती क्विंटल धान आले पाहिजे, याचा कोठेतरी विचार केला पाहिजे. एक एकरामध्ये तीन-चार क्विंटल धान पिकले तर 100 टक्के आणेवारी धरली जाते, हे दुर्दैव आहे, बियाणे, रासायनिक खते टाकूनही 15 क्विंटल पर्यन्त उत्पादन होते असे असताना दुसरीकडे पिकावर रोग पडला तर धान एकरी पाच ते सात क्विंटल होते. धानाचे एकरी उत्पादन कमी आल्यामुळे शेतकरी नाडला गेलेला आहे. धानाचे उत्पन्न कमी आले तरी 100 टक्के आणेवारी दाखविण्यात आल्यामुळे त्या शेतकऱ्याला कोणतीही सवलत मिळत नाही. बाबा आजमच्या काळापासून ही आणेवारी चालत आलेली आहे, त्यामध्ये बदल करणार आहात की नाही ? याबाबत शासनाने स्पष्टीकरण करावे. आज पश्चिम विदर्भातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत, त्याचे लोण सर्वत्र पसरून विदर्भातील सगळेच शेतकरी आत्महत्या केल्याशिवाय रहाणार नाहीत. मोरगाव अर्जूनी तालुक्यातील शेतकऱ्यांनी मागण्या मान्य करत नाहीत म्हणून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला. 400 ते 500 शेतकरी हे आमरण उपोषणाला बसले होते. मी निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, मागच्या वर्षी गारपीट झाली, शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे नुकसान झाले. कॉंग्रेसच्या आमदारांनी आंदोलन केले, त्यानंतर सरकारने 20 कोटी रुपयाचे पॅकेज जाहीर केले. आमदारांनी यासंबंधात पोस्टर छापून जाहिरात केली. परंतु प्रत्यक्षात 20 कोटी रुपये मिळालेच नाहीत. माझ्या विभागातील 289

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/ MHM/

श्री.केशवराव मानकर (पुढे सुरू..

शेतकऱ्यांना मदत मिळविण्यासाठी त्यांच्या अर्जाची फाईल मी स्वत: माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे घेऊन गेलो. परंतु त्या शेतकऱ्यांना अजून न्याय दिलेला नाही. मग शेवटी शेतकरी आत्महत्या करणार नाहीत तर काय करणार ?

यानंतर श्री.बरवड....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ....

त्याशिवाय त्यांना दुसरा पर्याय नाही.

सभापती महोदया, शासनाची आदिवासी प्रकल्प यंत्रणा आहे. त्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शेतीसाठी पंप वाटले गेले. ज्यांच्याकडे वीज कनेक्शन नाही त्यांना त्या पंपाचा काहीच उपयोग नाही. अशी अनेक कृषी हत्यारे आहेत. त्यांना डिझेल पंप दिले जातात. ज्यांच्याकडे विहीर नाही त्यांना पंप दिले जातात परंतु ज्यांच्याकडे विहीर आहे, पंप आहे त्यांना विजेचे कनेक्शन नाही अशी विदर्भाच्या पूर्व विभागातील शेतकऱ्यांची परिस्थिती आहे. गारपीट झाल्यानंतर कोणत्याही शेतकऱ्याला विम्याचे पैसे मिळालेले नाहीत. त्या ठिकाणी आकस्मिक आगी लागतात. मी आज फोटो आणलेले नाहीत. मी ते आपल्याला पुढच्या आठवड्यात दाखवीन. एका शेतमजुराने 7 हजार रुपये देऊन चार एकर शेती करावयास घेतली. त्यावर पूर्ण परिवाराने मेहनत घेतली. धान कापल्यानंतर त्याचे पुंजने लावले होते त्याला आग लागली आणि ते सर्व पुंजने जळाले. त्याचे जीवन उद्ध्वस्त झालेले आहे. भंडारा, गडचिरोली जिल्हयाची अशी परिस्थिती आहे. शिरपूर येथे सार्वजनिक पुंजने ठेवलेले होते. त्या ठिकाणी आग लागून अर्धे पुंजने जळाले. गावकऱ्यांच्या सहाय्याने ती आग विझवण्यात आली. त्या ठिकाणी पाण्याची सोय नाही. ज्या ठिकाणी पुंजने असतील त्या ठिकाणी पाण्याची सोय असली पाहिजे. आगस्मिक आग कधी लागेल, कशी लागेल हे सांगता येत नाही. या नैसर्गिक आपत्तीला निपटण्यासठी आमच्याकडे दुसरा कोणताही पर्याय नाही. मला अशी विनंती करावयाची आहे की, धान उत्पादक शेतकऱ्यांचे जे मळे आहेत ते शासनाने चांगले तयार करुन द्यावेत. आग लागली तर ती विझवण्यासाठी त्या ठिकाणी पाण्याची सोय केली पाहिजे. परंतु असे होत नाही. त्या ठिकाणी चांगले बियाणे मिळत नाही. रासायनिक खते मिळत नाहीत. शेतकऱ्यांकडून 100-100 रुपये जास्त घेतात. युरिया काळ्या बाजारामध्ये विकला जातो. मी कृषी आयुक्तांना फोन केला आणि सांगितले की, युरियाचा पुरवठा लवकर करावा. 250 रुपयांचा युरिया 325 ते 350 रुपयास विकला जातो ही शोकांतिका आहे. शेतकऱ्याला भाव मिळत नाही. हा शेतकरी काय करणार ? त्याला दुसरा कोणताही पर्याय नाही. माझी पहिली मागणी अशी आहे की, धानाला प्रति क्विंटल 1 हजार रुपये भाव दिला पाहिजे. ही मागणी रास्त आहे. शासन 580 रुपये

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ....

भाव देते. 40 रुपये बोनस हा टेम्पररी आहे. हा बोनस त्यामध्ये मिळवला तरी एकूण 620 रुपये होतात. देशाच्या कृषी मूल्य आयोगाच्या म्हणण्यानुसार 1 क्विंटल धानाचा उत्पादन खर्च 965 रुपये आहे. जर आपण याला धंदा म्हटले आणि मुनाफा त्यामध्ये जोडला तर फक्त 35 रुपये मुनाफा आहे. आमची मागणी रास्त आहे. धानाला 1 हजार रुपये भाव दिलाच पाहिजे.

त्याचबरोबर दुसरी मागणी अशी आहे की, जे धान उत्पादक शेतकरी आहेत त्यांच्या पंपाला 24 तास वीजपुरवठा असला पाहिजे. शासनाने त्यांच्या वीजपुरवठयाची वेगळी व्यवस्था केली पाहिजे. मी लोडशेंडिंगच्या बाबतीत बोलत नाही. परंतु शेतकऱ्यांच्या शेतीला पाणी पुरवावयाचे असेल, संपूर्ण महाराष्ट्रामध्ये हरितक्रांती करावयाची असेल तर शेतकऱ्यांना 24 तास विजेची उपलब्धता करुन दिली पाहिजे. शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती झाली पाहिजे. ती कर्जमुक्ती टप्प्याटप्प्याने केली तरी चालेल. आपण शिक्षकांना नोकरी देत असताना 20 टक्के, 40 टक्के, 60 टक्के, 80 टक्के आणि 100 टक्के याप्रमाणे अनुदानावर आणतो त्याप्रमाणे सरकारने या कर्जाची जबाबदारी घ्यावी.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. केशवराव मानकर...)

दरवर्षी 20-20 टक्क्याप्रमाणे 5 वर्षे पैसे देऊन शेतक-याचे संपूर्ण कर्ज माफ करावे. तसेच नवीन कर्ज 4 टक्के दराने देऊन शेतक-यांच्या आत्महत्या थांबण्यासाठी शासनाने मदत करावी अशी मी शासनाला प्रार्थना करतो आणि शेतक-यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्नावर बोलण्यासाठी मला संधी दिली त्याबद्दल तालिका सभापती महोदया, आपले आभार मानून मी माझे दोन शब्द संपवितो.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत रघुवंशी (धुळे तथा नंदुरबार स्थानिक प्राधिकारी संस्था) : तालिका सभापती महोदया, शेतक-यांच्या आत्महत्येच्या दुर्दैवी प्रश्नावर आपण याठिकाणी चर्चा करीत आहोत. हा राजकारणाचा विषय नाही. राज्य कोणाचेही असले तरी अशी परिस्थिती राज्यामध्ये निर्माण होऊ नये असे प्रत्येक माणसाला वाटल्या शिवाय रहात नाही. येणा-या अडचणीतून कसा मार्ग काढता येईल याबद्दल अगोदरच्या वक्त्यांनी शासनाला सूचना केलेल्या आहेत. मी सदनाचा जास्त वेळ घेणार नाही. मी हे सांगू इच्छितो की, शासन हे शेतक-यांना नेहमीच मदत करीत असते. कापसावर लाल्या रोग पडल्यानंतर शासनाने शेतक-यांना मदत केलेली आहे, अतिवृष्टीमध्ये कृषी विभागामार्फत पंचनामे करुन शेतक-यांना मदत केलेली आहे. पूरपरिस्थतीमध्ये देखील शेतक-यांना मदत केलेली आहे. अशा सर्वस्तरावर शेतक-यांना मदत करुन सुध्दा आम्हाला यश येत नसेल तर याबाबतीत कोठे तरी आत्मचिंतन करावे लागेल. समाजातील सर्व नेत्यांनी एकत्र बसून यातून मार्ग काढावा लागेल आणि भविष्यात असे प्रसंग येऊ नयेत यासाठी नियोजन करावे लागेल. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख हे नेहमीच अनुशेषासंबंधी याठिकाणी पोटतिडिकीने बोलत असतात. आज राज्य शासनावर 1 लाख हजार कोटीचे कर्ज आहे. महाराष्ट्रातील सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी 10 हजार कोटी रुपये लागणार आहेत. आता एवढे कर्ज असल्यानंतर पुन्हा 10 हजार कोटीचे कर्ज काढून राज्यातील सर्व सिंचन प्रकल्प पूर्ण करा असेही काही जण म्हणू शकतात. महाराष्ट्रातील जनतेला सर्व चित्र माहीत आहे. प्रादेशिक असमतोल दूर करण्याची शासनाची जबाबदारी आहे. शासनाने शेतक-यासाठी जे जे काही करता येईल ते केले पाहिजे. शेतक-यांना 6 टक्के दराने कर्ज उपलब्ध करुन देण्याची भूमिका शासनाने स्वीकारली, याचे रिझल्टस आपणाला पुढील वर्षापर्यंत दिसतील. जे शेतकरी वेळेवर पीक कर्ज फेडतील त्यांना 4 टक्के व्याज आकारले जाईल असेही शासनाने जाहीर केलेले आहे. असे विविध उपाय घेऊन शासन पुढे येत आहे. अशा वेळी राजकारणाच्या बाहेर जाऊन शेतक-यांसाठी काही मदत करता येईल का याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे.

तालिका सभापती महोदया, मी या सदनामध्ये सांगू इच्छितो की, आमच्या नंदूरबार जिल्हयामध्ये दरडोई उत्पन्न अगदी कमी आहे. दरडोई उत्पनामध्ये नंदूरबार जिल्हा अगदी शेवटी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. चंद्रकांत रघुवंशी...)

म्हणजे 35व्या क्रमांकावर आहे. नंदुरबार जिल्ह्यातील सिंचन प्रकल्प अपूर्ण असून तापीच्या एका बॅरेंजमध्ये पाणी अडलेले नाही. असे असताना नंदूरबार जिल्हयातील आमचा आदिवासी आत्महत्या करीत नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे संपूर्ण महाराष्ट्रभर फिरले. परंतु नंदूरबार जिल्हयामध्ये आत्महत्या केलेल्या शेतक-याच्या घरी भेट देण्याची वेळ त्यांच्यावर आलेली नाही. हे आत्महत्येचे लोन महाराष्ट्रभर पसरेल की काय अशी मला भीती वाटत आहे. ही गोष्ट तुम्हा आम्हा सर्वांना चिंतन करायला लावणारी आहे. शेतक-यांची कर्जे माफ करुन, त्यांची वीज बिले माफ करुन, त्यांना सबसिडी देऊन, त्यांच्या आत्महत्या थांबतील असे नाही.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत रघुवंशी.........

कर्ज कोणावर नसते? शेतकरी कुटुंबामध्ये जन्माला आलेल्या प्रत्येक माणसावर कर्ज आहे. अशा वेळेला जर नाउमेद होऊन शेतकरी आत्महत्या करु लागले तर ही बाब समाजाच्या दृष्टीने घातक आहे. म्हणून समाजातील सर्व लोकांनी याचा विचार केला पाहिजे आणि भविष्यामध्ये या समस्येतून महाराष्ट्राला बाहेर कसे काढता येईल यासाठी प्रयत्न केला पाहिजे. हे लोण जर आमच्या भागात आले तर आमचा जो आदिवासी माणूस लंगोटी लावून फिरतो, एकच पीक वर्षातून घेतो, सिंचनाचे क्षेत्र नाही, सातपुडा पर्वतामध्ये एकवेळ चटणी भाकर खाऊन जगतो. त्याच्या घराला छत सुध्दा नाही. तरी सुध्दा आलेल्या संकटातून मार्ग काढून जीवन जगतो. म्हणून माझी सर्व लोकप्रतिनिधींना विनंती आहे, या प्रश्नाचा साकल्याने विचार करावा लागेल. राजकीय दोषारोप न करता, पॅकेज जाहीर केले त्यामध्ये एवढे दिले, एवढे दिले नाही, एवढे अखर्चित राहिले असे सांगून मार्ग निघणार नाही. सर्वांनी संघटितपणे या गोष्टीबाबत विचार करावा लागेल. ज्यामुळे सरकारला कायमस्वरुपी निर्णय घेता येईल. तात्पुरती उपाययोजना न करता कायमस्वरुपी प्रश्न कसे सुटतील, सर्वसामान्य शेतकऱ्यांना न्यास कसा देता येईल यासाठी जे व्हायचे ते होईल, रोज थोडे थोडे मरण्यापेक्षा एकदा मेलेले परवडेल, महाराष्ट्रावर एवढे कर्ज असताना शेतकऱ्यांसाठी थोडेफार कर्ज उभारावे लागले तर ते उभारावे आणि त्या माणसाला न्याय द्यावा एवढीच नम्र विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या या विषयावर यापूर्वी बऱ्याच वेळेला चर्चा झालेली आहे. आपण सर्व विधान परिषदेतील सदस्य व समाजातील प्रत्येक माणसाला कधी ना कधी, कुठे ना कुठे मृत्यू शय्येवर असलेल्या माणसाचा मृत्यू जवळून पहावयास लागलेला असतो. माणसाच्या शरीरातून प्राण निघून जातो. त्यावेळेला शेवटचे काही क्षण ज्यावेळी माणूस मृत्यू आणि जीवन याच्या सीमारेषेवर उभा असतो त्यावेळी मधला असा एक क्षण येतो तेव्हा त्या माणसाचा प्राण हरपला असे लक्षात येते. आपण जिवंत आहोत आणि त्या माणसाचा प्राण निघून गेलेला आहे, अत्यंत करुण आणि माणुसकीला अंतर्मुख करेल अशा प्रकारचा क्षण असतो. ज्यावेळेला ती व्यक्ती कायमची जीवन सोडून गेलेली असते पण कोणी काहीही करु शकत नाही. अपघाताने, कधी आजाराने किंवा वेगवेगळया नैसर्गिक कारणामुळे मृत्यू होतात त्यावेळची देखील भावना हेलावून टाकणारी असते आणि आपण सद्‌गदीत होत असतो. आपण स्वत:लाच विचारतो, या गोष्टीला औषध नाही का? पिढ्यान्‌पिढ्या, संस्कृतीच्या संस्कृती, वर्षानुवर्षे, 28 युगे झाली. याचा शोध घेतला जात आहे. परंतु उत्तर मिळालेले नाही. अशा वेळेला असा मृत्यू स्वत:हून एखादी व्यक्ती स्वीकारते, स्वत:हून एखादा माणूस असा म्हणतो की, सगळयांना आवडणारे माझे जीवन संपविणार आणि त्या निर्णयाप्रत तो माणूस येऊन पोहोचतो ती शोकांतिका एका अर्थाने फार मोठा, समाजाच्या चिंतेचा, प्रबोधनाचा विषय आहे. प्रश्न असा पडतो की, एका बाजुला साप चावू नये म्हणून धडपडणारा माणूस, रस्ता क्रॉस करताना ट्रकने उडवू नये म्हणून नीट रस्ता क्रॉस करणारा माणूस, 2-3 महिने आधी आत्महत्येचा विचार करीत असतो. त्याला आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी आपण काय करु शकतो यावर खरे तर खूप अभ्यास झालेला आहे. मी स्वत: स्त्रियांच्या चळवळीमध्ये काम करीत आहे. आत्महत्येच्या लक्ष्मणरेषेवर जाऊन फिरलेल्या अनेक व्यक्ती आहेत. ज्याप्रमाणे ओढ्यावर जीव द्यायला आलेली व्यक्ती, तिला धरुन ठेवले जाते आणि दर्शन घेऊन येऊ असे म्हटले असता ती व्यक्ती जगते. जी व्यक्ती रात्री कोणतेही दु:ख नसताना आत्महत्येचा विचार करीत असते परंतु फोन बेल वाजल्यानंतर आत्महत्येचा निर्णय बदलवू शकते. गाव पातळीवर प्रश्न खूप आहेत. सगळया प्रश्नांना उत्तरे देण्याचा शासन प्रयत्न करते..........

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

सभापती महोदया, काही बाबतीत शासन कमी पडते पण तरी सुध्दा जगण्याच्या सीमारेषा कमी पडतात, आत्महत्येचा निर्णय बदलू शकणारे उत्तर मिळण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदया, शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात बरीच कारणे आहेत. मुलीच्या लग्नासाठी हुंडा देणे, पीक न येणे, दुष्काळ येणे, कर्ज होणे अशी साधारणत: आत्महत्येची कारणे आहेत. परंतु अकोला जिल्हयातील अकोटमधील दिपाली गणगणे या विद्यार्थीनीने आत्महत्या केलेली आहे. त्या दिवशी या विद्यार्थीनीने "शेतकरी आत्महत्या का करतात"? यासंदर्भातील एका वक्तृत्व स्पर्धेत भाग घेतला होता व शेतक-यांची कशा प्रकारे दुर्दशा आहे याची व्यथा मांडली होती. वक्तृत्व स्पर्धेनंतर घरी गेल्यानंतर घरची परिस्थिती पाहून आपल्या कुटुंबाला आता काहीच आशा नाही असे वाटल्यामुळे तिने विष घेऊन आत्महत्या केली, आपले जीवन संपविले. मला असे वाटते की, आत्महत्येचे लोण आता विदर्भ, मराठवाडयाबरोबर पश्चिम महाराष्ट्र, खानदेश या ठिकाणी तुरळक प्रमाणात का होईना पण पोहचलेले आहे. या ठिकाणी माननीय सदस्य श्री. रघुवंशी साहेबांनी सांगितले की, आमच्या आदिवासी भागात जर हे लोंण आले तर आमचा आदिवासी माणूस उभाच राहू शकणार नाही. परंतु मला सांगावेसे वाटते की, नंदूरबारच्या आदिवासी भागात मूल जन्माला आल्याबरोबर त्याला कुपोषणाची साथ लाभते. या ठिकाणाी फार मोठया प्रमाणात मुले कुपोषणाने मरण पावतात. आता प्रश्न हा येतो की, लहानपणी कुपोषण व्हावयाचे की, मोठे झाल्यानंतर आत्महत्या करायची? मला असे वाटते की, आत्महत्या रोखण्यासाठी, कोणत्याही प्रकारची यंत्रणा नाही. मला तर असे वाटते की, आपल्या पेक्षा दुस-याचे दु:ख जास्त आहे, जास्त दु:ख असणारी व्यक्ती कशी संकटमुक्त झाली याची जाणीव करुन दिली तर आत्महत्या करणारी व्यक्ती आत्महत्या करणार नाही. यामध्ये खरे म्हणजे एका शेतक-याने दुस-या शेतक-याला स्वसहाय्य मदत केली पाहिजे. परंतु सामाजिक मदत गावपातळीवर मिळत नाही. सामाजिक मदत न मिळण्यामध्ये सुध्दा बरीच कारणे आहेत. यामध्ये राजकारणातील वेगवेगळा पक्षपात, जे प्रभावी पुढारी आहे, ज्यांच्या बरोबर नेहमी 5-25 माणसांची कोंडाळी असते, ज्यांच्या बरोबर गाडयांचा ताफा असतो अशा मोठया माणसाकडे मग त्यामध्ये आमदार असतील, खासदार असतील, बँकेचे अधिकारी असतील अशा व्यक्तींकडे ही व्यक्ती आपले प्रश्न, आपल्या व्यथा मांडू शकत नाही हा महत्वाचा भाग आहे. त्याला या मोठया

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे....

व्यक्तींकडे कोंडाळे फोडून जाता येत नाही. त्या माणसाला वाटते की, माझी वर पर्यंत ओळख नाही , राजकारणामध्ये माझी कोणाशी ओळख नाही, माला कोणी वाली नाही अशी असहाय्यतेची जाणीव त्याला होत असल्यामुळे अनेक ठिकाणी अशा प्रकारे आत्महत्या झालेल्या आहेत. विदर्भामध्ये इतर भागापेक्षा आत्महत्येचे प्रमाण अधिक आहे. सभापती महोदय, शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात या सभागृहात ब-याच वेळा चर्चा झालेली आहे. परंतु या चर्चेतुन आजपर्यंत ठोस अशी उपाययोजना निघु शकलेली नाही. केवळ काही तरी थातुर मातूर उत्तर देऊन समाधान करण्याचा प्रयत्न केला जातो. आत्महत्येच्या संदर्भात केवळ घोषणा केली जाते परंतु त्यासाठी कोणत्याही प्रकारची अंमलबजावणी केली जात नाही. माननीय पंतप्रधानानी यासाठी एक पॅकेज आणले होते परंतु या पॅकेजचा सुध्दा काही एक उपयोग झालेला नाही. महाराष्ट्रातच आत्महत्या होतात असे नसून आंध्र आणि इतर राज्यामध्ये सुध्दा शेतकरी आत्महत्या करीत आहे. आत्महत्या हा काही एका राज्याचा विषय नाही. जोपर्यंत ग्रामीण भागतील आर्थिक विषमता दूर होत नाही, कृषीमध्ये विकास होत नाही, शहरी भागाच्या तुलनेने ग्रामीण भागाचा विकास होत नाही, सुधारणा होत नाही तोपर्यंत या आत्महत्या थांबू शकणार नाही. आत्महत्येच्या संदर्भात वेगवेगळे निवेदने कार्यकर्त्यांकडून येत असतात. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी अग्रीमाचे पैसे वेळेवर मिळाले पाहिजेत अशी मागणी केलेली आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे......

या मागण्यांसाठी सातत्याने आंदोलने झालेली आहेत. गेल्यावर्षी आम्ही धानाच्या प्रश्नासंदर्भात लक्षवेधी सूचना दिली होती.त्यावेळी उत्तर देताना मंत्रिमहोदयांनी सांगितले होते की, आम्ही नुकसान भरपाई देऊ. काही शेतकऱ्यांना 150 ते 200 रुपये नुकसान भरपाई मिळाली. त्यासाठी त्यांना बँकेत खाते उघडण्यास सांगण्यात आले. नंतर असे लक्षात आले की, ही नुकसान भरपाई एकरी देण्यात आली. सभापती महोदया, महसूल मंत्र्यांनी आश्वासन देताना सांगितले होते की, कुटुंब प्रमुख नसलेल्या शेतकऱ्याची आत्महत्या झाली नसेल तर त्या कुटुंबाला नुकसान भरपाई मिळणार नाही. ग्रामीण भागात अजूनही संयुक्तकुटुंब पध्दती अस्तित्वात आहे. जरी ते वेगवेगळे राहत असले तरी सात-बाराच्या उताऱ्यावर त्यांची एकत्रित नावे असतात. आम्ही जेव्हा ही तांत्रिक बाब निदर्शनास आणली तेव्हा आम्हाला सांगण्यात आले की, याबाबतीत जरुर विचार करण्यात येईल. परंतु त्या संदर्भातील कार्यवाही झाली किंवा कसे हे अजूनही आम्हाला समजू शकलेले नाही.

सभापती महोदया, सोयाबीन पिकाला 1500 रुपये भाव मिळावा अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. शेतकऱ्यांना उत्कृष्ट प्रतीची बी-बियाणे मिळत नसल्यामुळे देखील त्यांना मोठ्या प्रमाणावर संकटांना तोंड द्यावे लागत आहे. शेतकऱ्यांची दुसरी अडचण म्हणजे ग्रामीण भागात होत असलेले 12-12 तासांचे लोडशेडींग. या लोडशेडींगमुळे पाणी असूनही शेतकरी आपल्या शेतीला पाणी देऊ शकत नाही. उभी पिके मरताना तो पाहत आहे. शहरी भागात 91 टक्के वीज उपलब्ध आहे तर ग्रामीण भागात फक्त 9 टक्के वीज उपलब्ध होत आहे याचा देखील विचार करण्यात यावा.

सभापती महोदया, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सिंचनाच्या बाबतीत अतिशय मुद्देसूद विचार येथे मांडले. सभागृहाला कल्पना असेलच की, प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांना इस्पितळात दाखल करण्यात आले आहे. सभापती महोदया, मी या सभागृहात येण्यापूर्वी जुन्या सदस्यांची म्हणजे ॲड. दत्ता पाटील, श्रीमती मृणाल गोरे यांची प्रोसिडींग्ज वाचली. ही माणसे आता कोठे गेली ? त्यांनी ज्या पोटतिडकीने लोकांच्या समस्या मांडल्या त्या समस्या सुटल्या का ? याचा मी विचार करीत आहे. आपण याठिकाणी जी चर्चा करतो त्याच्या फायदा त्या लोकांपर्यंत पोहोचत नसेल तर त्या चर्चेचा काय फायदा आहे ? तेव्हा या सर्व प्रश्नांचा विचार करता

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे......

शेतकऱ्यांना कर्जमाफी दिल्या शिवाय पर्याय नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करुन माननीय बाळासाहेब ठाकरे यांनी कर्जमाफी,वीज माफीची घोषणा केली होती. सभापती महोदया, आज अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे की, शेतकऱ्यांना स्वत:बद्दल आत्मविश्वास वाटत नाही. त्याने कर्ज काढलेले असल्यामुळे त्याच्या मनात एकप्रकारची भीती निर्माण झालेली आहे, त्याला सारखे वाटत असते की, माझ्या घरावर जप्ती तर येणार नाही ना ? बँकेचे अधिकारी मला बाजारात अडवून माझ्याकडे कर्जाच्या वसुसाठी तगादा तर लावणार नाही ना ? अशा अनेक विचारांनी तो घेरला गेलेला आहे. बँकेचे अधिकारी सांगतात की, आम्ही त्यांच्या घरावर जप्ती आणलेली नाही. पण अधिकारी बावळट नाहीत, ते स्वत: जाणार नाहीत, ते दुसऱ्यांना पाठवितात.

सभापती महोदया, अवेळी पडणाऱ्या पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होते. केळी,संत्रा, सोयाबीन इत्यादी...

**तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी )** : सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी त्यांचे विचार थोडक्यात मांडावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, या विषयावर चर्चा करण्यासाठी सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांच्यामध्ये वेळेचे वाटप झालेले नाही....

**तालिका सभापती** : माझी आपणास कोणत्याही प्रकारची आडकाठी नाही, परंतु इतरही सदस्यांना त्यांचे विचार व्यक्त करायचे आहेत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदया, आम्हाला आमच्या भावना व्यक्त करायच्या आहेत.

यानंतर श्री.रोझेकर......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे........

आम्ही या ठिकाणी वेळ घालविण्यासाठी बोलत नाही तर आमच्या ज्या काही सूचना आहेत त्यांची उत्तरे सरकारकडून मिळणे आम्हाला अपेक्षित आहे. अन्यथा, सरकारने हे जाहीर करावयास हवे की, आम्ही सर्वज्ञानी पंडित आहोत पण अंमलबजावणी करु शकत नाही.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदया, सरकारचे काहीही म्हणणे नाही. केवळ जे मुद्दे पूर्वीच्या सन्माननीय सदस्यांच्या भाषणात आलेले आहेत त्याचे रिपिटेशन होऊ नये. असे झाले तर जास्तीत जास्त सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळेल. कारण सुरुवातीच्या 3 सन्माननीय सदस्यांनी प्रत्येकी 1 तास भाषण केलेले आहे.

**तालिका सभापती**, **श्रीमती सुधा जोशी** : सर्वच सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, मुद्यांचे रिपिटेशन करु नये आणि नवीन मुद्दे कमीतकमी वेळेत मांडावेत.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदया, आपण एक संवेदनशील व्यक्ती आहात, अशी माझी खात्री आहे. पीक विमा योजनेसंदर्भात मी बोलत होते. याच विषयावरील माझी लक्षवेधी सूचना आज कार्यक्रमपत्रिकेत आली नाही. ज्या शेतक-यांचे नुकसान झाले आहे त्या शेतक-यांना नुकसान भरपाई वेळेवर न मिळाल्यामुळे अनेक शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत, अशीही उदाहरणे आहेत. लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळी मी हा मुद्दा मांडणार आहे. या सगळया प्रश्नांच्या संदर्भात अनेक भागामध्ये नदीकाठचे जे बुडित क्षेत्र आहे त्याबद्दल वेगळी नुकसानभरपाई देण्याची आवश्यकता आहे. मला शेवटी असे म्हणावयाचे आहे की, शासनाने विविध 5 समित्यांचे याच विषयावरील अहवाल तज्ञांकडून मागविले आहेत. आता मला असे विचारावयाचे आहे की, या अधिवेशनात शासन आणखी कोणती समिती नेमणार आहे ? म्हणजे आम्ही लोकांना सांगू की, अहवालाची पाने धुंडाळा. प्रत्येक अहवालात सारख्याच सूचना आहेत. मग अंमलबजावणी का होत नाही ?

दुसरा मुद्दा असा आहे की, समुपदेशन हा शब्द हल्ली वारंवार उच्चारण्यात येतो. समुपदेशन कोणी आणि कुणाचे करावयाचे ? कसे करावयाचे ? शेतक-याचे करावयाचे असेल तर बँक अधिकारी कसे वागले पाहिजेत, स्थानिक तहसिलदार कसे वागले पाहिजेत, कृषि विभागाचे अधिकारी कसे वागले पाहिजेत यासाठी त्यांचे आधी समुपदेशन करणे आवश्यक आहे. कारण, हा प्रॉब्लेम अधिका-यांचा आहे. आपण अनेक चित्रपटात बघतो की, जो चांगला आहे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे..............

त्याला वेडयाच्या इस्पितळात टाकायचे आणि त्याला वेडा ठरवायचे. अशाच पध्दतीने शेतक-यांना आत्महत्या करण्यासारखी परिस्थिती निर्माण करावयाची आणि पुन्हा त्यांचेच समुपदेशन करावयाचे, हे बरोबर होणार नाही. त्याऐवजी आपली जी यंत्रणा आहे ती ठीकठाक करावी, असे या निमित्ताने सांगते. मला बोलण्याची संधी दिली, त्याबद्दल आभार मानते. धन्यवाद.

---------------

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भामध्ये या सभागृहामध्ये, खालच्या सभागृहामध्ये, संपूर्ण राज्यामध्ये आणि देशामध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. आपण देखील या विषयावर सातत्याने चर्चा करीत आहोत. परंतु नेमका इलाज सापडत नाही, हे आपले दुर्दैव आहे. आपल्या देशाचे दुष्यंत कवी असे म्हणतात की, "कैसे कैसे मंजर सामने आने लगे है, लोग कैसे कैसे चिल्लाने लगे हैं, अब तो तालाब का पानी बदल दो, क्योंकि कमल के फूल कुम्हलाने लगे हैं." सभापती महोदय, आमचा शेतकरी ज्या व्यवस्थेचा बळी आहे त्या व्यवस्थेला आम्ही पायदळी तुडविणार आहोत की नाही ? ज्या व्यवस्थेमुळे आमच्या शेतक-याला आत्महत्या करणे भाग पडत आहे त्या व्यवस्थेचा दफनविधी आम्ही केव्हा करणार आहोत ? हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. आमच्या देशाचे माजी पंतप्रधान स्वर्गीय लाल बहादूर शास्त्री यांनी "जय जवान, जय किसान" चा नारा दिला. देशाचे संरक्षण जवान करतात. सीमेचे संरक्षण जवान करतात आणि या देशाचे प्राण शेतकरी वाचवित असतो. त्याच्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. आत्महत्या का थांबत नाहीत ? मागच्या अधिवेशनामध्ये शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भामध्ये चर्चा झाली. त्यावेळी माननीय मुख्यमंत्री महोदयांनी पॅकेज घोषित केले. आम्हाला असे वाटले होते की, आता तरी शेतक-यांना दिलासा मिळेल, शेतक-यांच्या आत्महत्या थांबतील. परंतु आज शेतक-यांच्या आत्महत्या वाढत आहेत. देशाच्या पंतप्रधानांना आत्महत्याग्रस्त भागाला भेट देणे भाग पडले. त्यांनी शेतक-यांना दिलासा दिला. पॅकेज दिले. तरीही शेतक-यांच्या आत्महत्या का थांबत नाहीत ? जसा एखादा साथीचा रोग पसरतो त्याप्रमाणे हे आत्महत्येचे लोण पसरत आहे. आत्महत्येचे लोण पसरु नये याची दक्षता घेणे आवश्यक आहे. शेतकरी आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. भारतीय अर्थव्यवस्थेचा विद्यार्थी म्हणून मी शेतीच्या अर्थव्यवस्थेविषयी अभ्यास केला. आपल्या देशामध्ये कृषी अर्थव्यवस्था आहे. शेती हा आमच्या देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या कण्याचा शेतकरी हा आधार आहे आणि तो कमजोर झाला तर आमच्या देशाची अर्थव्यवस्था कोलमडल्याशिवाय राहणार नाही. म्हणून देशाला ताठ मानेने अभे करावयाचे असेल तर शेतकरी ताठ मानेने उभा राहिला पाहिजे, ही जाबाबदारी राज्य सरकारची आणि आपणा सर्वांची आहे. म्हणून आपण शेतक-यांच्या आत्महत्यांबाबत चिंताग्रस्त होऊन चिंता व्यक्त करीत आहेत, काळजी व्यक्त करीत आहोत. आमचा शेतकरी राजा वैफल्यग्रस्त झालेला आहे. शेतकरी आत्महत्येच्या रोगापासून कसा वाचू शकेल

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ SBT/ MAP/ KTG/ प्रथम श्री.रोझेकर .......... 17:30

प्रा.जोगेंद्र कवाडे .........

यासंदर्भात आपण उपाययोजना सुचविलेली आहे. मी तांत्रिक बाबींमध्ये जाणार नाही. आमचे काही मित्र भंडारा, गोंदिया जिल्हयांसदर्भात बोलले. पूर्व विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया भागातील शेतकरी धानकरी आहेत. पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी ऊसकरी आहेत आणि विदर्भातील शेतकरी कापूसकरी आहेत. प्रत्येक वेळेस करी हा शब्द आहे. म्हणजे सर्व बोलाचाच भात आणि बोलाचीच कढी आहे. धान पिकविणा-या भागामध्ये शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. आम्ही वारंवार मागणी केली की, धानाच्या आधारमूल्याचा पॅटर्न बदलला पाहिजे. कमीत कमी एक हजार रुपये भाव धान उत्पादक शेतक-याला मिळाला पाहिजे. 20 कोटी रुपयांची घोषणा करण्यात आली. आम्ही वारंवार मागणी केली की, त्या 20 कोटी रुपयांचे काय झाले,याची माहिती द्यावी.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे ....

आता हे 20 कोटी रूपये होते ते केवळ भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांसाठी. पण त्यावर अधिकार सांगण्यात आला तो संपूर्ण महाराष्ट्रात धान पिकविणाऱ्यांसाठीचा. मग प्रत्येकाला 20-20 हजार रूपये दिले तरी या 20 कोटीतील पैसाही ज्यांना खरोखरी आवश्यकता आहे आणि ज्यांच्यासाठी म्हणून हा पैसा दिलेला आहे त्यांच्या हाती येणार नाही. सभापती महोदया, मी आपला अधिक वेळ घेणार नाही, पण ही जी एकूणच परिस्थिती आहे ती भयानक आहे आणि ती उत्तरोत्तर वाढत गेली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमुळे आमच्या देशाचे स्वातंत्र्य तीळा-तीळाने मरते आहे की काय असे वाटू लागते. ज्यांच्या भरवशावर आपला देश जीवंत आहे, उभा आहे तो आधारच आत्महत्या करू लागला तर आपल्याकडे शिल्लक ते काय राहील ? मग कसली विधानसभा आणि कसली विधानपरिषद आणि कसली पार्लमेंट. ज्यांच्यासाठी म्हणून आम्ही हे सर्व करीत आहोत तो जर सुखाने जगणार नसेल, त्याला सन्मानाने भाकरी मिळणार नसेल, वैफल्यग्रस्त होऊन त्याला आपल्या जीवनाचा नाश करून घ्यावासा वाटत असेल तर मग या देशाचे दुर्दैव ते काय म्हणता येईल ? अनेक तज्ज्ञ आले, समित्या, आयोग येतात, विशेषज्ञ, तज्ज्ञ येतात पण इलाज सापडत नाही. इलाज सापडला तर त्याची अमलबजावणी होत नाही आणि अमलबजावणी केली तर अनेक झ ाारीतील शुक्राचार्य येथे बसलेले आहेत. पहिले पॅकेज जाहीर केले गेले, दुसरे पॅकेज माननीय पंतप्रधानांनी जाहीर केले. तो सारा पैसा कोठे गेला ? ज्या जिल्हा सहकारी बँका तेथील संचालकांनी लुबाडल्या, त्या बँकांचे त्यातून पुनरूज्जीवनर झाले. त्या वाचल्या आणि शेतकरी मात्र मेला. शेवटी आम्ही हे सारे करतो ते कोणासाठी आणि कशासाठी ? आमच्या कोणत्याही कृतीमध्ये प्रामाणिकपणा नसेल, मग तो अधिकारी असेल वा लोकप्रतिनिधी असेल, त्याचे समुपदेशन करायला पाहिजे. तो जो कोणत्याही वर्गाचा अधिकारी-कर्मचारी असेल त्याच्यामध्ये शेतकऱ्याबद्दल कणव नसेल, सहानुभूती नसेल तर तुम्ही आकाशातून चंद्र-तारे आणले तरी हे दुर्दैव महाराष्ट्राच्या नशिबी जे आणले गेले आहे ते संपणार नाही. सभापती महोदया, मी एवढेच म्हणेन की, या आत्महत्यांना अनेक कारणे आहेत. या आत्महत्यांच्या बाबतीत थट्टा केली जाते की, एक लाख रूपये मिळतात म्हणून आत्महत्या केल्या जाताहेत. असे म्हणणाऱ्या लोकांना हा प्रा. कवाडे कोठूनही 5 लाख रूपये गोळा करून आणून देईल आणि त्याला म्हणेल की, आता तू आत्महत्या कर. करील का तो ? सभापती महोदया, शेतकरी ही काही जात नाही तर तो एक

...... 4 जी 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. कवाडे ......

समाज आहे. त्यांच्या आत्महत्यांमागे काही कारणे जरूर असतील. काही म्हणतात ते दारू पितात. सभापती महोदया, प्रेमामध्ये वैफल्य आले तरी प्रेमवीर माणूस दारूचा आधार घेतो. तसेच शेतकरी देखील शेतीमध्ये वैफल्य आले तर दारूचा आधार घेतात. मग सावकाराचा पाश आणि बँकांचा जाच यामुळे कर्जबाजारी झाल्याने ज्यांचे संसार उद्ध्वस्त झाले ते शेतकरी वैफल्यग्रस्ता होतात आणि मग नको त्या गोष्टी करू लागतात, आत्महत्येकडे वळतात. हा सारा व्यवस्थेचा दोष आहे. सभापती महोदया, एक छोटेसे उदाहरण सांगतो. अलिकडेच बांगला देशाचे डॉ. युनूस यांनी एक नवीन प्रयोग केला. आमच्या देशातील, आमच्या राज्यातील सहकारी बँकांनी यापासून थोडेफार शिकले पाहिजे. पण चांगल्या गोष्टी शिकायच्या नाहीत तर खैरलांजी शिकायचे आणि मग राज्याला कलंकित करण्याचा प्रयत्न केला जातो. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... 4एच 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

डॉ. युनूस साहेबांनी एक प्रयोग केला. त्याबद्दल जगाने त्यांचा गौरव केला, त्यांना नोबल पारितोषिक मिळाले. त्यासाठी त्यांनी काय केले? एक गरीब माणूस महिन्याला काय कमाई करणार? तो एकदा एका सावकाराकडे 15 रुपये मागायला गेला. सावकाराने त्याला मागील पैसे परत केल्याशिवाय तुला 15 रुपये देणार नाही असे सांगितले. त्यामुळे तो हवालदिल झाला. अचानक डॉक्टर साहेबांच्या नजरेस तो आला. त्यांनी आपल्याकडील पैसे काढले आणि त्यातील 25 रुपये त्याला दिले. आश्चर्याची बाब अशी की, त्या माणसाने दिवसभर मेहनत करुन 25 रुपयांमधून 50 रुपये कमाविले आणि संध्याकाळी डॉक्टर साहेबांचे घेतलेले 25 रुपये परत केले. एका माणसाच्या इमानदारीवर विश्वास ठेवणारा प्रयोग डॉक्टर साहेबांनी केला आणि त्यांनी एक ग्रामीण बँक उघडली. त्या बँकेमार्फत ज्याला पैश्याची गरज आहे अशा गरीब माणसाला आर्थिक मदत करुन त्याचे जीवन उज्ज्वल करण्याचा प्रयत्न केला. ही गोष्ट बांगला देश सारख्या गरीब असलेल्या देशामध्ये होऊ शकते. आणि महासत्तेचे स्वप्न बघणाऱ्या आपल्या देशामध्ये होऊ शकत नाही? आपल्या माध्यमातून शासनाला व मंत्रिमहोदयांना माझी विनंती आहे की, असे काही चांगले प्रयोग करावयास आणि चांगल्या गोष्टींचे अनुकरण करावयास आपल्याला लाज वाटता कामा नये.आपण इंग्रजांचे अनुकरण तर करीत आहोत. तेव्हा याही चांगल्या गोष्टींचे आपण अनुकरण करावे. जे मोठमोठे भांडवलदार, उद्योगपती, अब्जोपती शासनाचे पैसे बुडवितात, त्यांच्यावर आपण कारवाई करीत नाही. आणि ज्या शेतकऱ्यांनी 15 ते 20 हजारांचे कर्ज घेतले आहे ते फेडले नाही म्हणून त्याची भांडी-कुंडी, नांगर, बैलजोडी जप्त करता. ही बेईज्जती ते कसे सहन करणार? त्यांनी आपला कामधंदा कसा टिकवायचा? आपली होणारी बेईज्जत सहन होत नाही म्हणून ते आत्महत्त्या करतात. तेव्हा या शेतकऱ्यांची पूर्ण कर्जमाफी झाली पाहिजे आणि त्यांना 6 टक्के दराने कर्ज दिले गेले पाहिजे. त्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळत नाही म्हणून त्याचा माल स्टोअरेजमध्ये ठेवला पाहिजे. आणि त्याला किमान पैसे दिले गेले पाहिजेत. बाजारामध्ये भाव वाढल्यानंतर वाढलेल्या भावाचे पैसे त्याला दिले पाहिजेत. हा फॉर्म्युला देशाचे कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार यांनी एका सभेमध्ये सांगितला तेव्हा मला बरे वाटले. परंतु राज्यामध्ये तसे होत नाही. त्या शेतकऱ्यांना आपण पूरक व्यवसाय दिला पाहिजे. आपण राज्यामध्ये एस.ई.झेड.निर्माण

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे...

करीत आहात. ज्या राज्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होत आहेत त्या जिल्हयामध्ये आपण एस.ई.झेड. निर्माण करावेत.

सभापती महोदया, शेवटचा मुद्दा सांगून मी माझे भाषण संपविणार आहे.आदिवासी क्षेत्रामध्ये जी आदिवासी बालके आहेत. त्या बालकांचे कुपोषणामुळे मृत्यू होत आहेत यासंबंधीचा एक अहवाल आलेला आहे. "हार्ड न्यूज" नावाचे एक मॅगझीन आहे. त्या मॅगझीनमध्ये म्हटले आहे की, आदिवासी भागामध्ये बालकांमध्ये व्हिटॅमिनचा अभाव असल्यामुळे ती बालके मरण पावत आहेत. त्याकरीता शासनाने एका कंपनीकडून कॅप्सूल घेऊन त्या बालकांना दिली. ती कॅप्सूल एम्प्टी होती. त्या कॅप्सूलमध्ये औषध नव्हते, फक्त वर आवरण होते. याबाबत दुष्यंतकुमार हेच म्हणतात की,

हो गई है पीर पर्वत सी, अब तो पिघलनी चाहिए
कहीं से तो एकाध गंगा निकलनी चाहिए
मेरे सीने में न सही, तेरे सीने में सही
कहीं तो आग जलनी चाहिए.
सिर्फ हंगामा खड़ा करना हमारा मकसद नहीं
हमारी कोशिश है कि इस देश की तकदीर बदलनी चाहिए.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे सुरु...

आपण सर्व मिळून प्रयत्नांची पराकाष्टा करुन त्या शेतकऱ्यांना नव्याने प्रोत्साहन देऊन जोमाने मृत्यूशी सामना करण्यासाठी प्रेम देऊ त्याच्या पाठिशी आपण उभे राहू, एवढे बोलून मला आपण बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आभार मानून माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.व मु.शी.** : कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सादर करणे व संमत करुन घेणे.

श्री.हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्यमंत्री) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने कामकाज समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो :-

"विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक गुरूवाद,दिनांक 7 डिसेंबर,2006 रोजी दुपारी 3.45 वाजता विधानभवन, नागपूर येथ्े झाली. सदरहू बैठकीत समितीने विचारविनिमय करून सोमवार, दिनांक 11 डिसेंबर,2006 ते शुक्रवार, दिनांक 15 डिसेंबर,2006 पर्यन्तचे सभाग,हाचे कामकाज पुढीलप्रमाणे असावे असा निर्णय घेतला :-

**डिसेंबर**,2006

| | |
|---|---|
| सोमवार, दिनांक 11 | 1) सन 2006-2007 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (पहिला दिवस) |
| | 2) शासकीय विधेयके |
| मंगळवार,दिनांक 12 | 1) सकाळी 10-30 ते 11.45 वाजेपर्यन्त शासकीय विधेयके |
| | 2) सन 2006-2007 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस) |
| | 3) सन 1998-1999 व 1999-2000 च्या अधिक खर्चाच्या मागण्यांवर चर्चा. |
| | 4) शासकीय विधेयके |
| बुधवार,दिनांक 13 | 1) शासकीय विधेयके |
| | 2) सन 2006-2007 चे (तृतीय) पुरवणी विनियोजन विधेयक. |
| | 3) महाराष्ट्र (अधिक खर्च) विनियोजन विधेयक. |
| गुरुवार,दिनांक 14 | 1) अंतिम आठवडा प्रस्ताव |
| | 2) शासकीय विधेयके |
| शुक्रवार,दिनांक 15 | अशासकीय कामकाज (विधेयके) |

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ KTG/

श्री.मधुकर चव्हाण :. आता आपण 12 तारखेला सन 1998-99 व 1999-2000 च्या अधिक खर्चाच्या मागण्या आणि पुरवणी मागण्या एकाच दिवशी ठेवलेल्या आहेत यापूर्वी अधिक खर्चाचे विवरण 13 तारखेला दाखविले होते आणि दुसऱ्या दिवशी पुरवणी मागण्या ठेवलेल्या होत्या. आता एकाच दिवशी पुरवणी मागण्या आणि अधिक ख्चार्चाच्या मागण्या ठेवल्यामुळे सदस्यांना बोलण्यासाठी कमी मिळणार आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : 12 तारखेचा कार्यक्रम पाहिला तर त्यामध्ये शासकीय विधेयके दाखविले असली तरी पुरवणी मागण्या आणि अधिक खर्चाचे मागण्यांवर चर्चा ठेवलेली आहे. आपल्याला चर्चेला वेळ उपलब्ध करुन देण्यात येईल.

**तालिका सभापती** : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवत्त सभागृहास संमत आहे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

--

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या

**मु.शी.**: राज्यात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या
या विषयावर सर्वश्री. पांडुरंग फुंडकर, मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री. मधुकर चव्हाण, प्रकाश शेंडगे, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री. पाशा पटेल, गोपीकिशन बाजोरिया, अरविंद सावंत, अनिल परब,सुरेश जेथलिया, परशुराम उपरकर, वि. प. स. यांचा प्रस्ताव.

( चर्चा पुढे चालू )

प्रा. शरद पाटील ( पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदया, शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येसंबंधी या ठिकाणी सुरु असलेल्या चर्चेमध्ये भाग घेण्याची आपण मला संधी दिली त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. एकूणच राज्याच्या चिंतेचा हा विषय आहे. या विषयासंबंधी आधीच्या सन्माननीय सदस्यांनी सविस्तर विवेचन केलेले आहे. सर्व मुद्दे येऊन गेलेले आहेत. मी शेतकऱ्यांच्या आणि विशेषत: विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्त्येसंबंधी दिल्लीच्या एका कवीने जी एक कविता लिहिलेली आहे ती मी वाचून दाखवणार आहे. सामान्यपणे शेतकऱ्यांच्या आणि कष्टकऱ्यांच्या कोणत्याही बातम्या न छापणाऱ्या एका मध्यान्ह दैनिकामध्ये म्हणजे दुपारी प्रकाशित होणाऱ्या दैनिकामध्ये ही कविता छापून आलेली आहे याचे मला आश्चर्य वाटले आणि कौतुकही वाटले. शेतकऱ्यांच्या प्रश्नाची दखल या उच्चभ्रू नियतकालिकाने घेतली. ही कविता इंग्रजीमध्ये आहे ती मी वाचून दाखवतो. त्या कवितेचे मराठी भाषांतर मी केलेले आहे तेही त्यानंतर वाचून दाखवतो. इंग्रजी कविता पुढील प्रमाणे आहे.

**Farmer's Sucides**

A wonderful escape route had Punjab and Andhra shown
Every eight hours a farmer kills himself in Vidarbha alone
So that his debt may also be cremated along with his body.
Our GDP is growing at a break-neck speed
Our Sensex is at its peak, indeed
And we don't have food enough for our people to feed!



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ KTG/

प्रा. शरद पाटील .....

We are going to be a super-power in two thousand twenty.
And our farmers are committing suicide,
Hourly, regularly, daily!
It's an age of prosperity and plenty
A golden age of globalisation
So why should we mind a few thousand deaths by starvation!
And since we are so proud of our peasantry
They should naturally die for the country.

ही कविता श्री. कुलदीप सलील या दिल्लीच्या कवीने लिहिलेली आहे. या कवितचे मराठी भाषांतर मी पुढील प्रमाणे केले आहे.

" छान पळवाट दाखविली पंजाब आणि आंध्रच्या शेतकऱ्यांनी
प्रत्येक आठ तासात एक शेतकरी आत्महत्या करतो विदर्भात
आपल्याबरोबर आपले कर्जही गाडले जाईल या वेड्या आशेने
आपले राष्ट्रीय उत्पन्न वाढते आहे वायू वेगाने
सेन्सेक्सने गाठला आहे परमोच्च बिंदू
आणि जनतेची भूक भागविण्यासाठी अन्न नाही आमच्याकडे
2020 साली आम्ही बनू महासत्ता
आणि आपले शेतकरी करत आहेत आत्महत्त्या
तासा तासाला, न चुकता दररोज
समृध्दीचे आणि मुबलकतेचे आहे हे युग
जागतिकीकरणाचे आहे हे सुवर्ण युग
मग काय तमा आम्हा काही हजार भुकेकंगालांच्या आत्महत्यांची
आपल्या रयतेचा आम्हाला आहे अभिमान
देशासाठी त्यांनी मरावे हे आहे नैसर्गिकच"

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ MHM/ SBT/ पूर्वी श्री. बरवड 17:55

(प्रा. शरद पाटील पुढे सुरु...)

विदर्भातील आणि एकूणच देशातील शेतक-यांची ही अगतिकता कवीने व्यक्त केलेली आहे. त्यावर अधिक भाष्य करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही.

मी सभागृहाचा अधिक वेळ घेणार नाही. 1989मध्ये श्री. व्ही.पी.सिंग यांच्या नेतृत्वाखालचे सरकार सत्तेवर होते. त्यावेळी देखील देशातील शेतकरी कर्जबाजारी झालेले होते. शेतकरी 7/12च्या उता-यावर कर्जाच्या ओझ्याखाली दबलेले असल्यामुळे त्याला कोणत्याही प्रकारचे आर्थिक सहाय्य मिळत नव्हते. या कर्जबाजारी शेतक-यांना कर्जातून मुक्त करण्यासाठी तत्कालीन सरकारने देशातील सर्व शेतक-यांचे 10 हजार रुपयापर्यन्तचे कर्ज व्याजासहीत माफ करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी एवढ्या मोठ्या संख्येने शेतक-यांच्या आत्महत्या होत नव्हत्या. त्यावेळी सरकारने 10 हजार रुपयापर्यन्तचे कर्ज त्यावरील व्याजासहीत माफ करण्याचा निर्णय घेऊन शेतक-यांना दिलासा दिला. आज महाराष्ट्रामध्ये कमी अधिक प्रमाणात आणि विशेषत: विदर्भातील 6 जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत. या आत्महत्या थांबाव्यात यासाठी मुख्यमंत्र्यांनी पॅकेज जाहीर केले. त्यानंतरही शेतक-यांच्या आत्महत्या थांबल्या नाहीत म्हणून माननीय पंतप्रधानांनी पॅकेज जाहीर केले. तरीही शेतक-यांच्या आत्महत्या थांबल्या नाहीत म्हणून महाराष्ट्रातील थोर गांधीवादी नेते आणि माजी केन्द्रीय मंत्री श्री. मोहन धारिया यांनी माननीय पंतप्रधानांकडे काही मागण्या केल्या. त्यातील पहिली मागणी अशी होती की, केवळ विदर्भातीलच नव्हे तर सर्व महाराष्ट्रातील अल्पभूधारक शेतक-यांचे थकीत कर्ज माफ करावे. दुसरी मागणी अशी होती की, शेतक-यांनी सावकराकडून घेतलेले सर्व कर्ज बेकायदेशीर ठरवून ते रद्दबातल करावे आणि 4 टक्के दराने शेतक-यांना कर्ज पुरवठा करावा, अशी तिसरी मागणी होती. त्यांनी आपल्या या मागण्यांसाठी पुण्यामध्ये उपोषण सुरु केले. त्यांच्या उपोषणाला महाराष्ट्राच्या विविध भागातून पाठिंबा मिळाला. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या उपोषणाची दखल घेऊन ते पुण्याला गेले आणि आमच्या उपस्थितीमध्ये - मी देखील त्यावेळी तेथे होतो - त्यांनी श्री. मोहर धारियाजींना आश्वासन दिले की, लवकरच आपल्या मागण्याबाबत मंत्रिमडळाच्या बैठकीत विचार करु. तालिका सभापती महोदया, मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाचे काय झाले ? याबाबतीत त्यांनी आपल्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. शरद पाटील...)

उत्तराच्या भाषणामध्ये खुलासा करावा. श्री. मोहन धारिया यांनी केलेल्या मागण्या मान्य करण्याच्या संदर्भात केन्द्राला प्रस्ताव पाठवावा. तामिळनाडूचे नवनिर्वाचित मुख्यमंत्री श्री. एम. करुणानिधी यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर पहिला निर्णय कोणता घेतला असेल तर तो ....

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शरद पाटील.........

त्या राज्यातील थकबाकीदार सर्व शेतकऱ्यांची कर्ज माफ करण्याचा. त्याचप्रकारचा निर्णय राज्य सरकारने घेण्याचे धाडस दाखवावे. केवळ केंद्राकडे बोट न दाखवता महाराष्ट्र राज्यातील सर्व अल्पभूधारक शेतकऱ्यांची थकित कर्जे माफ करण्याचा सरकारने निर्णय घ्यावा. त्याचबरोबर शेतकऱ्यांना 4 टक्के दराने कर्ज उपलब्ध करुन देण्याचा देखील निर्णय घ्यावा आणि सर्वात महत्वाची बाब म्हणजे ज्या सावकाराच्या पाशामध्ये शेतकरी अडकला आहे त्या पाशातून त्यांची मुक्तता करण्यासाठी सावकारांची कर्जे बेकायदा ठरवून ती रद्द करावीत अशी मागणी करतो आणि इतर सन्माननीय सदस्यांनी ज्या मागण्या केल्या आहेत त्यांना पाठिंबा देऊन माझे भाषण संपवितो. जय हिंद.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी बोलत असताना एक प्रश्न उपस्थित केला आणि तो प्रश्न फारच महत्वाचा आहे. त्यांनी ज्या ज्या आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या घरी भेटी दिल्या त्या त्या ज्या भगिनी आहेत, त्यांची आई आहे, मुलगी आहे त्या मुलींचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. आईच्या म्हातारपणाचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. ही परिस्थिती विदारक असली तरी ती निर्माण व्हावयास नको होती. यातून मार्ग काढला पाहिजे. याठिकाणी भगिनींच्या राख्या घेऊन येत असताना बहिणीचे नाते जोडले आणि माझ्या बहिणींची भावना त्यांनी व्यक्त केली. त्यांचे भाषण ऐकत असताना मला इतिहासातील एक आठवण झाली. स्वामी ही कादंबरी वाचत असताना शेवटच्या पृष्ठावर एक उल्लेख आहे. तो उल्लेख म्हणजे स्वामी माधवराव मरणासन्न अवस्थेत आहेत. त्यांची पत्नी सांगते, मी सती जाणार आहे. स्वामी सांगतात, मला हा निर्णय ऐकून आनंद वाटला. माझ्यानंतर तूझे काय होणार याची मला काळजी होती आणि मी आनंदीत झालो. इतिहासातील आणखी एक आठवण देणार आहे. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचीही अशीच परिस्थिती होती. त्यावेळी समाजाची मानसिकता सती जाण्याबद्दल होती. त्यांनाही सती जावे असे वाटत होते. परंतु पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर सती गेल्या नाहीत. त्यांनी अलिखित कायदा केला, घाट निर्माण केला आणि कारभार केला. एक चुकीचा संदेश, प्रतिकूल परिस्थितीत उभे राहण्याचा संदेश अहिल्याबाईंनी दिला. याठिकाणी कळीचा प्रश्न असा निर्माण होतो की, शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्यानंतर माता माऊली रस्त्यावर आली आहे. आमची माता माऊली ही राज्याची, देशाची, मराठवाडयाची, विदर्भाची आदिशक्ती आहे. या शक्तीमध्ये काम करण्याची क्षमता आहे. माझी भगिनी मानसिक, शारिरीक, बौध्दिक सर्व प्रकारचे श्रम करते. या शक्तीला क्रयशक्ती, या शक्तीला मूल्य आणि प्रतिष्ठा देण्याचा प्रयत्न समाजाने कधी केला का? समाजाच्या दृष्टीने पहिली शिक्षिका क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि अशाच समाज सुधारकांनी महिलांच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे ही कल्पना समाजामध्ये रुजविली. आदिशक्ती 16-16 तास श्रम करते आणि मी आत्महत्येचा विचार करतो. म्हणून मार्ग काढत असताना ही शक्ती विकास प्रक्रियेला जोडता आली तर जोडावी हा विचार जगाच्या पातळीवर आणि देशात सुरु झाला. या विचाराला आठव्या, नवव्या आणि दहाव्या पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून मूर्त स्वरुप देण्यासाठी कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी सुरु





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे.........

झाली. हा प्रश्न आर्थिक आणि कायद्याच्या पातळीवर सुटणार नाही. महिलांना विकास प्रक्रियेला जोडून बॅकलॉग दूर करण्यासाठी धोरणामध्ये स्पष्टता असली पाहिजे. पॅकेज केवळ सिंचनासाठी, शिक्षणासाठी दिले जाते. वैधानिक विकास मंडळे स्थापन करतो त्याच पध्दतीने या आदिशक्तीला विकास कामात जोडण्यासाठी, वेगळी दिशा देण्यासाठी दोन्ही सभागृहामध्ये आणि समाज पातळीवर चर्चा होणे गरजेचे आहे. हे मंथन 10-15 वर्षापासून पुरोगामी महाराष्ट्रात चालू झालेले आहे.

(नंतर श्री.जुन्नरे....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती. उषा दराडे.....

परंतु महिलांच्या विषयाला हात घालीत असतांना मी या विषयावर अधिक वेळ घेणार नाही परंतु थोडा वेळ लागला तर सभागृहाने मला माफ करावे अशी मी विनंती करते. या राज्याचे माजी मुख्यमंत्री कै. यशवंतराव चव्हाण यांनी सांगितले होते की, मराठवाडा निस्वार्थपणे महाराष्ट्रात सामील झाला त्यामुळे मराठवाडयाची नेहमी काळजी घेतली, विकास केला जाईल असे आश्वासन माननीय यशवंतराव चव्हाण यांनी मराठवाडयाला दिले होते. त्यामुळे या आश्वासनाची काळजी घ्यावी अशी विनंती आहे. स्वामी रामानंद तीर्थ, श्री. श्रीनिवासराव खोत, श्री.गोविंदभाई श्रॉफ, श्री.कॉ. काशिनाथराव जाधव यांनी हैद्राबादच्या मुक्ती संग्रामामध्ये लढा दिला होता. या लढयामुळेच स्वातंत्र्य मिळालेले आहे. सभागृहात दांडेकर समितीवर बरीच चर्चा झालेली आहे, बरेच अहवाल आलेले आहेत. परंतु मराठवाडयाचा शिक्षणाचा अनुशेष वाढलेला आहे. सिंचनाचा अनुशेष वाढलेला आहे. रस्त्यांचा अनुशेष वाढलेला आहे. ही कामे निर्धारित कालावधीत झालेली नाहीत त्यामुळेच मराठवाडयाचा अनुशेष मोठया प्रमाणात वाढलेला आहे. दिलेल्या कालावधीतच ही कामे झाली असती तर अनुशेष निर्माण झाला नसता. त्यामुळे कालमर्यादेच्या संदर्भात विचार करुन शासनाने पावले टाकली पाहिजेत. अनुशेष दूर करण्यासाठी सरकार प्रयत्न करीत आहे परंतु तरी सुध्दा अनुशेष वाढत चालला आहे. म्हणून भविष्यात अजून किती अनुशेष वाढेल याबाबत सरकारला विचार करावा लागेल व त्या दिशेने पाऊल टाकावे लागेल. आता आपल्याला अनुशेष हटविण्यापासून मागे जाता येणार नाही. कृष्णा खो-याच्या 40 टीएमसी पाण्याच्या संदर्भात यासभागृहात ब-याच वेळा चर्चा झालेली आहे. मला एक गोष्ट सांगावयाची आहे की, मराठवाडयाच्या हक्काचे जे पाणी आहे ते पाणी आणण्यासाठी प्रयत्न झाले नाहीत असे मला म्हणावयाचे नाही परंतु ज्या प्रमाणात प्रयत्न व्हावयास पाहिजे होते त्या प्रमाणात प्रयत्न न झाल्यामुळे, मराठवाडयाला हक्काचे पाणी मिळालेले नाही. यासाठी जी गती द्यावयास पाहिजे होती ती गती मिळाली नाही त्यामुळे या प्रश्नासाठी गती देण्याची आवश्यकता आहे. म्हणून हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी चळवळीची आवश्यकता आहे, लोकांचा सहभाग आवश्यक आहे व लोकांनी यासाठी जागरुक राहण्याची आवश्यकता आहे. तसेच शासनाकडून प्रयत्न होणे आवश्यक आहे. 1972 मध्ये जेव्हा महाराष्ट्रात दुष्काळ पडला होता तेव्हा बीड जिल्हयातील 2 लाख शेतकरी हे शेतमजूर झाले

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती. उषा दराडे.....

होते. विकासाच्या बॅकलॉगमधूनच शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत. तसेच त्या ठिकाणची सामाजिक, राजकीय व भौगोलिक परिस्थती, त्या कुटुंबाची आर्थिक स्थिती, त्याची मानसिकता , जमिनीची क्षमता, उपलब्ध असलेले रॉ मटेरियल, काम करण्याची शक्ती, पाण्याच्या योजनेचा अभाव, विकासासाठी राजकीय कौशल्याचा अभाव, शिक्षणाचा अभाव, आरोग्याकडे दुर्लक्ष, अवेरनेसचा अभाव इ. आत्महत्येची कारणे आहेत. सभापती महोदय, मराठवाडयामध्ये मोठया प्रमाणात अनुशेष असल्यामुळेच आत्महत्या होत आहेत. त्यामुळे यासंदर्भात सभागृहाने गांभीर्याने चर्चा करण्याची आवश्यकता आहे. 1972 च्या दुष्काळामध्ये बीड येथील 2 लाख शेतकरी आपल्या उदरनिर्वाहासाठी ठाणे, मुंबई, नवी मुंबईमध्ये मजूरीसाठी आले होते त्यापैकी अनेक कुटुंबे माझ्या जिल्हयात अद्याप पावेतो परत आलेली नाहीत. आज अशी अवस्था आहे की, ऊस तोडीच्या कामासाठी ऊस तोड जिल्हा म्हणून बीड जिल्हयाकडे पाहिले जाते. बीड जिल्हयातून जवळ पास 2 ते 3 लाख मजूर ऊस तोडीसाठी जात असतात. एवढया मोठया प्रमाणात हे मजूर घरदार सोडून पोटापाण्यासाठी ऊस तोडीच्या कामासाठी जात असतात.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे......

त्यांच्यावर विस्थापित होण्याचा प्रसंग निर्माण होतो. साखर कारखाने ऊसतोड कामगारांसाठी साखरशाळा काढतात,परंतु तो कारखाना चार-पाच महिने चालतो. ऊसकामगारांच्या मुलांची आई मुलांना फाटक्या पदरामध्ये झाकून झोपडीमध्ये त्यांना झोपविते. झोपडीला छिद्र असते. त्या छिद्रातून मुलांना चंद्राचे दर्शन घडविते आणि अंगाई गीत गाते. अशा मुलांवर शिक्षणाचे कोणते संस्कार होणार ? त्यासाठी रेसिडेन्शिअल स्कूल काढले पाहिजे. ज्यांची मुले आजी-आजोबांकडे राहतात ती मुले गावाबाहेर विटीदांडू वा इतर खेळ खेळत असतात. गटारात खेळत असतात, एखाद्या सावकाराच्या ऊसाच्या शेताबाहेर ऊस खायला मिळतो का ? या आशेने शेंबूड पुसत पाहत असतात. अशा मुलांचे भविष्य काय असणार आहे ? याचा देखील विचार केला पाहिजे. या सर्व गोष्टी एकमेकांना पूरक असल्यामुळे त्या वेगळ्या करता येणार नाहीत.

सभापती महोदया, शेतकऱ्यांनी पशुधन निर्माण केले पाहिजे असे सांगितले जाते. हा खूप चांगला मुद्दा आहे. पारंपारिक शेतीमध्ये बदल केला जावा असे केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी सांगितले. मग कोणत्या पध्दतीने शेती केली पाहिजे हे सांगण्यात यावे. हॉर्टीकल्चरची शेती करावी की केशर आंब्याची शेती करावी, झेंडुच्या फुलाची शेती करावी की, अन्य कोणती शेती करावी. नगरपासून पुण्यापर्यंत जाताना वाटेत आपल्याला निशिगंधाच्या फुलांचे ताटव्याच्या ताटवे दिसतात. शेवंतीच्या फुलांचे ताटवेच्या ताटवे दिसतात. या फुलांची शेती करावी की ज्वारी, बाजरी यांची शेती करावी. नवीन पध्दतीने शेती करणे आवश्यक आहे, पण त्यासाठी लागणारे प्रशिक्षण हे बचत गटांतून महिलांना दिले गेले पाहिजे. शेतीच्या कामात महिलांना पुढे आणले पाहिजे त्यांना महिला बचत गटांतून प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. माझ्या गावामध्ये मागच्या पाच-सहा दिवसांत महिलांचा एक मेळावा झाला. माझ्या गावात जलस्वराज्य प्रकल्प राबविला जात आहे. त्या मेळाव्यामध्ये महिला बचत गटातील एका अशिक्षित महिलेने बोट वर करुन काही बोलणार असल्याचे सांगितले. त्या महिलेने भाषण करताना सांगितले की, गावात जलस्वराज प्रकल्प आल्यामुळे महिला बचत गटाला प्रोत्साहन मिळालेले आहे. आम्हाला विकास म्हणजे काय याचा अर्थ समजलेला आहे. त्या महिलेनें पुढे असे सांगितले की, महिलांनो तुम्ही अंगावर एक दागिना कमी घाला. तसेच ज्याच्या घरी संडास बांधलेला आहे अशा मुलाच्या घरीच मुलगी द्या आणि घरात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे......

संडास बांधल्याशिवाय दुसऱ्याची मुलगी आणू नका. सावित्रीबाई फुलेंची साक्षरता यापेक्षा कोणती वेगळी असू शकते.

सभापती महोदया, बीड जिल्ह्यातील सोनीमावा गावात सर्वच पक्षाचे लोक आहेत, काँग्रेस, राष्ट्रवादी, भाजप, शिवसेना, आरपीआयचे दोन्ही गट इत्यादी पक्षातील लोक आहेत. पण ते सामाजिक कार्यासाठी एकत्रितपणे येऊन काम करीत आहेत. त्यांनी श्रमदान करुन दोन कोटी रुपयांची कामे केलेली आहेत. आणखी एक गोष्ट म्हणजे त्याठिकाणी चिकुन गुनियाचा एकही रुग्ण सापडला नाही आणि बाजुच्या तीन कि.मी.अंतरावर डेंग्यूने तीन माणसे मृत्युमुखी पडली.

सभापती महोदया, मराठवाडा विकास आंदोलन झाले म्हणून वाळुंज मिळाले मराठवाडा विकास आंदोलन झाले म्हणून जालना दिसतो आहे, अंबेजोगाई दिसतो,हॉस्पीटल दिसतात. मराठवाडा विकास आंदोलन झाले म्हणून कै.यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री होऊ शकले.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषाताई दराडे....

नांदेडच्या कडेने असेल, बीडच्या बाजूने असेल किंवा परभणीच्या बाजूने जायकवाडीचा पाट गेला असेल त्याठिकाणी गोदावरीचा पाट आम्ही पाहिला. या प्रकल्पामुळे अनेक गावांना विस्थापित व्हावे लागले. गोदावरीच्या पाटाबाबत आंदोलने झाली, ज्यांनी ही आंदोलने केली त्यांना आपण विश्वासात घेतले पाहिजे. आपण बॅगलॉगची चर्चा करतो. त्याबाबतीत आपण विदर्भातील लोकांशी चर्चा करा. विकासात्मकदृष्टीने राजकारण विरहित व महिलांच्या सहभागातून सावित्रीबाईंचे सुंदर स्वप्न लोकांच्यासमोर येण्याच्या दृष्टीने आपण त्यांना जगण्यासाठी आत्मविश्वास निर्माण करुन द्यावा, असे मला वाटते. याठिकाणी रडत बसण्यापेक्षा जगण्याच्या दृष्टीने त्यांचा आत्मविश्वास वाढवून त्यांच्या सहभागातून या शासनाने योजना कराव्या. याठिकाणी माननीय रावते साहेबांनी आमच्या बहिणींच्या भावाची भूमिका पार पाडली, त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देऊ इच्छिते. याच अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले यांनी आपल्या देशाला दिशा देऊन महाराष्ट्र एक सुंदर महाराष्ट्राचे स्वप्न बघितले ते साकार करण्यासाठी महिलांना शेती उद्योगाशी जोडून सर्वांनी मिळून प्रयत्न करावेत एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

धन्यवाद !

-----

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्याद पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, ही चर्चा शेतकऱ्यांच्या आत्महत्येसंबंधी असून हा विषय अत्यंत ज्वलंत आहे व तो मनाला चटका लावून जाणारा आहे. या गंभीर विषयावर गंभीरपणे विचार केला पाहिजे. आत्महत्येसंबंधी बोलावयाचे म्हटले तर ज्याचे जळते त्यालाच कळते. ज्यांना आत्महत्येची झळ पोहचली असेल त्याला हा विषय चांगल्या पध्दतीने कळतो. सन 1972 मध्ये महाराष्ट्रामध्ये दुष्काळ पडला होता. त्यावेळी एकवर्षे दुष्काळ पडल्यामुळे 25 एकरांच्या शेतकऱ्याचा मी एकुलताएक मुलगा आपला संसार चालवू शकत नाही म्हणून त्याला जेव्हा रोजगार हमी योजनेच्या कामावर जावे लागते तेव्हा त्याच्या मनात कोणकोणती चलबिचल होत असेल याची कल्पना आपण करावी. या सभागृहातील सन्माननीय सदस्य सभागृहाच्या बाहेर गेले व ज्यांना स्वत:ची सुटकेस हातामध्ये घ्यावी लागत असेल तर त्यांच्या मनात चलबिचल होते की, आपला पी.ए. आला नाही, शिपाई आला नाही. त्यावेळी त्यांना आपली बॅग घेऊन जाताना लाज वाटते. परंतु ज्यावेळी 25 एकरांच्या शेतकऱ्याच्या मुलाला जर रोजगार हमी योजनेच्या कामावर जावे लागत असेल त्यावेळी त्याच्या मनात काय घोळत असेल ? अशा वातावरणामध्ये आत्महत्या करावी असेच त्याच्या मनात येणार. सभापती महोदय, याठिकाणी मी हे सर्व भोगले असून मी त्या वातावरणातून गेलेलो आहे. त्यामुळे या विषयावर मला नैतिकतेने बोलण्याचा अधिकार आहे. माझ्या आजोबांकडे 400 एकर जमीन होती, ती माझ्या वडिलांकडे 90 एकरांची झाली व आता 90 एकरांची जमीन माझ्या काळात 25 एकरांवर येऊन ती आता 15 एकरांवर आली आहे. अशाप्रकारे 400 एकरांची जमीन 15 एकरांपर्यंत येत असेल तर एक दिवस माझ्याकडे एकही एकर जमीन न राहता एक दिवस मला रोजगार हमी योजनेच्या कामावर गेल्याशिवाय पर्याय उरणार नाही.

सभापती महोदया, कर्ज आणि व्याजाच्या संदर्भात बोलावयाचे म्हटले तर भूविकास बँकांनी कर्जे दिली, परंतु त्या बँकांच्या मॅनेजरला चिरीमिरी दिल्याशिवाय आम्हाला कर्ज मिळत नाही. 25 टक्के कर्ज व्याज देण्यात जाते. 30 हजार रुपयांचे कर्ज घेऊन त्याचे व्याज 60 हजार रुपये भरले असेल तर अजून 90 हजार रुपयांचे व्याज शिल्लक असते. कर्जाचे आकडे पाहिले तर आपले डोळे फिरतील असे आकडे आहेत. त्यावेळी माझ्यावर सरकारची जप्ती येते. माझी जमीन 25 एकरांची व त्यावर 30 हजार रुपयांचे कर्ज घेतलेले असते व त्याचवेळी माझ्यावर 3 जप्त्या येतात.

नंतर श्री.रोझेकर....

श्री.पाशा पटेल.........

पहिली जप्ती आली त्यावेळी लग्नात दिलेला पलंग गेला, दुस-या जप्तीत पिठाच्या गिरणीचे नरसाळे गेले, तिस-या जप्तीत हायब्रीडचे एक पोते गेले. अशा प्रकारे 3 बेइज्जती झाल्या तो म्हणून कसा उभा राहिल. आत्महत्या का करणार नाही ? राज्यकर्त्यांनी एका गोष्टीचा गंभीरपणे विचार करावा. शेतक-यांच्या आत्महत्येचे विश्लेषण करु नये. आत्महत्यांची कारणे सरकारी अधिकारी पंचनाम्यामध्ये काय लिहितात. मनाविकृतीमुळे, दुर्धर आजारामुळे, व्यसनाधिनतेमुळे, कुटुंब कलहामुळे. माझ्याकडे अशा शेतक-यांची नांवे आहेत. भागवत विश्वनाथ काळे, रा.पेठ, तालुका निलंगा या शेतक-याने आत्महत्या केली. दुस-या दिवशी त्या भागातील आमदार, श्री.संभाजी पाटील व मी त्या ठिकाणी गेलो. पंचनामा झाला होता. पंचनाम्यामध्ये मनोविकृतीमुळे आत्महत्या झाली असे लिहिले होते. म्हणून आम्ही त्या तहसिलदाराला थांबविले, दोन आमदार सांगतात म्हणून तेही थांबले. शेतक-याच्या घरातील सर्व कुटुंबाला एकत्र केले आणि त्यांना सांगितले की, न घाबरता सांगा की आत्महत्या का झाली आहे. त्यांनी सांगितले की, 6 पायल्या बियाणे पेरले होते, रास 5 पायली झाली, पोरीचे लग्न जवळ आले होते, लग्न कसे होणार, लग्न कसे होणार हा एकच विचार त्याच्या मनात होता आणि त्याने आत्महत्या केली. मला प्रश्न विचारावयाचा आहे की, मनाविकृतीमुळे ही आत्महत्या झाली की 6 पायल्या पेरल्या 5 पायल्या झाल्या म्हणून केली ? बीड जिल्हयात 90 आत्महत्या झाल्या, शेतक-यांना मदत नाकारण्यात आली कारण सर्वांच्या पंचनाम्यात अशा प्रकारची कारणे लिहिलेली होती. शासनाने त्यांच्या यंत्रणेला काय सांगुन ठेवले आहे ? अशा प्रकारे शेतक-यांचा आवाज दाबणार आहात काय ? तुम्ही असं सांगुन ठेवले आहे का की, खोटे रिपोर्ट द्या. कारण काय तर तुमच्या तिजोरीतून पैसे द्यावे लागणार आहेत. पैसे नका देऊ पण एक गोष्ट नम्रपणे करा की अशी खोटी स्टेटमेंट करु नका. त्या मरणा-याला एवढे तरी वाटेल की आपले मरण गंभीरपणे घेतले आहे. यामुळे आत्महत्या वाढू लागल्या आहेत. सन 1972 मध्ये गावातील माणसे कशी जगत होती ते मी येथे सांगणार आहे. सन 1972 मध्ये डिझेल 95 पैसे लिटर होते ते आता 40 रुपये झाले आहे. 42 पट वाढ झाली आहे. पेट्रोल 2 रुपये होते ते आता 52 रुपये झाले आहे, 26 पट वाढ, घासलेट 40 पट, सिमेंट 28 पट, इलेक्ट्रिसिटी 10 पट, गॅस 8 पट, कनिष्ठ लिपिक 36 पट,

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल.............

शिक्षक 36 पट, प्राध्यापक 25 पट, मजूरी 15 पट, साखर 36 पट, कापुस 36 पट, ऊस 20 पट, गहु 20 पट, तांदुळ 20 पट, ज्वारी 1 .मीठ 11 पट, तिखट 11 पट, दुध 11 पट, तेल 10 पट आणि सोने 50 पट वाढले आहे. सन 1972 मध्ये एक तोळा सोने घेण्यासाठी 1 क्विंटल हायब्रिड विकावे लागत असे.

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ SBT/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर ..........                18:25

श्री.पाशा पटेल ..........

हायब्रिडला 220 रुपये आणि धानाला 180 रुपये भाव होता. त्यावेळी सोने 200 रुपये तोळा होते. आता 20 क्विंटल हायब्रिड, 22 क्विंटल धान आणि 60 क्विंटल कापूस विकावा लागतो. मग आत्महत्या होतील की नाही याचा आपण सर्वांनी विचार करावा. सभापती महोदय, मी अन्न धान्याच्या उत्पादनाची आकडेवारी देणार आहे. सन 1950 मध्ये 50 मिलियन मेट्रीक टन धान्याचे उत्पादन होत होते. हरित क्रांती आल्यामुळे सन 1965-70 मध्ये 100 मिलियन मेट्रीक टन धान्य उत्पादन  झाले. सन 2000 मध्ये 213 मिलियन मेट्रीक टन धान्य उत्पादन झाले. म्हणजे धान्याच्या उत्पादनामध्ये झपाटयाने वाढ झाली. सन 1991 मध्ये शेतक-याचे दरडोई उत्पादन एका वर्षाला 3802 रुपये म्हणजे एका महिन्याला 318 रुपये, सन 2002-03 मध्ये वर्षाला 3730 रुपये म्हणजे महिन्याला 311 रुपये होते आणि शहरातील दरडोई उत्पादन वर्षाला 34,060 म्हणजे महिन्याला 3000 रुपये होते. म्हणजे उत्पादन 10 पटीने वाढले. आता हरित क्रांती आल्यामुळे लोकांचे उत्पादन वाढले का कमी झाले ? हे या आकडेवारीवरुन स्पष्ट होईल. 11 व्या पंचवार्षिक योजनेच्या कच्चा आराखडयाचे पुस्तक माझ्याकडे आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "कृषी क्षेत्रातील सखोल राष्ट्रीय उत्पादनाचा विकास दर 4 टक्क्यापर्यंत वाढवावयाचा असेल तर आपल्या देशात दुस-या हरित क्रांतीची गरज आहे." दुसरी हरित क्रांती आली तर किडया मुंग्यांसारखे लोक रस्त्यावर मरुन पडतील. हरित क्रांतीमुळे गावातील माणसांच्या उत्पादनामध्ये वाढ झालेली नाही. त्याच बरोबर पंचवार्षिक योजनांमध्ये किती खर्च झाला त्याबाबतची आकडेवारी मी देणार आहे. तिस-या पंचवार्षिक योजनेमध्ये 30.87, चौथ्या पंचवार्षिक योजनेमध्ये 22.60, पाचव्या पंचवार्षिक योजनेमध्ये 12.91, सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये 6.1, सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये 5.56, आठव्या पंचवार्षिक योजनेमध्ये 5.71 आणि नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये 4.98  टक्के खर्च झालेला आहे. त्यानंतर 2.55 पर्यंत खाली उतरलेले आहे. सभापती महोदय, दोन वर्षामध्ये आत्महत्यांचे प्रमाण वाढलेले आहे. त्याचे कारण असे आहे की, दोन वर्षापूर्वी खाजगी बाजारामध्ये कापसाला 3000 रुपये प्रती क्विंटल भाव होता. मागच्या वर्षी 1700 रुपये प्रती क्विंटल भाव होता. दोन वर्षापूर्वी सोन्याचा भाव 1800 ते 2100 रुपये तोळा होता. मागच्या वर्षी कापसाला 900 ते

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल ..........

1100 रुपये भाव होता. मजुरी वाढली, बियाण्यांचे दर वीस पटीने वाढले आणि शेतक-यांच्या मालाचे दर अर्धे झाले. जसे गरम तव्यावर दोन थेंब पाणी टाकले की चर्र... आवाज येतो. या सर्व गोष्टींचा गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. 11 व्या पंचवार्षिक योजनेमध्ये असे लिहिलेले आहे की, अन्याय आणि नैराश्यातून केवळ अतिरेकाचा जन्म होतो.

यानंतर श्री.सुंबरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाशा पटेल ...

देशभरातील शंभरहून अधिक जिल्ह्यात नक्षलवादी चळवळ पसरण्याचा धोक्याचा इशारा दिलेला आहे. काही भागामध्ये जातीयवादाच्या संघर्षातून असंतोष बाहेर पडेल. या सर्व असंतोषाच्या मागे कारणीभूत आहे ते सुयोग्य प्रशासन देण्यात आलेले अपयश, विकासाचा लाभ पोहोचविण्यात आलेले अपयश हे आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी यापूर्वीच सांगितले होते की, राजकीय क्षेत्रातील लोकशाही सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रात पसरली गेली नाही तर ते ते लोक घटना जाळल्याशिवाय राहणार नाहीत. आजच्या आत्महत्यांचा हा प्रश्न साधा आणि सोपा नाही. यामध्ये भयानकता लपली आहे. त्यात आपण सगळे मूग गिळून बसू लागलो, होणाऱ्या आत्महत्यांची, शेतकऱ्यांची टर उडवू लागलो, थट्टा करू लागलो तर मग परिस्थिती आणखी भयानक होणार आहे. तेव्हा सत्तेमध्ये बसलेल्यांनी, खुर्च्यांमध्ये बसलेल्यांनी किमान या आत्महत्या करणाऱ्यांची थट्टा तरी करू नये. या पैकी बरीच मंडळी शेतातून येथे निवडून आली म्हणून बरे, अन्यथा काय झाले असते ? शेवटी ज्याचे जळते त्यालाच कळते. तेव्हा काहीही आरोप करण्याच्या भानगडीत पडू नये. आज काय तुमचे पॅकेज आले ... मी मध्यंतरी 100 गावांमध्ये गेलो होतो तेथील लोकांनी मला सांगितले की, धानाला पॅकेज मिळाले नाही. मी तुमच्या भागामध्ये, पश्चिम महाराष्ट्रात, उत्तर महाराष्ट्रात, साऱ्या महाराष्ट्रात जातो, सर्वत्र मी पॅकेज पाहिजे काय म्हणून विचारले. तेथील लहान लहान लोकांनी सांगितले की आम्हाला पॅकेज नको. मग आपल्या शासनाचा संदेश त्यांच्यापर्यंत काय पोहोचावा ? तर तू मरू नको, मी तुमच्या सोबत आहे. आपल्या पंतप्रधानांचा संदेश असाच. तू मेल्याशिवाय मी तुझ्या सोबत येणार नाही. काय चमत्कार आहे पहा ? तू मर आणि मग मी लाकडे आणि इतर मटेरिअल पाठवितो अगदी रॉकेलसुद्धा पाठवितो. हा संदेश लोकांमध्ये आज गेलेला आहे. तेव्हा तुमचे कितीही पॅकेज आले तरी या आत्महत्या थांबणार नाहीत. मला पुन्हा एकदा भीती वाटू लागली आहे ? ... मला भाषणासाठी दिलेला वेळ संपत आलेला आहे, वेळेअभावी माझे तोंड दाबले जाण्याची शक्यता आहे. ...

**तालिका सभापती** (श्रीमती सुधा जोशी) : सन्माननीय सदस्यांची वेळ संपलेलीच आहे. 10 मिनिटे होऊन गेली आहेत. ..

श्री. पाशा पटेल : सभापती महोदया, माझी वेळ संपली तरीही आपण वेळ संपल्याची घंटी वाजविली नाहीत त्याबद्दल मी आपला आभारी आहे. मी येथे जे काही बोलतो आहे ते गेली

....... 4आर 2 ..

श्री. पाशा पटेल ...

तीस वर्षांपासून मी कार्यकर्ता म्हणून ग्रामीण भागात राहिलो आहे, फिरलो आहे आणि जे मला अनुभवास आलेले आहे तेच सांगतो आहे. त्यामुळेच कदाचित आपण घंटी वाजविली नसेल. मी माझ्या मनातील वेदनाच येथे सांगत आहे. मी घरातून बाहेर पडलो, अन्यथा सरपंच देखील होऊ शकलो नसतो. जे अनुभवास येत गेले ते दुसऱ्याला सांगत गेलो आणि त्यातून नेता झालो आणि आता आमदार झालो. हे कशामुळे तर केवळ केलेल्या गोष्टी लोकांना सांगितल्या म्हणून. मला येथे काही प्रश्न सरकारला, मंत्री महोदयांना विचारावयाचे आहेत. एवढ्या आत्महत्या झाल्या. तेव्हा कोण कोण येऊन गेले ? विदर्भामध्ये आत्महत्या झालेल्या आहेत, कापसामुळे या आत्महत्या झाल्या आहेत. जेथे जेथे कापूस पिकतो तेथे तेथे आत्महत्या झालेल्या आहेत. या संबंधात आपले पंतप्रधान सांगतात की, सिंचन असले पाहिजे, ते नाही हेच याला मुख्य कारण आहे. पण सिंचन हे एकच कारण असते तर पंजाबमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या नसत्या. पंजाबसारखा सुपीक भाग नाही. तेथे कापसाचे उत्पन्न 5 क्विंटलवरून 24 क्विंटलपर्यंत वाढले. तेथे भाक्रा नानगल सारखे मोठे धरण आहे, तेथील सारा भाग सिंचनाखाली आलेला आहे. पण तरीही पंजाबमधील दोन गावांमध्ये जाहीरात लावली गेली की, मला माझे घर, शेती, जनावरे सगळे काही विकायचे आहे. जर सिंचनाचे पाणी तेथे मोठ्या प्रमाणात असताना पंजाबमधील गावांमध्ये कशासाठी लोक आपले घरदार विकायला काढतात ? तेव्हा जेथे कापूस होतो आहे तेथे आत्महत्या झालेल्या आहेत, होत आहेत ही वस्तुस्थिती आहे. शेतकऱ्याचे शोषण तर सगळ्याच भागात झालेले आहे. म्हणून आपल्या विदर्भात या संदर्भात कमिटी आली. माझ्या माहितीप्रमाणे इंदिरा गांधी सोशल सायन्सेसच्या लोकांनी पाहणी केली. टाटाची टीम आली, स्वामीनाथन साहेब एक टीम घेऊन आले. .....

( यानंतर श्री. सरफरे .....4एस 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल...

सभापती महोदया, एक सत्यशोधक कमिटी आली. त्या कमिटीबरोबर मोठमोठी माणसे आली. त्यानंतर कृषी मूल्य आयोगाची कमिटी आली.त्यानंतर माननीय राज्यपाल आले, माननीय पंतप्रधान आले. आणि शेवटी नियोजन मंडळाचे सदस्य आले. सत्यशोधन कमिटीने काय सत्य शोधले? त्यांनी गाई दिल्या. तुम्ही आम्हाला गाय दिली,पण त्या गाईच्या दूधाचे बोला? शेतकऱ्याला गाय देऊन त्याचे प्रश्न मिटणार आहेत काय? गाईच्या दूधाचे भाव वाढवून प्रश्न मिटेल. गाय वाटण्यापेक्षा गाईच्या दूधाची किंमत वाढवून दिली असती तर आज शेतकरी आपल्या बायकोच्या गळयातील मंगळसूत्र विकून बँकेकडे गेला नसता.जर त्याचा दूधाचा धंदा किफायतशीर झाला तर तो आपली जमीन विकून गाई विकत घेईल. माझ्या गावामध्ये 150 गाई वाटण्यासाठी आणल्या असतांना मी त्याला विरोध केला, त्यावेळी लोकांनी मला विरोध केला. आज प्रत्येक शेतकऱ्याच्या डोक्यावर 40 ते 50 हजाराचे कर्ज आहे. तेव्हा गाय वाटण्याऐवजी तुम्ही दूधाचे पैसे वाढविले पाहिजेत. ते वाढविले नाहीत. एवढी मंडळी महाराष्ट्रामध्ये येऊन गेली.परंतु कापसाच्या आणि सोयाबीनच्या भावाबद्दल कुणीही काही बोलले नाही. सत्य शोधायला आलेल्या या मोठया माणसांची सोंगे मोठी असतात, त्यांच्या कल्पना मोठया असतात. कुक्कुट पालन व्यवसायाचे काय? आज या व्यवसायामध्ये एक अंडे तयार करावयास 1 रुपया 20 पैसे खर्च येतो आणि ते अंडे विकून शेतकऱ्याला 80 पैसे मिळतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या वाढण्याचे कारण यामागे आहे. तेव्हा या भागातील शेतकऱ्यांनी मरु नये असे आपणास वाटत असेल तर कापसाला आणि सोयाबीनला आपल्याला भाव द्यावा लागेल. तरच शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या थांबतील, नाहीतर थांबणार नाहीत. या प्रश्नासंबंधी दै. देशोन्नतीचे श्री. प्रकाश मोरे हे मुंबई हायकोर्टामध्ये गेले.त्यांनी हायकोर्टाला विनंती केली की,आपण निपक्षपातीपणे या गोष्टीचा एकदा सोक्षमोक्ष लावा. तेव्हा हायकोर्टाने टाटा सामाजिक विज्ञान संस्थेला याबाबत सर्व्हे करण्यासाठी नेमले.त्या टाटा सामाजिक विज्ञान संस्थेने यांसंबंधी सर्व्हे केल्यानंतर जो अहवाल शासनाला सादर केला आहे तो आपण स्वीकारीत कां नाही? त्या संस्थेने सादर केलेल्या अहवालामध्ये असे नमूद केले आहे की, "शेतकऱ्यावर कर्जाचे ओझे हे एका रात्रीमध्ये झाले नसून त्याची पाळेमुळे मागील कित्येक वर्षीच्या पतपुरवठयाच्या धोरणामध्ये आहेत" त्यामुळे आपण हा अहवाल स्वीकारीत नाही. त्यामध्ये असेही सांगितले आहे की, "शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या झाल्यातर आपण त्यांना अडीच लाख रुपये द्या." परंतु तुम्हाला ते



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MAP/

श्री.सय्यद पाशा पटेल...

परवडत नाही, म्हणून तुम्ही अहवाल स्वीकारीत नाही. इंदिरा गांधी सोशल सायन्सेसने दिलेला अहवाल आपण स्वीकारला नाही, तो कां स्वीकारला नाही? स्वामीनाथन साहेबांची एक टीम आली त्यांनी देखील आपल्याला सूचना केल्या. आता यानंतर कोणती कमिटी येणार आहे? आपण गावो गावी जावून सांगा की,अरे लोकहो, तुम्ही मरु नका अजून एक कमिटी येणार आहे. फक्त तुमच्या कमिटयांची नावे ऐकून त्यांचे भागणार आहे काय? भागणार नाही. आपल्याला जर या आत्महत्त्या थांबवावयाच्या असतील तर मी आपल्याला चार-पाच गोष्टी सांगणार आहे. पहिली गोष्ट म्हणजे त्यांच्या शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारीत रास्त भाव दिला पाहिजे. तो दिल्याशिवाय शेतकऱ्याच्या आत्महत्त्या थांबणे शक्य नाही. दुसरे असे की, तुम्ही त्यांना मदत देणार आहात त्यावर त्यांचा विश्वास आहे काय? मी मरु नये असे तुम्हाला वाटते म्हणून तुम्ही मदत देणार असाल तर त्यावर माझा विश्वास काय? त्याकरीता तुम्ही अगोदर या सर्व लोकांची कर्जमाफी करावी. आपण स्पेशल इकॉनॉमिक झोन जाहीर केले आहे. माझी सभागृहातील माननीय सदस्यांना विनंती आहे की, आपण सुध्दा त्या झोनमधील एक गाव घ्यावे. त्याठिकाणी आपल्याला फुकट पाणी मिळेल, 24 तास अखंडीत वीज मिळेल, परकीय चलन फुकट मिळेल, कर भरावा लागणार नाही, पर्यावरणाचा प्रश्न निर्माण होणार नाही. सर्व काही नंगानाच आहे, मज्जाच मजा आहे. आपण सर्वजण मिळून घ्या, बघा जमतेय कां? म्हणून मी पुन्हा सांगतो की, आपण त्यांना कर्जमाफी द्या, आणि सरकार तुमच्या पाठीशी उभे राहणार आहे अशाप्रकारचा विश्वास त्यांना द्या.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पाशा पटेल (पुढे सुरु....

तिसरी गोष्ट अशी की, कर्जाची पत मर्यादा वाढवावी. शेतकऱ्यांना कोरडवाहू शेती म्हणून 3 हजार रुपये कर्ज दिले जाते. परंतु त्याच्या जमिनीची किंमत लाखाच्या वर असताना फक्त 3 हजार कर्ज मिळते, हा काय जमत्कार आहे ? म्हणून माझी विनंती आहे की, कर्ज मर्यादा वाढवावी. शहरामध्ये घरासाठी कर्ज घ्यावयाचे असेल तर एकूण किंमतीच्या 80 टक्के कर्ज मिळते आणि शेतकऱ्याला मात्र त्याच्या जमिनीची किंमत एक लाखाच्या वर असून देखील 3 हजार रुपये कर्ज मिळते. म्हणून माझी मागणी आहे की, शेतीला मिळणाऱ्या कर्जाची मर्यादा वाढवावी. सहकार मंत्री महोदयांनी सगळया शेतकऱ्यांना सहा टक्के व्याजाने दराने कर्ज देणार असल्याचे सांगितले. हे कर्ज आपण अल्प मुदतीचे देणार आहात, की दीर्घ मुदतीचे देणार आहात, याबाबत स्पष्ट असे काही सांगितले नाही .

श्री.अनिल देशमुख (बसून ) : सहा टक्के व्याजाने तीन लाखापर्यन्त कर्ज आहे.

श्री.पाशा पटेल : तीन लाखापर्यन्तचे कर्ज हे अल्प मुदतीचे आहे की दीर्घ मुदतीचे आहे ? शेतकरी हा शेतीसाठीच कर्ज वापरणार आहे, म्हणून ते सहा टक्के दराने द्या. पीक विमा योजना आहे. माणूस मेला तर त्याला विम्याचा फायदा मिळतो. पीक मेले तर तालुक्याचे पीक मिळाल्याशिवाय शेतकऱ्याला विम्याचा फायदा मिळणार नाही, असा जी.आर. काढा. जोपर्यन्त व्यक्तिगत विम्याचा फायदा मिळणार नाही तोपर्यन्त शेतकरी वाचणे शक्य नाही. बियाण्याच्याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी मुद्दा मांडला. मी एक गोष्ट सांगतो की, पश्चिम विदर्भामध्ये गेल्यावर्षी 66 कोटी रुपयाचे कापसाचे बियाणे खोटे निघाले, अशी "दै.लोकमत"मध्ये बातमी आली. एकेकाळी महिकोचे बियाणे खूप चालायचे. महिकोची पिशवी मिळणे म्हणजे नशीब. आठ-दहा वर्षापूर्वी माझ्या जिल्ह्यामध्ये 700 पिशव्या आल्या. 700 पिशव्या घेण्यासाठी 20 हजार लोक आले.त्यावेळी लाठीहल्ला झाला, त्यामध्ये तिघांचे हात तुटले. एवढी प्रचंड त्या बियाण्याची किमया होती. यामध्ये कमाई करता येईल ही बाब एका व्यापाऱ्याच्या लक्षात आली. आमची ज्वारी त्यांनी त्यांच्या पिशवीत भरली आणि बियाणे म्हणून विकली. ज्वारीचे पीक जे पाच फूट उंच जायचे ते पीक ते 11 फूट उंच वाढले पण शेंडा आणि गोंडा काहीच नाही. शेतकऱ्याला बियाण्याचे पैसेही मिळाले नाहीत. मंत्री महोदय, कायदा असा करा की, जर एखाद्या कंपनीने शेतकऱ्यांना खोटे बियाणे दिले तर त्या बियाण्याच्या पिशवी ऐवजी त्या पिशवीतील बियाण्यातून मिळणाऱ्या उत्पादनाएवढी किंमत त्याला मिळाली पाहिजे. असे जर केले तर कोणतीही कंपनी हरामखोरी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

श्री.पाशा पटेल (पुढे सुरू.....

करणार नाही, हे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. या दोन-चार गोष्टींचा विचार केला तर आत्महत्त्या थांबू शकतील. सत्यशोधन कमिटीचा काही उपयोग नाही. ते आले तरी अजूनही आत्महत्या वाढतील. आज आमच्याकडे हा प्रश्न आहे उद्या तुमच्याकडेही आत्महत्या वाढतील. आमच्याकडे रोज 15 शेतकऱ्यांचा हात्महत्या होतात त्या तुमच्याकडे सामुदायिक होतील. आपण पक्षभेद विसरून चर्चा करत आहोत. पश्चिम महाराष्ट्रामध्ये पाणी आले, ऊस आला, कारखानदारी आली, सहकाराचे जाळे पसरले तरी शेतकरी आहे तेथेच आहे. सन्माननीय सदस्य श्री.मानकर यांनी आपल्या भाषणामध्ये काही गोष्टी सांगितल्या.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल..... (पुढे सुरु)

गोंदिया, गडचिरोली, भंडारा या जिल्हयात मला जी गंभीर परिस्थिती दिसली, ती मी आपणास सांगत आहे. विविध कार्यकारी सहकारी सोसायटीची इमारत यापैकी एकाही गावामध्ये नाही, त्यांना येथे जागा नाही. मात्र आपल्या भागात विविध कार्यकारी सहकारी सोसायटयांच्या, पतसंस्थांच्या व बँकांच्या 3-4 मजली इमारती आहेत, काचेची दालने आहेत, सेंट्रल ए.सी. आहे. इकडे जागा नाहीत, बँका नाहीत. धान्याला भाव मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांनी कर्जे घेतली तरी ती फेडली जात नाहीत. तुमच्याकडे शेतकरीसुध्दा कर्जे घेतात आणि फेडतात. अशी तुलनात्मकदृष्टया गंभीर परिस्थिती आहे. तुमच्याकडील बँकांना व सोसायटयांना कमीशन मिळाल्यामुळे, त्यांच्या 3-4 मजली इमारती दिमाखात उभ्या राहतात. अशा इमारती, इकडे उभ्या राहण्यासाठी शासन दरबारी त्याचे कारण समजून घेतले पाहिजे. हा माझा आत्मा बोलत नाही, ज्या गरीब आत्महत्या केलेल्या घरातील माणसे मेली, त्यांच्या मुला-मुलींचा आत्मा बोलत आहे तर त्यांचा आवाज चिरडला जात आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या घरातील 21 वर्षाचा मुलगा किंवा 18 वर्षाची मुलगी लग्नाला आलेली असते. मुलगी विचार करते की, माझ्या भावाला बी.एस्सी.ॲग्रीचे शिक्षण मिळणार आहे. आर्थिक परिस्थिती नाजूक असल्यामुळे, मुलीच्या लग्नास असंख्य अडचणी येतात, तिला स्वत:च्या जीवनापेक्षा भावाचे शिक्षण जास्त महत्वाचे वाटत असल्यामुळे, ती आत्महत्या करत आहे. त्या कुटूंबाच्या परिस्थितीचा गांभीर्याने विचार केला तर आपणास परिस्थितीची जाणीव होईल. माणूस म्हणून या परिस्थितीकडे पाहिले तर मनाला मोठया यातना होतात. खुर्चीवर आणि सत्तेत बसलेल्या मंडळींनी याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. खुर्ची निर्जीव असली तरी तुम्ही आम्ही सजीव आहोत. कोणीतरी ए.सी.मध्ये बसून नियोजन करीत आहे आणि दुसरीकडे गंभीर परिस्थिती निर्माण होत आहे. तुम्ही Be practical आहात. महाराष्ट्र आणि देशाला वाचविण्यासाठी, या गोष्टीचा गंभीरपणे विचार करावा अशी मी तुम्हाला विनंती करतो. मी तुम्हाला निवडणूकीमध्ये पाडण्याचा प्रयत्न केला तरी तुम्ही पडणार नाहीत. कारण तुमच्याकडे निवडणूक जिंकण्यासाठी विविध संस्था, अस्त्रे व युक्त्या आहेत. आपण सर्वांनी गांभीर्याने विचार करुन प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करावा. हे प्रश्न सोडविण्यासाठी आमच्या सारख्या कार्यकर्त्यांची मदत पाहिजे असेल तर लेबर किंवा हमाल म्हणून तुमच्याकडे काम करण्याचीसुध्दा माझी तयारी आहे, एवढी विनंती मी आपल्या वतीने सरकारला करतो आणि माझे भाषण संपवितो.

-----

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदया, आमचे मित्र सन्माननीय श्री.सय्यद पाशा पटेल यांनी अतिशय सुंदर, इमोशनल, सेंटीमेंटल, स्टॅटेस्टीकली या सभागृहात भाषण केले आहे. शेतकऱ्यांची, राज्याची आणि देशाची परिस्थिती, आयोगाच्या शिफारशी या सर्व बाबींवर त्यांनी त्यांचे मत परखडपणे प्रदर्शित केले आहे, त्याबद्दल मी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. त्यांच्या भाषणातील बऱ्याच गोष्टी मानण्यासारख्या व मन:पूर्वक विचार करण्यासारख्या आहेत. भारतामध्ये अशी परिस्थिती का झाली त्याच्या विविध कारणाकडे पहावे लागेल. प्रथम या देशाची वाढती लोकसंख्या रोखण्यासाठी गांभीर्याने लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे. भारताच्या वाढत्या लोकसंख्येमुळे उद्‌भवलेले बरेच प्रश्न आपल्यासमोर येतात, ही गोष्ट आपल्याला नाकारता येणार नाही. भारतात हरितक्रांती झाली, त्यामुळे शेतीचे आणि शेतकऱ्यांचे प्रश्न खूप मोठया प्रमाणात कमी झालेले आहेत, उत्पन्न वाढले आहे. परंतु आपल्याला येथेच थांबून चालणार नाही. मी भारताचे पंतप्रधान माननीय डॉ.मनमोहनसिंह यांचे अभिनंदन करतो, कारण त्यांनी 21 व्या शतकामध्ये भारतात पुन्हा एकदा नवीन हरित क्रांती घडविण्याचे प्रयत्न व नियोजन केलेले आहे. या देशामध्ये हजारो नव्हे तर लाखो हेक्टर जमीन त्या माध्यमातून सिंचनाखाली येणार आहे. सिंचनाच्या विविध योजना राबविल्या जाणार आहेत.

..... यानंतर श्री.सोनवणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन...

आणि विविधप्रकारे त्या माध्यमातून योजनांची अंमलबजावणी या देशामध्ये होणार आहे आणि त्याचा फायदा या राज्याला होणार हे कोणीही नाकारणार नाही. शेतीचा प्रश्न आहे, आत्महत्या घडत आहेत आत्महत्या ज्या परिस्थितीत घडत आहे ती परिस्थिती अतिशय वाईट आहे हे कोणी नाकारु शकत नाही. महाराष्ट्र राज्यातील विशेषत: विदर्भ, मराठवाडा आणि आपल्या बाजूच्या राज्यातील आंध्रप्रदेश हे बेल्ट जर आपण बघितले तर जास्त सुसायडल डेथ शेतकऱ्यांची याच पट्टयामध्ये आहे आणि याच पट्टयामध्ये इरिगेशनची कमतरता आहे हे आपल्याला दिसून येईल. सिंचनाची कमतरता आहे हे आपल्याला दिसून येते. शेतकरी आत्महत्या का करतो त्याच्यावर या सभागृहातील सन्माननीय सदस्यांनी आपली मते व्यक्त केली आहेत. त्याच्याबद्दल मी काही बोलू इच्छित नाही. महाराष्ट्रामध्ये जे काही रिजन्स आहेत उत्तर महाराष्ट्र असो पश्चिम महाराष्ट्र असो कोकण असो मराठवाडा असो विदर्भात जरी शेतकरी चांगले पीक घेत असला तरी या परिसरामध्ये सुध्दा काही प्रमाणावर आत्महत्या घडलेल्या आहेत. त्या आत्महत्या कोणत्या कारणांमुळे घडलेल्या आहेत त्याचा अभ्यास करण्याची गरज आहे. या परिसरात म्हणजे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रमध्ये बऱ्याच ठिकाणी इरिगेशन नाही. त्या ठिकाणी पूर परिस्थिती निर्माण होत असते, त्या ठिकाणी दुष्काळ असतो असे असताना सुध्दा त्या परिसरातील शेतकरी हा आत्महत्या करीत नाहीत, जर करीत असतील तर त्यांचे प्रमाण खूप कमी आहे आणि शेतकरी आत्महत्या करीत असेल तर तो का करतो याचा खरोखर शोध घेण्याची गरज आहे, त्यांची मानसिक स्थिती काय आहे या गोष्टींचा अभ्यास केला पाहिजे. त्याचबरोबर विदर्भ मराठवाडयात सुध्दा याच पध्दतीने शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतात. त्या आत्महत्या का होतात यासाठी शासनाने मोठ मोठया समित्या स्थापन केल्या आहेत. माझी सूचना या ठिकाणी अशी आहे की, राज्याने एक छोटी समिती नेमून त्या समितीने त्या गावात किंवा तालुक्यात जाऊन त्या शेतकऱ्याच्या परिवारांना भेटावे, त्या गावातील जे शेतकरी असतील त्यांना भेटावे, त्यांची जी परिस्थिती असेल त्या परिस्थितीचा त्यांनी मनापासून आढावा घेऊन अभ्यास केला पाहिजे अशाप्रकारे संपूर्ण महाराष्ट्रात सर्व डिव्हीजनच्या शेतकऱ्यांच्या संदर्भातील त्यांची मानसिक स्थिती लक्षात घेऊन ज्यावेळी त्यांची फसल गेली असेल तर ज्याबाबतीत काय उपाय करावा याबाबतीतील अहवाल तयार करणे खूप गरजेचे आहे. एक लाँग टर्म प्लॅनींग करणे खूप गरजेचे आहे. जर केंद्र सरकारच्या माध्यमातून या राज्यामध्ये 16

4V-2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुझफ्फर हुसेन...

हजार कोटी रुपये मिळणार आहेत तर त्यांच्या माध्यमातून विदर्भ, मराठवाडा, उर्वरित भागाच्या ठिकाणी बॅकलॉग हे निश्चितपणे पूर्ण होणार आहेत. परंतु याला काही वेळ लागणार आहे. हे सर्व करीत असताना आपले जे काही सिंचनाचे प्रस्ताव प्रलंबित आहेत किंवा जे अर्धवट आहेत त्यावर शासनाने नजर घातलेली आहे. त्यासंबंधीच्या प्रस्तावास केंद्र सरकारने मान्यता दिलेली आहे आणि त्यावर 16 हजार कोटी रुपये खर्च करुन प्रलंबित कामे तसेच नवे प्रस्ताव शासन पूर्ण करणार आहेत. आजच्या घडीला जे प्रस्ताव सामील करुन घेतलेले नाहीत ते किती आहेत हे पाहून त्यांच्यासाठी एक लॉंग टर्म प्लॅनींग राज्यासाठी गरजेचे आहे म्हणून एका बाजूला शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती, मानसिक परिस्थिती पहाता दुसऱ्या बाजूला शासनाची सिंचनाची तयारी, इरिगेशनची तयारी, शेतकऱ्यांसाठी देणाऱ्या मदतीचा लॉंग टर्म पाथ पहाता निदान 25 वर्षासाठी राज्याची तयारी असणे गरजेचे आहे त्यांच्यासाठी आपण जे प्रकल्प राबविणार आहोत त्याच्या माध्यमातून किती हेक्टर जागा आपल्या सिंचनाखाली येणार आहे आणि त्यामुळे शेतकऱ्यांना पाणी मिळणार आहे हे देखील पाहिले पाहिजे शेतीचे उत्पादन चांगले होईल असे आपण निश्चितपणे बोलतो पण तेथेच न थांबता अजून त्याच्यापुढे आपली वाढती लोकसंख्या लक्षात घेता आज जो सर्वात मोठा प्रश्न शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा आहे त्याकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

यानंतर श्री. बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मुजफ्फर हुसेन .....

परंतु त्या ठिकाणी न थांबता आपली वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन विचार केला पाहिजे. ज्या ज्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत त्यांचे शेतीचे होल्डींग पाहिले तर कोणाकडे एक एकर तर कोणाकडे दीड एकर किंवा दोन एकर एवढे होल्डींग आहे. ती शेती सुध्दा रिमोट एरियामध्ये आहे. शासनाच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत. शासनाचे अधिकारी त्यांच्या पर्यंत योजना घेऊन पोहोचत नाहीत. आपण ज्या सगळ्या गोष्टी करतो त्याचा लाभ जिल्हा मुख्यालयापर्यंत किंवा तालुका मुख्यालयापर्यंत मिळतो. रिमोट एरियामध्ये किंवा गावामध्ये अधिकारी आणि योजना पोहोचत नाहीत. त्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचविण्याचे काम आणि त्यांना सातत्याने मार्गदर्शन करण्याचे काम शासनाचे आहे. शासनाने याबाबतीत लॉन्ग टर्म प्लॅनिंग करण्याची गरज आहे. टारगेट ओरिएंटेड प्लॅनिंग करण्याची आवश्यकता आहे. आपल्या देशामध्ये आणि आपल्या राज्यामध्ये सर्व जातीधर्माचे लोक राहतात. त्यांची संस्कृती आहे. आपल्या समाजामध्ये प्रचार करण्यासाठी गुरु, स्वामी, मौलाना, महाराज अशा व्यक्ती किंवा संत कार्यरत असतात. शेतकऱ्यांना जीवन जगण्याच्या दृष्टीकोनातून अशा मोठ्या संतांचे सुध्दा मार्गदर्शन मिळण्यासाठी, त्यांना आर्ट ऑफ लिव्हींगचे मार्गदर्शन मिळण्यासाठी शासनाच्या माध्यमातून या संतांचे सहाय्य घेतले पाहिजे. जिल्हा पातळीवर अशा प्रकारची शिबिरे आयोजित केली पाहिजेत. त्याचबरोबर जी योजना आपण आखणार आहोत त्या कामाचे इन्फ्लेशन होत असते. आपण सिंचनाची हजारो कोटी रुपयांची कामे पूर्ण करणार आहोत. स्टील, सिमेंट, लेबर या सर्वांची कॉस्ट वाढलेली आहे. कामाला सुरुवात झाल्यानंतर एक दोन वर्षात 50 ते 60 टक्के किंमती वाढतील. आज आपण 16 हजार कोटी रुपयांचे नियोजन करतो परंतु काम सुरु करताना त्याची किंमत 20 हजार कोटी रुपये होईल. काम सुरु केल्यानंतर त्याची किंमत आणखी वाढून 30 ते 40 हजार कोटी रुपये होईल. त्यामुळे परत कामे थांबतील आणि पुन्हा बॅकलॉगचा डोंगर उभा राहील. ज्या प्रश्नाबाबत दोन्ही सभागृहाचे सन्माननीय सदस्य गांभीर्याने चर्चा करुन यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहेत तो प्रश्न पुढच्या पाच दहा वर्षामध्ये तसाच उभा राहील. त्यामुळे यामध्ये खूप लक्ष घालण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे एक समिती करुन, शेतकऱ्यांपर्यंत वन टू वन इंटरॲक्शन करुन शासनाच्या योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवाव्यात अशी सूचना करुन मी माझे भाषण संपवितो.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/ MAP/

डॉ. दीपक सावंत ( मुंबई पदवीधर ) : सभापती महोदया, या प्रदीर्घ चाललेल्या चर्चेमध्ये अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले मौलिक विचार या ठिकाणी मांडलेले आहेत. सन्माननीय सदस्य डॉक्टर साहेबांनी आपले अनुभव या ठिकाणी सांगितले तर सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी प्रॅक्टीकल सोल्यूशन दिले. आमच्या माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या चर्चेमध्ये आजपर्यंत त्यांनी जे विचार मांडले त्यापेक्षा अधिक तीव्रतेने त्यांनी आपल्या भावना मांडलेल्या आहेत. शेतकरी आत्महत्या का करतात हा प्रश्न सगळयांच्या समोर आहे. आपण पॅकेज जाहीर केले. माननीय पंतप्रधानांची भेट झाली आणि त्यानंतर आत्महत्या का वाढल्या याचा मुळात जाऊन कधी कोणी विचार केला आहे काय ? एखादी व्यक्ती आत्महत्या का करतो याचे चांगले विश्लेषण सन्माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी केलेले आहे. तो अशा एका बिंदूवर येऊन पोहोचतो की आपले आयुष्य संपवावयाचे की आपण जगावयाचे ? ज्यावेळी तो या बिंदूवर येऊन पोहोचतो त्यावेळी तो आत्महत्येचा निर्णय घेतो. तो निर्णय कोणत्याही क्षणी होत नाही. याला भरपूर मानसिक तयारी करावी लागते. एखादा विद्यार्थी परीक्षेत नापास होणार असतो. दुसऱ्या दिवशी निकाल असतो. निकाल लागल्यानंतर तो आत्महत्या करतो. कारण त्याला अपयशाला सामोरे जावयाचे नसते. त्याला दुसऱ्याला तोंड दाखवावयाचे नसते.

यानंतर श्री. शिगम ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 19:00

(डॉ. दीपक सावंत...)

त्याला आई-वडिलांना, परीक्षेत का फेल झालो याचा जाब द्यावयाचा असतो. विद्यार्थ्याची आत्महत्या आणि शेतक-याची आत्महत्या यामध्ये फरक आहे. शेतक-याला मुलीच्या लग्नाची चिंता असते, तिचे लग्न होईल की नाही, माझ्या आयुष्यातील फेल्युअर लोकांसमोर येईल का ? अशा प्रकारच्या सायकॉलॉजीमध्ये तो अडकलेला असतो आणि शेवटी तो आत्महत्येस प्रवृत्त होतो. याच क्षणी त्याला सावरण्याची आवश्यकता असते. सन्माननीय सदस्य श्री. मुझफ्फर हुसेन यांनी, एक समिती नेमून त्या समितीने गावागावाला भेट देऊन सर्वेक्षण केले पाहिजे, अशी सूचना केली. सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल यांनी हा चढ-उतार का हे सांगितले. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावतेसाहेबांनी सभागृहासमोर आकडेवारी सादर करुन 4 लाख 34 हजार कुटुंबे "अ " श्रेणीमध्ये म्हणजे अत्यंत अडचणीच्या परिस्थितीमध्ये आणि 9 लाख कुटुंबे "ब " श्रेणीमध्ये आहेत असे सांगितले. कुपोषणाच्या ग्रेड 4 मधील व्यक्ती ग्रेड 3 मध्ये जाते त्याप्रमाणे या "अ" आणि "ब" श्रेणीच्या संख्येमध्ये बदल होऊ शकेल. म्हणून याकडे वेळीच लक्ष दिले तर येणा-या पुढच्या काळामध्ये आत्महत्यांचे प्रमाण कमी होऊ शकेल. आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबीयांना शासनाने कोणती आणि किती मदत केली याच्या खोलात मी जात नाही. या आत्महत्या होऊ नयेत यासाठी शासनाला काही उपाय शोधायचा असेल तर तो उपाय म्हणजे शासनाने या 9 लाख कुटुंबाचे मॉनिटरिंग करणे आवश्यक आहे. चीन, ब्रिटन या देशांमध्येही आत्महत्या झाल्या होत्या. ब्रिटनमध्ये जेव्हा शेतक-यांनी आत्महत्या केल्या त्यावेळी बिलियन डॉलर्स् शेतक-यांचे कर्ज माफ केले. ते शेतकरी देखील कापूस उत्पादक शेतकरी होते. आपण तर शेतक-यांना काहीच मदत देत नाही. आपण त्यांना 1 लाख रु.सुध्दा देत नाही. आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या बाबतीत खोटे पंचनामे करुन, त्यांना व्यसनाधीन ठरवून त्यांना मदतीपासून वंचित केले जाते. शेतक-यांची आर्थिक स्थिती, सामाजिक प्रतिष्ठा, त्याच्यावरील कर्ज इत्यादीबाबतची कोणाला माहिती असू शकेल तर ती अंगणवाडी सेविकेला असू शकते. अंगणवाडी सेविकेचे गावातील प्रत्येक कुटुंबाशी जवळचे नाते असते. त्यामुळे प्रत्येक कुटुंबाची माहिती अंगणवाडी सेविकेला असते. अंगणवाडी सेविकेला एक वेगळया प्रकारचे ट्रेनिंग दिले तर ती गावातील कुटुंबांच्या परिस्थितीबाबत माहिती मिळवू शकेल आणि त्यामुळे आत्महत्येस प्रवृत्त होणा-या शेतक-यांच्या संदर्भात वेळीच मदत करता येऊ

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(डॉ. दीपक सावंत...)

शकेल. तेव्हा यादृष्टीने शासनाने विचार करावा असे माझे मत आहे. शेतकरी व्यसनाधीन का होतो ? तर मुलीच्या लग्नासाठी घेतलेले कर्ज कसे फेडावे या विवंचनेत तो असतो, त्याला मग फस्ट्रेशन येते आणि शेवटी तो आत्महत्येकडे वळतो. शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात टाटा इन्स्टिटट्यूट ऑफ सोशल सायन्सेसच्या रिपोर्टवर सर्वंकष विचार होण्याची आवश्यकता आहे. अधिका-यांनी देखील आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे. शेतक-यांना मिळणारे पैसे हे खरोखरच त्यांच्या पर्यन्त पोहोचतात की नाही हे पाहिले पाहिजे. त्यासाठी किमान सिंगल विण्डो सिस्टिम ठेवली पाहिजे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत........

मघाशी सन्माननीय सदस्य श्री.रावते यांनी सांगितले किती खेटे मारावे लागतात. निदान शेतकऱ्याच्या मृत्यूनंतर त्याच्या विधवा पत्नीला खेटे घालायला लागू नये यासाठी एक खिडकी योजना राबवावी आणि आज ज्या जाचक अटी आहेत त्या कमी करुन 1 लाख रुपये किंवा जी काही आर्थिक मदत द्यायची आहे तो चेक निदान पहिल्या दिवशी दिला जावा. बँकेत खाते उघडण्यासाठी 75 रुपये लागणार नाहीत किंवा शासनाने ते 75 रुपये खाते उघडण्यासाठी भरावेत अशी विनंती करुन माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र !

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदया, आज आपण गंभीर अशा विषयावर सभागृहात चर्चा करीत आहोत. अनेक सन्माननीय सदस्यांनी विस्तृतपणे आकडेवारीसह आपले विचार मांडले आहेत. त्यामुळे अधिक आकडेवारी न देता मी माझ ो विचार मांडणार आहे. भारत हा कृषिप्रधान देश आहे. 60 टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. 58 वर्षात शेतीवरचा बोजा दीड पटीने वाढला असून तो वाढतच जाणार आहे. मागील 50 वर्षात लोकसंख्या 35 कोटीवरुन 105 कोटीवर पोहोचली आहे. जे बागायतदार होते ते शेतकरी अल्पभूधारक झाले आहेत. या सगळया अनुषंगाने शेतकरी हवालदिल होऊन आत्महत्येला सामोरा जात आहे ही गोष्ट भूषणावह नाही. आज प्रामुख्याने शेतीमालाला भाव मिळणे, बियाणे, खते, पाणी, वीज आणि कर्ज या सगळया गोष्टी प्रमुख घटक आहेत. मला विनंती करावयाची आहे की, शेतकऱ्याला बाजारभावाची माहिती मिळाली पाहिजे. मार्केट कमिटी हे त्याला जवळचे साधन आहे. महाराष्ट्रातील सगळया बाजारभावाची माहिती, शेजारी असलेल्या राज्यामधील मार्केट किंवा बाजारभावाची माहिती त्याच्या घरापर्यंत कशी पोहोच करता येईल हे पाहिले पाहिजे. याकरीता अंगणवाडी सेविकेच्या माध्यमातून, ग्रामपंचायतीच्या माध्यमातून पोहोच करता येईल का याचा विचार व्हावा. हा विषय कोणाच्या अखत्यारित येतो याची मला कल्पना नाही. मला याठिकाणी खेदाने नमूद करावेसे वाटते की, कृषिप्रधान देश आहे, रेडिओवरील बातम्या संपल्यानंतर बाजारभावाची माहिती दिली जाते. अनेकदा मी स्वत: ऐकले आहे, बातम्या संपल्यानंतर आज बाजारभाव नाहीत असे सांगितले जाते. ग्लोबलायझेशनच्या युगात आय.टी.मधील क्रांतीने घराघरात संगणक आले, दूरदर्शन पोहोचले. परंतु शेतकरी रेडिओ ऐकतो त्यावर जर त्याला आवश्यक अशी माहिती मिळणार नसेल तर सरकारला विनंती करावीशी वाटते की, असे घडता कामा नये, यादृष्टीने लक्ष द्यावे. पाण्याच्या संदर्भात बरीच चर्चा झाली आहे. सकाळी सभागृहामध्ये एसईझेडबाबत चर्चा झाली. पाण्यासाठी महत्वाकांक्षी प्रकल्प उभारण्यात आले. अनेक प्रकल्पांचे डिझाईन आणि प्लॅनिंग इंग्रजांच्या काळात झालेले आहे. आजही काही प्रमाणात प्रकल्प निर्माण केले गेले आहेत. परंतु महाराष्ट्रातील 100 टक्के पाणी वापरले जाते का हा संशोधनाचा विषय आहे. इस्त्रायलसारख्या देशात 4-5 इंच पाऊस पडत असताना आपण त्या देशामध्ये जाऊन कृषिविषयक ज्ञान प्राप्त करतो. आपल्याकडे एका दिवसात एकाच गावात इतका पाऊस पडत असताना इस्त्रायलमध्ये शेतीबाबत शिक्षण घेण्यास जाणे हा दैवदुर्विलास होय. महाराष्ट्रामध्ये विशेषत: कोकणामध्ये मोठया प्रमाणात

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील..........

पाऊस पडतो, त्या पावसाचे पाणी समुद्राला जाऊन मिळते. ते पाणी कसे वाचविता येईल याचा विचार झाला पाहिजे. आज ठाणे जिल्हयामध्ये जी धरणे अस्तित्वात आहेत त्यातील वैतरणा, तानसा, भातसा ही धरणे पहिल्यांदा शेतीसाठी बांधली गेली. महाराष्ट्रातील अनेक धरणांची उभारणी सुरुवातील शेतीसाठी केली गेली. कालांतराने ते पाणी पिण्यासाठी व औद्योगिक कारणासाठी वापरले जाऊ लागले.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील.....

सभापती महोदय, कोकणामध्ये मोठया प्रमाणात पाऊस पडतो परंतु या पाण्याला अडविण्यासाठी धरण नसल्यामुळे हे सर्व पाणी समुद्राला जाऊन मिळते. तसेच कोयनेतून जे पाणी वाहून जाते ते सुध्दा समुद्राला मिळते. ते पाणी अडविण्यासाठी सुध्दा काही योजना आखण्यात नाही. ठाणे जिल्हयातील धरणाचा उद्देश शेतीसाठी होता. ठाणे जिल्हयाच्या धरणातून पाणी नाशिक आणि मराठवाडयापर्यंत मिळत होते. परंतु आता ठाणे जिल्हयाचे पाणी मुंबईच्या जनतेसाठी पिण्यासाठी वापरले जाते. त्यामुळे कोकणातून वाहून जाणारे पाणी आणि कोयनेतून वाहून जाणारे पाणी अडविले आणि त्याचा शेतीसाठी उपयोग केला तर त्याचा खुप चांगल्या प्रकारे फायदा होऊ शकेल.

सभापती महोदय, विदर्भात 6 ठिकाणी एसईझेड होणार आहेत, पश्चिम महाराष्ट्रात 25 एसईझेड होणार आहेतत तसेच कोकणामध्ये सुध्दा मोठया प्रमाणात एसईझेड होणार आहे. एसईझ ेड झाल्यामुळे मेगासीटी निर्माण होणार आहेत. एसईझेडमध्ये शेती काही तयार होणार नाही. त्यामुळे आज ज्या धरणातून पाणी शेतीसाठी वापरले जाते ते पाणी सुध्दा पिण्याच्या पाण्यासाठी वापरले जाण्याची शक्यता आहे. खरे म्हणजे धरणाच्या पाण्याला प्रथम प्राधान्य पिण्यासाठी त्यानंतर उद्योगधंद्यासाठी व त्यानंतर उरलेले पाणी शेतीसाठी मिळू शकते. येणा-या काळात हजारो हेक्टरमध्ये मेगासीटी निर्माण होणार आहेत त्यामुळे या धरणाचे पाणी जास्त करुन मगासीटीज करता वापरले जाणार आहे. त्यामुळे समुद्राला जे पाणी मिळते ते पाणी अडविले जाणे फार आवश्यक आहे. त्यामुळे यासंदर्भात मास्टर प्लॅन डोळयासमोर ठेवणे आवश्यक आहे. या प्रश्नाच्या संदर्भात माननीय शरदचंद्रजी पवार यांनी अनेक वेळा चर्चा घडवून आणलेली आहे. राष्ट्रीय नद्या जोड प्रकल्पावर सुध्दा सभागृहात चर्चा झालेली आहे. त्यामुळे समुद्रात वाहून जाणारे पाणी अडवून ते विदर्भापर्यंत कशा रितीने पोहचू शकेल यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

दुसरा मुद्दा असा आहे की, परेदशामध्ये जर वीज गेली आणि वीज गेल्यामुळे जर नुकसान झाले तर त्या व्यक्तीला नुकसान भरपाई दिली जाते. आमच्याकडे 12-12 तास वीजेचे लोडशेडींग केले जाते. या लोडशेडींग मुळे वीज कमी दाबाने मिळते व त्यामुळे मोठया प्रमाणात यंत्र खराब होतात त्यामुळे परदेशात ज्या प्रमाणे नुकसान भरपाई दिली जाते त्या प्रमाणे आपल्याकडेही

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील.....

नुकसान भरपाई मिळण्याची आवश्यकता आहे. कारखान्याला विजेचा सप्लाय कट झाला तर ते त्यांच्या जनरेटरने वीज तयार करु शकतात व आपला कारखाना चालू ठेवू शकतात परंतु शेतकरी हा काही वीज जनरेट करुन आपले विद्युत पंप चालवू शकत नाही. त्यामुळे शेतक-यांसाठी वीज जास्त प्रमाणात मिळण्याची व सारख्या दाबाने मिळण्याची आवश्यकता आहे. विजेच्या संदर्भात लाँग टर्म योजना आखण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, शेतीमधून जो माल तयार होतो त्यावर प्रक्रिया करणारे उद्योग निर्माण करण्याची आवश्यकता आहे. मराठवाडयातील बरेच शेतकरी आता ऊसा ऐवजी सोयाबीनचे पीक घेण्याकडे वळले आहेत. तसेच विदर्भात देखील मोठया प्रमाणात सोयाबीनचे पीक घेतले जाते. त्यामुळे शेतीतून तयार होणा-या मालावर प्रक्रिया करणारे कारखाने निर्माण होण्याची आवश्यकता आहे. प्रक्रिया करणा-या उद्योगामध्ये शासनाने जरी गुंतवणूक केली तरी ते फायद्याचे ठरणार आहे. शासनाने धंदा करावा असे मी म्हणत नाही परंतु आता शेतीतून निर्माण होणा-या मालावर प्रक्रिया करणा-या उद्योगांची, फुड प्रोसेस पार्कची जिल्हया-जिल्हयात आवश्यकता निर्माण झालेली आहे. आता बटाटयाचा दर 4 ते 5 रुपये किलो आहे परंतु याच बटाटयावर प्रक्रिया केली तर बटाटयाचा दर किलो मागे 250 ते 300 रुपयापर्यंत जातो त्यामुळे यासंदर्भात सुध्दा तातडीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. तसेच आता आपल्याकडे कोल्ड स्टोरेजची मोठया प्रमाणात आवश्यकता झालेली आहे. कोल्डस्टोरेज नसल्यामुळे शेतक-यांचा माल खराब होतो. कोल्ड स्टोरेज जिल्हया जिल्हयात निर्माण झाले तर शेतक-यांना त्याचा चांगला उपयोग होऊ शकेल.

सभापती महोदय, शेतक-यांना सहा टक्के दराने पैसे उपलब्ध करुन दिले जातील अशी घोषणा मागच्या अधिवेशनात करण्यात आली होती परंतु अद्यापपावेतो त्याची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे सहा टक्के दराने शेतक-यांना पैसे उपलब्ध करुन द्यावेत अशी विनंती आहे. तसेच भुविकास बँकाचे पुनरुज्जीवन करण्याची घोषणा सुध्दा झालेली आहे परंतु त्याची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे यासंदर्भातील प्रक्रिया पूर्ण करावी अशी विनंती करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------------------

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.अरविंद सांवत )**

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, राज्यात होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या या विषयावर सभागृहात जवळपास साडेपाच तास चर्चा सुरु आहे. सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी या विषयावर आपली मते मांडलेली आहेत. शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या हा सर्वांच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. या सभागृहात बसलेल्या सदस्यांच्यादृष्टीने, बाहेरील सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. सत्ताधारी पक्षाच्या दृष्टीचे चिंतेचा विषय आहे, विरोधी पक्षाच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. थोडक्यात सर्वांनाच चिंता करायला लावणारा हा विषय आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी सर्वच सदस्यांनी मौलिक सूचना केलेल्या आहेत. त्यादृष्टीने राज्य शासन योग्य ती प्रकारची उपाययोजना करील. राज्यात होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात मला प्रामुख्याने दोन मुद्दे मांडावयाचे आहेत. पहिला मुद्दा म्हणजे प्रिव्हेन्टींव्ह मेजर्स. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्या लागतील जेणेकरुन आपल्याला शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखता येतील. त्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी कोणकोणते उपक्रम हाती घ्यावे लागतील, कोणकोणती काळजी घ्यावी लागेल यावर सखोल चर्चा होणे गरजेचे आहे. नियोजन होणे गरजेचे आहे आणि त्यानुसार प्रत्यक्ष कार्यवाही होणे अत्यंत गरजेचे आहे.

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा प्रश्न म्हणजे दुर्दैवाने ज्या शेतकऱ्यांची आत्महत्या झालेली आहे त्यांच्या कुटुंबाला शासन काही प्रमाणात मदत करते. त्या मदतीमुळे त्या कुटुंबाला थोडासा आधार मिळतो, सहारा मिळतो. सभापती महोदय, फक्त विदर्भातच शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत असे नव्हे, तर राज्याच्या इतर भागातही शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. फक्त विदर्भात आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे. राज्यात झालेल्या एकूण आत्महत्येपैकी 98 टक्के आत्महत्या या विदर्भात झालेल्या आहेत. या आत्महत्येचे लोण राज्याच्या अन्य भागांत पसरण्यास सुरुवात झालेली आहे. नाशिक- ठाणे पर्यंत हे लोण पोहोचलेले आहे. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी शेतकरी सुध्दा आत्महत्येस प्रवृत्त होत आहेत. आज शेतकऱ्यांवर संकट आले की, त्याच्याकडे आत्महत्या करण्याशिवाय पर्याय नसतो. सभापती महोदय,मी आपणास नाशिक

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते......

जिल्ह्यातील उदाहरण सांगतो. नाशिक जिल्ह्यातील  नैताळ गावातील शेतकऱ्यांनी एक्सपोर्ट होतील अशा क्वॉलिटीच्या द्राक्षांची तीन-चार एकरामध्ये लागवड केली होती. त्यातून त्यांना सुमारे पाच-सहा लाख रुपयांचे उत्पन्न मिळणार होते. पण अचानक झालेल्या गारपीटीमुळे त्या सर्व द्राक्षाच्या बागा उद्ध्वस्त झाल्या. त्या गावापासून तीन-चार कि.मी.अंतरावर मागे व पुढे कुठेही गारपीट झाली नाही. फक्त त्याच गावात गारपीट झाली. त्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला गेला. त्या शेतकऱ्यांना डोळ्यासमोर दिसत होते की, आपल्याला किमान 5-6 लाख रुपयांचे उत्पन्न मिळणार, परंतु त्यांच्या डोळ्यादेखत बागांचे नुकसान झाले. गारपीटीमुळे झालेल्या नुकसानामुळे काही शेतकऱ्यांना हृदयविकाराचा झटका आला, काहींची मन:स्थिती बिघडली. त्यांच्यासमोर अनेक समस्या उभ्या राहिल्या होत्या. बँकेचे-सोसायट्यांचे कर्ज फेडायचे होते. मुलीचे लग्न करायचे होते, मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न होता. त्याला जे 5 लाख रुपये मिळणार होते त्यासाठी त्याने किमान 2-3 लाख रुपयांची गुंतवणूक केली आहे,

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

त्यांनी औषधोपचारासाठी खर्च केलेला आहे, फवारणीसाठी खर्च केलेला आहे, मेहनतीच्या दृष्टीने लेबरसाठी खर्च केला आहे परंतु आता आपल्याला काहीच मिळणार नाही, पुढच्या वर्षी पुन्हा 5 लाख रुपयांची गुंतवणूक करुन पुन्हा निसर्गाच्या भरवशावर उत्पादन घ्यावे लागेल या दृष्टीने त्यांच्या मनमाध्ये जी परिस्थिती निर्माण झालेली आहे, तीच शेतक-यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त करते, असे मला वाटते. त्यामुळे यासंबंधी उपाययोजना होणे अत्यंत गरजेचे आहे. सभापती महोदय, याठिकाणी माननीय शिक्षण मंत्री उपस्थितीत आहेत. ज्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या, त्यांच्या कुटुंबियांना शासनाकडून काहीनाकाही प्रमाणात मदत मिळाली. परंतु ती मदत तात्पुरत्या स्वरुपाची आहे. यानिमित्ताने मी शासनाला व पर्टीक्युलरली शिक्षण मंत्र्यांना विनंती करणार आहे की, ज्या सर्वसामान्य गरीब शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्यांच्या कुटुंबियातील कर्ताधर्ता माणूस निघून गेल्यामुळे खरोखरच आज त्या कुटुंबामध्ये जी शिक्षण घेणारी मुले असतील त्यांना शिक्षणाच्या बाबतीत कोणत्या प्रकारची अडचणी नाहीत ना किंवा ते शिक्षणापासून वंचित तर राहत नसतील ना याची काळजी सरकारने घेणे आवश्यक आहे. याबाबतीत सर्व्हे होऊन त्यांना मदत मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे याबाबतीत आपण सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून पाहून यासंदर्भात सर्वेक्षण करुन मदत करावी. तसेच, आत्महत्या झालेल्या कुटुंबातील मुला-मुलींच्या बाबतीत, ज्या मुली वयात आलेल्या असतील व त्यांचे लग्न यामुळे रखडले असेल तर याहीबाबतीत आपण सर्वे करुन त्यांना मदत करण्याच्या दृष्टीने विचार करावा, ही विनंती. एवढे बोलून मी माझे मनोगत येथेच थांबवतो.

धन्यवाद !

------

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. डॉ.एम.ए.अजिज (नामनियुक्त) : सभापती महोदय, कालपासून हे सभागृह एका महत्वाच्या विषयावर उत्तेजित झालेले आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी काल आग्रह धरला होता की, आजच या विषयी चर्चा सुरु व्हावी. त्यावेळी मला थोडेसे वाटले होते की, हा त्यांचा आग्रह राजकीय आहे की काय ? परंतु आज सगळया सभागृहाच्या भावना ऐकून व सध्या राज्यात जी परिस्थिती निर्माण झालेली आहे, ती पाहून खरोखरच माननीय विरोधी पक्षनेत्यांचा आग्रह योग्य होता, असे मला दिसून येत आहे.

सभापती महोदय, आज शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या होत आहेत, त्या गेल्या 4-5 वर्षामध्येच का होत आहेत, त्या अगोदर चांगली परिस्थिती होती का ? याचाही विचार आपण केला पाहिजे. सभापती महोदय, आज शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत असून शासनही त्याबाबतीत उपाययोजना करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करीत आहे. याबाबतीत 1 लाख, 2 लाख रुपयांची मदत किंवा हे पॅकेज, ते पॅकेज अशी मदत होत आहे, परंतु आज आत्महत्येचे प्रमाण वाढतच आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांनी सांगितले की, असे पॅकेज देऊनही आत्महत्या कमी होणार नाहीत, या त्यांच्या मताशी मी सहमत आहे. याठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी अनुशेषाचा उल्लेख केला. त्याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री.सय्यद पाशा पटेल यांनी सांगितले की, असे असेल तर पंजाबमध्ये शेतकरी का आत्महत्या करीत आहेत ? हाही मुद्दा विचार करण्यासारखा आहे.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए.अझिज...........

मी देखील शेतकरी आहे. डॉक्टर हा माझा व्यवसाय आहे. माझ्या शेतात एक शेतकरी आहे तो मला म्हणाला की, डॉक्टरसाहेब कोणते चांगले विष आहे की जे मी घेतल्यानंतर मला ताबडतोब मरण येईल. मी त्याला आत्महत्येचे कारण विचारले तेंव्हा त्याने सांगितले की, आत्महत्या केल्यानंतर 1 लाख रुपये शासनाकडून मिळतात त्यामध्ये 20 हजार रुपये मुलीच्या लग्नासाठी, 40 हजार रुपये मुलाला दुकानासाठी वापरता येतील. मला या निमित्ताने हे सांगावयाचे आहे की, केवळ पैसे देऊन आत्महत्या थांबणार नाहीत. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.रावतेसाहेब यांनी या ठिकाणी भरपूर आकडेवारी सादर केलेली आहे. विरोधी पक्षनेते यांनी या प्रकरणातील शॉर्टफॉल दाखवून दिले. शासनाने जी आश्वासने दिली ती पूर्ण न केल्याचे त्यांनी सांगितले आणि तपशीलही दिला. यासंदर्भातील अंतिम सोल्युशन आपण कोणते काढणार आहोत ? हे सर्वोच्च सभागृह आहे. एकमेकांवर आरोप करुन चालणार नाही तर ठोस उपाय शोधून काढण्याची गरज आहे. यासाठी शेतकरी आत्महत्या का करतात याचे निश्चित निदान झाले पाहिजे. मी स्वत: डॉक्टर आहे. कोणताही आजार असेल तर आजार दूर करण्यासाठी निश्चित निदान व्हावे लागते. डोके दुखते म्हणून ते थांबण्याची गोळी, पोट दुखते म्हणून ते थांबण्याची गोळी देऊन उपयोगी नाही तर ते कशामुळे दुखते याचे निश्चित निदान होणे गरजेचे असते. आजाराचे मूळ काय आहे हे शोधावे लागते. मूळ आजार समजला, त्याचे निदान करु शकलो तर आपण त्यावर कायमस्वरुपी मात करु शकतो. आज आपण कॅन्सरचे उदाहरण बघितले तर आपल्या असे लक्षात येईल की, आपण या आजारावर आतापर्यन्त मात करु शकलेलो नाही कारण त्या आजाराची इकोलॉजी आपल्याला मिळालेली नाही. एडस्‌ची देखील तशीच परिस्थिती आहे. या आजारांचे जोपर्यन्त निदान करु शकत नाही तोपर्यन्त त्यावर मात करता येणार नाही. आत्महत्येचे देखील तसेच आहे. त्याची इकॉलॉजी माहिती करुन घेण्याची गरज आहे, निश्चित निदान करण्याची गरज आहे. केवळ पैसे देऊन, लोन देऊन काहीही होणार नाही. जी शेती उत्पादने आहेत त्यांच्यासाठी वेअर हाऊसेस बांधली पाहिजे आणि त्या उत्पादनांना योग्य भाव मिळाला पाहिजे. त्याचप्रमाणे या प्रश्नाचा थोडा सायकॉलॉजीकली विचार करण्याची देखील गरज आहे. यासंबंधी संशोधन होण्याची गरज आहे. यासाठी एखादी टिम तयार करुन जीवनाचे महत्व शेतक-यांच्या लक्षात आणून देणे गरजेचे आहे.

..2..........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.एम.ए.अझिज....

स्वर्गीय इंदिरा गांधी यांची हत्या झाली, शानदान प्रोसेशन निघाले, हजारो लोक त्याठिकाणी जमले होते. त्यामध्ये एक उर्दु कवी होते. त्यांचा असा शेर आहे की, "मौत कितनी शानदान सही लेकिन जिंदगी तेरा जवाब नही." शेतकरी बांधवांना जीवन काय आहे याचा पाठ द्यावा लागेल. आत्महत्या करुन कोणतेही प्रश्न सुटत नाही. एवढे बोलून आणि सन्माननीय सदस्य, श्री.पाशा पटेल यांनी जे मुद्दे मांडले त्या मुद्यांचे समर्थन करुन माझे दोन शब्द संपवितो.

--------------------

यानंतर श्री.बोरले.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ KTG/ SBT/ MHM/ प्रथम श्री.रोझेकर .......... 19:30

श्री.परशुराम उपरकर (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, काल माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी शेतक-यांच्या प्रश्नावर चर्चा करण्याचा आग्रह धरला आणि सभागृहाचे कामकाज अनेक वेळा तहकूब झाले. शेतक-यांच्या प्रश्नांना न्याय मिळण्यासाठी आज आपण सर्व सन्माननीय सदस्यांना आपापली बाजू मांडण्याची संधी उपलब्ध करुन दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. विदर्भातील आत्महत्या टी.व्ही. वर किंवा वर्तमानपत्रातून आम्ही वाचत होतो. विदर्भामध्ये आत्महत्या झाल्या नंतर माननीय मुख्यमंत्र्यांकडून किंवा पंतप्रधानांकडून पॅकेज मिळाल्याची बातमी आम्ही वर्तमानपत्रातून वाचत होतो. परंतु आज सभागृहामध्ये बसल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल आणि इतर सन्माननीय सदस्यांचे अनुभव ऐकल्यानंतर खरोखर चिंता वाटत आहे. भारत हा शेती प्रधान देश आहे असे म्हटले जाते. जे पॅकेज देण्यात येते ते शेतक-यांपर्यंत पोहोचले किंवा नाही हे बघण्यासाठी शासनकर्ते कमी पडलेले आहेत. ब-याच वेळा माननीय मंत्री महोदय असे सांगतात की, योजना तयार झाल्यानंतर ती योजना ग्रामीण भागापर्यंत पोहोचविण्यामध्ये आम्ही कमी पडलो. जे पॅकेज दिले जाते ते शेतक-यांपर्यंत पोहोचते किंवा नाही हे बघण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्र शासनाने शेतक-यांना राजासारखे वागण्यासाठी शासनाच्या तिजोरीतील पैसे ज्या अन्य योजना आहेत त्या थांबवून शेतक-यांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी वापरावेत. मोर्चा काढावयाचा असेल तर कोणता नेता, कोणता कार्यकर्ता किती माणसे गोळा करु शकतो याचे पोलीस यंत्रणेकडे अचूक उत्तर असते. त्या नेत्याला प्रिव्हेंटीव्ह मेजर खाली अटक करुन त्यावर मात केली जाते. नागपूरमध्ये मोर्चा निघणार होता त्यावेळी आपण हे बघितलेले आहे. शेतकरी आत्महत्या करणार नाही अशा प्रकारची उपाययोजना कृषि विभागाकडून झाली तर शेतक-यांच्या आत्महत्या थांबतील. शेतक-यांच्या आत्महत्येचे नेमके कारण शोधले पाहिजे. विदर्भ, मराठवाडयामध्ये शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत. हे आत्महत्येचे लोण आता पश्चिम महाराष्ट्रामध्ये आलेले आहे आणि काही वर्षांनी कोकणामध्ये देखील येईल. कोकणामध्ये आपल्याला काही वर्षात आत्महत्या बघावयास मिळतील. त्याचे कारण कोकणामध्ये येणारे हत्ती हे आहे. कर्नाटक राज्यातून कोकणामध्ये हत्ती आलेले आहेत. सिंधुदुर्ग जिल्यातील

...2/-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर ..........

काही तालुक्यांमध्ये हत्ती फिरल्यामुळे शेतीचे नुकसान होत आहे. मागच्या दोन वर्षापासून शासनाने याकडे दुर्लक्ष केलेले आहे. शासनाने शेतक-यांना कोणत्याही प्रकारचे अनुदान दिलेले नाही, नुकसान भरपाई दिलेली नाही.

यानंतर श्री.सुंबरे .........

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उपरकर ....

मात्र अनेक वेळा या सभागृहात आम्ही नुकसान भरपाई देणार म्हणून सरकारकडून सांगितले गेले आणि त्या भरवशावर शेतकऱ्यांनील तत्संबंधीची कागदपत्रे शेकडो रूपये खर्च करून तयार करून शासन दरबारी पाठविली. परंतु `तरीही अद्याप तो भरपाईचा पैसा मिळालेला नाही. बऱ्याचशा शेतकऱ्यांनी कर्जे काढली आहेत आणि ती कर्जे आता फेडता येणार नाहीत म्हणून ते शेतकरी आता चिंताग्रस्त झालेले आहेत. मघाशी या ठिकाणी ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी सांगितले की, शासन आणि शासनातील अधिकारी डोळे झाकून, एसीमध्ये बसून निर्णय घेते पण तेही योग्य प्रकारे घेत नाहीत. सभापती महोदय, कोकणामध्ये हत्तींकडून होणाऱ्या नुकसानीबाबत देखील हेच झालेले आहे. शेतकऱ्यांकडे बंदुकी असल्यातरी आपल्या शेतामध्ये हत्ती आला तर तो त्याला मारू शकत नाही आणि त्या हत्तींमुळे शेतामध्ये जे नुकसान होते त्याची भरपाई देखील मिळत नाही. तेव्हा आपण हत्तींना मारण्याची परवानगी देणार नसाल तर त्यांच्याकडून होणाऱ्या नुकसानीबद्दल भरपाई तरी द्या. पण तीही शेतकऱ्यांना दिली जात नाही. मग त्या बंदुका तरी शेतकऱ्यांकडून काढून घ्या किंवा हत्तींना गोळ्या मारण्यास तरी परवानगी द्या. सभापती महोदय, दुसरे म्हणजे आमच्या कोकणामध्ये मोठ्या प्रमाणात आंबा बागायत होते. या आंबा बागायतीचे निसर्गामुळे नुकसान झाल्यास भरपाई देण्याचे शासनाने कबूल केले. पण ती भरपाई शेतकऱ्यांना मिळण्यास 4-4 वर्षे लागली. 25 टक्के आली, 50 टक्के आली आणि अजून 25 टक्के भरपाई देण्याचे राहिलेले आहे. पाऊस आल्याने शेतकरी खूष होतात, पण आंब्याला चांगला मोहोर आल्यानंतर अवेळी पाऊस पडल्याने तो सारा मोहोर धुवून जातो आणि शेतकऱ्याच्या साऱ्या आशांवर पाणी पडते. आंब्याला चांगला मोहोर आल्यामुळे शेतकऱ्यांनी खाजगी व्यापाऱ्यांकडून त्या आधारे पैसे घेतलेले असतात. परंतु अवेळी आलेल्या पावसामुळे मोहोर गळून जातो आणि त्याचा परिणाम आंबा पिकावर होतो, आंबा कमी येतो. मोहोर चांगला आल्याने आता भरपूर आंबा येणार म्हणून आगाऊ पैसे घेतलेल्या शेतकऱ्यांपुढे आंबा कमी आल्यामुळे पैसे कसे फेडायचे हा प्रश्न उभा राहतो. पुढील वर्षी तरी उत्पन्न येईल की नाही हाही प्रश्न असतो. त्यामुळे कृषी खात्याने या प्रश्नाकडे लक्ष दिले पाहिजे. सभापती महोदय, कोकणामध्ये मच्छिमारीचा व्यवसाय देखील मोठ्या प्रमाणात केला जातो. शेतामध्ये या वर्षी कमी उत्पन्न आले तर शेतकरी पुढील वर्षीच्या पीक चांगले येईल या आशेवर असतो. पण समुद्रात मासे या वर्षी मिळाले नाहीत

...... 5इ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उपरकर .....

तर पुढील वर्षी मिळतील अशी आशाही आता राहिली नाही. गेल्या वर्षी या मच्छिमारांना पॅकेज दिले पण या वर्षी मात्र शासन असे पॅकेज देण्यास असमर्थ ठरले आहे. मच्छिमार आपल्या होड्या घेऊन समुद्रात जातात, भरपूर मासळी मिळेल म्हणून प्रयत्न करतात पण समुद्रात मासेच राहिलेले नाहीत तर त्याला मासे मिळणार कसे ? आणि मग त्या आधारे त्याने जे कर्ज काढलेले असते, होड्यांसाठी, जाळ्यांसाठी म्हणून ते तो फेडणार कसे हा प्रश्न त्याला सतावू लागतो. या मच्छिमारांनी 12-12 लाखाचे कर्ज घेऊन बोटी घेतलेल्या आहेत आणि आता ते कर्ज फेडण्याची चिंता त्यांच्या मागे लागली आहे. परंतु ज्याप्रमाणे शेतीतून पुरेसे उत्पन्न मिळत नाही म्हणून शेतकरी निराश होतो तसाच समुद्रातून मासळी मिळाली नाही तर मच्छिमारसुद्धा निराश होतो आणि या निराशेच्या पोटी आज विदर्भामध्ये ज्याप्रमाणे आत्महत्या होताहेत त्याप्रमाणे कोकणामध्ये होण्यास वेळ लागणार नाही. आज मत्स्य व्यवसायामध्ये अनेक लोक उतरू पाहतात. पण अगोदरच हे मच्छिमार मासळी मिळत नाही म्हणून त्रस्त झालेले आहेत. आपण कशा प्रकारे मच्छिमारी करावी, आपला उद्योग वाढवावा आणि कशा प्रकारे उपजीविका करावी असा प्रश्न त्याला पडलेला आहे. तेव्हा शासनाला या संबंधात काही उपाय योजना मी या निमित्ताने सुचवू इच्छितो. सभापती महोदय, केरळ सरकारने तेथील छोट्या मच्छिमारांना सबसिडीवर रॉकेल दिले आहे. त्या धर्तीवर आपल्याकडे देखील सरकारने छोट्या मच्छिमारांना सबसिडीवर रॉकेल द्यावे. दुसरे म्हणजे 12-12 लाखांचे कर्ज 12 वर्षाच्या मुदतीने या मच्छिमारांनी एनसीडीसी कडून घेतलेले आहे. पण त्यातील बऱ्याचशा मच्छिमारांना व्यवस्थित आणि पुरेशी मच्छिमारी न झाल्यामुळे ते कर्ज फेडता येऊ शकत नाही. तेव्हा त्यांना आपण कर्जाची माफी द्यावी अशी मागणी नाही तर त्यांना कर्जफेडीसाठी 12 वर्षाची मुदत दिली आहे ती वाढवून 15 वर्षांची केली तर हे मच्छिमार ते कर्ज फेडू शकतील. ...

( यानंतर श्री. सरफरे ....5एफ 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर...

जर त्यांनी 12 वर्षामध्ये कर्ज फेडले नाहीतर पूर्ण सबसिडी कर्जामध्ये वर्ग होते. आणि मग कर्जाचा डोंगर वाढतो त्यासाठी आपण उपाय योजना करावी.

सभापती महोदय, कर्नाटक आणि केरळमध्ये पारंपारिक रापण व्यावसायिक आहेत. त्या राज्यांमध्ये मच्छिमारीच्या कालावधीमध्ये प्रति माणसामागे विशिष्ट रक्कम घेतली जाते. आणि ज्यावेळी मच्छिमारी बंद होते त्यावेळी मानधनाच्या रुपामध्ये पेन्शन दिली जाते. अशाप्रकारची योजना आपल्याही राज्य सरकारने राबवावी. जेणेकरुन मच्छिमार त्रस्त झाले आहेत त्यांना आपण न्याय दिल्यासारखे होईल. त्याचप्रमाणे मच्छिमारांच्या अनेक मूलभूत गरजा आहेत. त्यामध्ये त्यांच्याकरीता कोल्ड स्टोअरेजची व्यवस्था शासनाने करावी. ज्यावेळी मच्छिमारी असते त्यावेळी पकडलेली मच्छी डम्प करावी, आणि ज्यावेळी मच्छिला जास्त दर येईल त्यावेळी ती मच्छी विकावी. अशाप्रकारे या भागातील आत्महत्त्यांचे कोकणामध्ये येणारे लोण थांबविण्यासाठी शासनाने उपाययोजना करावी. तसे केले तरच मच्छिमारांना खऱ्या अर्थाने न्याय दिल्यासारखे होईल. मच्छिमारांना एक वर्ष पॅकेज दिले जाते, दुसऱ्या वर्षी दिले जात नाही. ते लोकांपर्यंत, मच्छिमारांपर्यंत पोहोचविण्यासाठी वेगळी उपाय योजना केली पाहिजे. अशाप्रकारची सूचना आपणामार्फत शासनाला करावीशी वाटते. या केलेल्या सूचनांची अंमलबजावणी शासनाने करावी. त्याचबरोबर कोकणामध्ये हत्तीच्या अतिक्रमणामुळे तेथील शेतकऱ्यांना जो त्रास सहन करावा लागत आहे, त्यासाठी योग्य ती उपाय योजना करुन त्यांना न्याय द्यावा अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मला एका गोष्टीचे भान आहे की, या सभागृहामध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर, तसेच माननीय सदस्य सर्वश्री अरुण गुजराथी, पाशा पटेल अशा या क्षेत्रातील दिग्गजांनी या चर्चेमध्ये भाग घेतला. त्यांची भाषणे ऐकल्यानंतर मी आता बोलावयास उभा आहे. सभापती महोदय, विदर्भ आणि मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे लोन आता ठाणे जिल्हयामध्ये येऊन पोहोचले आहे. ठाणे जिल्हयातील वाडा तालुक्यामध्ये श्री. नामदेव कोचरे नावाच्या शेतकऱ्याने आत्महत्या केली. दुसऱ्या एका शेतकऱ्याने त्याच्या 12 एकरातील भात शेतीचे पिक जाळून टाकले. त्याचे कारण त्याने पेरलेले बियाणे खोटे निघाले, रोपे वाढली नाहीत, दाना भरला नाही म्हणून ते पिक जाळून टाकले. शेतकरी आत्महत्त्या कां करतात याविषयी सभागृहामध्ये चर्चा सुरु आहे. मघाशी माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी अनेक कारणे याठिकाणी सांगितली. त्यावेळी शासनाकडून आणि अधिकाऱ्यांकडून वैयक्तिक स्वरुपाची कारणे असल्याचे सांगितले जाते. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे विदर्भ आणि मराठवाडयामध्ये अनवाणी फिरले व त्यांनी शेतकऱ्यांचे दु:ख पाहिले आहे. असाच एक माणूस 100 वर्षापूर्वी युरोपमध्ये फिरत होता. त्याचे नाव एडवीन डर्कीन होते व तो समाजशास्त्रज्ञ होता. 1858 ते 1914 या काळामध्ये तो फ्रान्समध्ये होता. त्याच काळात सरंजाम शाहीकडून औद्योगिक विकासाकडे वाटचाल सुरु होती. त्यामुळे मोठया प्रमाणात युरोप आणि फ्रान्समध्ये शेतकरी आत्महत्त्या करीत होते. त्यावेळी सांगितले जात असेलेले कारण वैयक्तिक होते.घरामध्ये मुलीचे लग्न होत नाही, कुटुंब कबिला अशी अनेक कारणे सांगितली जात होती. 100 वर्षापूर्वी डर्कीनने जे मत नोंदविले होते तेच आज विदर्भामध्ये सांगितले जात आहे. या सर्व घटना वैयक्तिक कारणांमुळे होत असल्या तरी त्यामध्ये सामाजिक कारणे सुध्दा आहेत. त्यामुळे तो आत्महत्त्येसाठी प्रवृत्त होत आहे. विदर्भामध्ये कापूस उत्पादक शेतकरी आत्महत्त्या कां करीत आहे? मोठा शेतकरी आत्महत्त्या कां करीत नाही? माननीय सदस्य श्री. रघुवंशी म्हणाल्याप्रमाणे नंदूरबारमधील शेतकरी आत्महत्त्या कां करीत नाही? आमच्या ठाणे जिल्हयातील वाडा तालुक्यातील कुणबी शेतकरी आहे, तो आत्महत्त्या करणार नाही.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (पुढे सुरु...

ग्रामीण भागात आणि देशभर पाहिले तर आर्थिक विकासाचा दर वेगाने वाढत आहे. त्यातून मध्यम शेतकरी आहे, त्याला वैफल्य आलेले आहे. ज्यांनी मोठी गुंतवणूक करुन कॅशक्रॉप घेतले आहे आणि त्याच्या शेतामध्ये जेव्हा नापीक झाले किंवा अतिवृष्टीमध्ये पीक गेले तर त्यामध्ये त्याला मोठी खोट येते. त्याचे कर्ज वाढलेले असते. त्यामुळे त्याला आत्महत्येशिवाय पर्याय रहात नाही. कर्ज वाढलेले असतानाही प्रतिष्ठेपायी ते अशाप्रकारे कर्ज घेत असतात. शेत नापीक झाल्यानंतर ज्यावेळी त्याच्यावर मजुरी करण्याची वेळ येते तेव्हा तो कावराबावरा होतो, त्यांची कालवाकालव होते व त्यातून आत्महत्या घडत असतात. या प्रश्नाकडे दुर्दैवाने व्यक्तिगत कारण म्हणून पाहिले जाते. या आत्महत्येची शासन कशी दखल घेते हा सगळ्यात महत्वाचा प्रश्न आहे. पॅकेजच्या संदर्भातील उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी केला आणि त्यांनी भीती व्यक्ती केली. मी आंध्र प्रदेशमधील अनुभव सांगतो. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भाने आंध्रमध्ये पॅकेज जाहीर झाले परंतु दोन जिल्ह्यांचा सर्व्हे केला असता शेतकऱ्यांपर्यन्त पॅकेज पोहोचलेच नाही. त्याचा फायदा पुढाऱ्यांना झाला. स्थानिक पुढाऱ्यांकडे स्कॉर्पिओ गाड्या आल्या. स्थानिक पुढाऱ्यांनाचा याचा लाभ झाल्याचे दिसून आले. त्याच्या संबंधित जे लोक होते त्यांच्याकडे अशा प्रकारच्या 400 स्कॉर्पिओ गाड्या आल्या. विदर्भातील शेतकऱ्यांसाठी पॅकेज आले परंतु आत्महत्या थांबल्या नाहीत. आत्महत्या वाढत गेलेल्या आहेत. याला शासनाचे धोरण कारणीभूत आहेत. आर्थिक, सामाजिक कारणे आहेत ती वेगळी आहेत. या सगळ्याच्या मुळाशी राजकीय कारणे आहेत. हे सरकार मान्य करणार आहे की नाही ? हा खरा प्रश्न आहे. याबाबत माननीय कृषी मंत्री विस्ताराने सांगतील. शेतकऱ्यांना त्याच्या पिकाला रास्त भाव मिळाला पाहिजे. आज विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये 3 ते 4 टक्के व्याजाने कर्ज दिले जाते. शेतकऱ्यांना आपण 6 टक्के व्याजाने कर्ज देणार आहोत. कृषीसाठी कर्जपुरवठा करतो त्यामध्ये सुध्दा आपण 3 टक्के, 4 टक्के दराने कर्जपुरवठा का करत नाही ? आपल्या देशाची 60 टक्के अर्थव्यवस्था आजही शेतीवर अवलंबून आहे. त्या शेतकऱ्याला कमी व्याजाने कर्ज पुरवठा का करत नाही ? शेतकऱ्याला रास्त दराने बियाणे मिळाले पाहिजे. परंतु आज बियाणे भेसळयुक्त पुरविले जाते मग त्यामध्ये कापसाचे बियाणे असेल किंवा इतर पिकांचे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री. कपिल पाटील....

असेल ते भेसळयुक्त बियाणे पुरविल्यामुळे पिकाचे उत्पादन होत नाही. बियाणाची खोट हे सर्वात मोठे कारण आहे. दुसरी बाब अशी की, आज कर्जाची वसुली दामदुपटीने केली जात आहे. याबाबतीत "देशोन्नती" या दैनिकामध्ये आकडेवारी आलेली आहे. शेतकऱ्यांकडून दामदुपटीने कर्जाची वसुली झालेली आहे. दुसरे असे की, कर्ज देत असताना भूविकास बँकेचे शेअर्स आहेत ते विकले तर व्याजासह रक्कम मिळेल. त्याबाबतचा रेटा शासनाने ताबडतोब लावावा. शिक्षणमंत्री उपस्थित आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचे उघड्यावर संसार पडलेले आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचा जो भाग आहे तो पिडित भाग आहे. त्या विभागामध्ये वातावरण वेगळे झालेले आहे. त्यामुळे त्या भागातील मुलांची फी माफ करुन शिक्षणाची मोफत सोय करावी. यासाठी शिक्षण मंत्री महोदयांनी मंत्रीमंडळासमोर जाऊन त्यास मान्यता घ्यावी. एवढे दोन-तीन मुद्दे मांडून मी रजा घेतो, धन्यवाद.

---

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सागर मेघे ( नागपूर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, या अतिशय गंभीर विषयावर आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे. सर्व प्रमुख सन्माननीय सदस्यांनी या विषयावर चर्चा केलेली आहे. त्यांनी जे मुद्दे मांडलेले आहेत त्यांची मी पुनरावृत्ती करणार नाही. इरिगेशनचा विषय असो किंवा लोडशेडिंगचा विषय असो या सगळ्या विषयांवर प्रमुख सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. कापूस हे विदर्भातील महत्वाचे पीक आहे. माननीय राज्यपालांकडे ज्यावेळी बॅकलॉग संबंधीची बैठक होती त्या बैठकीला सर्व विरोधी पक्षाचे आमदार हजर होते. मलाही त्या बैठकीला हजर राहण्याची संधी मिळाली. माननीय राज्यपाल त्यावेळी असे म्हणाले की, विदर्भामध्येच आत्महत्त्येचे प्रमाण जास्त का ? गुजरातमध्येही मोठ्या प्रमाणावर कापसाचे उत्पादन होते. गुजरातमध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होत नाहीत. फक्त विदर्भामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होण्याचे कारण काय ? त्याचे महत्वाचे कारण असे सांगण्यात आले की, आपल्याकडील दर एकरी प्रॉडक्शन गुजरातपेक्षा फार कमी आहे. कारण या ठिकाणी सिंचनाची सोय नाही. सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख साहेबांनी सिंचनासंबंधी मुद्देसूद भाषण केलेले आहे. त्यामुळे मी इरिगेशनच्या बाबतीत बोलणार नाही. मला वेगळा मुद्दा मांडावयाचा आहे. आज कापसापासून जे यार्न आणि कापड तयार होते त्यामध्ये आपल्या देशाची मुख्य स्पर्धा चीन बरोबर आहे. आज विदर्भातील कापूस चीनपेक्षा स्वस्त आहे. लेबर चीनपेक्षा स्वस्त आहे. मग कापड महाग का ? त्याचे कारण असे की, चीनमध्ये जी अर्थव्यवस्था आणि जी सिस्टीम आहे त्यामध्ये ज्या ठिकाणी शेतकऱ्यांचा कापूस तयार होतो त्याच ठिकाणी कापसापासून कापडापर्यंत सर्व प्रक्रिया होते. आज विदर्भामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये जवळपास चार ते पाच ठिकाणी कापसाचे लोडिंग आणि अनलोडिंग होते. शेतकरी आपला कापूस बैलगाडीने कलेक्शन सेंटरवर आणतात त्यावेळी त्या कापसाचे अनलोडिंग होते. नंतर तो कापूस जिनिंग प्रेसिंगला पाठविला जातो त्यावेळी परत लोडिंग होते. त्या ठिकाणी कापसाच्या बेल्स तयार होतात. त्या जिनिंग प्रेसिंगच्या ठिकाणी लोडिंग आणि अनलोडिंग होते. त्यांनंतर त्या बेल्स स्पिनिंग मिल्सला पाठविल्या जातात. त्या ठिकाणी परत लोडिंग आणि अनलोडिंग होते. त्या ठिकाणी यार्न तयार झाल्यानंतर त्याचे लोडिंग करुन ते कापडाच्या फॅक्टरीमध्ये जाते. त्या ठिकाणी पुन्हा लोडिंग

...2...

श्री. सागर मेघे ....

आणि अनलोडिंग होते. म्हणजे जवळपास चार ते पाच ठिकाणी लोडिंग आणि अनलोडिंग होते. म्हणजे सात ते आठ वेळा त्या कापसाचे लोडिंग आणि अनलोडिंग होते. त्याचप्रमाणे ट्रान्सपोर्ट लॉसेस होतात. त्यामुळे आज आपले जे कापड तयार होते ते चीनपेक्षा महाग आहे. आज आपण विशेष आर्थिक क्षेत्राबाबत बोलतो. 1 ते दीड लाख कोटी रुपयांची गुंतवणूक त्यामध्ये होणार आहे. विदर्भातील शेतकऱ्यांना खरोखर दिलासा द्यावयाचा असेल. त्यांच्या कापसाला खरोखर भाव द्यावयाचा असेल तर चिनमध्ये ज्याप्रमाणे कापसापासून कापडापर्यंतची प्रक्रिया एकाच ठिकाणी होते त्याप्रमाणे या ठिकाणी ज्या झोनमध्ये कापसाचे उत्पादन होते त्या झोनमध्ये सहकारी तत्वावर अशा प्रकारचे प्रॉडक्शन युनिट टाकले तर आपल्याकडील कापड स्वस्त होईल. कापड स्वस्त झाले तर शेतकऱ्यांच्या कापसालाही जास्त भाव देता येईल. अशा प्रकारचे युनिट आपण विदर्भात आणणार काय ? आज अशी परिस्थिती दिसते की, कापूस विदर्भात उत्पादित होतो आणि सूतगिरण्या पश्चिम महाराष्ट्रामध्ये आहेत. कापसापासून कापडापर्यंत प्रक्रिया होणारे युनिट विदर्भामध्ये आले तर चांगल्या प्रकारचा रोजगार निर्माण होईल तसेच कापसाला चांगला भाव देऊ शकू. आपण व्याजमुक्तीसाठी 750 कोटी रुपये कॉऑपरेटिव्ह बँकेमध्ये जमा केलेले आहेत. डी.सी.सी. बँकामध्ये शेतकऱ्यांनी शेअर्स जमा केलेले आहेत. त्यांचे 22 हजार कोटी रुपयांचे शेअर्स डी.सी.सी. बँकेमध्ये आहेत. त्यातील काही पैसे शासनाने या युनिटमध्ये लावले तर चांगले होईल. नाबार्ड बँक ही शेतकऱ्यांसाठी आहे असे आपण म्हणतो. मला मागच्या वर्षीचा अहवाल वाचावयास मिळाला. नाबार्डने जो एकूण फायनान्स केला त्यातील 84 टक्के फायनान्स हा इन्फ्रॉस्ट्रक्चरसाठी म्हणजे रस्ते, पूल याच्या डेव्हलपमेंटसाठी केला आणि फक्त 16 टक्के खर्च शेतकऱ्यासाठी केला.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ SBT/ MAP/ MHM/ पूर्वी श्री. बरवड 19:55

(श्री. सागर मेघे...

या धोरणाबाबत सर्वांनी विचार केला पाहिजे. यु.के. आणि यु.एस.मध्ये देखील शेतक-यांना सबसिडी मिळते. शेतक-याने उत्पादित केलेल्या तृणधान्य, डाळी आदी मालाचे भाव वाढले तर लगेच शहरातील मंडळी महागाई वाढल्याची ओरड करतात. मग भाव नियंत्रणात रहावेत म्हणून परराष्ट्रातून मालाची आयत होते. परिणामी शेतक-याने उत्पादित केलेल्या मालाला भाव मिळत नाही. याबाबतीत शहरातील लोकांनी देखील मदतीचा हात पुढे केला तर शेतक-याच्या मालाला चांगला भाव मिळू शकेल. दुसरे असे की, शेतक-याला सबसिडी दिल्या शिवाय पर्याय राहाणार नाही. अनेक सन्माननीय सदस्यांनी शेतक-यांना 6 टक्के दराने कर्ज उपलब्ध करुन द्यावे, त्यांचे कर्ज माफ करावे अशा ज्या सूचना केलेल्या आहेत त्याच्याशी मी सहमत आहे. तेव्हा शेतक-यांच्या आत्महत्या थांबाव्यात यादृष्टीने शासनाने तातडीने पावले उचलावीत एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : तालिका सभपती महोदय, आज सकाळ पासून 8 तास शेतक-यांच्या गंभीर प्रश्नावर या सभागृहामध्ये चर्चा सुरु आहे. सदनातील बहुतांश सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केलेले असून त्यांनी काही अपेक्षा व्यक्त केलेल्या आहेत. व्याजाचे दर, कापसाचे भाव, कर्ज माफी यासंबंधी दोन-चार प्रमुख मागण्या सन्माननीय सदस्यांनी केलेल्या आहेत. याठिकाणी कृषीा खात्याचे मंत्री उपस्थित आहेत. त्यांचा कर्जमाफी किंवा कापसाच्या भावाशी काही संबंध नाही. ज्यांचा या गोष्टींशी संबंध आहे असे सहकार मंत्री सभागृहामध्ये नाहीत. या चर्चेला जर शिक्षण मंत्री उत्तर देणार असतील तर ते आम्ही कसे काय मान्य करायचे ? कृषी मंत्र्यांप्रमाणेच सहकार मंत्री देखील सभागृहामध्ये उपस्थित राहाणे आवश्यक आहे. तेव्हा आपण सहकार मंत्र्यांना बोलवावे अशी माझी आपणास विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : तालिका सभापती महोदय, काल पासून विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये शेतक-याच्या गंभीर प्रश्नाविषयी चर्चा होत आहे. नियम 289 अन्वये चर्चा उपस्थित करण्याचा विरोधी पक्षाने आग्रह धरला याचे कारण त्या नियमाखाली मतदान मागता येते आणि विरोधी पक्षाचा तो अधिकार आहे. हा अधिकार वापरण्या पासून विरोधी पक्षाला वंचित करण्यात आले. शेतक-यांच्या आत्महत्येचे गांभीर्य सर्वांना असताना आम्हाला या सदनामध्ये इच्छा नसताना देखील प्रक्षोभक होऊन सीमा पार करावी लागली. त्याबाद्दल आम्हाला आनंद होतोय अशातला भाग नाही. या सदनामध्ये 8 तास चर्चा झाल्यानंतर राज्यातील शेतक-यांच्या हाताशी काही लागणार नसेल तर मग उद्यापासून हे अधिवेशन भरवायचे कशाला ? थातूरमातूर बिले पास करण्यासाठी कि केवळ केलेल्या कराराची अंमलबजावणी करण्यासाठी ? शेतक-यांच्या प्रश्नावर भावनात्मकतेने बोलल्यानंतर काहीही आऊटपूट येणार नसेल तर या चर्चेला काहीच अर्थ राहाणार नाही. या सदनामध्ये माननीय सभापती, उपसभापती देखील नाहीत. मला माहीत आहे की, ते आपल्या दालनामध्ये बसून भाषणे ऐकत आहेत. परंतु त्यांनी सभागृहामध्ये येणे आवश्यक आहे. हे सरकार शेतक-यांना काय समजते ? सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा पटेल हे विव्हळल्या सारखे बोलत होते. ते शेतक-यांच्या वेदना घेऊन येथे आलेले आहेत.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.......

माझे सोडून द्या. याठिकाणी सभागृहाचे नेते सुध्दा आलेले नाहीत. कृषि मंत्री बसले आहेत. सहकार मंत्री कुठे आहेत? 2700 रुपये भाव कापसाला द्यायचा की नाही? 6 टक्के व्याजाची हमी द्यायची की नाही? हे निर्णय मुख्यमंत्री घेऊ शकतात, ते फक्त शब्द देऊ शकतात.

**तालिका सभापती** (श्री.अरविंद सावंत) : सकाळी माननीय विरोधी पक्षनेते बोलत असताना ते मधूनच उत्तर देण्याचा प्रयत्न करीत होते. तेव्हा त्यांनी हेच सांगितले होते की, आता उत्तर देऊ नये. माननीय विरोधी पक्षनेत्यांचे बोलणे होऊ द्या, त्यांचा रिप्लाय देण्याची वेळ येईल तेव्हा द्यावा.

श्री.दिवाकर रावते : आम्हाला ठाम उत्तर मिळणार नसेल तर सभागृह बरखास्त करावे. सभागृहाची बैठक आटोपती घ्यावी किंवा आणखी काही करावे. आम्ही येथून घरी जाणार नाही. इतर सन्माननीय सदस्य घरी गेले तरी मी आमच्या सहका-यासोबत येथेच झोपू.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, गंभीर विषयावर चर्चा सुरु असल्यामुळे मी या सभागृहात दुपारी 2.00 वाजल्यापासून बसलो आहे. अतिशय जिव्हाळयाचा विषय असल्यामुळे कोणीही लाईटली घेऊ नये. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी म्हटल्याप्रमाणे शिक्षण आणि कृषि मंत्री यांनी उत्तर देऊ नये. हा विषय अतिशय गंभीर व जिव्हाळयाने घेतला पाहिजे म्हणून मी बसलो आहे.

श्री.दिवाकर रावते : मी नामदार प्रा.वसंत पुरके यांचे स्वागत करतो. ज्यावेळी मंत्रीमहोदय बोलत असतात ते शासनाचे मत म्हणून बोलत असतात. ते म्हणाले की, शासन फार गंभीर आहे. हा विषय गांभीर्याने घेतला पाहिजे असे सरकारला वाटत असेल तर ज्या अधिकाऱ्यांनी हायकोर्टात ॲफिडेव्हीट करुन 60 वर्षाच्या वृध्द शेतकऱ्याने आत्महत्या का केली याचे स्पष्टीकरण त्याच्या पत्नीचा वियोग झाला, शेजारणीवर त्याचे प्रेम होते म्हणून आत्महत्या केली असे सांगितले. हायकोर्टाने अधिक खोलात चौकशी केली असता 15 वर्षापूर्वीच त्याच्या पत्नीचे निधन झाल्याचे निष्पन्न झाल्याचे आढळून आले. आत्महत्या केली हे सिध्द झाल्याने सरकारने मदत केली परंतु अशाप्रकारे टिंगलटवाळी करुन शेतकऱ्याची कुचेष्टा केली त्या अधिकाऱ्यांबाबत कोणते धोरण व गांभीर्य दाखविले जाणार आहे याचे उत्तर आले पाहिजे. शासन या विषयावर गंभीर आहे त्याची प्रचिती कारवाईमधून यावी अशी विनंती करतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम (सहकार मंत्री) : सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या विषयावर सदनामध्ये जवळपास 8 तास चर्चा झाली. विधानसभेत सुध्दा मला उत्तर द्यावयाचे होते व मंत्रीमंडळाची बैठक सुरु असल्यामुळे मला येण्यास विलंब झाला. या विषयाच्या दृष्टीने राज्य सरकारने पॅकेज जाहीर केले, माननीय पंतप्रधानांनी पॅकेज दिले. ते पॅकेज आपण पूर्णपणाने इम्प्लिमेंट केले तरी सुध्दा हा प्रश्न का सुटत नाही? शेती हा विषय न परवडणारा विषय आहे. शेतकरी नाईलाज म्हणून शेती करतो.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम ....

शेतक-याला दुसरा काही पर्याय नसल्यामुळे तो शेती करीत असतो. शेतीला पाणी, वीज, खते द्यावी लागतात आणि हे सर्व करुन तो जो माल तयार करीत असतो त्या मालाला योग्य भाव मिळणे असे हे सर्कल आहे. शेतक-यांना कितीही पॅकेज दिले आणि किती कर्ज माफ केले तरी हा प्रश्न सुटू शकणार नाही. त्यामुळे या प्रश्नाकडे राजकारण म्हणून न पाहता सर्वांनी यासंदर्भात विचार करण्याची आवश्यकता आहे. आत्महत्या ही बाब शासनाला भूषणावह नाही. शेतक-यांच्या ज्या आत्महत्या होत आहे त्या दृष्टने जर आत्मचिंतन केले तर ते योग्य होईल. शेतकरी आत्महत्या का करीत आहेत यासंदर्भात निरनिराळया संस्थांनी अभ्यास केलेला आहे. शेतक-यांच्या आत्महत्येची कारणे देखील शोधलेली आहेत. आत्महत्येचे मुख्य कारण हे शेतकरी कर्जबाजारी असणे हे आहे. यासंदर्भात केंद्राने 2.5 हजार कोटी रुपये इरिगेशनसाठी दिलेले आहेत. 16.5 हजार कोटी रुपये कॅबिनेटच्या सबकमिटीने दिलेले आहेत, त्यातील 6.5 हजार कोटी विदर्भातील इरिगेशनसाठी मिळणार आहेत. तसेच कोकण, मराठवाडयाचे पूर्णपणे इरिगेशन करण्याच्या दृष्टीनेही शासनाने निर्णय घेतलेला आहे. या ठिकाणी ब-याच सन्माननीय सदस्यांनी शेतक-यांना सहा टक्के दराने कर्ज मिळाले पाहिजे अशी भुमिका घेतलेली आहे. याबाबतीत मी आपल्याला सांगू इच्छितो की, शेतक-यांना 6 टक्के दराने कर्ज देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. परंतु 6 टक्के कर्जाचे कॅलक्यूलेशन मार्च महिन्यानंतरच होणार आहे. यासंदर्भात केंद्रसरकारने 7 टक्के दराने कर्ज देण्याची घोषणा केलेली आहे व महाराष्ट्र शासनाने 6 टक्के दराने कर्ज देण्याची घोषणा केलेली आहे. केंद्राच्या 7 टक्के दराच्या कर्जामध्ये महाराष्ट्र शासन 1 टक्का सबसिडी देणार आहे. यामध्ये नाबार्ड 2.5 टक्के, राज्य बँक अर्धा टक्के तसेच जिल्हा बँक 1 टक्का आणि 3 टक्के सोसायटया कमिशन घेणार आहेत. 11(बी) खाली ज्या बँका तसेच नाबार्डने सुध्दा सांगितले आहे की, यामध्ये आम्ही एक पैसाही देणार नाही. त्यामुळे यासंदर्भात माननीय पंतप्रधान, केंद्रीय कृषी मंत्री, केंद्रीय अर्थमंत्री यांच्याकडे महाराष्ट्र शासनाने 100 टक्के प्रतिपुर्ती करण्यासाठी सातत्याने प्रयत्न केलेला आहे. 100 टक्के प्रतिपुर्ती झाली नाही तर या सोसायटया सरप्लसमध्ये येणार नाहीत. त्यामुळे युपीएचे अध्यक्ष श्रीमती सानिया गांधी यांनी माननीय पंतप्रधान, केंद्रीय अर्थमंत्री आणि केंद्रीय कृषी मंत्र्यांबरोबर बैठक घेतली आणि हे आपल्याला करावेच लागेल अशा

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम ....

प्रकारचा

निर्णय घेतला. परंतु मला हे खात्रीपूर्वक सांगता येत नाही. केंद्रीय मंत्रिमंडळाने हा विषय एक वर्षासाठी मंजूर केलेला आहे. परंतु यासंदर्भातील निर्णय एक वर्षापुरता घेऊन चालणार नाही. तर यासंदर्भात कायमचा निर्णय होण्याची आवश्यकता आहे. कोऑपरेटीव्ह चळवळ कोलमडू नये म्हणून जिल्हा बँका आणि इतर बँका सक्षम व्हाव्यात म्हण्धून वैद्यनाथन समितीने या बँकाचे नुकसान भरुन देण्याच्या संदर्भात सूचना केलेली आहे. यामध्ये 78 टक्के केंद्रशासन व 22 टक्के राज्यशासनाने वाटा ऊचलावयाचा आहे. सहकार चळवळ जगावी म्हणून 100 टक्के प्रतिपुती केली जाणार आहे. यामुळे जो तोटा आहे तो पुर्णपणे भरुन निघणार आहे. शेतक-यांचे केवळ कर्ज माफ करुन चालणार नाही तर शेतक-यांना अजून काय सवलती देऊ शकतो तसेच मालाची उत्पादन क्षमता किती टक्क्याने वाढविता येईल, मालाला योग्य भाव कसा मिळेल या सर्व सर्कलचा आपल्याला विचार करावा लागणार आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम..........

सभापती महोदय, साखरेचा दर पुन्हा एकदा कोलमडला आहे. साखरेचा दर 1400-1500 वर आलेला आहे. कापसाच्या संदर्भात पणन मंत्र्यांना सांगितले आहे की, कापसाच्या भावाबाबत निर्णय घेण्यासाठी एक समिती नेमावी आणि अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घ्यावा. सभापती महोदय, मला या अनुषंगाने सांगावयाचे आहे की, पश्चिम महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आत्महत्या का होत नाहीत ? कारण तेथील शेतकरी फक्त शेतीवर अवलंबून न राहता दुधाचा, पोल्ट्रीचा व वाटल्यास रोहयोच्या कामावर जातो. तेथील शेतकऱ्यांना स्वत:पुढे तीन-चार पर्याय ठेवलेले आहेत. एकूण 75 टक्के लोक शेतीवर अवलंबून आहेत, त्या तुलनेत शेतीचे उत्पन्न फक्त 12 टक्के आहे आणि हे व्यस्त प्रमाण आहे. याठिकाणी फक्त भाषणे करुन वा आमच्याकडून उत्तरे घेऊन काही होणार नाही. शेतकऱ्यांच्या आत्म्हत्या रोखण्यासाठी त्यांना "आर्ट ऑफ लिव्हींग"चा पर्याय सुध्दा दिलेला आहे. शेतकऱ्यांवर एकदम कर्ज फेडण्याचा बोजा पडू नये म्हणून कर्जाचे हप्ते पाडण्यात आलेले आहे. पहिल्या दोन वर्षात शेतकऱ्यांकडून वीस हजार रुपयांपेक्षा कोणतीही वसुली करायची नाही असे सांगण्यात आलेले आहे. त्यावर बॅकांनी सांगितले आहे की, आमची कुवत नाही, आमच्यावर प्रशासक नेमा. नॅचरल जस्टीसच्या दृष्टीने त्यांचे म्हणणे बरोबर आहे. जर बँका आर्थिकदृष्टया सक्षम झाल्या तर याबाबत विचार करता येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या शेअर्सपोटी कापलेल्या रकमेचा प्रथम हिशोब करण्यात यावा. ही रक्कम किती आहे ते सांगण्यात यावे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, बँकांकडे शेअर्सपोटी शेतकऱ्यांची किती रक्कम जमा आणि शेतकऱ्यांवर किती कर्ज शिल्लक आहे याचा आढावा घेण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. पतसंस्था, अर्बन बँक, भूविकास बँक, सेंट्रल बँक यांनी शेतकऱ्यांना फायनान्स करावा असे सांगितलेले आहे. तसेच शेतकऱ्यांना दामदुप्पट देण्याचा निर्णय घेतलेला आहे. शासनाने आता नीवन धोरण स्वीकारलेले आहे. उद्योजकांना भागभांडवल देत असताना त्याचे प्रमाण अन्य भागात 1:5 तर विदर्भात 1:9 देण्याची भूमिका घेतलेली आहे. आम्ही आता 60 हजार विहिरी देण्याचा

डॉ.पतंगराव कदम..........

निर्णय घेतलेला आहे. प्रत्येक तालुक्याला एक हजार विहिरी देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याचप्रमाणे 60 हजार तळी देण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामध्ये प्रत्येक तालुक्याला एक हजार तळी देण्याचा निर्णय घेतलेला आहे. या विहिरी आम्ही रोजगार हमी योजनेमध्ये घेणार आहोत.

यानंतर श्री.पुरी....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम...

यापध्दतीने या प्रश्नाकडे पाहत असताना जोडधंदा म्हणून आपण शेतकऱ्यांना गायी-म्हशी दिल्या, परंतु त्या या उष्णतेच्या वातावरणात टीकणार का ? ते हा धंदा कसा काय करु शकणार ? आज 1700 कोटी रुपयांनी कर्ज वाढलेले आहे. हे सर्व बेसिक प्रश्न आहेत. मला माननीय श्री.पी.के.सावंत साहेबांची आठवण येते, ते कृषि मंत्री असताना आम्ही कोकणामध्ये गेलो. त्यावेळी ते मला म्हणाले की, आपल्याला दुधाचा धंदा करावयाचा आहे. त्यावेळी आपण शेतक-यांना गायी-म्हशी देऊ. आम्ही त्याठिकाणी गेल्यानंतर सभेमध्ये एकाजण उठला आणि म्हणाला की, आपण आम्हाला गायी-म्हशी देणार, परंतु त्याचे दूध कोण काढणार ? हे सर्व आपण करा, असे त्याने सांगितले. त्यासाठी आपल्याला इन्व्हॉल्मेंट तयार करावी लागेल. जोपर्यंत आपण अशा माणसांमध्ये व्हील पॉवर, सगळया इन्व्हॉल्मेंट तयार करणार नाहीत तोपर्यंत असे प्रश्न सुटणार नाहीत. आपण त्यांना कर्ज देतो, सगळे करतो, परंतु हा सगळा मुलामा आहे. त्यांच्यासाठी आपण कायमस्वरुपी उपाययोजना निर्माण केली पाहिजे. आमच्या जिल्हयातील शेतकऱ्यांनी द्राक्षाचे पीक घेतले, त्यानंतर ते आमच्याकडे आले व म्हणायला लागले की, आमच्या मालाला भाव नसल्यामुळे व्यापारी पैसेच देत नाही. त्यावेळी आम्ही त्यास मनुक्याचे पीक घेण्यास सांगितले. आज त्याठिकाणी त्यांनी वाईन पार्क काढलेले आहेत. आज परदेशात लोक दारु पीत नाहीत तर ते वाईन पितात.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांची इच्छा असेल तर आम्ही आपल्या बंगल्यावर येऊन याबाबतीत चर्चा करण्यास तयार आहोत. आपण याठिकाणी कोकणातील गायीपासून नाशिकच्या द्राक्षांच्या गाठीपर्यंत गेलात, परंतु आपण कापसाच्या गाठीवर काहीच सांगितले नाही. 6 टक्के व्याजाच्या संदर्भातील विषय तसाच आहे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मी 6 टक्क्याच्या व्याजासंबंधी सांगितले की, यासंबंधी कॅल्क्यूलेशन चालू असून येत्या 13 तारखेला याठिकाणीच आम्ही सर्व जिल्हा बँकेची आणि एम.डीं.ची बैठक बोलावली आहे. आम्ही जो पैसा घेतलेला आहे, तो आम्ही परत करु. परंतु व्याजाचे दर हा खरीप हंगामापासून 6 टक्क्यांनी दिला जाईल. त्यामध्ये कुठल्याही प्रकारची अडचण राहणार नाही. याबाबतीत केंद्र सरकारने काहीही म्हटले तरी राज्य सरकारच्या वतीने 6 टक्क्यांनी कर्ज देण्याची आमची बांधिलकी आहे.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, कर्जाची मर्यादा वाढविणे आवश्यक आहे.

डॉ.पतंगराव कदम : सन्माननीय सदस्यांची सूचना चांगली असून आपण सध्या 6 टक्के व्याज दराने 3 लाखापर्यंत कर्ज देतो. परंतु याबाबतीत आम्ही निश्चित विचार करु.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी याठिकाणी छातीवर हात ठेऊन माहिती दिली. परंतु याठिकाणी माझ्याकडे क्षेत्रीय ग्रामीण बँकेने श्री.तुळशीराम देवजी आयम, काडोळ यांना पाठवलेले लेखी पत्र आहे. त्या पत्रामध्ये बँकेने स्पष्टपणे त्यांना लेखी कळवले आहे की, "थकीत रक्कमेचे पुर्नःगठन केल्यानंतर आपण धारण केलेली शेती, जिल्हास्तरीय तांत्रिक समितीने जाहीर केलेले दर, हेक्टरी पीक कर्जदार आणि आपली परतफेडीची क्षमता पाहून नवीन पीक कर्ज रु.25 हजार पर्यंत किसान क्रेडीट कार्ड योजनेंतर्गत मंजूर करण्यात येईल."

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

नवीन मंजूर केलेल्या कर्जाचा व्याजदर दरसाल दरशेकडा 9 टक्के राहिल, व्याज आकारणी उचल केलेल्या रकमेवर राहिल. अशा पध्दतीने 9 टक्के व्याजाचे पत्र दिलेले आहे. कर्जाचे पुनर्गठण होणार नाही, अशा प्रकारचे पत्र देखील दिलेले आहे. जिल्हा उपनिबंधकांनी देखील कर्जाचे पुनर्गठण होणार नाही, असे पत्र दिलेले आहे. त्यामुळे शासनाचे नक्की धोरण काय आहे ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, या सर्व प्रश्नांचा आढावा घेण्यात येणार आहे. जे आदेश काढण्यात आलेले आहेत, जे निर्णय घेण्यात आलेले आहेत त्यांची अंमलबजावणी कशा पध्दतीने होते आहे याबाबतची चौकशी करुन निर्णय घेण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी जे प्रकरण या ठिकाणी सांगितले आहे त्याचीही चौकशी करण्यात येईल. अशा पध्दतीने ज्या बँकांचा कारभार होत आहे त्यासंबंधी उपनिबंधकांना सक्त ताकीद देण्यात येईल. त्याचप्रमाणे बँकांचे चेअरमन व कार्यकारी संचालक यांची एक बैठक नागपूर येथे बोलाविण्यात आलेली आहे त्यावेळीही स्पष्ट सूचना देण्यात येतील व यामध्ये कुणी दोषी आढळल्यास त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

---------------

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात (कृषिमंत्री) : सभापती महोदय, विधानपरिषदेमध्ये शेतक-यांच्या आत्महत्येबाबतीतील 8 तासाची चर्चा येथे झाली. या चर्चेची सुरुवात सन्माननीय विरोधी पक्षनेते, श्री.पांडुरंग फुंडकर यांनी केली. मोठया संख्येने सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला. त्यांनी केलेली भाषणे जर पाहिली तर 'अतिशय दर्जेदार चर्चा' असा त्याचा उल्लेख करावा लागेल, असे मला या निमित्ताने वाटते. आत्महत्येचा प्रश्न जसा राज्यात आहे तसाच तो संपूर्ण देशामध्ये सुध्दा आहे. ही चर्चा कधीपासून सुरु झाली याचा विचार केला तर अनेक वर्षांपासून शेतक-यांच्या आत्महत्येची चर्चा देशामध्ये सुरु झालेली आहे. आत्महत्येचे जिल्हे पाहिले तर 38 जिल्हे असे आहेत की ज्यामध्ये याचे प्रमाण जास्त आहे. सन 1995 ते 1999 या कालखंडामध्ये जेंव्हा आम्ही विरोधी पक्ष म्हणून काम करीत होतो त्यावेळी माननीय अध्यक्षांच्या आसनापर्यन्त सुध्दा या प्रश्नासाठी जात होतो आणि आत्महत्येचा जाब सरकारला विचारित होतो, ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. अलिकडच्या कालखंडामध्ये हे प्रमाण वाढलेले दिसत आहे. अशा प्रकारचे वातावरण तयार झाल्याचा कोणालाही आनंद होणार नाही, विरोधी पक्ष असो, सत्ताधारी पक्ष असो, महाराष्ट्र म्हणून जेंव्हा आपण काम करतो त्यावेळी शेतकरी अडचणीत असणे, आत्महत्येपर्यन्त जाणे, ही दु:ख देणारी गोष्ट आहे. या सगळया आत्महत्यांचा विचार करीत असतांना एक महत्वाची गोष्ट सन्माननीय सदस्य, श्री.पाशा पटेल यांनी या ठिकाणी मांडली. पंजाब, आंध्र, केरळ सारख्या संपन्न राज्यात देखील आत्महत्या होत आहेत, त्या कशामुळे होत आहेत ? उलटपक्षी राजस्थान, कच्छचे रण किंवा आपल्या राज्यातील दुष्काळी पट्टा, आदिवासी भाग आहे त्या ठिकाणी आत्महत्येचे प्रमाण दिसून येत नाही. आत्महत्या असतील पण त्या फार कमी आहेत. ही अशी परिस्थिती का आहे ? हा संशोधनाचा प्रश्न आहे. त्याचे निश्चित उत्तर आताच आपल्याला देता येणार नाही. परंतु, त्यामध्ये एक बाब अशी आहे की, आपण सर्व ठिकाणी पहा की, बांधकाम व्यवसाय करणारा हा राजस्थानातील असतो, कच्छमध्ये देखील छोटे छोटे लघुउद्योग सुरु झालेले आहेत. दुष्काळाला जोडधंद्यांचा पर्याय दिल्यामुळे त्यांचे जीवन सुकर झाले आहे. पण दुस-या बाजूला जी राज्ये संपन्न आहेत, राज्यातील जो भाग संपन्न आहे पण तो अडचणीत आहे. याचे कारण त्या ठिकाणी आवश्यक तेवढे जोडधंद्याचे जाळे विणले गेलेले नाही, ही वस्तुस्थितीही नाकारता येणार नाही. आत्महत्येची चर्चा सुरु झाल्यानंतर, राज्य शासनाने पॅकेज दिले, सन्माननीय पंतप्रधानांनी पॅकेज

..3..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात...............

दिले. याचा मी ज्यावेळी विचार करतो त्यावेळी लक्षात आले की, कृषि विभागाच्या अनेक योजना आहेत, त्याशिवाय आत्महत्याग्रस्त भागांसाठी पॅकेजमध्ये जवळ जवळ 33 योजना राबविण्याचा प्रयत्न चाललेला आहे. या शेतक-यांना कशा पध्दतीने मदत करता येईल, याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

यानंतर श्री.बोरले..............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात ..............

सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते विदर्भामध्ये फिरले. मी सुध्दा महिन्यातील 5-6 दिवस निरनिराळया जिल्हयांमध्ये जाऊन शेतक-यांशी संवाद साधण्याचा प्रयत्न केलेला आहे. अधिका-यांशी चर्चा केलेली आहे. हा प्रश्न कसा सोडविता येईल, पॅकेजची अंमलबजावणी चांगल्या पद्धतीने झाली पाहिजे यासाठी आमचे प्रयत्न सुरु आहेत. राज्य शासनाने 1 हजार 75 कोटी रुपयांचे पॅकेज दिले. त्यापैकी 808 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. आता हे पॅकेज 1400 कोटी रुपयांचे झालेले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी असा प्रश्न विचारला होता की, 800 कोटी रुपये चढउतार निधीचे दिले होते. ते शासनाचे पैसे नाहीत. ते शेतक-यांचे पैसे आहेत.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, यासंदर्भामध्ये पणन मंत्री बोलतील. पिकावर लाल्या रोग पडला तर हेक्टरी एक हजार रुपये मदत देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. आता पर्यंत 271 कोटी रुपयांचे वाटप करण्यात आलेले आहे आणि अजून 200 कोटी रुपयांची मागणी आलेली आहे. कर्जावरील व्याज माफ केलेले आहे. त्यामध्ये 239 कोटी रुपये आतापर्यंत खर्च झ ालेले आहेत. 1378 कोटी रुपयांचे पुर्नगठन केलेले आहे. आम्ही पॅकेजमध्ये 60 हजार कुटुंब निवडलेली आहेत. यासाठी आता पर्यंत 50 कोटी रुपये उपलब्ध झालेले आहेत. त्यापैकी आता पर्यंत 16 कोटी 41 लाख रुपये वाटप झालेले आहेत. शेतक-यांसाठी सर्वात जास्त चांगले काम कोणते होऊ शकते याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. शेतक-यांच्या विहिरीवर इलेक्ट्रीक मोटर बसूवन देण्याचा प्रयत्न होऊ शकतो. इलेक्ट्रीक मोटर, पंप आम्ही शेतक-यांना देऊ शकलो तर चांगले होईल, असा आम्ही आग्रह धरलेला आहे. ही कार्यवाही आपल्याला लवकरच होतांना दिसेल. मला आठवते की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि मी सामूहिक विवाह मुहूर्ताला एकत्र होतो. त्यावेळी आम्ही बुलढाणा जिल्हयामध्ये 300 लग्न एका दिवसामध्ये लावली होती. ती सर्व लग्न पॅकेजमध्ये आलेली आहेत. त्याचा चांगला उपयोग झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि मी एकत्र फिरुन सामूहिक विवाहामध्ये सामील झालो होतो. तो विनियोग चांगला झ ाला, हे आपल्याला मान्य करावे लागेल. सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...2/-

श्री.बाळासाहेब थोरात .............

आम्ही 3 कोटी रुपये खर्च करीत आहोत. याचा देखील पॅकेजमध्ये सामावेश आहे. चांगल्या सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून शेतक-यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. आम्ही पीक विमा योजनेची जोखीम 80 टक्क्यांपर्यंत नेली. त्यामध्ये राज्य सरकारचा हिस्सा सर्वात जास्त आहे. पीक विमा योजनेमध्ये 5 वर्षाचे उत्पन्न एकत्र धरुन उंबरठा उत्पादन ठरविले जाते. ज्यावेळी क्रॉप कटींग उंबरठा उत्पादनापेक्षा जास्त होते त्यावेळी विम्याचे पैसे मिळत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. शेतक-याने कापसाचा विमा उतरविला पाहिजे, असा आमचा प्रयत्न आहे. शेतक-याला शासनाकडे काही मागण्याची वेळ येऊ नये यादृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत आणि त्यासाठी विम्याशिवाय पर्याय नाही. वैयक्तिक विमा कसा होईल हा आमचा प्रयत्न आहे. आम्ही केंद्र सरकारकडे चांगल्या पद्धतीने योजना नेण्याचा प्रयत्न करीत आहोत.

यानंतर श्री.सुंबरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

KBS/MAP/KTG/KGS/SBT. श्री.बोरले नंतर --- 20:30

श्री. थोरात ....

1985 सालापासून विम्यासाठी खूप योजना आपण आणल्या. पण अशी एखादी योजना आपल्याला सापडली नाही की, ज्यातून सर्वांगीण मदत होऊ शकेल, ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा निरनिराळे क्रॉप कटिंग घ्यायचे म्हटले आणि सगळी क्रॉप्स घ्यायची म्हटली तर त्यासाठी मग 100 कोटी रूपये खर्च येणार आहे. त्यामध्ये आपण रिमोट सेन्सींगचाही उपयोग करून घेता येऊ शकतो काय हेही पाहिले. तेव्हा अशा प्रकारे विम्या संदर्भात आपण 9 कोटी 66 लाख रूपये खर्च केलेले आहेत. विदर्भामध्ये आपण पाणलोट क्षेत्रे घेतलेली आहेत. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल हे लातूर, उस्मानाबाद क्षेत्रात फिरणारे आहेत. दुष्काळामध्ये 3-4 वर्षे होते आणि त्यात अत्यंत कठीण परिस्थिती होती. त्या काळामध्ये घरात गाडी असणाऱ्या शेतकऱ्याला देखील आपली गाडी विकावी लागली आणि घरातील कुटुंबासह रोजगार हमीच्या कामावर त्याला कामावर जावे लागल्याचेही आम्ही पाहिले आहे. दरवर्षी त्या काळात 100 कोटी रूपये खर्च रोजगार हमीमध्ये झालेला आहे. तो सारा खर्च बहुश: जलसंधारणावर झाला. म्हणूनच मागील वर्षी पाऊ झाला आणि पाणीही वाढले आणि त्याचा परिणाम म्हणून तेथील ऊसाच्या उत्पन्नावर झाले. झालेला ऊस संपेल की नाही अशी परिस्थिती निर्माण झ ाली. तेथील शेतकरी रोजगार हमीच्या कामावर गेले आणि त्यातून जलसंधारणाची कामे केली गेली म्हणून हे झाले हेही कोणाला नाकारता येणार नाही. आपल्याकडे थोडी परिस्थिती वेगळी आहे. टंचाईची परिस्थिती असताना ही सगळी जलसंधारणाची कामे घेतली गेली. तेव्हा आता तर तुम्हाला तुमचे गाव बदलायचे असेल तर जलसंधारणाची कामे केल्याशिवाय पर्याय नाही. म्हणून आम्ही त्यांना तुम्ही आम्हाला मजूर द्या, आम्ही येथे जलसंधारणाची कामे करू असे सांगितले पण कोणी मजूर तेथे कामावर आले नाहीत हेही आपल्याला मान्य करायला पाहिजे. आता आपला प्रयत्न असा आहे की, यापूर्वी आपण दुष्काळ पडल्यानंतर रोजगार हमीच्या माध्यमातून ही कामे घेत होतो आणि त्यामुळे पाण्याचे प्रमाण टिकवून ठेवू शकलो. परंतु आता त्या अगोदरच ही कामे करून पावसाचे प्रमाण वाढविण्यावर आपला भर राहणार आहे आणि त्यासाठी 17 कोटीचा निधी उपलब्ध करून दिला असून 91 लाखाची कामे झाली असून 17 कोटी रूपये मार्च महिन्यापर्यंत खर्च झाल्याचे आपल्याला दिसेल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी बियाणांच्या बाबतीतील एक महत्त्वाचा प्रश्न येथे माडला. पंतप्रधानांच्या पॅकेजमधील बियाणे आहे ते पहिल्या वर्षी, हाती पॅकेज आले आणि लगेचच

....... 5पी 2 ...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. थोरात ....

आपण बियाणे वाटावयास सुरूवात केली. म्हणजेच जे बियाणे आपल्याकडे उपलब्ध होते ते देण्याचा प्रयत्न आपण केलेला आहे. यापुढेही ट्रुथफुल बियाणे तयार होईल तेच आपण देणार आहोत. जमीन, पाणी महत्त्वाची तसेच बियाणे देखील महत्त्वाचे आहे आणि ते देण्याचे काम आपण करीत आहोत. त्यासाठी बीज उत्पादनाचा मोठा कार्यक्रम आपण राबविणार आहोत. त्यामध्ये शेतकरी स्वावलंबी करण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत.

श्री. पाशा पटेल : पण बियाणांच्या बाबतीत, समजा बियाणे खोटे निघाले तर ते विकणाऱ्याला, तयार करणाऱ्याला आपण काय शिक्षा करणार आहात ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या बियाणांच्या संदर्भात आम्ही जास्त महत्त्व या गोष्टीस दिले आहे की, शेतकऱ्याने स्वत:च स्वत:साठी बियाणे तयार करावे. याप्रमाणेक पाच लाख बियाणे आपण स्वत: तयार केले. सरळ हायब्रीड व्यतिरिक्त सारे बियाणे आपण आपले करू शकलो तर त्यातून मोठा प्रश्न सुटणार आहे. नाही तरी पूर्वी शेतकरी स्वत:साठी स्वत:च बियाणे करीत होता. तेच प्रयत्न आताही आपण करीत आहोत. निरनिराळ्या कंपन्यांचे बियाणे बोगस निघते असा अनुभव येतो. पण त्या संदर्भातील कायदा हा केंद्र सरकारचा आहे आणि त्यामुळे त्याबाबतीत आपण काही करू शकत नाही. मग शेवटी आपण संबंधितांना ग्राहक पंचायतीकडे जायला सांगतो. केंद्र सरकारचा हा कायदा बदलण्याचे प्रस्तावित आहे आणि त्यात असे प्रकार झाल्यास भरपाई देण्याची पूर्ण जबाबदारी ही कंपनीने घेतली पाहिजे अशा प्रकारची सुधारणा करण्याची सजेशन आपण त्यांना दिलेली आहे. ...

श्री. दिवाकर रावते : आपण गेल्या अधिवेशनामध्ये देखील हेच सांगितले होते. त्यावेळेसही आपण सांगितले होते की, बियाणे बोगस निघाले तर ते कंपनीने घेतले पाहिजे पण तसे झाले तर...

श्री. बाळासाहेब थोरात : शेवटी हा प्रश्न आज तरी केंद्रीय कायद्याशी निगडीत आहे आणि त्यासाठी आपण त्यांच्याकडे हा कायदा कडक करण्याचा आग्रह धरला आहे. ....

( यानंतर श्री. सरफरे .... 5क्यू 1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात...

हा कायदा आता करावयास घेतला आहे असे नाही तर तो 1994 मध्ये घेतला आहे. मध्ये बराच काळ गेला आहे. सत्ताधारी पक्ष बदलले तरीसुध्दा तो झाला नाही. तेव्हा तो कायदा झाला पाहिजे असा आम्ही आग्रह धरीत आहोत.

श्री. पांडुरंग फुंडकर : याबाबतीत आपण काही कार्यवाही करणार नसाल तर बियाणे विकणाऱ्या कंपन्या अशाच पध्दतीने बोगस बियाणे विकत राहणार.याचे कारण आपल्यावर कुणीही कारवाई करीत नाही याची त्यांना माहिती आहे. मागील वर्षी आंध्र प्रदेशातील एका कंपनीने बोगस बियाणे विकले. त्यामुळे शेतकरी उध्वस्त झाले तरी त्या कंपनीवर काहीही कारवाई झाली नाही. शासनाने शेतकऱ्यांना मदतही केली नाही...

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, शासनाने 2002 मध्ये प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविला होता की, आपण जर कायदा करणार नसाल तर आम्हाला कायद्या करु द्या. परंतु राज्य सरकारचा प्रस्ताव केंद्र सरकारने नाकारला.

डॉ. दीपक सावंत : बियाणे ही कंकरंट लिस्टमधील बाब आहे. The State has got power to make Law.

श्री.बाळासाहेब थोरात : माझे भाषण पूर्ण झाल्यानंतर आपण जर प्रश्न विचारले तर मी आपल्या प्रश्नांची उत्तरे देईन.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा विषय गेल्या तीन अधिवेशनामध्ये सातत्याने येत आहे, आणि आपण त्याला उत्तर देत आहात. यामध्ये सरकार हतबल कां होत आहे? जर घटनेप्रमाणे सर्व काम करावे याकरीता कंकरंट लिस्टमध्ये हा कायदा करण्याचा आपल्याला अधिकार आहे? आपण माहितीच्या अधिकाराचा कायदा केला. श्री. अण्णा हजारेंचे डोक्यावर बसलेले भूत खाली उतरविण्यासाठी आपण कायदा केला. आपल्याला अधिकार नसतांनाही आपण तो कायदा केला. आपला कायदा झाल्यानंतर केंद्र सरकारने कायदा केला. त्यामुळे ॲटोमॅटीक आपला कायदा रद्द झाला. मी बी.टी. बियाण्यासंबंधी लक्षवेधी सूचना आणली होती. आपण त्या बी.टी. बियाण्याची वकिली केली. आपल्या कृषी खात्याने जाहीर केले की,60 टक्के बियाणे बोगस होते. त्या कृषी खात्याने आपला अधिकृत अहवाल दिला. माझे असे म्हणणे आहे की, जर यामुळे शेतकरी उध्वस्त होणार असेल आणि त्याला आपल्याला वाचवावयाचा असेल तर हा कायदा करण्याबाबत आपण पुढाकार कां घेत नाही? बोगस बियाण्याबाबत कंपनीला आज जबाबदार धरले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

जात नसल्यामुळे ते शेतकऱ्यांना फसवीत आहेत. तेव्हा हा कायदा होईपर्यंत जर शेतकऱ्यांचे अशा बियाण्यांमुळे नुकसान झाले तर त्यांना नुकसान भरपाई योग्य पध्दतीने देऊ असे तरी आपण जाहीर करा. आपण शेतकऱ्याला संरक्षण कां देत नाही हे मला समजत नाही?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, सन 2002 मध्ये आम्ही केद्र सरकारला प्रस्ताव पाठविला की, आम्हाला कायदा करु द्यावा. त्या प्रस्तावाला त्यांनी असे उत्तर पाठविले की, तुम्हाला कायदा करता येणार नाही. त्यामुळे आपण पुन्हा केंद्र सरकारला असा कायदा करण्यासंबंधीचा प्रस्ताव पाठवू.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, केंद्र सरकार म्हणजे कोण? कृषी खाते. आज कृषी खाते महाराष्ट्राच्या माननीय श्री.शरद पवार साहेबांकडे आहे. ईकडे आत्महत्त्या होत असल्यामुळे या कायद्याची निंतात गरज आहे. माननीय श्री. शरद पवार साहेब कायदा करीत नाही असे आपण म्हणता काय? गेली दोन वर्षे जर ते हा कायदा करीत नसतील तर ते शेतकऱ्यांचे मारेकरी असे आपल्याला म्हणावे लागेल.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, 1994 पासून हा प्रस्ताव आहे. तेव्हा केंद्रसरकारकडे आम्ही पुन्हा प्रस्ताव पाठवितो. आणि त्यांना सांगतो की, तुम्ही तरी कायदा करा अन्यथा आम्हाला कायदा करण्यास परवानगी द्या.

श्री. दिवाकर रावते : तसा कायदा करण्यासाठी या विधीमंडळामध्ये ठराव आणा.

श्री. बाळासाहेब थोरात : आजच्या चर्चेच्या अनुषंगाने आपण केंद्र सरकारला सूचना करु आणि लवकरात लवकर कायदा करण्यास सांगू. नाहीतर आम्हाला कायदा करण्यास परवानगी द्या असेही त्यांना सांगू. सभापती महोदय, माननीय सदस्यांनी अत्यंत चांगल्या शब्दामध्ये काही गोष्टी मांडल्या आहेत. मागील वेळी सहा जिल्हयांमध्ये साडे सहाशे कोटींचे कर्ज वाटप केले. आणि कालचे आकडे आहेत त्याप्रमाणे खरीप हंगामासाठी 1732 कोटींचे कर्ज वाटप केले आहे.

श्री. दिवाकर रावते : याबाबत आपल्या विभागाकडून योग्य स्टेटमेंट येणे आवश्यक आहे. आपण कोर्टामध्ये प्रतिज्ञापत्राव्दारे जे सांगितले आहे, त्यामध्ये टारगेट किती आणि कर्जवाटप किती ते सांगा?

(यानंतर श्री. किल्लेदार)

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके : मंत्री महोदयांचे भाषण पूर्ण होऊ द्यावे. मधेच सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित करून अडथळा निर्माण करू नये.

श्री.दिवाकर रावते : आत्महत्येच्या घटना सर्वात जास्त यवतमाळमध्ये घडलेल्या आहेत.

प्रा.वसंत पुरके : सन्माननीय सदस्यांना आत्महत्येच्याबाबतीत जेवढी जाण आहे त्यापेक्षा जास्त आम्हाला आहे.

**तालिका सभापती (श्री.अरविंद सावंत )** : सन्माननीय मंत्री महोदय, कृपया आपण आपले उत्तराचे भाषण चेअरला उद्देशून पुढे सुरू ठेवावे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या विषयावर आपण आठ तास चर्चा करत आहोत. आपले उत्पादन कमी असण्याचे कारण या ठिकाणी सिंचन कमी आहे. एवढी धरणे बांधल्यानंतर देखील आपले सिंचन 16 ते 17 टक्केपर्यन्तच पोहोचलेले आहे. अपूर्ण धरणे पूर्ण केली तरी देखील 25 ते 30 टक्क्याच्या वर सिंचन पोहोचू शकणार नाही. विदर्भामध्ये 900 ते 1000 मिली मिटर पाऊस पडतो. दोन पावसामध्ये अंतर पडल्यामुळे पिकाला मार बसतो आणि उत्पादन घटते. ही परिस्थिती सुधारावयाची असेल तर जलसंधारणाची कामे घेणे महत्वाचे आहे. प्रत्येक गावामधील पाणी गावामध्येच अडवून जिरविण्याचे काम केले तर पाण्याच्या उपलब्धतेची शाश्वती निर्माण होईल. एकाच पिकावरील अर्थव्यवस्था सक्षम नसते, दुसरी पिके घेतली पाहिजे. पाण्याची उपलब्धता असेल तर दुसरी पिके घेऊ शकतो. म्हणून जलसंधारणाच्या कामाशिवाय पर्याय नाही. जलसंधारणाच्या कामांना गती देण्याच्या संदर्भात माननीय रोजगार हमी मंत्री आपल्या उत्तरामध्ये सांगतील.

श्री.दिवाकर रावते : जलसंधारणासाठी 20 कोटी रुपये उपलब्ध होऊनही फक्त 92 लाख रुपये खर्च केले, बाकीचा खर्च केला नाही. याबाबत संबंधितांवर काय कारवाई करणार आहात ?

श्री.बाळासाहेब थोरात : विदर्भ पाणलोट मिशन आपण केलेले आहे,त्याचे सर्वेक्षण केलेले आहे, पाणलोट निश्चित केलेले आहे. 91 लाख रुपये खर्च झालेला आहे. 17 कोटी रुपये मार्चपर्यन्त खर्च करावयाचे आहेत. खर्चाच्याबाबतीत जी.आर. कधी निघाला, पैसे कधी आले याचा विचार केला जातो. पावसाळा सुरू झालेला आहे. नदीमध्ये पाणी असेल तर पाटबंधाऱ्याची योजना कशी करता येईल ? पंतप्रधानांकडून पॅकेज आलेले आहे, त्यामधून बंधाऱ्याची कामे सुरू करावी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात (पुढे सुरू...

लागणार आहेत. आता त्याला गती येईल. याबाबत काळजी करण्याचे कारण नाही. 48 टक्के हलकी जमीन आहे. पाण्याची कमतरता आहे. पावसावरच सगळे अवलंबून आहे. उत्पादन वाढवायचे असेल तर रासायनिक खते मोठ्या प्रमाणात वापरावी लागतील, पेस्टीसाईड वापरावे लागतील, हायब्रीड वाण वापरले तर पिकाचे उत्पादन वाढेल. जमिनीचा पोत सुधारायचा आहे. बियाण्यांचा कार्यक्रम घ्यायचा आहे. प्रत्येक गावामधील मातीचे 10 नमुने घ्यावयाचे असे 5 लाख मातीचे नमुने गोळा होणार आहेत. त्या मातीचे परिक्षण करून मातीच्या पोताची वर्गवारी करू आणि प्रत्येक शेतकऱ्याला सॉईल हेल्थ कार्ड देणार आहोत. अशाप्रकारची मोहीम यावर्षी आपण घेत आहोत. बियाणांची मोहीम घेतो, त्याप्रमाणे जलसंधारणाची मोहीम घेत आहोत.

यानंतर श्री.बरवड.....

श्री.बाळासाहेब थोरात (पुढे सुरू....

आपले उत्पादन कमी असण्याचे कारण या ठिकाणी सिंचनाची कमी आहे. एवढी धरणे बांधल्यानंतर देखील आपले सिंचन 16 ते 17 टक्केपर्यन्तच पोहोचलेले आहे. अपूर्ण धरणे पूर्ण केली तरी देखील 25 ते 30 टक्क्याच्या वर आपण पोहोचू शकणार नाही. विदर्भामध्ये 900 ते 1000 मिली मिटर पाऊस पडतो. दोन पावसामध्ये अंतर पडल्यामुळे पीकाला मार बसतो आणि उत्पादन घटते. ही परिस्थिती सुधारावयाची असेल तर जलसंधारणाची कामे घेणे महत्वाचे आहे. प्रत्येक गावामधील पाणी गावामध्येच अडवून जिरविणे हे काम केले तर पाण्याच्या उपलब्धतेची शाश्वती निर्माण होईल. एकाच पिकावरील अर्थव्यवस्था सक्षम नसते, दुसरी पिके घेतली पाहिजे. पाण्याची उपलब्धता असेल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तर दुसरी पिके ते घेऊ शकतात. म्हणून जलसंधारणाच्या कामाशिवाय पर्याय नाही.. जलसंधारणाच्या कामांना गती देण्याच्या संदर्भात माननीय रोजगार हमी मंत्री आपल्या उत्तरामध्ये सांगतील.

श्री.दिवाकर रावते : जलसंधारणासाठी 20 कोटी रुपये उपलब्ध होऊनही फक्त 92 लाख रुपये खर्च केले बाकीचा खर्च केला नाही. याबाबत संबंधितांवर काय कारवाई करणार आहात ?

श्री.बाळासाहेब थोरात : विदर्भ पाणलोट मिशन आपण केलेले आहे त्याचे सर्वेक्षण केलेले आहे, पाणलोट निश्चित केलेले आहेत. 91 लाख रुपये खर्च झालेला आहे. 17 कोटी रुपये मार्चपर्यन्त खर्च करावयाचे आहेत. खर्चाच्याबाबतीत जी.आर. कधी निघाले, पैसे कधी आले याचा विचार केला जातो. पावसाळा सुरु झालेला आहे, नदीमध्ये पाणी असेल तर पाटबंधाऱ्याची योजना कशी करता येईल ? पंतप्रधानांकडून पॅकेज आलेले आहे, त्यामधून बंधाऱ्याची कामे सुरू करावी लागणार आहेत. त्याला गती येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात ...

तीन क्विंटल जर कापूस आला तर कापसाला कितीही भाव दिला तरी ते परवडणार नाही. जर 10 क्विंटल कापसाचे उत्पादन केले तर ते परवडेल. त्यामुळे उत्पादकता वाढविणे आवश्यक आहे. कापसाला भाव मिळाला पाहिजे, आधारभूत किंमत वाढविली पाहिजे. त्यादृष्टीने प्रयत्न करीत आहोत. शेती परवडण्याच्या दृष्टीने उत्पादकता वाढविणे हे सर्वात महत्वाचे काम करण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालू आहे. जलसंधारणाच्या कामासाठी आपण रोजगार हमी योजनेचा उपयोग करुन घेतो. आपण पाणलोट मीशन घेतले. जलसंधारणाच्या बाबतीत केंद्राचीही योजना आहे. त्याचाही उपयोग करुन घेत आहोत. जलसंधारणाचा कार्यक्रम ज्या गतीने चालू आहे त्या गतीने 50 वर्षातही आपण आपले उद्दिष्ट गाठू शकणार नाही ही वस्तुस्थिती आहे. त्याला चळवळीचे स्वरुप कसे येईल यादृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे. मी यामध्ये सन्माननीय सदस्यांच्या सहभागाची अपेक्षा व्यक्त करतो. काही गावांना त्यांनी मुद्दाम पाणलोट क्षेत्र विकासाकरिता पुढे आणले पाहिजे. या क्षेत्रात काही एन.जी.ओ. काम करतात. परंतु विधानसभेचे सदस्य असतील किंवा विधान परिषदेचे सदस्य असतील ते लोक गोळा करु शकतात. ते शासकीय यंत्रणांना बोलवू शकतात, वित्तीय संस्थांना बोलवू शकतात. त्या गावाला पुढे करुन ते काम पुढे नेण्याच्या कामी पुढाकार घेतला तर या कामाला चांगल्या चळवळीचे स्वरुप प्राप्त होऊ शकेल. त्यामुळे सन्माननीय सदस्यांकडून मला सहकार्याची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, दुसरी बाब अशी की, पीक रचनेचा फेरविचार करण्याची आवश्यकता आहे. लोक आता कापसावरुन सोयाबीनवर आलेले आहेत. तुरीचे क्षेत्रही वाढलेले दिसते. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. मानकर यांनी भंडारा आणि गोंदिया जिल्ह्याच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला. त्या ठिकाणी भात या एका पिकावर असणारी अर्थव्यवस्था आहे. ही अत्यंत गरिबीची अर्थव्यवस्था आहे. त्या ठिकाणी इतर पिके कशी घेता येतील यादृष्टीने आम्ही प्रयत्न केला. मी राज्यमंत्री असताना स्वत: गोंदियाला सिंचन परिषद घेतली होती. त्या ठिकाणी बहू पीक पध्दती कशी चालू करता येईल यासाठी प्रयत्न केला. भाताची आताची लागवडीची जी पध्दत आहे त्या पारंपारिक पध्दतीपेक्षा वेगळ्या पध्दतीने भाताची लागवड करण्याचा प्रयोग 200 हेक्टरमध्ये



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाळासाहेब थोरात...

केला. यावर्षी 18 हजार हेक्टरमध्ये त्या पध्दतीने लागवड केली. त्यासाठी खर्च कमी झाला आणि उत्पादकता वाढली. त्यामुळे पिक फेररचना सुध्दा महत्वाची आहे. कापूस असेल, तूर असेल, सोयाबीन असेल, भात असेल याच्याही पलीकडे जाण्याची आवश्यकता आहे. संत्र्याचे एक पीक आहे परंतु त्याला एक्स्पोर्टला फार वाव नाही. आपल्याला फळांची अशी काही पिके घ्यावी लागतील जी ज्या फळांना परदेशामध्ये वाव आहे. आम्ही काही क्लस्टर करु शकतो. आम्ही माती आणि पाण्याचे परीक्षण करु. त्यातून कोणती फळझाडे येऊ शकतील, कोणते क्लस्टर होऊ शकेल हे पाहणे आवश्यक आहे. काही भागामध्ये आपल्याला केशर आंब्याचे क्लस्टर दिसून येते. शिर्डी भागामध्ये 1 हजार एकरवर पेरु दिसतो. सोलापूरमध्ये मोठ्या प्रमाणावर डाळींब दिसतात. या ठिकाणी कोणत्या फळाचे पीक मोठ्या प्रमाणावर घेऊ शकतो आणि त्यावर प्रक्रिया करु शकतो हे पहावे लागेल. निव्वळ ज्वारी, बाजरी, गहू यावर आधारित अर्थव्यवस्था सक्षम होऊ शकत नाही त्यासाठी हॉर्टिकल्चर, फुलांची शेती सुध्दा केली पाहिजे. हा भाग भारताच्या मध्यभागी आहे. त्याचा उपयोग करुन आपला माल सगळ्या देशामध्ये कसा जाईल यादृष्टीने प्रयत्न करावयास पाहिजे. आज नागपूरला चांगली फुले बंगलोरवरुन येतात. आपल्या येथील फुले कलकत्याला, बंगलोरला, दिल्लीला, मुंबईला तसेच परदेशामध्ये गेली पाहिजेत. हे करण्याचा प्रयत्न नॅशनल हॉर्टिकल्चर मीशनमध्ये चालू आहे. या ठिकाणी दुधाच्या बाबतीत सुध्दा सांगण्यात आले. माननीय मंत्रिमहोदय त्याबाबत बोलले. त्यामुळे मी त्यावर बोलणार नाही. कर्जमाफीच्या बाबतीत सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी मुद्दा उपस्थित केला. श्री. मोहन धारिया यांनी उपोषण केले त्याबाबत त्यांनी विचारणा केली. तो विषय कॅबिनेटपुढे चर्चेला येणार आहे. केंद्र सरकारने सुध्दा राधाकृष्णन समितीची नेमणूक केली आहे. त्यामध्ये जो निर्णय होईल तो आपल्याला बंधनकारक राहील हे मी या निमित्ताने सांगतो. कृषी विभागाचे बजेट मर्यादित असल्याबद्दचा मुद्दा उपस्थित झाला. आपल्याकडे 25 ते 30 हजार अधिकाऱ्यांचा स्टाफ आहे. हे एवढे मोठे बजेट आपल्याकडे आहे. त्यांचे सहकार्य घेऊन,

**(सभापतीस्थानी माननीय सभापती )**

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 20:50

श्री. बाळासाहेब थोरात......

कृषी विद्यापीठांचे सहकार्य घेऊन गेले 100 दिवस आम्ही विदर्भामध्ये आत्मनिर्भरता अभियान राबवून शेतक-यांपर्यन्त पोहोचत आहोत. कृषी विज्ञान मंडळ देखील स्थापन होत आहे. शेतक-याला नवीन तंत्रज्ञान अवगत व्हावे आणि शेतीचे उत्पादन वाढावे यादृष्टीने कृषी विभाग प्रयत्न करीत असून आमच्या प्रयत्नाला यश मिळेल आणि यापुढच्या काळात शेतक-यांच्या आत्महत्या निश्चितच कमी होतील अशी अशा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ KGS/ पूर्वी श्री. बरवड 20:50

श्री. हर्षवर्धन पाटील (पणन, रोजगार हमी योजना मंत्री) : सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या प्रश्नावर या सदनामध्ये 8 तास चर्चा झालेली आहे. या प्रश्नासंबंधी कोणकोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत यासंबंधीची माहिती सन्माननीय सहकार मंत्र्यांनी तसेच सन्माननीय कृषी मंत्र्यांनी या सदनाला दिली. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्यांनी भाग घेऊन उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. या 8 तासाच्या चर्चेमध्ये काही वेळ मी सभागृहामध्ये उपस्थित नव्हतो. तरी सन्माननीय शिक्षण मंत्री प्रा.वसंत पुरके यांनी माझ्या खात्याशी संबंधित असलेले मुद्दे मला सांगितलेले आहेत. शेतक-यांच्या आत्महत्या हा विषय तुम्हा आम्हाला न शोभणारा आणि आपणा सर्वांना शरमेने खाली मान घालायला लावणारा आहे. आता हा प्रश्न केवळ राज्यापुरताच मर्यादित राहिलेला नसून संपूर्ण देशामध्ये हा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. या गंभीर प्रश्नावर कोणती उपाययोजना करायची, यापुढे सरकारने कोणती भूमिका घेऊन काम करायचे, हा विषय देखील महत्वाचा आहे. कर्जबाजारीपणा, प्रापंचिक अडचणी, आजारपण अशी आत्महत्येची विविध कारणे असतात. पण या आत्महत्या विशेषत: विदर्भ आणि मराठवाड्याच्या काही भागत होत असल्या तरी राज्याच्या अन्य काही भागात देखील ह्या घटना घडत आहेत. राजकारण आणण्यासारखा हा विषय नाही किंवा शेतक-यांच्या आत्महत्येचा प्रश्न हा विरोधी पक्षानेच उपस्थित करावा आणि सरकारने त्याबाबतीत नकारात्मक भूमिका घ्यावी असा देखील हा विषय नाही. या प्रश्नाबाबत सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची आवश्यकता आहे. सहकार मंत्र्यांनी आणि कृषी मंत्र्यांनी याबाबतीत कोणकोणत्या उपाययोजना करण्यात येत आहेत हे सांगितले. माझ्याकडे पणन आणि रोजगार हमी योजना ही खाती असल्यामुळे मी कापसाच्या तसेच प्रक्रिया उद्योगाच्या संदर्भात जे काही मुद्दे उपस्थित करण्यात आले त्या मुद्यांना उत्तर देणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी कापसाच्या संदर्भात सदनामध्ये आकडेवारी सांगितली. त्यांनी असे सांगितले की, राज्यामध्ये 300 लाख क्विंटल कापसाचे उत्पादन होणार आहे आणि आतापर्यन्त केवळ 45 लाख क्विंटलच कापूस खेरदी केलेला आहे. मी सांगू इच्छितो की, कापूस खरेदीची 123 केन्द्रे सुरु केलेली आहेत. 200 केन्द्रांचा आराखडा मंजूर करुन तो कापूस पणन महासंघाकडे पाठविलेला आहे. कापसाची आजची खरेदी ही सव्वातीन लाख क्विंटलपर्यन्त झालेली आहे. 45 लाख क्विंटल कापूस सीसीआय मार्फत आणि काही खाजगी जिनिंग प्रेसिंगच्या माध्यमातून

..3..

(श्री. हर्षवर्धन पाटील...

खरेदी करण्यात आलेला आहे. कालपर्यन्त ओपन मार्केट मधील भाव शंभर ते दीडशे रुपयांनी कमी झालेले आहेत. इण्टरनॅशनल आणि डोमेस्टिक मार्केटमधील रेट देखील कमी झालेले आहेत. .

नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील.....

आणि त्यामुळे गेल्या दोन दिवसांपासून 50 ते 60 हजार क्विंटल आवक कापूस केंद्रावर यावयास लागली आहे. रोज मागणी येत आहे. दोन्ही सभागृहाच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी अमूक ठिकाणी केंद्र सुरु करावे अशी मागणी केली आहे. येत्या आठवडाभरात 200 केंद्रे आपण सुरु करण्याचा निर्णय केलेला आहे. जवळपास 100 लाख क्विंटलपर्यंत कापूस खरेदी करण्याची तत्वत: व्यवस्था सरकारच्या माध्यमातून केली आहे. यासाठी लागणारी 20 टक्के दुराव्याची रक्कम 400 कोटी रुपये आणि 1600 कोटी रुपयांची पेमेंटची रक्कम उपलब्ध होईल. त्यातील 500 कोटी रुपये पुढील 4 ते 8 दिवसात उपलब्ध होतील. कापूस खरेदी संदर्भात सरकारचे धोरण काय? पणनमंत्री म्हणाले होते 300 क्विंटल कापूस खरेदी केला जाईल. होय, आमचा अंदाज आहे. सॅटलाईट सर्व्हे जो झाला त्यावरुन कृषि खात्याने जी माहिती दिली त्यानुसार 31 लाख हेक्टर क्षेत्र कापूस पिकणाऱ्या एरियामध्ये निर्माण झाले. त्यातून अंदाज आहे की, 3 ते 3.25 लाख क्विंटल कापूस खरेदीसाठी येईल. 100 लाख क्विंटलपेक्षा जास्त खरेदी कापूस पणन महामंडळाकडून होऊ शकणार नाही म्हणून सगळा कापूस खरेदी करण्याच्या संदर्भात धोरण मंत्रीमंडळापुढे मांडले. निश्चितपणे कापूस खरेदीबाबत अडचण येणार नाही. दुसरा प्रश्न भावाच्या संदर्भात आहे. या संदर्भात सरकार फेरविचार करणार का? असा प्रश्न उपस्थित केला. या संदर्भ्ज्ञात माझ्या अध्यक्षतेखाली मराठवाडा, विदर्भ व खानदेशमधील मंत्री, राज्यमंत्री यांची समिती गठित केली आहे. मागील सोमवारी या संदर्भात बैठक झाली. पुढील सोमवारी पुन्हा बैठक आयोजित केली आहे. आमचा हा प्रयत्न आहे, अधिवेशन संपण्यापूर्वी या संदर्भात निर्णय झाला पाहिजे. दोन प्रस्ताव पुढे आले आहेत. भाव वाढवून देणे अशी मागणी आहे आणि दुसरी मागणी दर हेक्टरी काही अनुदान स्वरुपामध्ये आम्हाला मदत द्यावी. या दोन्ही मागण्यांच्या संदर्भात सरकार कशा पध्दतीने निर्णय करेल याची या समितीमध्ये आम्ही चर्चा करीत आहोत. लवकरच निर्णय घेतला जाईल. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना कापसाचा भाव कमी असणे हेही कारण आहे. त्या संदर्भातील धोरण निश्चितपणे अधिवेशन संपण्यापूर्वी आम्ही जाहीर करु आणि जे जाहीर करु त्याची अंमलबजावणी होईल अशा प्रकारचा प्रयत्न निश्चितपणे केला जाईल हे मला सदनाला मुद्दाम सांगावयाचे आहे. 3 टक्के रक्कमेबाबत सन्माननीय विरोधी पक्षनेते म्हणाले की, शेतकऱ्यांना ती रक्कम परत दिली पाहिजे. त्या रक्कमेचे काय केले?

...2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MHM/ KGS/ SBT/ KTG/ 20:55

श्री.हर्षवर्धन पाटील.....

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते कॉटन फेडरेशनचे अध्यक्ष होते. सन्माननीय सदस्य श्री.रावते पणन खात्याचे मंत्री होते. कॉटन फेडरेशनच्या बायलॉजमध्ये तरतूद आहे. कापूस एकाधिकार खरेदी आणि कॉटनचा सगळा विषय संपेल त्यानंतरच भागभांडवलाच्या संदर्भात पैसे परत द्यावे अशी तरतूद आहे. आपण गेल्या वर्षी असा निर्णय घेतला की, विशेषकरुन 3 टक्के रक्कम मागील वर्षानुवर्षे 1994-95 सालापर्यंत पडून आहे. 1995 नंतर रक्कम घ्यायचे बंद केले. पूर्वीच्या काळातील 3 टक्के रक्कम भागभांडवलासाठी कापून घेत होतो ती सगळी रक्कम विदर्भ आणि मराठवाडयातील शेतकऱ्यांची आहे. जवळजवळ 56 लाख शेतकऱ्यांची ही रक्कम आपल्याकडे जमा होती. ती रक्कम साधारणत: 250 कोटीच्या आसपास होते. त्यावर 12 टक्के व्याज देण्याचा आम्ही निर्णय केला. ती जवळजवळ 768 कोटी रुपये इतकी रक्कम झाली आणि जून, 2004 पर्यंत व्याजाची आकारणी केली होती. नंतरच्या दीड वर्षाच्या काळातील 31 मार्च, 06 पर्यंत 112 कोटी रुपये आकारणी करायचे राहिले होते आणि आपण जे व्याज 12 टक्केप्रमाणे दिले ते आपण जून, 2004 पर्यंतचेच व्याज दिले. म्हणून ती रक्कम सुध्दा आपण द्यायचा निर्णय केला. त्या संदर्भात मंत्रीमंडळाने मान्यता दिली. दीड वर्षाचे राहिलेले व्याज आहे ते व्याज सुध्दा आपण शेतकऱ्यांना देण्याचा निर्णय केला. निधी उपलब्ध करुन तातडीने व्याजाची रक्कम देण्याचा निर्णय करु. ही रक्कम देत असताना 100 रुपयाच्या आतील रक्कम चेकने न देता रोखीने देण्याचा निर्णय केला.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील.....

हे काम खरेदी विक्री संघाच्या माध्यमातून करावे लागणार आहे. खरेदी विक्री संघ उर्जित अवस्थेत यावा यासाठी निश्चितपणे प्रयत्न केले जाणार आहेत. कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडून अगोदर 1 रुपया सेस घेतला जात होता परंतु पुन्हा त्यात 50 पैसे घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता परंतु आता पुन्हा 75 पैसे प्रमाणे सेस घेण्याचा निर्णय झालेला आहे. या मार्केट कमिटया मोठया प्रमाणात विदर्भ आणि मराठवाडयातीलच आहेत. त्यांना सक्षम करण्याच्या संदर्भात एक प्रस्ताव आलेला आहे व त्या बाबतीत लवकरच निर्णय घेतला जाणार आहे.

सभापती महोदय, गेल्या वर्षी लाल्या रोग आला होता त्यावेळी कृषी खात्याच्या माध्यमातून नुकसान भरपाई सुध्दा देण्यात आली होती. यावर्षी सुध्दा पुन्हा लाल्या रोग, बोंड न फुटणे तसेच गारपिटीमुळे शेतीचे नुकसान झालेले आहे. यासंदर्भातील माहिती माननीय कृषी मंत्र्यांनी दिलेलीच आहे. आता कापसाचे उत्पन्न वाढत आहे त्यामुळे जिनिंग प्रेसिंगला परवानगी देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. आपल्या राज्यापेक्षा, देशापेक्षा अमेरिका आणि चीनमध्ये कापसाचे उत्पन्न मोठया प्रमाणात निघत असते. परदेशातून जर आपल्याकडे कापसाच्या गाठी आल्या तर अजून वेगळाच प्रश्न निर्माण होऊ शकतो. केंद्रामध्ये आतापर्यंत तीन सव्वातीन लाख क्विंटल कापसाची खरेदी झालेली आहे. आपल्याकडे बन्नी जातीच्या कापसाचे उत्पन्न 2 ते 5 टक्के होते. या कपपसाला 2020 रुपये प्रती क्विंटल भाव दिला जातो. सुपर फाईन कापसाच्या बाबतीत दरपत्रक तयार करण्यात आलेले आहे व त्याची खरेदी पणण महासंघाच्या माध्यमातून केली जाणार आहे. आत्महत्या रोखण्यासाठी प्रक्रिया उद्योग निर्माण करण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात माननीय सहकार मंत्र्यांनी माहिती दिलेलीच आहे तसेच 6 टक्के दराने कर्ज देण्याच्या संदर्भात सुध्दा त्यांनी माहिती दिलेली आहे. 6 टक्क्याच्या कर्जामध्ये सरकार आणि बँका यांच्यामध्येच संभ्रम आहे. या कर्जामध्ये सरकार आणि शेतकरी यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारचा संभ्रम नाही. शेतक-यांच्या मागणी नुसार कर्ज पुरवठा केला जाणार आहे.

सभापती महोदय, नव्या कृषी प्रक्रियेचे नवे धोरण एकास नऊ असे घेतले जाणार आहे. यासाठी सरकारची गॅरंटी राहणार आहे. मोठे प्रक्रिया उद्योग सुरु करण्यापेक्षा 5 कोटी

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील.....

रुपयांपर्यंतच्या प्रक्रिया उद्योग निर्माण करण्याचा तत्वत: निर्णय घेण्यात आलेला आहे.40-50 कोटी रुपयांच्या प्रक्रिया उद्योग घेतले तर ते चांगले चालत नाही यासाठी 5 कोटी रुपया पर्यंत कृषी प्रक्रिया उद्योग सुरु करण्याचा मंत्रिमंडळाने तत्वत: मान्यता दिलेली आहे. ज्या ठिकाणी आत्महत्या होत आहेत त्या ठिकाणी हे उद्योग उभारण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. ज्या ठिकाणी आत्महत्येचे प्रमाण जास्त आहे त्या ठिकाणी को जनरेशनचे प्रस्ताव तयार करण्यात आलेले आहेत.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील.........

त्यातील एक-दोन प्रस्तावास प्रायोगिक तत्वावर परवानगी देण्याचे धोरण स्वीकारत आहोत. हायब्रीड मका, काळी ज्वारी, काळी बाजरी यांची बायोशुगर करण्याचे नवे धोरण स्वीकारलेले आहे. त्यास एन.टी.सी.ने मान्यता दिलेली आहे. विदर्भाच्या बाजूने आवश्यक अशाप्रकारचे धोरण या योजनांमध्ये घेतलेले आहे. सभापती महोदय, सर्वांत महत्वाचा सिंचनाचा प्रश्न आहे. सिंचना शिवाय विदर्भातील अनुशेष भरुन निघणार नाही. त्याठिकाणी मध्यम आणि मोठे प्रोजेक्ट उभे करण्यासाठी पाच-सहा वर्षांचा कालावधी जावा लागेल. आपण कितीही पॅकेज दिले किंवा बाहेरुन कर्ज उभे केले तरी त्यास बराच कालावधी जाणार आहे. त्याशिवाय सिंचनाचा प्रश्न सुटू शकणार नाही. आपल्याला इन्स्टंन्ट इरिगेशन करायचे असेल तर विहिरीं शिवाय पर्याय नाही. त्यादृष्टीने आम्ही पावले उचलली आहेत. सहा जिल्ह्यांमध्ये 64 हजार विहिरी देण्याचा निर्णय घेतलेला आहे. अमरावती 14, यवतमाळ 16, वर्धा 8,वाशीम 6, अकोला 7, बुलढाणा 13 अशा एकूण 64 तालुक्यांमध्ये प्रत्येकी एक हजार विहिरी देण्याचा निर्णय घेतलेला आहे. एका विहिरीचा खर्च 61500 रुपये आहे. त्याप्रमाणे 64 हजार विहिरींसाठी 400 कोटी रुपयांची तरतूद मान्य करण्याचा निर्णय घेतलेला आहे. तसा जी.आर.देखील काढलेला आहे. ही सर्व रक्कम रोजगार हमी योजनेमार्फत देण्याचा निर्णय घेतलेला आहे. दोन महिन्यांच्या आत या विहिरींचे प्रस्ताव प्रशासनाकडून मंजूर होऊन आले पाहिजेत अशाप्रकारचा आपण कार्यक्रम घेतलेला आहे. आपण फक्त विहिरी काढून थांबणार नाही तर या विहिरींवर इलेक्ट्रीसिटी आणि पंप बसविण्याचा देखील विचार चालू आहे. त्याचप्रमाणे कृषि विभागाच्या माध्यमातून बि-बियाणे पुरविण्याचा देखील धडक कार्यक्रम राबविण्याचे ठरविले आहे. या धडक कार्यक्रमामध्ये कोणतीही अडचण येणार नाही.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी सामुदायिक विवाह सोहळ्यास प्रोत्साहन दिलेले आहे. कारण मुलींची लग्न हा देखील त्यांच्या आत्महत्येचे कारण आहे. त्यासाठी आम्ही बजेटमध्ये 5.5 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. या सहा जिल्ह्यांमध्ये आतापर्यंत जवळपास 88 हजार सामुदायिक विवाह झालेले आहेत. आम्ही अनेक गांवामध्ये अनेक तालुक्यांमध्ये अशा चळवळी उभ्या करीत आहोत. ज्यांना मुलींच्या लग्नाचा खर्च करणे परवडत नाही असे शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होतात, त्यांना मदत करण्याची भूमिका घेतलेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील......

पूर्वी सामुदायिक विवाहातील जोडप्यांना भांडी, कपडे, दागिने वगैरे देण्यात येते होते. परंतु आता नवीन जी.आर.काढण्यात आलेला आहे. सामुदायिक विवाह सोहळ्यामध्ये सहभागी होणाऱ्या जोडप्याच्या नावे जॉईन्टली दहा हजार रुपयांचा चेक देण्याचा निर्णय झालेला आहे. ज्या स्वयंसेवी संस्था अशाप्रकारे सामुदायिक विवाह सोहळ्याचे आयोजन करतील त्यांना अनुदान म्हणून प्रत्येक जोडप्यामागे एक हजार रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेतलेला आहे. यामध्ये फक्त एकच अट टाकलेली आहे की, सामुदायिक विवाह सोहळ्यामध्ये कमीत कमी दहा जोडपी असली पाहिजेत. या कार्यक्रमासाठी यावर्षी 6 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. वाटल्यास आणखी जादा अनुदान देण्यात येईल, गरज पडली तर सी.एफ.ॲडव्हान्समधून मदत घेण्यात येईल. या सामुदायिक विवाह सोहळ्यामध्ये सर्व जातीधर्माच्या लोकांना सामावून घेतले जाते. सर्व धर्माची लग्ने लावण्यात येतात. आंतरजातीय विवाहसुध्दा लावले जातात.

सभापती महोदय, संपूर्ण ग्रामीण योजनेच्या कामासाठी 12 जिल्ह्यांसाठी आपल्याला केंद्र सरकारकडून 450 कोटी रुपये मिळाले आहेत. त्या संदर्भात मी आजच दुपारी बैठक घेतली होती. यावर आतापर्यंत 180 कोटी रुपये खर्च झालेले आहेत.आणखी 450 कोटी रुपये मिळालेले आहेत. त्याप्रमाणे आपण धडक कार्यक्रम घेत आहोत.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हर्षवर्धन पाटील...

जे मागासवर्गीय शेतकरी आहेत, त्यामध्ये एस.सी.,चे एस.टी.,चे असतील त्यांच्या शेतीसाठी लागणारी फॅसिलिटी आपण देणार आहोत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा जातीवाद आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, याठिकाणी जातीवादाचा प्रश्न नाही. केंद्र सरकारने जो राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना कायदा केला त्यामध्ये त्यांनी एक सेक्शन असा दिलेला आहे की, यामध्ये जे कोणी मागासवर्गीय शेतकरी असतील, मग त्यामध्ये एस.टी.,चे असतील, एस.सी.,चे असतील व ज्यांनी इंदिरा आवास घरकुलाचा लाभ घेतला असेल अशा शेतकऱ्यांना व्यक्तिगत इरिगेशन करण्याचे काम एमआरईजीएसमध्ये घेता येईल, अशी त्या ॲक्टमध्ये सुधारणा आहे. ही केंद्र शासनाची योजना असून ती योजना आपल्या राज्यातील 12 जिल्हयांमध्ये स्वीकारलेली आहे. अशाप्रकारे त्यांनी आपल्या राज्यामध्ये ती योजना राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे, सभापती महोदय, याठिकाणी रोजगार हमी योजनेसंबंधी प्रश्न उपस्थित करण्यात आले. त्याबाबत मी एवढेच सांगेन की, रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून ज्या भागामध्ये आत्महत्या होत आहेत, त्या परिसरामधील जो भाग मागासवर्गीय आहे, त्याबाबतीत नियम शिथिल करुन अतिशय सुलभ आणि सोप्या पध्दतीने त्या भागामध्ये मोठयाप्रमाणात जलसंधारणाची कामे घेण्याचे धोरण शासनाने स्वीकारलेले आहे. त्यापध्दतीने कृषि खाते आणि जलसंधारण खाते एकत्रितपणे रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून काम करणार आहे. या विभागाकडे फंड उपलब्ध असून यावर्षी 2200 कोटी रुपयांचा बृहत आराखडाही तयार करण्यात आलेला आहे. याबाबतीत पैशाची कुठल्याही प्रकारची अडचण नाही. फक्त याबाबतीत रोजगार हमी योजनेचे काम करण्यासंबंधीची त्या विभागाची मानसिकता बदलण्याची आवश्यकता असून नियमांमधेही बदल करण्याची आवश्यकता आहे. याबाबतीत निश्चितपणे नियम शिथिल करुन या भागाला न्याय मिळेल अशाप्रकारचे धोरण स्वीकारुन सरकारच्या वतीने ज्या ज्या प्रकारे मदत करता येईल ती ती करण्याचा सरकारचा प्रयत्न आहे, एवढेच मी याठिकाणी सांगू इच्छितो. तसेच, राज्यातील आत्महत्या रोखून समाजामध्ये विश्वासाचे वातावरण कसे तयार होईल यादृष्टीने आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करु या, एवढेच मी याठिकाणी सांगू इच्छितो.

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, याठिकाणी मी माननीय कृषि मंत्र्यांना धन्यवाद देऊ इच्छितो की, त्यांनी माझ्या फोनवर आमच्या भागातील शेतकऱ्यांना युरिया खत उपलब्ध करुन दिला. याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा करावा की, गारपीटग्रस्त शेतकऱ्यांसाठी 20 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. परंतु त्यापैकी फक्त 3-4 लाख रुपयांचेच वाटप झाले. उर्वरित रक्कम शासनाने अजूनही दिलेली नाही. याबाबतीत आम्ही जिल्हाधिकाऱ्यांना विचारणा केली असता, त्याठिकाणी असे सांगण्यात आले की, सदरचा निधी फायनान्स विभागाने अडवून ठेवला आहे. त्यामुळे याबाबतीत खुलासा व्हावा.

**सभापती** : याठिकाणी मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, 8 तासामध्ये अनेक प्रश्न मांडून झाले आहेत. सगळयाच प्रश्नांच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांना उत्तर देता येणार नाही. मी याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले, त्याबाबतीत आपण आपल्या विभागामार्फत एक महिन्यांच्या आत याबाबतीत आपण कोणती कारवाई केली हे संबंधित लोकप्रतिनिधींना कळवावे.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, मी सिंधुदुर्ग जिल्हयातील आत्महत्या रोखण्यासंबंधी उपाययोजना सांगितली होती, त्याबद्दल माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या विभागातील हत्तींच्या नुकसान भरपाईसंबंधी व मत्स्य उद्योगाच्या बाबतीत मुद्दे मांडले. तसेच, सन्माननीय सदस्य श्री.अरविंद सावंत यांनीही याबाबतीत आग्रह धरला. त्यामुळे हे सगळे मुद्दे तपासून पाहण्यात येतील व त्याबाबतीत कार्यवाही करण्यात येईल.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, एका तालुक्यामध्ये एक हजार विहिरी देण्याचा निर्णय शासनाने केला आहे. मला असे विचारावयाचे आहे की, भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस कमी होत चालली आहे त्यामुळे आपण पाणी साठवण्यावर लक्ष देणार आहोत की पाणी उपसण्यावर लक्ष देणार आहोत ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, पाणी साठवणे, जिरवणे आणि उपसणे असे सर्कल तयार केलेले आहे, त्यामुळे त्याची काळजी नसावी.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी माझ्या भाषणामध्ये 2/3 मुद्दे या ठिकाणी उपस्थित केले होते. जिल्हा सहकारी बँकांकडून शेअर कपात थांबविणे, 6 टक्के व्याज दर, कापसाला 2700 रुपये भाव किंवा शेतकरी जेवढा कापुस पेरेल तेवढया क्षेत्रासाठी एकरी 2000 रुपये अनुदान, सक्तीची कर्ज वसुली सुरु आहे त्याला स्थगिती, अशा प्रकारचे विषय मी मांडले होते. परंतु, आश्वासनांखेरीज आम्हाला या ठिकाणी काहीही मिळालेले नाही. 8 तास चर्चा करुन आमचे समाधान झालेले नाही.

**सभापती** : या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जे जे मुद्दे उपस्थित केले त्यांची सविस्तर उत्तरे देणे मंत्रीमहोदयांना शक्य होणारे नसल्यामुळे माझी त्यांना विनंती आहे की, सर्वसंबंधितांनी जे मुद्दे उपस्थित केले त्यासंबंधीचे लेखी उत्तर त्यांना 15 दिवसात किंवा महिन्याभरात विभागातर्फे देण्यात यावे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी देखील जे महत्वाचे मुद्दे या ठिकाणी मांडले त्याची नोंद गांभीर्याने घ्यावी.

आता जवळ जवळ 8 तास चर्चा या ठिकाणी झालेली आहे. माननीय मंत्रीमहोदयांनी देखील अतिशय चांगल्या पध्दतीने उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. मला वाटते विदर्भातील शेतक-यांच्या अनुषंगाने अत्यंत महत्वाचा, तिव्रतेचा हा प्रश्न होता. त्या निमित्ताने या प्रश्नांवर बोलत असतांना हा प्रश्न पोटतिडकीने या सदनातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी विशेषत: विरोधी पक्षनेत्यांनी मांडलेला आहे. मला असे वाटते की, यामध्ये जसे विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्येच्या दृष्टीने काही प्रश्न प्रकर्षाने पुढे आले आणि त्यादृष्टीने अनेक उपाययोजना केल्या त्यापध्दतीनेच सन्माननीय सदस्य, श्री.उपरकर यांनी उपस्थित केलेल्या

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मा.सभापती**............

मुद्यासारखेच कोकणातील शेतकरी असतील, दुष्काळी विभागातील शेतकरी असतील, डोंगराळ भागातील शेतकरी असतील त्यांची चर्चा, त्यांचे प्रश्न डोळयासमोर आले तर त्या पध्दतीने त्यांना कशी मदत करता येईल, हेही पहावे.

नियम 97 ची चर्चा येथे समाप्त झाली आहे.

**सभापती** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 8 डिसेंबर 2006 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक 9 वाजून 19 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 8 डिसेंबर 2006 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही